नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास


राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

युगवाणी

फेब्रुवारी – मार्च १९८३





हीरक महोत्सवाचे उद्‌घाटन करताना श्री. विद्याधर गोखले. बाजूला डॉ. आष्टीकर.

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ
पुरस्कृत : विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

संपादक : शरद कोलारकर
कार्यकारी संपादक : प्रकाश देशपांडे

यु ग वा णी

संपादक मंडळ : सु. श्री. पांढरीपांडे,
म. रा. जोशी, वृंदावन देशमुख,
रूपा कुळकर्णी, शंकर वडे, श्रीपाद मुंजे

वर्ष ३९ : अंक ३५–३६ □ फेब्रुवारी–मार्च १९८३ □ वसंत □ अधिक फाल्गुन–निज फाल्गुन □
शके १९०४ □ मूल्य तीन रुपये □

अनुक्रमणिका

निरोप

१९८० च्या मार्च महिन्याच्या शेवटी शेवटी ज्यावेळी माझे मित्र डॉ. मधुकर आष्टीकर यांनी 'युगवाणी'च्या सम्पादनाची जबाबदारी ह्यावेळी मी तुमच्यावर सोपविण्याचा निर्णय घेतला आहे असा निरोप दिला त्यावेळी ही जबाबदारी स्वीकारावी किंवा नाही याबाबत माझ्या मनाची द्विधा अवस्था झाली. त्याला कारणेही अनेक होती. एकतर इतिहासाचा एक अभ्यासक अशी माझी प्रतिमा लोकांच्या डोळ्यासमोर होती आणि साहित्याबद्दलचे माझे प्रेम तितकेसे लोकांना माहित नव्हते. आणि ह्याशिवाय 'युगवाणी' म्हणजे तर मराठीच्या लोकांचे खास क्षेत्र! त्यामुळे आपण ही जबाबदारी स्वीकारल्यास तिचे कसे स्वागत होईल याबाबत मी बराच साशंक होतो. परंतु शेवटी मराठी वाङमयाचा एक डोळस आस्वादक, ह्या नात्याने हा नवीन प्रयोग करण्याला काय हरकत आहे असा धाडसी विचार मनात आला आणि प्रयोग म्हणून ही जबाबदारी स्वीकारण्याचे निश्चित केले. कोणत्याही पदाचे मूल्यमापन शेवटी त्या पदावर कार्य करणारा माणूस कोणते कार्य करून दाखवितो यावर अवलंबून आहे अशी माझी श्रद्धा असल्याने आपण त्यातल्यात्यात बरे कार्य केल्यास आपोआपच लोक आपल्या कार्याला मान्यता देतील असा विश्वास वाटत होता. म्हणून शेवटी ही जबाबदारी स्वीकारली. ह्याचवेळी माझे मित्र प्राचार्य रामभाऊ अयाचित, महेश एलकुंचवार, विश्वास कानडे, सुरेश वखले, माणिक गोडघाटे 'ग्रेस' ह्यांच्याशी ह्या बाबतीत अनेकदा चर्चा करण्याचा योग आला. गेली अनेक वर्षे त्यांच्याशी माझे मित्रत्वाचे संबंध असल्याकारणाने साहित्य संघाबाबतीत जरी त्यांची परस्परविरोधी तीव्र मते होती तरी 'युगवाणी' मी चालविण्याला त्यांची मते मला अनुकूलच दिसली. त्यामुळे माझा आत्मविश्वास द्विगुणित झाला.

माझ्या नेमणुकीच्या मोठ्या संमिश्र प्रतिक्रिया साहित्यिक जगतात उमटल्या. "कुठला कोण हा ?" येथपासून "पुढल्या अंकापर्यंत युगवाणी बंद झाले तर नवल नाही" इत्यादी सर्व प्रतिक्रिया ऐकू येऊ लागल्या. ज्या अनेक लेखकांना, कवींना, संशोधकांना माझी थोडीबहुत माहिती होती त्यांनी तुमच्याकडून बऱ्याच अपेक्षा आहेत अशी पत्रे लिहिली. दलित जगतात मी बराच वावरल्याने त्यांतील नवीन तरुण कवी न विचारताच कविता पाठवू लागले. नाटकाच्या जगताशी बराच संबंध असल्याकारणाने जास्तीत जास्त एकांकिका प्रकाशित करा असा आग्रह होऊ लागला. मराठीच्या मंडळीना 'युगवाणी' हे आपले खास क्षेत्र वाटत असल्याने त्यांच्यात तर साहजिकपणे बरीच खळबळ निर्माण झाली. काहीतर "आम्ही काय हातात बांगडया भरल्या होत्या काय ?" असे विनोदाने मलाच विचारू लागले.

ह्या कोणाच्याही प्रश्नांना उत्तरे देण्याच्या भानगडीत मी अजिबात पडलो नाही. एका प्रतिष्ठित साहित्य-संस्थेचे मुखपत्र असलेल्या युगवाणीत दर्जेदार साहित्य कसे येईल आणि हा दर्जा कसा टिकविता येईल याचाच मी विचार करू लागलो. कारण अडचणी अनंत होत्या. नागपूर–विदर्भातील साहित्यिक युगवाणीबाबत उदासीन होते. युगवाणीची आर्थिक स्थिती तितकीशी ठीक नसल्याने लेखकांना मोबदला देणे शक्य नव्हते. ह्याशिवाय युगवाणीला महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून जे अनुदान मिळत होते त्यांत संशोधन, समीक्षा, टीकालेख यांना जास्त प्राधान्य मिळावे अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती. तर युगवाणीच्या संपादकीय मंडळात युगवाणीने सत्यकथेसारखे केवळ ललित स्वरूप धारण करावे असा मोठा जोरदार विचारप्रवाह निर्माण झाला होता. मला स्वतःला युगवाणीची वाचनीयता वाढावी, परंतु त्याचबरोबर तिचा दर्जा कायम रहावा, केवळ समाजातील मूठभर

बुद्धिनिष्ठांचे ते मासिक बनू नये असे वाटत होते. संशोधन, समीक्षा, टीकालेख, कविता, कथा, एकांकिका, नोंदी ह्या सर्वांचा समतोल साधला जावा असे माझे प्रामाणिक मत होते. त्यातही विदर्भातील नव्या नव्या लेखकांना युगवाणीत स्थान मिळावे असा माझा प्रयत्न होता. वाङ्मयीन नवीन प्रवाहांचे प्रतिबिंब युगवाणीत पडावे असे मला तीव्रतेने वाटत होते. ह्या दृष्टीने मी ज्यावेळी निरनिराळया साहित्यिकांशी प्रत्यक्ष संपर्क साधू लागलो त्यावेळी प्रथमतः मला निरुत्साही वातावरण अनुभवास आले. परंतु हळूहळू परिस्थितीत बदल होऊ लागला आणि मोठा आशावादी प्रतिसाद मिळू लागला.

ह्या दृष्टीने गेल्या तीन वर्षात मी युगवाणीत जे साहित्य प्रकाशित केले त्याची वैशिष्टये नमूद करणे मी माझे कर्तव्य समजतो. युगवाणीचा एप्रिल ८० चा पहिला जो अंक मी काढला तो म्हणजे "सार्त्र विशेषांक". महाराष्ट्रातल्या वैचारिक जगामध्ये हा अंक अतिशय गाजला. अजूनही पश्चिम महाराष्ट्रातून ह्या अंकाची वारंवार मागणी येते याचा मला अभिमान वाटतो. त्यानंतर आत्मचरित्रविषयक एक विशेषांक मी काढला. तोही अंक गाजला. त्यानंतर दिवाळीच्या निमित्ताने आम्ही एक एकांकिका स्पर्धा जाहीर केली. त्यात ज्या एकांकिकांना पारितोषिके मिळाली त्याही एकांकिका सर्वत्र गाजल्या. त्यापैकी अश्विनी घोंगडे लिखित "अनुत्तरित" आणि "चिता ओलीय–घासलेट आणा" ही प्रकाश जोशी लिखित एकांकिका यांचे प्रयोग तर आजही ठिकठिकाणी होतात. श्री. जयंत परांजपे यांनी मूळ हस्तलिखित आणि प्रत्यक्ष कादंबरी यांचा तौलनिक अभ्यास करून "गारंबीचा बापू" आणि "एल्गार" ह्या कादंबऱ्यातील मूळ व्यक्तिरेखा आणि कथावस्तू यांचा पाठपुरावा करण्याचा प्रयत्न केला तो मराठीत प्रथम आणि नवीन प्रयत्न होता. त्यामुळे त्यांच्या लेखांनी अभ्यासकांचे लक्ष वेधून घेतले. "संगीत रंगभूमीची सुरवात : काही शंका, काही उलगडा" हा जो प्रा. भीमराव कुळकर्णी यांनी लेख लिहिला त्यात प्रारंभीच्या काळात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे संगीत नाटकात कसा मनापासून रस घेत असत ही नवीन मनोरंजक माहिती पुढे आल्याने मोठेच कुतुहल निर्माण झाले. "दुसऱ्यांदा देवदास" हा डॉ. द. भि. कुळकर्णी यांचा लेख सुद्धा गाजला. "चक्रधरांचा वध झाला काय ?" हा डॉ. सुरेश म. डोळके यांचा लेख आणि "श्री चक्रधरस्वामींचा वध" हा डॉ. वि. भि. कोलते यांचा लेख हे दोन्ही लेख सर्व महाराष्ट्रात गाजले. किंबहुना विद्वत-क्षेत्रातील ह्या जुगलबंदीने अनेक विद्वानांचे लक्ष्य ह्या विषयाकडे पुन्हा आकृष्ठ झाले आहे. ह्या कालखंडात कविता, कथा, पुस्तक परीक्षणे, नोंदी ह्या महत्त्वाच्या सदरांकडे युगवाणीने आवर्जून लक्ष दिले. कविता–विभागात नवे–जुने, दलित–दलितेतर, तरुण–वृद्ध ह्या सर्वांनी आपली हजेरी लावलेली आपल्याला आढळून येईल. त्यातल्या त्यात कुसुमाग्रम, ना. घ. देशपांडे, शरश्चंद्र मुक्तिबोध, नारायण कुळकर्णी कवठेकर, उत्तम कोळगावकर, गजमल माळी, वा. रा. सोनार, ह्या मान्यवरांचा उल्लेख केल्याशिवाय मला राहवत नाही. नव्यांमध्ये अनंत अमदाबादकर, बब्रन चहांदे, रंजना विगम, उ. रा. गिरी, शंकर बडे, सय्यद अकबर, दे. शि. दुधलकर, सुलभा भानगावकर, शिवा इंगोले, चित्रा पांढरकर, वासन्ती इनामदार, वामन इंगळे, विश्वास कानडे, अशोक थोरात, सुनिल गोपाळ शिनखेडे, प्रतिमा इंगोले, धर्मराज निमसरकर, सुलभा हेर्लेकर –किती जणांची नावे आठवायची ? कथांच्या बाबतीत सुद्धा सुनीती आफळे, सुलभा भानगावकर, वसंत वाहोकर, सुनंदा कविमंडन, बशीर मुजावर, पद्माकर पाटील, वसंत वऱ्हाडपांडे इत्यादी अनेक नामवंतांनी आम्हाला सहकार्य दिले. विदर्भात नवीन नवीन ग्रंथ प्रकाशित होतात परंतु त्यावर जाणत्या आणि रसिक टिकाकारांकडून ग्रंथपरीक्षण न आल्यास लेखक मोठा नाऊमेद होतो. म्हणून मी अनेक प्राध्यापकांना, टीकाकारांना, लेखकांना, कवींना सतत पत्रव्यवहार करून पुस्तक–परीक्षणे लिहिण्यास प्रवृत्त केले. ह्या अंकाच्या शेवटी युगवाणीने ह्या तीन वर्षात काय केले याची सूची मी मुद्दामहून दिली आहे. त्यावरून ह्या तीन वर्षात मी ४१ लेख, १३ संशोधन लेख, ८ विशेष लेख, ११५ कविता, १५ कथा, ४० परीक्षणे ८ एकांकिका, १ लतुत्तम नाटक, ३ प्रवास वर्णने, २ समीक्षा लेख, १ मुलाखत, ६ नोंदी, २ विज्ञान लेख इत्यादी विविध वाङ्मय प्रकाशित करू शकलो. योजनापूर्वक मेहनत घेतल्याने त्याचे फळ म्हणून की काय युगवाणीच्या १९८१ दिवाळी अंकाला महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे विविधज्ञानविस्तार कर्ते कै. रा. र. मोरमकर पारितोषिक प्राप्त झाले याचा मला अभिमान वाटतो.

अनुक्रमणिका

एकूण युगवाणीच्या संपादकपदाचा माझा हा तीन वर्षांचा काळ मला मोठा जिवंत अनुभव देऊन गेला. ह्या तीन वर्षात मला अंतर्गत विरोध सहन करावा लागला त्याचप्रमाणे अनेकांचे लिखाण मला नाकारावे लागल्याने अनेकांचा रोषही पत्करावा लागला. पुष्कळसे कडू-गोड अनुभव आले. विदर्भ साहित्य संघाच्या पदाधिकाऱ्यांनी, कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी मला सहकार्याच्याच भावनेने वागविले हे मी नमूद करू इच्छितो.

माझ्या ह्या संपादकीय कालखंडात विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर आणि साहित्य संघ यांच्याविषयी अनेक विवादाचे प्रसंग निर्माण झाले. परंतु डॉ. आष्टीकरांनी मला युगवाणीच्या संपादनात जे पूर्ण स्वातंत्र्य दिले होते त्यात कधीही ढवळाढवळ केली नाही. कोणताही एखादा लेख युगवाणीत आला पाहिजे किंवा येऊ नये असे त्यांनी मला कधी अप्रत्यक्षपणे सुद्धा सुचविले नाही. ह्या स्वातंत्र्याला मी फार किंमत देतो. याबाबतीत मी डॉ. आष्टीकर यांचा अतिशय आभारी आहे. युगवाणीचे संपादक मंडळ त्यांचाही मी आभारी आहे. विशेषत: श्री. शंकर वडे आणि श्री. वृंदावन देशमुख यांनी मला वेळोवेळी मदत केली त्यांचा मी विशेष आभारी आहे. नागपूरच्या साहित्य-क्षेत्रात मी नेहमीच संपर्क साधून होतो. त्यात माझे स्नेही डॉ. द. भि. कुळकर्णी यांनी मला वारंवार आपुलकीने अनेक सूचना केल्या. त्यांना ज्यावेळी युगवाणीचे अंक आवडले त्यावेळी त्यांनी त्याची जाहिरात रसिकांपर्यंत करण्याला मागेपुढे पाहिले नाही. त्यांचा मी विशेष आभारी आहे. दुसरे माझे स्नेही डॉ. वसंत वऱ्हाडपांडे यांनीही मला वारंवार मौलिक सूचना देऊन उपकृत केले. पश्चिम महाराष्ट्रातल्या अनेक मान्यवर साहित्यिकांनी पत्रे पाठवून युगवाणीचे वेळोवेळी कौतुकच केले. त्यात डॉ. भीमराव कुळकर्णी, प्रा. स. रा. चुनेकर, वि. ह. कुळकर्णी, कै. सोपानदेव चौधरी, भा. ज. कविमंडन. वि. म. कुळकर्णी, उत्तम कोळगावकर, मधु जामकर, महावीर जोंधळे, डॉ. उषा मा. देशमुख, प्र. न. परांजपे, दाजी पणशीकर, श्री. ना. पेंडसे, ह्यांचा विशेष उल्लेख केला पाहिजे. कार्यबाहुल्यामुळे हीरक महोत्सवी युगवाणीचा अंक मी काढू शकलो नाही. त्यामुळे ती जबाबदारी युगवाणीचे कार्यकारी संपादक श्री. प्रकाश देशपांडे यांना सांभाळावी लागली. युगवाणीचे स्वरूप बदलतांना मला नारायण मुद्रणालयाचे चालक श्री. मधुसूदन बनहट्टी आणि श्री. बाळासाहेब बनहट्टी यांची अतिशय मोलाची मदत झाली. त्यांचा मी अतिशय आभारी आहे.

वरील वृत्तांतावरून माझ्या संपादकीय कारकिर्दीत युगवाणीचे अंक सगळेच दर्जेदार आणि वैगुण्यरहित निघाले असा माझा दावा आहे असा वाचकांचा ग्रह होण्याचा संभव आहे. तसा माझा कोणताही दावा नाही हे मी याच ठिकाणी स्पष्ट करू इच्छितो. साहित्य संघाच्या तत्कालीन परिस्थितीत मी युगवाणीचा दर्जा अनेक मर्यादा आणि अडचणी असून सुद्धा उंचावण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला एवढेच माझे म्हणणे आहे. गेल्या तीन वर्षात एकही चांगला लेख सहजपणे पोस्टाने आला नाही हे माझे दु:ख आहे. नव्वद टक्के लेख खास विनंती करून लिहून घ्यावे लागले यात सर्व परिस्थिती वाचकांना स्पष्ट होईल.

आता प्रा. राम शेवाळकर विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष म्हणून निवडून आलेले आहेत. महाविद्यालयीन जीवनापासून त्यांचा माझा परिचय आहे. युगवाणीचे संपादकपद आता श्री. प्रकाश देशपांडे यांच्याकडे आले आहे. ह्या दोघांच्या नेतृत्वाखाली साहित्य संघाची आणि युगवाणीची उत्तरोत्तर प्रगती होवो अशा शुभेच्छा ह्या ठिकाणी व्यक्त करतो.

ज्या ज्या लेखकांनी, संशोधकांनी, कविमित्रांनी, नाटककारांनी, चित्रकारांनी मला सहकार्य दिले त्यांचे मी पुन्हा आभार मानतो. ज्यांचे उल्लेख चुकून राहिले असतील त्यांनी मला उदार मनाने क्षमा करावी अशी प्रार्थना करतो.

शरद कोलारकर
संपादक युगवाणी

△ △ △

नागपूरचे राज्य सन १८३०

सेतुमाधवराव पगडी

आंध्र प्रदेशात. प्राचीन तेलगू, संस्कृत आदि भाषातील हस्तलिखितांचा शोध घेण्याचे काम मोठ्या शिस्तबद्ध रीतीने चालू आहे. राज्यशासनाने हस्तलिखित ग्रंथांची आणि संशोधनाची एक संस्था स्थापन केली असून गेल्या दहाबारा वर्षात ह्या संस्थेने अनेक दुर्मिळ ग्रंथांचे प्रकाशन केले आहे. अर्थात्च जुन्यातील जुन्या तेलगू भाषेतील प्रकाशनांवर अधिक भर देण्यात आला आहे हे सहाजिकच आहे. अशा ह्या प्रकाशित ग्रंथापैकी एका ग्रंथाचा संबंध महाराष्ट्राशी येतो त्याची ही कथा.

एनुगुला वीरस्वामी हा नियोगी पोटजातीचा आंध्र ब्राह्मण, वृत्तीने धार्मिक आणि आचार विचार पाळणारा असला तरी कट्टर कर्मठ आणि संकुचित विचारसरणीचा नव्हे. ह्याचा जन्म इ. स. १७८० च्या सुमारास झाला असावा. वयाच्या बाराव्या वर्षी हा तामिल प्रांतात तिनेवेल्ही येथे बोर्ड ऑफ ट्रेड ह्या सरकारी खात्यात नोकरीस लागला. नोकरी अगदी सामान्य होती. तेथे तीन वर्षे काढल्यावर वीरस्वामी हा इ. स. १७९५ च्या सुमारास मद्रास येथे आला. तो अतिशय बुद्धिमान आणि तडफदार होता. तेलगु आणि तामिळ ह्या भाषांत तर तो प्रविणच होता. ह्याशिवाय तिनेवेल्ही येथे असताना त्याने इंग्रजीचाही चांगलाच अभ्यास केला. घरच्या वातावरणामुळे संस्कृतचेही थोर संस्कार त्याच्या मनावर होतेच. असा हा बहुभाषिक मुलगा मद्रासमध्ये न्यायकचेरीत दुभाषा म्हणून कामास लागला. ह्याच कामात त्याला सतत बढती मिळत गेली. शेवटी तर तो मद्रास येथील उच्च न्यायालयाच्या (सुप्रीम कोर्ट) मुख्य न्यायाधिशांचा प्रमुख दुभाषा म्हणून काम करीत होता. त्याच्या सफाईदार इंग्रजीवर आणि अचूक भाषांतरावर त्याचे वरिष्ठ खूष असत. त्या काळच्या पद्धतीप्रमाणे त्याला मुबलक पगार मिळू लागला आणि येण्याजाण्यासाठी म्हणून त्याला पालखीचा सरंजामही देण्यात आला.

वीरास्वामीचे दिवस असे आनंदात चालले होते. तो वृत्तीने धार्मिक असल्यामुळे इ. स. १८३० मध्ये त्याने काशीयात्रेस जाण्याचा बेत केला. त्या काळात रेल्वे वगैरे प्रवासाची साधने उपलब्ध नव्हती. प्रवास बैलगाड्यातून अगर घोड्यांवर किंवा पालखीमेण्यातून करीत असत. वीरास्वामीनेही असाच माफक लवाजमा बरोबर घेतला. काही घोडे, बैलगाड्या, पालख्या, नोकरचाकर असा लवाजमा घेऊन १८ मे १८३० रोजी त्याने मद्रास सोडले.

वीरास्वामीचा एक घनिष्ट मित्र होता. त्याचे नाव श्रीनिवास पिल्ले. वीरास्वामी हा काशीयात्रेस निघण्यापूर्वी श्रीनिवास पिल्ले ह्यांनी त्याला विनंती केली की "तुम्ही प्रत्येक मुक्कामावरून जे जे तुम्हाला आढळेल त्याची साद्यंत हकीगत मला पत्रांनी कळवीत जा. तपशील कितीही बारीक असला आणि क्षुल्लक असला तरी तो सोडू नका. काशीचा पल्ला लांब आहे. आम्हालाही प्रवासाचे कुतूहल आहे. त्यामुळे तुमच्या पत्रांचा सर्वांनाच मोठा उपयोग होईल." वीरास्वामीने पिल्लेची विनंती मान्य केली. त्याचा काशीपर्यंतचा प्रवास पुढीलप्रमाणे झाला. मद्रास, तिरुपती, कडपा, करनुल, श्रीशैल, हैद्राबाद, निर्मल, आदिलाबाद, धानोरा, वणी, वरोडा, नागपूर, रामटेक, जबलपूर, रेवा, प्रयाग आणि काशी. परतीचा प्रवास पुढीलप्रमाणे काशी, गया, मोंघीर, राजमहाल, कृष्णागर, कलकत्ता, श्राकाकुलम, राजमहेंद्री, मच्छलीपट्टण, नेल्लोर आणि मद्रास.

वीरास्वामीने श्रीनिवास पिल्लेला दिलेले वचन पूर्णपणे पाळले. प्रत्येक मुक्कामावरून तो अगत्य

तपशीलवार पत्रे पाठवीत होता. राजकीय परिस्थिती, सामाजिक व्यवहार, माणसांच्या रीतीभाती, भाषा, आचारविचार, बाजारभाव, धान्ये, फळफळावळे, भाजीपाला, इत्यादींच्या सोयी आणि बाजारभाव, अंतरे, वाहने आणि वहातुकीच्या इतर सोयी. अशी कितीतरी तपशीले त्यांच्या पत्रात आढळतात.

काशीयात्रेहून परत आल्यानंतर आपल्या पत्रांचा संग्रह पाहून 'वीरास्वामीला धन्य वाटले. तोपर्यंत त्यांचा नागपूर येथील मित्र नागापूरी लीलास्वामी याने ह्या संग्रहाचे मराठी भाषांतर करून ठेवले. ते प्रकाशित झाले किंवा नाही त्याबद्दल आपल्याला काहीच माहिती नाही असे प्रस्तावनाकार म्हणतात. मलाही वीरास्वामीचे प्रवास वर्णनांचे मराठी भाषांतर पहाण्यास मिळाले नाही.

प्रस्तावनाकार असेही म्हणतात की ह्या मराठी भाषांतरावरून नागपूर येथील इंग्रज रेसीडेंण्ट ह्याने इंग्रजी भाषांतर करून घेण्याची तयारी दाखविली. पण वीरास्वामीने त्याला लिहिले की " आपणच ह्या पत्रांचे इंग्रजी भाषांतर करीत आहोत." वीरास्वामीने काही प्रकरणांचे इंग्रजी भाषांतर केले आहे असे म्हणतात. पण आजतरी ते भाषांतर उपलब्ध नाही.

वीरास्वामी हा ३–१०–१८३६ रोजी मरण पावला. श्रीनिवास पिल्लेच्या वंशजांकडून तेलगू पत्रांचा संग्रह आंध्र शासनाने मिळविला आणि प्रसिद्ध केला. इतकेच नव्हे तर ह्या संग्रहाचे इंग्रजी भाषांतर बारकाईने संपादित करून आंध्र शासनाने प्रसिद्ध केले आहे. हा ग्रंथ आंध्र प्रदेश गव्हर्मेंट ओरीअंटल मॅन्युस्क्रीप्ट लायब्ररी आणि रिसर्च इन्स्टीटयूट अफजलगंज हैद्राबाद ५०००१२ येथून प्रकाशित झाला आहे (इ. स १९७३).

वीरास्वामीचा प्रवास झाला तो वऱ्हाड आणि नागपूर प्रांतातून. ८ ऑगस्ट १८३० रोजी तो आंध्र प्रांतातील आदिलाबाद जिल्ह्यातून निघून वऱ्हाडातील वणी (यवतमाळ जिल्हा) येथे पोहोचला. त्यावेळी वणी तालुका हा निजामाच्या राज्यात होता. वणीहून निघून तो वरोड्याला (बाबा आमटे ह्यांच्यामुळे प्रसिद्ध झालेले गाव) (चंद्रपूर जिल्हा) आला. तेथून तो १४–ऑगस्टला नागपूरला आला. येथून तो रामटेक,डोंगरगांव इत्यादी स्थळे करीत पुढे जबलपूरकडे गेला. त्याकाळी नागपूर मध्ये भोसल्यांचे राज्य होते. त्यामुळे वीरास्वामीला आपल्या प्रवासात जे काही निदर्शनास आले आणि जे त्याने लिहून ठेवले ह्याला १८३० च्या विदर्भाचा राजकीय आणि सामाजिक आलेख असे म्हटल्यास वावगे होणार नाही. अज्ञानावर आधारलेली माहिती बऱ्याच ठिकाणी अपुरी वाटण्यास संभव आहे. त्या आंध्र ब्राह्मणाचा कर्मठपणाही आणि त्याच्या तुलनेने दिसून येणारा महाराष्ट्रीयांचा भोजनादी व्यवहारातील स्वैरपणा वाचकांच्या डोळ्यात भरल्या शिवाय रहात नाही. पण वरील प्रवासवृत्तातील लहान सहान दोष वगळूनही असे म्हणावे लागेल की वीरास्वामीचे ह्या प्रवास वर्णनामुळे इ. स. १८३० चा विदर्भ आपल्या डोळ्यासमोर उभा राहतो. ह्या दृष्टीने हा ग्रंथ महाराष्ट्राच्या १९ व्या शतकातील राजकीय आणि सामाजिक इतिहासाच्या साधनग्रंथात महत्वाचा म्हणून समजण्यास हरकत नाही.

ह्या लेखात वीरास्वामीच्या ग्रंथातील विदर्भातील प्रवासवृत्तापुरते मराठी भाषांतर दिले आहे.

८ ऑगस्ट १८३०

रविवारी ८ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजता मी मागील मुक्कामाहून निघालो आणि १० मैलांचा प्रवास करून ११ वाजता वणी येथे पोहोचलो. वाटेत चार लहान खेडी लागली. इकडे जमीन काळी चोपणाची आहे (Black Clay). खाली मात्र खडकाचा थर आहे. वरच्या थरावर मात्र चिखलच चिखल आहे. वाटेत बरेच ओढे ओलांडावे लागले. वाटेत दाट जंगल लागले. पण रस्ता खडकाळ नव्हता. वणी म्हणजे मोठे आणि सुधारलेले खेडे म्हणता येईल. ह्या गावात दहा देवळे आहेत. येथे धनिक लोकांची बरीच घरे आहेत. ब्राह्मणांचीही वस्ती आहे. धान्यादी वस्तु येथे उपलब्ध आहेत. ह्या गावात सरकारी अधिकारी राहतात. गावात पाण्याची सोय आहे. गावातील घरे मोठी आहेत. मी व्यंकटेश्वराच्या मोठ्या देवळात उतरलो. माझ्या वहानातील जनावरे, पालख्या वाहणारे भोई, शिपाई, पहारेकरी इत्यादींना राहण्यासाठी जवळच जागा मिळाली. ह्या गावात पुरेशा चावड्या, कोठड्या, (मळग्या) मशिदी आणि आशूरखाने आहेत. त्यामुळे मला तंबूत राहण्याची आवश्यकता वाटली नाही. ह्या गावात नाण्यांची अदलाबदल करून घेणे

बरे. गावाच्या परिसरात चिखल नाही. जमीन रेताळ आहे. हे गाव एका नदीच्या काठावर आहे. निजामाच्या राज्यात कलेक्टर अगर तत्सम अधिकार गाजवलेले अधिकारी आणि काही परदेशी (इंग्रज) ह्यांनी ह्या गावात घरे बांधली असून ते येथे राहतात. इंग्रज ह्या ठिकाणी कलेक्टर कसे ह्याचे कारण असे– निजामाचे स्थानिक अधिकारी आणि जमिनदार ह्यांच्याकडून महसूलाचा भरणा समाधानकारक होईना. दिवाण चंदुलाल (हैद्राबादचा) ह्याने विचार केला की इंग्रजांना तालुक्यावर नेमले तर ते महसूलाची वसुली व्यवस्थितपणे करू शकतील. त्यांनी आपल्या रेसीडन्सचा सल्ला घेतला आणि आपल्या अमलदारांना साह्य करण्यासाठी इंग्रजांच्या नेमणूका करविल्या. हे इंग्रज निजामाच्या अधिकाऱ्यांच्या बरोबरीने ह्या राज्यात काम करीत होते. पण ह्याचा परिणाम असा झाला की स्थानिक अधिकाऱ्यांना मोगलाई आणि दंडेली गाजविता येईना. हतबुद्ध होऊन त्यांनी हा प्रश्न चंदुलालपुढे मांडला. परिणाम असा झाला की रेसीडण्टने इंग्रज अधिकाऱ्यांना परत बोलावून घेतले. इंग्रजांच्या न्यायी वागणूकीचा अनुभव लोकांना आला होता. त्यांचा अंमल पुन्हा सुरू व्हावा ह्याची लोक प्रार्थना करीत आहेत. कृष्णा नदी ओलांडल्यावर पेंटीला नावाच्या खेड्यात मी एक मोठे देऊळ पाहिले होते. त्याचे मुखमंडप विस्तीर्ण होते (सभामंडप). त्या नंतर असे देऊळ माझ्या प्रवासात पाहण्यात आले नाही. येथे (वणी) मात्र तशा प्रकारचे देऊळ माझ्या पाहण्यात आले. ह्या रात्री मी येथे मुक्काम केला आहे.

९ ऑगस्ट १८३०

९ तारखेस सोमवारी सकाळी नऊ वाजता मी निघालो आणि १२ मैलांचा प्रवास करून दुपारी १२ च्या सुमारास वरोडा येथे पोहोचलो. कालच्या प्रवासातील मार्गाप्रमाणेच आजचा मार्गही काळ्या मातीचाच होता. मला एक नदी ओलांडावी लागली. ह्या नदीचे नाव वर्धा आहे. ह्या नदीला वसिष्ठा असेही म्हणतात. पेणगंगा नदीप्रमाणेच मी ह्या नदीतून ओबडधोबड नावेतून (ट्रक) पार झालो. वाटेवर मला शिवाला आणि इतर काही खेडी लागली. वर्धा ही हैद्राबाद राज्याची हद्द आहे. ह्या नदीच्या पलीकडच्या काठापासून नागपूर राज्याची दुसरी हद्द सुरू होते. आजच्या प्रवासात मला जंगल आढळले नाही. रस्त्याच्या दुतर्फा मोकळी मैदाने होती.

नागपूरचे सर्व राज्य (वरोड्यासहित) प्रथम काही दिवस इंग्रजांच्या अमलाखाली होते. त्यामुळे गोऱ्या लोकांना हवे ते सामान उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्येक खेड्यात एक पट्टेवाला नेमण्यात आला आहे. ह्या पट्टेवाल्यांच्या आणि इतर लोकांच्यामुळे प्रवाशांना माफक किंमतीत त्यांना लागणाऱ्या वस्तू मिळतात. वरोडा हे गाव म्हणजे एक वाढलेले खेडे म्हणावे लागेल. येथे आवश्यक असे सामान उपलब्ध आहे. पाण्याची सोय आहे. ब्राह्मणांची वस्ती आहे. ह्या गावाला कसंबा म्हणावे लागेल. कायर ह्या गावापासून पुढे तेलगू भाषेचा वापर क्वचितच होतो. ब्राह्मण आणि इतर जमाती महाराष्ट्र (मराठी) बोलतात. येथे तेलगू कोणालाच येत नाही. हिंदुस्थानी आणि तुर्क भाषा (उर्दू) ह्यांचा सर्वसाधारण वापर होतो. गोदावरीच्या उत्तर तीरापासून पुढे एक गोष्ट लक्षात आली ती ही की सामान्यपणे लोक आणि त्यातल्या त्यात उच्चवर्णीय दिवसातून एकदाच जेवतात. एवढ्याने त्यांचे पोट भरत नाही. रात्री ते फराळ म्हणून पोहे खातात. दुसऱ्यांदा जेवण येथे आक्षेपार्ह समजतात. आपल्याकडे मुले आजारी आणि संस्कारहीन लोक तिसऱ्यांदा जेवले तर वाटेल तसे.

शनिवारी मी चौकशी केली की पंचांगाप्रमाणे आश्वाईन महिन्यात राशी कोणती? आमच्या प्रदेशात कावेरी पाक सिद्धांतीचा प्रचार आहे. त्यावरून आश्वाईन महिन्यात सिंह राशीचा प्रारंभ झाला असावा असे वाटते. पण सिद्धांतीमध्ये सिंह रास ह्या पूर्वीच सुरू झाली असे म्हटलेले बरोबर वाटत नाही.

पूर्वेकडील दुष्काळ टाळण्यासाठी म्हणून जे लोक इकडे आले आहेत तेच तेवढे तेलगू बोलतात. पूर्वेकडील (आंध्र) भागातून अनेक ब्राह्मण आणि वैश्य येथे स्थायिक झाले आहेत. रात्रीसाठी मी एका ब्राह्मणाच्याकडे मुक्काम केला. पुढील मुक्कामात माझ्या पालख्या प्रवाशांच्या बंगल्यात ठेवण्यात आल्या होत्या.

१० ऑगस्ट १८३०

मंगळवारी सकाळी ५ वाजता मी निघालो आणि १६ मैलांचा प्रवास करून मी नागेरी ह्या गावी

पोहोचलो. चिकणी गावापर्यंतचा मार्ग हा काहीसा रुंद होता. वाट मात्र काळया मातीतून होती. मागील प्रवासाप्रमाणे वाटेत चिखल भरपूर होता. चिकणीनंतर देखील काळी मातीच आहे. पण जमिनीच्या प्रतीमुळे येथे चिखल लवकर वाळतो. ह्यामुळे प्रवास सुकर होतो. वाट चढ उताराची आहे आणि मार्गात बरेच ओढे लागतात. नागवी हे गाव म्हणजे लहान खेडे आहे. ह्या गावात प्रशस्त सभामंडप असलेले रूक्मी विठोबाचे एक देऊळ आहे. ब्राह्मणांची वस्ती आहे. प्रवाशांना सर्व वस्तू आवश्यक अशा मिळतात. येदुलाबाद (आदिलाबाद) पासून पुढे येथपर्यंत कोरडवाहू जमिनी आहेत. बागाइत किंवा भातशेती निवडक ठिकाणी आढळतात. गुरा-ढोरांपासून रक्षण व्हावे म्हणून रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या शेतांना काटेरी कुंपणे घालतात. चिखलामुळे हे काटे आणि चिखल ह्यांचो सरमिसळ होते. मी ह्या गावी रात्री मुक्काम केला.

११ ऑगस्ट १८३०

बुधवारी सकाळी ६ वाजता मी निघालो आणि १४ मैलांचा प्रवास करून दुपारी १२ वाजता मंडू ह्या ठिकाणी येऊन पोहोचलो. वाटेत मला हिंगणघाट जवळ वेद्या नदी ओलांडावी लागली. मागील प्रवासाप्रमाणे ही नदीही ओवडघोबड नावातून पार करावी लागली. प्रवासात १०-१० मैलांवर ही नदी लागली. ह्या ठिकाणी व्यापारी मोठ्या प्रमाणात मीठ आणतात. आणि आसपासच्या लोकांना विकतात. श्रीमंत लोकांनी बांधलेले बरेच वाडे येथे दिसून येतात. येथे नाण्यांची अदलाबदल करण्यात येते. कापड, औषधे इत्यादी वस्तु येथे मिळतात. ज्या वाटेनी मी आलो ती वाट मागील प्रवासातील चिकीनी आणि नागिनी ह्या गावप्रमाणे वाटेतच होती. वाटेत अनेक ओढे ओलांडावे लागतात. मंडू गाव हे वाढलेले खेडेच. प्रवाशांना आवश्यक अशा वस्तू येथे मिळतात. येथील घरे मात्र प्रशस्त आणि मोकळी नाहीत. येथे ब्राह्मणांची वस्ती आहे. काल प्रवासात आढळलेल्या देवळाप्रमाणे एक देऊळ आहे.

आज गोकुळ अष्टमीचा दिवस आणि म्हणून मी एका मारवाड्याच्या लहान दुकानात उतरलो. देवळा-तील उत्सवामुळे मला एका मारवाड्याच्या दुकानात उतरावे लागले.

१२ ऑगस्ट १८३०

गुरुवारी सकाळी ६ वाजता मी निघालो आणि १० मैलाची मजल मारून १० वाजता चिंडी ह्या खेड्यात आलो. मार्ग कालच्या मार्गासारखाच आहे. वाट चढउताराची आहे आणि अनेक ओढे ओलांडावे लागतात. चिंडी हे कसब्याचे ठिकाण आहे. सुधारून वाढलेले गाव. येथे आवश्यक वस्तू मिळतात. ब्राह्मणांची घरे आणि चावड्या येथे आहेत. मी येथे कचेरीच्या चावडीत उतरलो. येथे वाटेतील प्रत्येक खेड्यात आठवड्यातून एकदा बाजार भरतो. ह्या बाजारात जवळपासच्या खेड्यातून सामान विकण्यासाठी आणतात. आज बाजाराचा दिवस होता आणि अनेक वस्तू विक्रीला मिळतात. ह्यात भाजीपाला, पाने आलीच. मी ह्या गावी रात्री मुक्कामाला राहिलो.

१३ ऑगस्ट १८३०

शुक्रवारी सकाळी ६।। वाजता निघून मी १६ मैलांचा प्रवास केला आणि १२।। वाजता गुणगाव येथे पोहोचलो. रस्ता पूर्वीप्रमाणेच काळ्या मातीनी आणि दगडांनी भरलेला आहे. सुरवातीचे ८ मैल टाकळघाटपर्यंत कोरडी जंगले आहेत. टाकळघाट येथे ओढा ओलांडावा लागतो. ती लहानशी नदीच आहे. ओढा कसला. येगुलाबाद (आदीलाबाद)च्या पुढे सरकावे तो प्रत्येक खेडे ओढ्याच्या काठावरच आहे. इकडे मोठे तलाब दिसत नाहीत. खेड्यांच्या गरजा ओढ्यातील पाण्याने मुबलकपणे भागविल्या जातात. टाकळघाटच्या पुढचा मार्ग सपाट आहे. तो खडकाळ नाही. जंगलेही आढळत नाही. गुणगाव हे कसब्याचे ठिकाण आहे. नागपूरच्या राजाच्या नात्यातील भिका-बाई ह्या नावाच्या बाईच्या नावे जहागीरीचे गाव आहे. हे गाव नागपूरपासून जवळ आहे. ह्या गावातील लोक आणि अधिकारी मोठ्या तोऱ्याने वागताना आढळतात. ह्या वाढलेल्या खेड्यात सर्व वस्तू विकत मिळतात. गावाच्या मधोमध स्वच्छ पाण्याचा ओढा आहे. गावात एक देऊळ, एक धर्मशाळा आणि ब्राह्मणांची वस्ती ह्या आढळून येतात. धर्मशाळा सडकेच्या कडेला असून त्याच्या सभागृहाला बरेच मोठाले खांब आहेत.

बाहेरून येणाऱ्या प्रवाशाला एक गोष्ट येथे आढळून येते. येथे ब्राह्मणसुद्धा दृष्टिदोषाचे पालन करीत नाहीत. रस्त्यावर माणसे चालली असली तरी त्यांच्या समोरच ते स्वैंपाक करतात आणि जेवतात.

जेवताना इतर ज्ञातीच्या लोकांना पंक्तीत समोर घेऊन हे ब्राह्मण बोलता बोलता जेवत असतात. ब्राह्मण आणि इतर जातीचे लोक एकाच पंक्तीत पण वेगवेगळे बसून जेवण्याची चाल येथे आढळून येते. इकडील पद्धत म्हणजे 'मन्येव मनुष्याणाम् कर्माणाम् बंधमोक्षैव' ह्यास अनुसरून दिसते. ह्यात प्रकृती आणि निवृत्तीचा समावेश दिसतो.

मला ही जागा प्रशस्त वाटली नाही. ब्राह्मणांची वस्ती फारच गजबजलेली दिसली. जागाही प्रशस्त नव्हती. येथील स्थानिक पद्धतीप्रमाणे येथील ब्राह्मण इतर जातींच्या लोकांकडून पाणक्याचे काम करून घेतात. मी माझे तंबू ओढयाच्या काठावर लावले आणि रात्री तंबूतच राहिलो. टाकळघाटपर्यंत बरीच खेडी आहेत. पण मुक्कामाला योग्य नाहीत. लोक घरे बांधतात पण त्या घरांच्या एकाच भागात पक्क्या मातीची बांधणी असते. ती कुटुंबासाठी. घराच्या वरच्या मजल्यावर गच्ची असते. तेथे जाण्यासाठी शिडी तरी लावतात नाहीतर जिना बांधतात. गेदुलाबादपर्यंत घरांना कौले वापरतात. ती आपल्याकडे पाण्याच्या पन्हाळयाच्या कौलाराप्रमाणे दिसतात. येथून पुढे मात्र तिकडील घरांची कौलारे आपल्याकडील पक्क्या घरांच्या कौलाराप्रमाणे चौकोनीच पण थोडी बाकदार असतात.

१४ ऑगस्ट १८३०

शनिवारी १४ तारखेस सकाळी ७ वाजता मी निघालो आणि ८ मैलाचा प्रवास करून मी १० वाजता नागपूर येथे पोहोचलो.

नागपूर

नागपूर पर्यंतचा हा प्रवास काळ्या मातीतून आणि जंगलातून झाला. रस्ता खडकाळ नाही. कुठेही दृष्टी फेकली तरी दिसेल तेथपर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूला जमीन सपाटच आहे. नागपूरच्या जवळ नागुलेरू नावाचा ओढा ओलांडावा लागतो.

सितावर्डी

सितावर्डी हा नागपूर मधील एक भाग होय. येथे रेसीडेण्ट (इंग्रज) राहतो. त्यांचा वाडा एका बागेच्या मध्ये आहे. त्या वाडयाभोवती अनेक घरे, दुकाने आणि बागा आहेत. येथील पोस्ट ऑफीसमध्ये वीरास्वामी मुदलियार नावाचा मद्रासचा एक रहिवासी कामावर आहे. हैद्राबाद मध्ये असताना तेथील ओमीसारोएट मॅनेजर रामस्वामी ह्यांचे मला जसे सहाय्य मिळाले तसेच येथे वीरास्वामी मुदलीयारची मदत मिळाली. त्याच्या सहायाने मला मोतीबागेत एका बागेमध्ये एक सोयीचा बंगला राहाण्यास मिळाला.

नागपूर राज्याची माहिती

नागपूर राज्य पूर्वीपासून कोंडाराजलू (डोंगरी-राज्य) डोंगरीराजे. (वीरास्वामीला गोंड राजे म्हणावयाचे आहे, ह्यांच्या अंमलाखाली होते. ह्या राजांचा तळ जंगलात असे. डोंगर आणि किल्ले ह्यांच्या बळावर ते राज्यांचा उपभोग घेत असत. ते प्रवाशांनाही आपल्या राज्यात येऊ देत नसत. त्यांची वागणूक दोन पायांच्या जनावरासारखी असे. २०० वर्षापूर्वी राजा शाहू ह्याने पुण्याच्या श्रीमंतांना हे राज्य दिले. बुधोजी (वीरास्वामीला रघोजी किंवा मुधोजी म्हणावयाचे असावे)चे पूर्वज राजा शाहूचे नातेवाईक होते. बुधोजीच्या पूर्वजांनी नागपूरच्या भोवतालचा प्रांत जिंकला. हळूहळू कोंडाराजू (गोंडराजे) ह्यांना संपूर्णपणे जिंकून घेण्यात आले. नवीन राज्याची राजधानी नागपूर येथे स्थापन करण्यात आली.

तंजावर

राजा शाहूच्या घराण्यातील एक शाखा दक्षिण भारतात गेली. तिने तंजावर जिंकून घेतले आणि तेथे राज्य करण्यास सुरवात केली. शाहूच्या ह्या घराण्याला भोसला म्हणतात. शाहूच्या राजधानीचे नाव सातारा आहे. दिल्लीच्या बादशहाची मुलगी ही शाहूच्या प्रेमात पडली. त्याच्याशी लग्न लावावे अशी तिची इच्छा होती. पण बादशहाने शाहूचा वध केला. (संभाजीबद्दलची दंतकथा वीरास्वामीच्या कानावर आलेली दिसते) बादशहाच्या मुलीने नंतर शाहूच्या मुलाचा संभाळ केला. आणि तिच्या पाठिंब्याने त्याला साताऱ्याचे राजपद मिळाले. ह्या नंतर त्यांच्या वंशजांपैकी एकाला मूलबाळ नव्हते त्यामुळ ते राज्य राजाच्या आश्रित ब्राह्मणाला देण्यात आले. इकडे कोंडराजूंना (गोंडराजे) जिंकून घेण्यात आले होते. राजाने (साताऱ्या) ठरविले की ज्या ब्राह्मणाला राज्य देण्यात आले त्याची चाकरी सर्वांनी करावी. त्याच ब्राह्मणाला श्रीमंत म्हणतात (अपुऱ्या माहितीतून विकृत कथा बनतात त्या अशा). राज्य कारभाराविषयी

आणि भक्कम राज्य निर्माण करण्याविषयी बुधोजीची ख्याती अशी बुधोजीचा बाप रघोजी ह्याला आणखी मुले होती. आणि राज्य मुलांच्यामध्ये वाटले गेले. बुधोजीने नागपूर येथे आपली राजधानी केली. एका भावाची राजधानी चांदा ही झाली. आणि इतर दोघा भावांपैकी एकाची राजधानी रत्नपूर (बिलासपूरजवळ) आणि दुसऱ्याची नंदीग्राम अशा होत्या. बुधोजीच्या काळात इंग्रज ह्या राज्यात शिरले. बुधोजीच्या मुलांच्या राजकारणात त्यांनी ढवळाढवळ केली. त्या मुळे त्यांना महत्व प्राप्त झाले. नवीन राजधान्या स्थापन केलेले काही राजपूत मारले गेले. काही दग्यामुळे ठार झाले. शेवटी सर्व राज्य आप्पासाहेब नावाच्या इसमाच्या ताब्यात आले. इंग्रजांना राज्यांतून बाहेर काढण्यासाठी त्याने प्रयत्नांची शिकस्त केली पण त्याला ते जमले नाही. तो आता निर्वासित आहे. आणि अज्ञातवासात असूनही सर्व अर्थाने निरुपयोगी झाला. इंग्रजांनी त्या नंतर राज्याचा कारभार केला. रघोजीच्या मुलीचा मुलगा त्यावेळी लहान होता. तो काही महिन्यापूर्वी सज्ञान झाला. इंग्रजांशी झालेल्या तहाच्या अटी अनुसरून त्याला राज्य देण्यात आले आहे. ह्या मुलाचे नाव रघुजी आहे. तहाच्या अटीप्रमाणे त्याने ईस्ट इंडीया कंपनीला दरवर्षी ९ लाख रुपये द्यावयाचे आहेत.

मागील काळी ह्या राज्याची हद्द पूर्वेकडे कटकपर्यंत, दक्षिणेकडे वर्धा नदीपर्यंत पश्चिमेकडे, पुण्यापर्यंत आणि उत्तरेकडे जबलपुरपर्यंत होती. ईस्ट इंडीया कंपनीने रघुजीशी मतभेद असल्याचे निमित्त करून उत्तरेकडील आणि दक्षिणेकडील भाग गिळण्यास सुरवात केली. त्या काळात कंपनीचा अमल नागपूरच्या उत्तरेस तीस मैलापासून चालू होता. पलीकडे राजाचा अंमल मुळीच नव्हता. नागपूर राज्याची हद्द रामटेकला संपते. नागपूरचा राजा हा मराठा आहे. तंजावरच्या राजाशी त्याचे नाते आहे. हे राज्य मराठ्यांनी ओसंडून वहात आहे. येथील सर्व माणसे मराठी बोलतात आणि लिहितात. इतर भाषांचा वापर होत नाही. पूर्वी ह्या लोकांना आपल्या हिताची काळजी होती त्यावेळी ते परमेश्वराची प्रार्थना करीत आणि ब्राह्मणांचा आदर करीत. आता कंपनीने नेमलेल्या कलेक्टर आणि तहसीलदार ह्यांच्याद्वारे राज्यकारभार चालतो. इंग्रजांनी [illegible]ाला राज्य परत केले पण राज्यातील लोक ह्यामुळे संतुष्ट नाहीत. ह्या राज्यात अनेक जमीनदार आहेत. ते राजाला दरवर्षी ठराविक महसूल देत असतात. इंग्रजांच्यातर्फे वकील म्हणजे रेसीडेण्ट. तो सीताबर्डीत रहातो. हे स्थळ नागपूरपासून २४ मिनीटांच्या अंतरावर आहे. सिताबर्डीला रेसीडेण्टने वाडा आणि बाग तयार केली आहे. सीताबर्डीच्या टेकडीजवळ इंग्रज आणि येथील राज्याच्या लढाया झाल्या. सीताबर्डी येथे परदेशांची घरे आहेत. येथे शस्त्रागार आणि Post office ही आहेत. इंग्रजांना खरेदीची सोय व्हावी म्हणून पारशांनी मुंबईहून वस्तू आणल्या असून त्यांनी येथे दुकाने उघडली आहेत सीताबर्डीत बाजार आहे. अनेक हिंदुंची घरे आणि बागा आहेत. येथील पाश्चात्यांच्या घरावर विलायती गवताचे छप्पर घालतात. ही फार आकर्षक असतात.

कामठी

नागपूर पासून १२ मैलावर कामटी येथे छावणीचे ठिकाण आहे. येथे पाच फलटणी आणि त्यांचे अधिकारी आहेत. कामटी हे सुधारलेले गाव आहे. छावणीतील सरकारी भाषा इंग्रजी आहे. त्यामुळे आमच्या भागातील अनेक लोक आणि अर्काटकडील मुदलीयार येथे काम करताना आढळतात. आपल्या प्रदेशातील माणसांना ते मदत करतात. स्थानिक लोकांच्या मानाने ही माणसे मनमिळाऊ आणि मैत्रीला जपणारी आहेत. मला पूर्वी वाटे की पाश्चात्य लोकच एकमेकाला ह्या देशात मदत करतात. ह्या दृष्टीने ते आपल्यापेक्षा बरे आहेत पण कामटीच्या छावणीत आल्यानंतर मी आपले मत बदलले आहे. माणसे आपल्या घराबाहेर पडून दुसऱ्या देशात जातात त्यांना जेव्हा त्यांच्या देशातील माणसे भेटतात तेव्हा त्यांच्याबद्दल मैत्री आणि जिव्हाळा वाटणे सहाजिक आहे. त्यात असाधारण असे काही नाही. पूर्वी मात्र मला असाधारण वाटे हे खरे. पूर्वी हैद्राबाद, नागपूर, जालना आणि म्हैसूर येथील कोमीसार्जंट म्यानेजरच्या खालील जागा ह्या मद्रास सरकारच्या कार्यक्षेत्रात होत्या. ह्या जागा स्थानिक लोकांना मिळत. रोजगाराच्या दृष्टीने ह्या जागा उत्तमच म्हणाव्या लागतील. ह्या कचेरीच्या मॅनेजरांकडे सरदार शिपायांची ये जा असते आणि त्यांचे संबंध मॅनेजर लोकांशी बरे असतात. मॅनेजरच्या जागेसाठी उच्च शैक्षणिक पात्रतेची जरूरी नव्हती पण प्रशासन कौशल्य पाहिजे. सिताबर्डीच्या पोस्ट ऑफीसमधील रायटर. वीरास्वामी हा असून त्याच्या हाताखाली शस्त्रागारातील सामानांचा साठा

आहे. त्याने माझी व्यवस्था चांगली ठेवली. हा देश माझाच आहे असे वाटायला लावले. त्यामुळे मला आनंद झाला. येथील छावणीत बंगालचे सैन्य (Bengal Army) आहे. ह्या सैन्याने अनेक पूल, बराकी आणि इतर सार्वजनिक इमारती बांधल्या आहेत. अशा बांधणुकीसाठी मद्रास सरकारची मंजुरी मिळणे अवघड जाते. त्या उलट बंगालचे सरकार ह्या बाबतीत उदार आहे. सिताबर्डी आणि कामठी येथील छावणी ह्यांना जोडण्यासाठी रस्ता असून पूल बांधण्यात आले आहेत. घोडेगाड्या त्यावरून मोकळेपणाने फिराव्यात असे ते रस्ते आहेत. पण हा रस्ता वाळवंटासारखा वाटतो. नागपूर शहरातील घरांची संख्या २० हजार असावी. ही घरे फार लहान आहेत. आणि आकर्षक तर नाहीतच. पण राहण्यास सोयीस्कर नाहीत. येथे मोठा बाजार आहे. येथे खाण्यापिण्याच्या अनेक वस्तू आणि कपडे बाजारात मुबलक मिळतात पण कुशल कामगार (Skill worker) मोठ्या संख्येत नसावेत असे वाटते. येथील रहिवासी धूर्त आहेत पण हैद्राबादचे लोक कारण नसतानाही हत्यार घेऊन धावतात तसे हे करीत नाहीत. येथील स्त्री पुरुष देखणे आहेत. येथे सर्व प्रकारची फळे मिळतात. कमला जातीची उत्तम प्रकारची संत्री येथे मोसमामध्ये मुबलक मिळतात. त्यांच्या संत्र्याच्या पुष्कळ बागा आहेत. बाहेरून आणलेली अंजीरे इत्यादींची लागवड येथे केली जाते. येथील जमीन सुपीक आहे. शहराच्या भोवती बागा आहेत. येथे केळीही मुबलक होतात. येथे गल्लीबोळ अरुंद आहेत ह्या गावचा कोतवाल (पोलीस अधिकारी) हा मुसलमान आहे. त्यांनी इतकी उत्तम व्यवस्था ठेवली आहे की कोणा एखाद्याने एखादी वस्तू रस्त्यात टाकली असली तर तो परत उचलून घेईपर्यंत तिला कोणी हात लावीत नाही. ह्या गावात (नागपूर मध्ये) प्रत्येक गल्लीत एक ठाणे (पोलीसाचे) आहे. व्यवस्थेच्या बाबतीत राजाला भक्कम पाठिंबा मिळतो. न्यायदानाच्या खात्यात ईस्ट इंडिया कंपनी येथील व्यवस्थेत भाग घेत नाहीत. ह्या शहरात कित्येक मारवाडी आणि गोसावी हे सावकारी करतात. त्यांनी पेढ्या उघडल्या आहेत. सावकार हिऱ्याचा व्यापार करतात. माझ्यापाशी जे अलंकार आहेत त्याचे येथील लोकांना कौतुक आहे. माझ्यापाशी असलेल्या हिऱ्यासारखा हार त्यांना तसा बनवता येत नाही. असे अलंकार त्यांनी कधीच पाहिले नसावे असे दिसते. ह्या शहरात किंवा भोवती प्रशस्त आणि प्रसिद्ध असे एकही देऊळ नाही. पण राजनगरमध्ये दोन चांगली देवळे आहेत. तेथे पूजाअर्चा होते. (वीरास्वामीला महालाचा भाग असे म्हणावयाचे असावे). येथील अन्नछत्रातून रोज शंभरजणांना अन्नदान देण्यात येते. येथे वेदाभ्यासासाठी संस्थान आहे. त्यांना ज्ञान हवे असेल त्यांना मंथली (गोदाकाठचे गाव) ब्राह्मणाकडून शिकून घ्यावे लागे. ह्या भागातील लोकांत खोल विद्या आढळून येत नाही. इह आणि परह ह्यातील श्रेय संपादन करण्यासाठी हे हरीकथा करतात आणि कितंने करीत बसतात आणि कितंने ऐकतात. हैद्राबादहून पुढे देवळांची एक वेगळी रीत आहे. देवळांना एक गर्भगृह, एक मुखमंडप आणि केळफुलाच्या आकाराचा स्तूप (खांब) हे हटकून आढळतात. इकडील लोकांची वागणूक आपल्याला न पटो पण ती शास्त्रांना अनुसरून आहेत. आता एक उदाहरण पहा. येथे दृष्टिदोष नाही आणि पाण्याच्या बाबतीत तर नाहीच (जेवणास बसण्यापूर्वी पाणी शिंपडणे). दुसऱ्या समोर ते खुशाल जेवतात. मी म्हणतो त्यात वावगे काय ? म्हणजे दृष्टी आणि स्पर्श दोष पाळीत नाहीत. ह्यात गैर काय.? ब्राह्मण परशिचामी करतात त्याने दृष्टिदोष नाहीसा होत नाही का ? असे असूनही जर कोणी म्हणेल की दृष्टिदोष जात नाही तर आपस्तंभ सूत्र आपण टाकून दिल्यासारखे होईल मग परिसिचामीमध्ये अर्थ काय राहिला. पृथ्वी, वायू, आप, अग्नी आणि आकाश ही पंचमहाभूते आहेत ना ! सगळ्या वस्तूंचे शुद्धीकरण पाण्याच्याच द्वारे होते ना ! मग पाण्याला दोष कसा ! तलावाच्या एकाच घाटावर निरनिराळ्या जातीचे लोक एकाच वेळी आंघोळ करीत नाहीत काय ? थोड्या पाण्यानी दोष लागतो असे कोणी म्हणतील असे असेल तर थोड्याशा अग्नीनेसुद्धा दोष लागावा. अग्नीला स्पर्श दोष नाही ह्याचे कारण काय ? शास्त्राप्रमाणे शिळे खाणाऱ्यांची मुंज दुसऱ्यांदा करावी लागेल. त्याप्रमाणे दारुला जशी बंदी तशी मीरे घालून चिंचशिजवली म्हणजे ती निषिद्ध समजतात. पण चिंच आणि मिरे नसेल तर द्रविड लोक जगूच शकत नाही हे ओळखूनच ते निषिद्ध असले तरी ह्या वस्तु खायला परवानगी दिली. ज्ञान हे कर्मामधून मिळत असते. नेमाच्या पाळण्याशिवाय मुक्ती मिळत नाही. अंधरूढीमुळे काही नियम निरर्थक झाले आहेत. उदाहरणार्थ काहींच्या मते कालचे वस्त्र पूजेत वापरता येत नाही

दररोज ते वेगळे पाहिजे म्हणजे धुतलेले ह्यात गैर काय ? समजा आज कपडा धुतला तो बारा तासानंतर पूजेत वापरण्यात आला नंतर काढून ठेवण्यात आला. काही वस्त्रे सहा तासात स्वच्छ करण्यात आली. अशी वस्त्रे (आदल्या दिवशीची म्हणून) वापरली तर काय चूक ? न्यायशास्त्रात आपल्या पूर्वजांनी जे नियम केले आहेत ते त्या त्या देशातील स्थानिक परिस्थितीनुरूपच केले आहेत. दक्षिणेकडील टोकास (आपल्या देशाच्या) स्त्रियांबद्दल आसक्ती मोठ्या प्रमाणात आहे. बहिणीच्या मुलाला येथे आप्त समजतात आणि मुलाच्या मानानी भाचा हा वारस आणि क्रियाकर्माचा अधिकारी समजला जातो.

नागपूरच्या कामटी छावणीतील जमीन काळी आहे. पावसाळ्यात फार चिखल होतो. चालणे फिरणे कठीण होते. सीताबर्डी आणि कामटी येथील पाश्चात्य लोकांनी मात्र सिताबर्डी येथील टेकडीजवळ आणि कामटी येथील नदीजवळ बागा बांधल्या आहेत. जमीन छान आहे. जमिनीत खडक आणि दगड ह्यांचे मिश्रण आहे. ह्या भागात (Jasmine) सुवासिक फुले ही फुले खूप मिळतात. पण लहान फुले मिळत नाही. मद्रास सोडल्यानंतर मला श्रीरंगम् कस्तुरी आढळली नाही. नागपूरनंतर पुढे मला गंध कोरण्याच्या काड्या (Ena-stick) पुढे गंधाच्या काड्या मिळत नाही. ताडीच्या झाडाच्या पानापासून येथे केरसुण्या बनवितात. पत्रावळी-साठी चोया वापरतात. त्या वांबूच्या काड्यांपासून बनवितात. त्यासाठी ज्वारीच्या धान्याचे बुंदे वापरतात. कडा सोडल्यावर लहान पाटे वरवंटे पाहण्यात येत नाही. (सन्ना कल्लू). त्यामुळे वाटण्यासाठी ते उखळ आणि मोठे वत्ते ह्यांचा उपयोग करतात. आमच्या प्रांतातून आलेल्या लोकांना येथे सन्नेकल्लू (लहान पाटे) मिळत नसल्यामुळे त्यांना दगडाचा उपयोग करावा लागतो. कामटी येथे पारशी लोकांनी इंग्रजी पद्धतीची दुकाने काढली आहेत. छावणीचे बाजार आणि गाव हे प्रगत आहेत खरे पण हैद्राबादच्या छावणीच्या मानाने काहीच नाहीत. ह्याचे कारण असे की पूर्वी हे राज्य इंग्रजी अमलाखाली होते. त्यामुळे स्थानिक लोक सैन्यात सामील झाले नाहीत. येथे इंग्रज हे स्वयंराजे आणि मंत्र्याप्रमाणे वागत. हैद्राबादचा नवाब हा आपली प्रतिष्ठा संभाळून आहे. नागपूरचे लोक दिव्यातून बाहेर पडल्यामुळे निर्ढावल्यासारखे झाले आहेत. हैद्राबाद मात्र इंग्रजांशी मैत्रीने आणि गोडीगुलाबीने वागत आहेत. इंग्रजांच्या मद्रासेकडील फलटणी नागपुरास येईपर्यंत त्या राज्यातील लोकांना चिंचेचा वापर माहीत नव्हता. येथील लोक ताक आणि दही वापरतात. पण ती गरम करून.(कढी करून). येथील लोकांची समजूत अशी की रात्री ताक प्यायले तर ते प्रकृतीला अपायकारक आहे. आपल्या प्रांतातील शूद्रांना नाही का वाटत ? रात्री ताक प्यायले तर सर्दी होते म्हणून. जठराग्नीला मानवत असले तरच विविध सवयी जुळवून घेता येतात. एकदा अशा रीतीनी जुळले की काही हरकत नाही. दही आणि ताक येथे मुबलक आहे. आम्ही त्यांचे यथेच्छ सेवन केले. पण प्रकृतीला आमच्या काही झाले नाही. उदाहरण पहा. आदिवासी आहेत. जंगलातील विषारी प्राण्या-पासून रक्षण व्हावे म्हणून मुष्टी (?) विया आणि गारलम (विषारी पदार्थ) खातात आणि त्यांना काही होत नाही. अर्थात परदेशातला म्हणून आपल्या सवयी टाकूनच दिल्या पाहिजेत असे काही नाही.

मी हैद्राबादमध्ये असताना तेथे उत्सव चालू होता. तसेच नागपूरमध्ये तेव्हा येथेही उत्सव चालू होता. येथे आजकाल श्रीकृष्ण नवरात्र उत्सव मोठ्या थाटात चालू आहे. प्रत्येक घरात लोक जनावरे आणि माणसे ह्यांना सजवतात. आपल्या देशातील उत्सवा-प्रमाणेच हैद्राबादमध्ये मी खाजगी तंबू आणि राहुटचा विकत घेतल्या होत्या. त्या येथे मी टाकून दिल्या. मी येथे एक खाजगी तंबू, एक खांबी तंबू, एक चांगल्या कापडाचा तंबू ह्या विकत घेतल्या. ह्या शिवाय काशी-यात्रेसाठी मी प्रत्येकी १५ रुपये देऊन सहा घोड्यांची व्यवस्था केली. चार तंबू, तंबूचे खुंटे, चटया आणि सतरंज्या ह्या वाहून नेण्यासाठी घोडे उपयोगी पडतील. माझ्याबरोबर हैद्राबादहून ओझ्याचे बैल आणले होते. त्यांना १५ दिवसांचा पगार देऊन त्यांना परत पाठविले. (हैद्राबादला) मी आपल्या बरोबर दोन खलाशी आणि एक चंचू जातीचा माणूस ठेवला. शिवाय जमिनीवर सर्दीचा त्रास होऊ नये म्हणून मी प्रवासाच्या खाटा (तीन) बरोबर घेतल्या.

येथे प्रचारात नागपुरी रुपये आहेत. पण हैद्रा-बादप्रमाणे आपल्या रुपयाचा बटवडा करताना येथे नुकसान होत नाही. अर्थात साध्या पैशाच्या बाबतीत मात्र निरनिराळ्या भागात निराळे बटवड्याचे दर आहेत. एक नागपूरी रुपयाचे ३२२ गुड्डु (पैसे)होतात.

रुपयामागे किती गुड्डू असतात ह्यात थोडा भेद आहे. Mr Groam ग्रोएम ह्यांची माझ्यावर कृपा आहे. नागपूरच्या मुक्कामात त्यांनी माझ्या मदतीला एक शिपाई दिला. प्रवासाच्या मार्गातील तपशील त्यांनी पुरविले. माझ्या बरोबर जवळपूरपर्यंत येण्यासाठी येथील सरकारकडून दोन शिपायांची व्यवस्था केली. त्यांनी प्रवासाच्या मार्गदर्शनासाठी संदर्भाच्या पुस्तिका दिल्या आणि युरोपियन लोकांना पत्रे दिली. त्याबद्दल परमेश्वर त्याचे भले करो. प्रवासात पालख्या सारख्या हालतात काणि खिळचांनी व्यवस्थित बसवल्या नाहीत तर पालखी करकर वाजू लागते. पुढे पालखीला धोका निर्माण होतो. मद्रासहून आणलेल्या पालख्या नीट नसाव्यात त्यामुळे ऐन जंगलात दांडे तुटले आणि मी पडलो. हैद्राबादपर्यंत येईपर्यंत पालख्या खराब झाल्या होत्या. आता पालखीमधून मी खाली पडणार म्हणून त्या पालख्यांनी थॉमस बरीन ह्या माणसाला देऊन टाकल्या आणि १०० रुपयाला एक प्रवासी पालखी विकत घेतली. एक पालखी नीट करून डॉयल फीनॅन ह्याला दिली आणि ७५ रुपयाला नवीन पालखी विकत घेतली. पण ह्या पालख्या कातडचांनी बांधल्यामुळे त्याही नादुरुस्त झाल्या. निर्मल गावी त्या दुरुस्त केल्या. एका पालखीची लोखंडी पट्टी मोडल्यामुळे मला त्रास होऊ लागला. कसातरी मी नागपूरास पोचलो. येथील शस्त्रागारातील कामगारांच्या मदतीने पालख्या दुरुस्त करून घेतल्या. पुढे ह्यामुळे मला त्रास होऊ नये म्हणून मी देवाजवळ प्रार्थना केली. मी वापरत होतो ती पालखी कोंडापट्टमला तयार केली होती. ती चांगली होती. त्यामुळे त्या पालखीचा सतत वापर करूनही तिचा त्रास होत नाही. लांब प्रवासासाठी पालख्या चांगल्या मजबूत पाहिजेत. त्या बरोबरच लोखंडी काम्ब असलेल्या वजनानी हलक्या पाहिजेत. नाजूक पालख्या दुरुपयोगी असतात. डॉक्टर वायली हे येथे (नागपूरात) १५ वर्षे रहात आहेत. त्यांचा मी सल्ला घेतला तेव्हा ते म्हणाले, नागपूर ते जबलपूर प्रवास अरण्यमय आहे. सगळा भाग ओलसर आहे. यामुळे ऑगस्ट ते ऑक्टोबरपर्यंत हिवताप येण्याचा संभव असतो. डॉ. वायली मला म्हणाले, तुम्ही जबलपूरला लवकर जा कसे. इतरांनी पण हेच सांगितले. त्यामुळे हा प्रवास लवकर करण्याचा मी निश्चय केला. माझ्या-बरोबर औषधे होती. श्रीरामाच्या कृपेने अनेकांचा हिवताप त्या योगे बरा झाला.

मी हैद्राबादेस असताना तेथे एका माणसाला विषारी साप चावला. मी सर्पदंशावरील गुणकारी मुळी (Snake Wood) स्नेकवुड वाटून (एदुलनू?) त्याला दिली. तो माणूस ६ तासात बरा होऊन घरी गेला. हिवतापावर मी लिंगाकट्टु देत असे. ताप उतरल्यास वर रोग्यांना एक रेचक औषध देत असे. ह्या रीतीने रोगी बरे होतही. श्रीरामाचीच कृपा. वातविकारावर म्हणून वैद्य रामय्या ह्याने काही गोळ्या दिल्या होत्या. मी एका रोग्याला दिल्या तो बरा झाला. ह्या गोळ्यांचे काय रहस्य आहे हे कळून जाहीर झाले पाहिजे. म्हणजे त्याचा उपयोग सर्वांना होईल. श्रीरामाच्या कृपेने सर्वजण बरे होत आहेत. माझ्या बरोबरचे लोक मात्र माझ्या वैद्यकीची जाहिरात करत असल्यामुळे बरेच जण मागे लागतात. पण कौशल्य नसताना डॉक्टरीकडे पाहाणे हे पाप आहे. अगदीच जरूर असल्याशिवाय माझी माणसे सोडून इतरांना औषधे देत नाही. प्रवाशांनी आपल्या बरोबर काही औषधे बाळगलीच पाहिजेत असे माझे मत आहे. उदा. ओकारीसाठी एमिटीक पावडर नंतर एक जलापू आणि रेचकाच्या गोळ्या, तापासाठी लिंगाकट्टुची साल जखमेसाठी मलम. येथे काशीयात्रा करून आलेली बरीचजण भेटतात. आपल्या प्रदेशात तिरूपतीयात्रा करून आलेली माणसे जशी भेटतात तशी.

२१ ऑगस्ट ते २६ ऑगस्ट सन १८३०

शनिवार २१ ऑगस्टला मी नागपूर सोडले आणि दुपारी कामटीच्या छावणीत आलो. २६ तारखेला दुपारी मी कामटेश्वर घाटावरून नावेतून नदी ओलांडली आणि १४ मैलाचा प्रवास करून रामटेक नावाच्या क्षेत्राला आलो. मी कामटीहून ६ वाजता निघालो त्या वेळी त्याजम (न निघण्याची वेळ)चा काही वेळ शिल्लक होता. त्याचे परिणाम मला भोगावे लागले. नदी पार करण्याची परवानगी मला कर्नल पॅरेनकडून मिळाली होती. पण ह्या घाटावरून की त्या घाटावरून हे ठरविण्याचा गोंधळ झाला आणि शेवटी ८ च्या सुमारास मला लहानसा लाकडी पडाव (ट्रक) मिळाला. माझे सामानही उशिरा आले. कामटीहून रामटेकला जायला तीन वाटा आहेत. कामटेश्वर घाटावर

शिवालय आहे. मुख्य मार्ग लागण्यापूर्वी कन्हान नदी ओलांडावी लागते. माझे सामान दुसऱ्या घाटावरून निघून केडी गावाजवळ मिळाले आणि माझी काही माणसे रामटेक समोर भेटली. रस्ता काळचा मातीचा आहे. वाटेवर बरीच लहानशी खेडी लागली. त्यांची नावे अशी– वरोडा, आरोरी, केडी, साकरपू, पुरा आणि रामटेक. रामटेक हे रामक्षेत्र आहे. ते शहरवजा आहे. भोवती लहान लहान डोंगर आहेत. गावात सुमारे ४००० घरे आहेत. येथे चार पाच तलाव आहेत. पाण्याची मुबलक सोय आहे. येथे पानमळे आहेत. रामटेकची पाने प्रसिद्ध असून ती दक्षिणेत हैद्राबादपर्यंत आणि उत्तरेत प्रयागपर्यंत जातात. राजे आणि अधिकारी ही पाने डाकेने मागवितात. काळजीपूर्वक ही पाने ठेवल्यास महिनाभर टिकतात. ह्या पानांचा विशेष असा की ती कोवळी असतात. ती पिकली तरी कोवळी आणि पातळ राहतात. आपल्याकडील रावेसा (?) पानाप्रमाणे ही रुचकर आहेत. रामटेकला सर्व वस्तू मिळतात. येथून एक मैलावर अंबरीष तीर्थ असून सरोवराभोवती मंडप आहेत. येथे नागपूरच्या राजाचा वाडा आहे. तो प्रशस्त आहे. येथे कार्तिक शुद्ध पौर्णिमेला ब्रह्मोत्सव होतो. तिरूअण्णममलाईलाही असेच उत्सव होतात. त्या वेळी यात्रेस एक लाख माणसे जमतात. टेकडीवर देवळात पोचण्यासाठी ७०० पायऱ्या चढाव्या लागतात. देऊळ लहान आहे परंतु सुंदर बांधले आहे. टेकडीवर नरसिंह आणि वराह मूर्ती ह्यांची देवळे आहेत. मूर्त्या सुंदर घडवल्या आहेत. अगदी शिल्पशास्त्रास धरून. अगदी त्या जिवंत वाटतात. पूजाअर्चा शाही इतमामाने होते. नागपूरचे राजे ब्राह्मणांच्या द्वारे ही पूजा करवितात. त्यासाठी वार्षिक खर्च ९००० रु. येतो. टेकडीवरून रामटेकचे सुंदर शहर दिसते. ह्या देवळाच्या उत्तरेकडील दरवाजाला काशी दक्षिणद्वारम म्हणतात. म्हणजे दक्षिणेकडून काशीला जाण्याचा मार्ग. तीर्थापासून टेकडीला जाण्याचा मार्ग आहे. मी राजनगर येथे उतरलो आणि क्षौर आदी क्रियाकर्म केले. येथील ब्राह्मण शुक्ल यजुर्वेदी आहेत. त्यांच्या परंपरा आपल्याहून भिन्न आहेत. येथील स्थानिक पुरोहिताच्या द्वारे मी नैवेद्य आभिषेक आणि ब्राह्मणभोजनाची व्यवस्था करविली. गावात ६० ब्राह्मण घरे आहेत. तीर्थाच्या भोवती मंडप असून भोवती फळझाडे आणि टेकड्या आहेत. ध्यान आणि तपश्चर्येसाठी हे स्थळ योग्य आहे. काहीजण तीर्थाच्या काठावर आणि टेकडीवर पुरश्चरण करीत असतात. तीर्थाच्या काठावर सुंदर अशी घडवलेली दत्तात्रयाची मूर्ती स्थापन करण्यात आली आहे. तीर्थातील लोक दंतकथा सांगतात. अंबरीष राजाने येथे सुवर्ण मंदिर बांधले होते. तीर्थातील पाणी कमी झाले तेथे मंदीर दिसते (सुवर्ण) असे म्हणतात. पण पाणी कमी कधीच होत नाही. त्या तीर्थाची उत्पत्ती पाताळ लोकातील आहे असे म्हणतात. म्हणून उर्ध्व लोकांत मंदाकिनी भूलोकात भागीरथी तशी पाताळात भोगावती असे म्हणतात. हे तीर्थ भोगावतीचे होय. दुर्वासाच्या शापातून मुक्त होण्यासाठी अंबरीषाने ह्या तीर्थाच्या द्वारे मुक्ती मिळविली. अंबरीष येथे राज्य करीत होता आणि त्याची राजधानी येथून ८ मैलावर नंदीग्रामी होती असे म्हणतात. रुख्मांगदाची राजधानी कोठे होती हे अजून माहीत नाही. येथील डोंगराला सिंधूराजपर्वतम् म्हणतात. शंभूक वधानंतर त्यांच्याच प्रार्थनेनंतर रामाने सीता, लक्ष्मण, मारूतीसहित राहण्याचे कबूल केले अशी आख्यायिका आहे. मी येथे शनिवारी रात्रीपर्यंत राहिलो.

२९ ऑगस्ट १८३०

२९ तारखेस रविवारी १२ वाजता निघालो. १२ मैल प्रवास करून दुपारी १ वाजता डोंगरतालला पोचलो. त्याज्य काळात निघाल्यामुळे वाटेत पावसात खूपच भिजलो. मद्रासहून सुखात आल्याचे येथे उट्टे निघाले. वाट लालसर माती आणि वाळू ह्यांच्या मिश्रणाची आहे. निर्मल सोडल्यानंतर इतकी सुंदर वाट आम्हाला मिळाली नाही. ही वाट गर्द जंगलातून गेलेली आहे. वाटेत दोन मोठे ओढे आणि लहान ओढे पार करावे लागले. आम्ही डोंगरतालला पोहोचलो. दुकानदाराने दुकानाजवळ छपराच्या खोल्या घातलेल्या आहेत. खोल्यात शेकोट्या आहेत. भिंती शेणाच्या आहेत. गाई बांधण्यासाठी तेथे खुंट आहेत. रिकाम्या खोलीत प्रवासी थांबतात. वस्तू दुकानदार पुरवतो. कृष्णा ओलांडल्यानंतर उतरण्याच्या जागेची अडचण वाटते. पण ह्या प्रशस्त खोल्या राहण्यास चांगल्या. भिंतीना पडदे असते तर छान. मी एका खोलीचा दिवाणखाना बनवला. एका खोलीत पालख्या, एका खोलीत घोडे. दुसऱ्या खोलीत माणसांची सोय केली. मी एकंदर ७–८ खोल्या घेतल्या. येथे जनावरांसाठी कोवळे गवताचे खूप भारे मिळतात. चणेही मुबलक

आहेत. लाल डाळी आणि काळे जवस, (जींजेली ?) ह्या वस्तू नागपूरात मिळतात. तिळाचे तेल मात्र मिळत नाही. एरंडीचे शुद्ध तेल मिळत नाही. मोहरीची लागवड येथे खूप होते. आपल्याकडील जवसाप्रमाणे त्याचे तेल काढतात. दिव्यासाठी (वीप्पा) वापरतात. येथे डाळी आणि चणे विकत नाहीत तर त्याचे पीठ करून विकतात. रामटेक हे नागपूर राज्याच्या सरहद्दीवरील गाव आहे. पण हे गाव (शिवनी) तालुक्यात असून बंगाल सरकारच्या ताब्यात आहे. (सरहद्दीवर) नर्मदेच्या दोन्ही काठावरचा प्रदेश नागपूरच्या राजाकडे होता. कंपनीच्या ताब्यात तो आल्यानंतर गव्हर्नर जनरलने नसाईझेर येथे एक एजंट नेमला. जिल्ह्यावर काम करण्यासाठी त्याच्या हाताखाली सहा युरोपियन सहायक देण्यात आले. हा भाग इंग्रजांच्या ताब्यात येण्याच्यापूर्वी येथील जंगलात चोरांची फार भीती असे. आता प्रत्येक खेडयासाठी प्रत्येक ठाण्यावर तीन घोडेस्वार नेमले आहेत. कंपनीने चोरांना पकडले आणि त्यांना तडक काठच्या झाडावरच फाशी दिले. प्रेते सडत पण झाडावरून काढू देत नसत. येथील युरोपियन अधिकारी कॅप्टन लॅंडलो ह्याचे मुख्य ठाणे शिवनीला आहे. सडकेवरील प्रतिष्ठितांच्या सहाय्यासाठी खेडयातून (मुक्कामाच्या) एक कोतवाल, दोन शिपाई ठेवण्यात आले आहेत. आता येथे भीती फक्त जंगली जनावरांची. ह्या गावात पाण्याची चांगली सोय आहे. शिवनी तालुक्यातील खेडी हजारेदारांना दिली आहेत. त्यांना पटेल म्हणतात. हे गाव लहान असले तरी प्रवाशांना सोयीचे आहे. मी येथे रात्रीसाठी थांबलो. ह्या गावाच्या वाटेवर मोघी गाव आहे. येथे नागपूरच्या राजाची एक चौकी आहे. टपालाची चावडी पण आहे.

३० ऑगस्ट १८३०

सोमवारी ३० तारखेस सकाळी ६।। वाजता मी निघून १४ मैल प्रवास केला आणि दुपारी १ वाजता कुराई ह्या गावी पोहोचलो. वाटेवर मला खालील गावे लागली. दरा, कवासा, रेली, रामवी, आणि कुराई. कालच्याप्रमाणे रस्ता सोयीचा वाटला. रस्ता घनदाट जंगलातून जातो. ६ मोठे ओढे आणि लहान ओढे पार करावे लागतात. मद्गरा येथे कमळाचे एक सुंदर तळे आहे. काळी माती आढळते पण मागे पाहिली तशी चिक्कलमाती नाही. कुरई येथे चावडया आणि खोल्या मिळतात. वस्तूही मुबलक मिळतात. रामटेकचे टपालाचे शिपाई हे शिवनी डाकेच्या खाली येतात. नागपूर क्षेत्राचे दोन टपालाचे शिपाई माझ्याबरोबर होते त्यांच्यामुळे मला कुराईपर्यंत त्यांची मदत मिळाली. येथील कोस म्हणजे पक्का कोस. १ पक्का कोस म्हणजे तीन कच्चे कोस. येथे दोन मैलाला कच्चा कोस समजतात. गाव सुधारलेले नाही. पण प्रवाशांना ठीक आहे. नागपूर राज्यात भाजीपाला मुबलक मिळतो. येथील तलावात शिंगाडयांची मोठया प्रमाणात लागवड होते. ह्याचे पीठ करून उपासासाठी पुऱ्या करतात. शिंगाडयाचे पीठ गोड असून हे पीठ आरोग्याला चांगले असते. मी येथे रात्री मुक्काम केला.

समारोप

वीरा स्वामीची ही पत्रे दीडशे वर्षांपूर्वीच्या ईशान्य महाराष्ट्रावर मोठा मनोरंजक प्रकाश पाडतात. इंग्रजांची पकड नागपूर राज्यावर किती बसली होती ह्याची ह्या पत्रावरून कल्पना येते. १८३० मध्ये छावणी आणि सीताबर्डी ह्यांच्यामुळे नागपूरला शहरी स्वरूप होते हे दिसून येते. रामटेकच्या क्षेत्राचे वर्णन तपशीलवार आहे. त्यातील वराह मूर्ती आणि नरसिंह ह्यांच्या देवळाचा वीरास्वामीने आवर्जून उल्लेख केला आहे. रामटेकला वीरास्वामी रामक्षेत्र म्हणतो पण वरील दोन देवळे रामलक्ष्मणाच्या देवळाहून भिन्न आहेत की काय ? वीरास्वामी हा दक्षिणेकडील कर्मठ ब्राह्मण असल्यामुळे त्याच्या पत्रातील दृष्टिकोन समर्थनीय नसला तरी समजण्यासारखा आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाच्या अभ्यासकास ही पत्रे निश्चितच उद्बोधक वाटतील.

△ △ △

कलंदर

प्रफुल्ल यशवन्त अत्रे

अंकल थोरातांनी खिशातून तपकिरीची डबी बाहेर काढली. डबी डाव्या हातात धरून त्यावर उजव्या हाताने टिचक्या मारत झाकण उघडून डबी माझ्यापुढे धरली आणि म्हणाले, 'घ्या, चांगली, कडक आहे, अगदी जेनाप्रमाणे.'

'ही जेना कोण ?' चिमुट भर तपकीर काढून-घेत मी विचारलं.

'जेना म्हणजे, माझी मेहुणी.' थोरात.

आक ऽऽ छी ऽ मला फटाफट दोन शिंका आल्या.

'घ्या ! बघा, खरंय की नाही.' थोरात.

'काय खरंय ?' मी.

'तपकीर कडक आहे.' थोरात.

'जेनाप्रमाणे ?' मी.

'म्हणून तर शिकलात तुम्ही.'

थोरातांनी बचकभर तपकीर नाकात कोंबली. त्यामुळे त्यांचे नाक जरा हुळहुळल्यासारखं झालं. त्यांच्या बोटाच्या चिमटीतून सुटलेली पण नाकात जाऊ न शकलेली तपकीर त्यांच्या शर्टावर पसरली.

'मागच्या आठवड्यात एक गंमत झाली.' खुषीत येऊन थोरात म्हणाले.

'गंमत झाली की केलीत ?' मी.

'ते ऐकल्यानंतर तुम्ही ठरवायचं.' थोरात.

'तुम्हाला काय वाटतं ?' मी.

'गंमत आली.' थोरात.

थोरातांच्या गंमती नेहमीच ऐकण्यासारख्या असतात. आयुष्यभर गंमती जमती करण्याशिवाय थोरातांनी केलंय काय दुसरं ? बहुरंगी, बहुढंगी व्यक्तिमत्वाचा हा माणूस प्रथमदर्शनीच समोरच्या माणसावर आपल्या मोहक चेहऱ्याने नि आकर्षक व्यक्तिमत्वाने छाप पाडतो. वयाने पन्नाशीला पोहोचलेले. काश्मिरी गोऱ्या वर्णाचे थोरात हसताना फार सुंदर दिसतात एका सरळ रेषेत, बत्तीसच्या बत्तीस मौजुद असलेले स्वच्छ दात चेहऱ्याचे मूळचे सौंदर्य खुलवतात.

थोरातांचे संपूर्ण नाव सॅम्युअल ताराचंद थोरात. येस ? थोरात धर्माने ख्रिश्चन आहेत. दर रविवारी सकाळी अंघोळ करून चर्चमध्ये 'प्रे' करण्यासाठी जातात.

आश्चर्य वाटतं ते याच गोष्टीचं–अनेक भानगडी करून त्या पचवून रंगढंग करणारा हा माणूस प्रत्येक रविवारी संध्याकाळी आसपासच्या छोट्या छोट्या चर्चमधून बायबलवर प्रवचनांचे रतीब घालत असतो. चर्चमध्ये ते अंकल म्हणून ओळखले जातात.

'हं सांगा तुमची गंमत.' मी.

'पंधरा दिवसापूर्वी जेना न्यूयॉर्कहून परतली. आता न्यूयॉर्कएवढा पगार कोण देणार तिला ?'

'करेक्ट ! मग पुढे–'

'नोकरी शोधण्याकरता जेना आमच्याच घरी मुक्काम ठोकून आहे.'

'या मेहुणीचे वय काय थोरात ?'

'सौंदर्याला वयाची मोजपट्टी लावायची नसते !'

'म्हणजे जेना दिसायला सुंदर आहे ?'

'नुसतीच सुंदर नव्हे, तर मादक आहे. म्हणजे हल्ली तुम्ही सेक्सबॉम्ब वगैरे म्हणता तशी !'

'ऑल राईट, बोला पुढे–'

'जेना नोकरी शोधतेय, एक दोन ठिकाणी इंटरव्ह्यू पण झालेत, पण–'

'थोरात या तुमच्या सेक्सबॉम्बला 'इंटरव्ह्यू'-ची काय जरूर ? नुसत्या 'आउटर व्ह्यू' वर कोठेही सिलेक्ट होईल.'

'होईलसुद्धा. जेना सध्या इथं आहे म्हणून त्या भरवशावर तिची थोरली बहीण माहेरी, नगरला गेलीय.'

'म्हणजे मिसेस थोरात माहेरी गेल्यात ?'

'येस.'

'या जेनाचे लग्न झालंय ?'

'पुन्हा तेच. तुम्हाला कधी काळी मोनालिसा भेटली असती तर तुम्ही तिचं वय, शिक्षण, लग्न, परिस्थिती यांचा विचार केला असतात ?'

'ठीक आहे. मिसेस थोरात माहेरी गेल्यात, पुढे-'

'तुम्हाला आठवतंय, मागच्या आठवड्यात एकदा मी हाफ डे कॅज्युअल काढून घरी गेलो होतो-'

'मिसेस थोरात इथं नसताना सुद्धा ?'

'येस.'

'तुमचं काही तरी डोकं दुखत होतं-'

'डोकं दुखत नव्हतं, डोकं चढलं होतं. सकाळी घरातून बाहेर पडताना जेना म्हणाली, अंकल आज ऑफिसला जाऊ नका, दुपारी माझा एक मित्र येणार आहे.'

'न्यूयॉर्कचा ?'

'होय, तिचा वर्गमित्र. येताना त्याने जेनासाठी 'वाईन' आणली होती. दुपारी त्यांचा प्रोग्रॅम होता. जेना म्हणाली. अंकल आजच्या पार्टीला आम्हाला तुमची 'कंपनी' हवी आहे. ऑफिस को मारो गोली. म्हणलं तुम्ही तरुण पोरं. मला म्हाताऱ्याला कशाला ओढता ? जेनाला नाराज करून आलो. पण-'

'पण काय-'

'कामात लक्ष लागत नव्हतं. तिचा हिरमोड करायला नको होता. विचारी ! मोठ्या प्रेमाने आग्रह करीत होती. वेडी पोर ! इथं तरी माझ्यावाचून असं काय अडणार होतं ? मन फारच अस्वस्थ झालं. त्यातून जेनाचा मित्र 'वाईन' आणणार होता. जेनाचं न ऐकण्यात चूकच केली.'

'मग ?'

'बरं वाटत नाही म्हणून अर्धा दिवस रजेचा अर्ज फेकून घरी आलो. तेव्हा साडेबारा वाजून गेले होते. जेना आणि तिचा मित्र दोघं रंगात आले होते. टेपरेकॉर्डवर एक धुंद धून वाजत होती. बाटली निम्मी संपली होती. त्या धुंद संगीताची लय पकडून जेना आणि तिचा मित्र बेफाम होऊन नाचत होते.'

'-आणि तुम्ही अचानक गेलात ? कबाबमे हड्डी !'

'तसं नाही. मला पाहून जेनाला फार आनंद झाला. नृत्य थांबवून ती धावत माझ्याजवळ आली आणि गळ्यात हात टाकत म्हणाली, 'ओ ! हाऊ स्वीट अंकल, कमॉन, वेळेवर आलात अगदी, हा माझा मित्र रूबेन, रूबेन मीट माय अंकल, मिस्टर थोराट.'

'माझ्या आगमनानंतर रूबेनच्या चेहऱ्यावर नाराजीची सूक्ष्म आठी उमटून गेली. बट आय डिडन्ट केअर. जेनाने माझ्यासाठी ग्लास तयार केला. वा ! अतिशय उत्कृष्ट वाईन होती. त्यानंतर दोन राऊंड झाले. जेना आणि रूबेन पुन्हा नृत्यात मग्न झाले. बेभान झाले. तुम्हाला ते वाक्य माहित आहे. व्हेन यू गो टू रोम-'

'माहित आहे.'

'मला माझ्या तारुण्यातले दिवस आठवले. नाचताना मी सुद्धा असाच बेभान होत असे. जेनाचे नृत्यकौशल्य अवर्णनीय आहे. लाजवाब ! तिच्यापुढे रूबेन फिका पडत होता. नृत्याचा जल्लोष आणि मद्याची बेहोषी माझ्या शरीरातला रोम न् रोम चेतवून गेली. नृत्य मध्येच थांबवून जेना माझ्याजवळ आली. एक हात गळ्यात टाकून दुसऱ्या हाताने मला खुर्चीतून उठवलं. म्हणाली, कमॉन अंकल. जेनाने माझ्या कमरेभोवती हात टाकले. मला बरोबर घेऊन नृत्य करण्यास सुरवात केली. जेनाच्या सहवासात मी स्वतःला हरपून गेलो. असा भान हरपून जाण्याचा प्रसंग माणसाच्या आयुष्यात फार कमी वेळा येतो. मी तो आनंद दुसऱ्यांदा 'एन्जॉय' करत होतो.'

'या अगोदरचा पहिला प्रसंग कोणता ?'

'सॅलीच्या सहवासात मी असाच देहभान हरपून जात असे, सॅलीनं मला खूप काही दिलंय.'

'सॅली कोण ?'

'जेनाची थोरली बहिण.'

'म्हणजे मिसेस थोरात ?'

'येस ! लग्नापूर्वी सॅली अशीच नाचायची, मलाही नाचवायची पण सॅली आता खूप थकलीय. माझं घरात कधीच लक्ष नव्हतं. सॅलीने सगळा संसार सांभाळला. मुलामुलींची लग्नं स्वत: पुढाकार घेऊन केली. आतापर्यंत सतरा वेळा मी नोकऱ्या बदलल्या. आयुष्य मी उपभोगत होतो. सॅली भोगत होती. पण मी जे काही केलंय ते सगळं सॅलीला सांगत आलोय. तिच्यापासून काहीच लपवून ठेवलं नाही. लॉर्ड जिजस् अगोदर सॅलीपुढे मी कन्फेशन देत आलोय. सॅलीबद्दल सांगायचे कारण जेनाबरोबर नाचताना मला सॅलीची आठवण झाली. सारख असं वाटायचें सॅली पुन्हा तरुण होऊन आलीय. जेनाने काही क्षण मला माझं तारुण्य परत दिलं. बेहोष होऊन जेना मला घट्ट बिलगली. जेनाचे ओठ माझ्या ओठात अडकले. जेना आणि सॅलीमध्ये काहीसुद्धा फरक नाही. तोच स्पर्श, तोच आवेग.'

'ओ स्वीट अंकल म्हणत जेनाने माझ्या उजव्या गालावर मोहोर उठवली.'

मी चमकून थोरातांच्या उजव्या गालाकडे पाहिलं. एक अस्पष्टसा दंतव्रण दिसत होता.

'जेनाच्या हातून जे घडलं ते इन्सल्टिंग वाटून रुबेन पार्टीतून मध्येच निघून गेला.'

'जेनाने त्याला अडवलं नाही ?'

'नाही.'

'पण त्यानेच तर जेनासाठी आवर्जून वाईन आणली होती.'

'होय. जेना म्हणाली, त्याचीच वसुली पण तो करून जाणार होता. पण जेना सावध होती. रुबेनला संधी मिळू नये म्हणून तर माझी उपस्थिती जेनाच्या दृष्टीने आवश्यक होती. निरपेक्ष, निर्व्याज प्रेमाने रुबेननं वाईन आणली नव्हती.'

'अंकल, नो डाऊट–जेना हुषार आहे.'

'पण जेनाने माझी पंचाईत करून टाकली. सॅली नगरहून परतल्यावर तिला माझ्या उजव्या गालावरची मोहोर दिसली. सॅलीने माझ्याकडे पहात चेहरा प्रश्नार्थक केला. सॅलीपासून मी काहीच लपवलं नाही. सॅली फक्त हसली, आणि जेनाला म्हणाली, इडियट ! इटस् अ टू मच जेना, दाताचे वण दिसेपर्यंत...? त्यांना ऑफिसमध्ये जायचं असतं.'

'ओ. सॉ ऽऽऽ री ऽ !' असं म्हणत जेना सॅलीला बिलगली आणि तिच्याही गालावर 'तसलीच' मोहोर उठवत म्हणाली, 'रिटर्नड् बॅक टू यू ! ओ. के. ?'

'दोघी बहिणींचा हेवा वाटला मला.'–आणि थोरात हसत सुटले.

क्षणभर मलासुद्धा हेवा वाटला. तिघांचा !

–आणि असे कितीतरी क्षण, हेवा करण्यासारखे–थोरातांनी अनुभवलेत–मी फक्त ऐकलेत.

अंकल थोरात याही वयात किती एव्हरग्रीन आहेत, हे त्यांनी, या वयात त्यांच्या होणाऱ्या कुचंबणा मला सांगितल्यावर कळलं.

कुचंबणा होत नाहीत कोणाच्या ? पण ज्या माणसाला मन मारून जगणं कधी माहितच नाही असा माणूस वयपरत्वे होणाऱ्या मानसिक आणि शारीरिक कुचंबणांनी असहाय्य होतो तेव्हा त्याला जरूर असते एका मित्राची, मन मोकळं करण्यासाठी.

त्यांची ही गरज मी भागवत होतो. आमच्या दोघांच्या वयात दुपटीने फरक होता. मी त्यांना मुलाप्रमाणे होतो. अंकल पन्नाशीला पोहोचले होते तर मी नुकतीच पंचविशी ओलांडली होती.

पण–

आमची 'वेव्हलेंग्थ' अशी काही जुळली होती म्हणता– एक दिवस आण्टी मला म्हणाल्यासुद्धा !

आण्टी ! होय. मिसेस सॅली थोरात.

नाताळमध्ये, एकतीस डिसेंबरच्या रात्री डिनरसाठी थोरातांनी बोलावलं होतं. जेवायला बेत साधाच होता, बिर्याणी, मटनफ्राय आणि आमलेट, बरोबर पुडींगही !

जेवायला सुरवात करण्याअगोदर अंकल म्हणाले, 'फेणी घेणार थोडीशी, काजुची आहे, टेस्ट तर करा. आमच्या मेहुण्याने गोव्याहून मुद्दामहून पाठवलीय माझ्यासाठी.'

'थँक्स ! सॉरी अंकल. मी घेत नाही.'

समोर आण्टी उभ्या होत्या. त्यांच्यासमोर फेणी घ्यायला माझं मन तयार होईना. माझी अवस्था अवघडल्यासारखी झाली. मी गोंधळून गेलो. ते पाहून आण्टी हसल्या. थोरातांच्याही ते लक्षात आलं.

'घ्या हो, लाजता काय ?' अंकल म्हणाले.

'अहो पण त्यांना नकोय तर तुमचा आग्रह का ? तुमच्याबरोबर त्यांना कशाला बिघडवता ?' आण्टी उर्फ मिसेस सॅली थोरात म्हणाल्या.

'सॅली, अग तरुण वय आहे, येऊ दे जरा अनुभव, घ्या हो तुम्ही, आपली मुलं आपल्यासमोर घ्यायला घाबरतात, कचरतात याचा अर्थ ते अजिबात घेत नसतील काय ?'

'घेत असतील तर काय–तुमचीच मुलं ती !' आण्टी.

मी डोळे मिटून ग्लास रिकामा केला.

जरा वेळाने मिसेस थोरातांनी माझ्यापुढे हात करून विचारलं, 'हौ मेनी फिंगर्स, फिफ्टीन, ट्वेंटी ?'

'आय अॅम क्वाईट ओके आण्टी'. मी स्वच्छ उत्तर दिलं.

म्हणूनच एक दिवस आण्टी मला म्हणाल्या, 'हे घरी आल्यावर सारखा तुमच्या नावाचा जप चालू असतो, जोशी असं म्हणाले, जोशी तसं म्हणाले.'

'–आणि आण्टी, अंकल ऑफिसमध्ये आले की तुमच्या नावाचा जप चालू असतो.'

एक दिवस, थोरात आणि आण्टी यांना मी घरी जेवायला बोलावलं होतं तेव्हा अंकलना इतका आनंद झाला की, आण्टी मला म्हणाल्या, 'तुम्ही ह्यांना आमंत्रण दिलं त्या दिवशी घरी आल्यावर अक्षरश: माझा हात धरून मला ह्यांनी नाचवलं आणि स्वत:ही नाचले, आता का आमचं नाचायचं वय आहे ?'

आण्टी म्हणाल्या ते बरोबर होतं. संसारातल्या जबाबदाऱ्या पेलून आण्टी थकल्या होत्या. कसलाही उत्साह आता उरला नव्हता आणि उसना उत्साह आणून सांगतात कोणाला ?

मुलं आता मोठी झाली होती. मुलींची लग्न होऊन घरात नातवंडं आली होती. जागा अपुरी पडत होती.

मग जेनाच्या सहवासात अंकलना स्वत:चं हरवलेलं तारुण्य गवसलं त्यात नवल ते काय ?

जेनालासुद्धा क्षणभर मोह पडावा असे अंकल होते. –आणि तसा मोह झाला सुद्धा होता.

अंकलची होणारी कुचंबणा जेनासुद्धा ओळखून होती. म्हणूनच,

जेनाला भक्कम पगाराची नोकरी लागल्यावर तिने फ्लॅट घेतला तेव्हा अंकल आणि आण्टी यांना आठ दिवस एका खोलीत कोंडून ठेवलं होतं.

हे सगळं आज आठवायचं कारण–
तसं पाहिलं तर काहीच कारण नव्हतं.

आमच्या कंपनीची सेकंड शिफ्ट बारा वाजताच सुटून गेली होती. कामं उरकून ऑफिसच्या बाहेर येई-पर्यंत साडेबारा झाले होते. रात्री मात्र, हवेत एकदम फरक पडला होता. मंद असा गार वारा सुटला होता. दुपारच्या भयानक उकाड्यानंतर आताच्या हवेचा स्पर्श सुखद वाटत होता.

नेहमीप्रमाणे अजंठामध्ये चहा घ्यावा आणि मग तडक घर गाठावं या विचारात होतो.

हॉटेलच्या अलिकडेच डाव्या बाजूच्या सिमेट्री-समोर म्हणजे ख्रिश्चन लोकांच्या दफनभूमीसमोर रस्त्याच्या मधोमध बरीच गर्दी जमली होती. मी स्कुटर थांबवली. रस्त्याच्या बाजूला उभी केली. सिमेट्रीच्या बाहेर उभ्या असलेल्या रखवालदाराकडे चौकशी केली. त्याला मी थोडाफार ओळखत होतो.

रखवालदाराशेजारी उभ्या असलेल्या आणि त्याच्याशी गप्पा मारणाऱ्या एका इसमाने त्या गर्दीचा तपशील पुरवला.

एक किरकोळ अपघात झाला होता. बैलगाडी-मध्ये रिक्षा घुसली होती. रिक्षाची धडक बसल्यामुळे जखमी होऊन बैल उधळून पळाला होता. गाडी हाकणारा बेशुद्ध पडला होता.

मी त्या सिमेट्रीच्या रखवालदाराला विचारलं, 'काय हो, आज दुपारी चार वाजता मी इथून चाललो होतो तेव्हा सिमेट्रीमध्ये फार मोठा वणवा पेटला होता. मुद्दाम लावला होता की आपोआप लागला होता ? त्याची धग इथं रस्त्यापर्यंत येत होती.'

'होय ना. अगदी भाजून निघाल्यासारखं वाटत होतं ?' गप्पा मारणारा तो दुसरा इसम म्हणाला.

'बराच वाळलेला पाला पाचोळा पडला होता. जाळून टाकला.' रखवालदार म्हणाला.

'तुमची झाली स्वच्छता. पण त्या जमिनीखालच्या बंद पेटीतल्या माणसांची काय अवस्था झाली असेल? अहो आधीच एप्रिल-मेचं कडक उन, त्यात त्या वणव्याची धग, उकाडा सहन न होऊन त्या काफीनमधलाच माणूस उठून बाहेर यायचा जरा गार वाऱ्याला.' मी विनोदाने म्हणालो.

'एक्झॅक्टली! संध्याकाळीच मला थोरात म्हणाले होते, जरा गार वाऱ्यावर जाऊन बसेन म्हणतो.' तो गप्पिष्ट म्हणाला.

'हे थोरात कोण?' रखवालदाराने विचारलं.

'थोरात माहित नाही? कमाल करता, अहो आपले अंकल.'

'अच्छा, म्हणजे चर्चमध्ये संध्याकाळी प्रवचन करतात ते?'

'तेच ते' तो गप्पिष्ट.

'मोठा रंगेल माणूस' मी.

'असं? आम्हाला काही कल्पना नाही.' रखवालदार.

'वा! तुम्ही नुसत्या त्यांच्या प्रवचनांवर जाऊ नका, अंकलनी आयुष्य पुरेपूर उपभोगलंय, अक्षरशः हेवा करण्यासारखं आयुष्य जगले.' मी.

–आणि मग थोरातांच्या आयुष्यातला जेनाचा किस्सा सांगणं ओघानं आलं.

'खरंय, थोरात भेटले की अशा गंमती जमती नेहमी सांगत असतात, मोठा मजेदार माणूस.' गप्पिष्ट.

'तुम्हाला कोठे थोरात भेटतात?' मी.

'वा! रोज भेटतात तर–' गप्पिष्ट.

'काय सांगताय? चेष्टा करताय काय आमची?' मी.

'वाय गॉड! खरंच, दुपारीच अंकल म्हणाले होते, आज फारच उकडतंय.' गप्पिष्ट.

'अहो कसे भेटणे शक्य आहे? येत्या ऑक्टोबरात तीन वर्षं होतील त्यांना जाऊन.' मी.

अंकल आपल्यात नाहीत या वस्तुस्थितीची जाणीव पुन्हा एकदा तीव्रतेनं झाली. खरंच थोरात फार लवकर गेले. जाताना चटका लावून गेले. तो दिवस निदान मी तरी विसरणं शक्य नाही.

दहा ऑक्टोबर.

दसरा. ऑफिसला सुट्टी होती. त्यादिवशी बुधवार होता. मंगळवारी संध्याकाळी ऑफिस सोडताना अंकल म्हणाले. 'उद्या सुट्टी आहे. या संध्याकाळी गप्पा मारायला.'

'सहा, साडेसहापर्यंत येतो' असं मी म्हणालो. पण प्रत्यक्षात मला सहाच्या अगोदरच म्हणजे फार लवकर जावं लागलं. दोन वाजता.

दुपारी एक वाजता फोन मिळाला–

अंकल गेले.

दहा ऑक्टोबर!

अलका सकाळपासूनच हॉस्पिटलमध्ये होती. कळा वाढल्या होत्या.

अंकलना निरोप देऊन घरी येतो तोच दुसरा फोन–

अजयचा जन्म झाला होता. वजन सात पौंड.

बाळ बाळंतीण सुखरूप.

कधी एकदा दोघांना पाहीन असं झालं होतं.

नियती माणसाच्या आयुष्यात केवढं नाट्य निर्माण करते. एका डोळ्यात मित्र वियोगाचं दुःख होतं. तर दुसऱ्या डोळ्यात दसऱ्याच्या मुहूर्तावर पुत्रलाभाचा आनंद!

नाट्य, नाट्य म्हणतो, ते याहुन वेगळे काय असते. अंकल गेले ही धक्कादायक बातमी मी अलकाला सांगू शकत होतो, पण.

'मला मुलगा झाला' ही आनंदाची बातमी धावत जाऊन ज्यांना सांगावी ते अंकल दुपारीच निघुन गेले होते. फार लांब. दूरच्या प्रवासाला.

एखाद्या चित्रपटाप्रमाणे या सर्व घटना माझ्या मनःचक्षु समोर सरकून गेल्या.

'तुम्हाला कोठे भेटले होते' अंकल? रखवालदाराने त्या गप्पिष्टाला विचारलं.

'ते काय तिथं.'–आत सिमेट्रीकडे बोट दाखवत तो गप्पिष्ट म्हणाला.

'तिथे ? शक्यच नाही, आणि तुम्ही आत गेलात कसे ? आत जायला परवानगी नाही.'–रखवालदार म्हणाला.

'वा ? अहो तिथंच तर मी रहातो.'–तो गप्पिष्ट.

'काय ? वेड तर लागलं नाही ना तुम्हाला ? आता रहायला परवानगी नाही कोणाला.'–रखवालदार.

'परवानगी काढूनच तर आम्ही तिथे रहातो.'–गप्पिष्ट.

'कोठे ?'–रखवालदार.


'ते काय तिथंच ! मी चाललो परत.'–असं म्हणत बोट दाखवलेल्या जागेकडे जात तो गप्पिष्ट म्हणाला.

–हा माणूस वेडा असावा म्हणून रखवालदाराने त्याला अडवण्याचा प्रयत्न केला.

पण छे ! बघता बघता तो वितळून हवेत मिसळून गेला, धुरासारखा.

उरलो होतो फक्त मी, रखवालदार आणि डोक्यापासून पायापर्यंत निथळत जाणारे घामाचे लोट !

△ △ △



गुलाबराव महाराज व त्यांचे हिन्दी साहित्य

कृष्ण दिवाकर

महाराष्ट्रामध्ये साधु-संतांची फार मोठी परंपरा आहे. प्राचीन काळापासून आजपर्यंत चक्रधर, ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदास, बहिणाबाई, नृसिंह सरस्वती, माणिक प्रभू, गजानन महाराज, अक्कलकोटचे श्रीस्वामी समर्थ, साईबाबा, वासुदेवानंद सरस्वती टेंबेस्वामी, गोंदवलेकर महाराज, संत गाडगे महाराज, स्वामी स्वरुपानंद इत्यादी महान साधुसंतांमध्ये विदर्भातील संत गुलाबराव महाराज यांचेही विशिष्ट महत्त्वाचे स्थान आहे. बालांध असूनही अवघ्या चौतीस वर्षांच्या आयुष्यामध्ये संत गुलाबराव महाराजांनी विविध विषयांवर जे विपुल साहित्य निर्माण केले ते त्यांच्या अलौकिकत्वाचीच साक्ष देते. नेत्रहीन अवस्थेमध्ये ही ज्ञानार्जनाची जी तळमळ त्यांचे ठिकाणी दिसून येते तिला तोड नाही. दुसऱ्यांकडून ज्ञानाच्या विविध स्तरांचे वाचन करवून घेणे, त्याचा संग्रह स्मरणात ठेवणे व आपल्या अलौकिक प्रतिभेने विशिष्ट उद्देश डोळ्यासमोर ठेवून संस्कृत, हिन्दी, मराठी, वऱ्हाडी व व्रज भाषांमध्ये सुमारे १३० ग्रंथांची निर्मिती करून भारतीय संस्कृती व परंपरेचे संरक्षण करणे साधीसुधी गोष्ट नाही.

मराठी संतांपैकी बऱ्याच संतांनी आपले विचार-धन मुख्यत्वे करून आपल्या मराठी या मातृभाषेत व्यक्त केले. परंतु त्यांचा दृष्टिकोण संकुचित नव्हता. मराठी ज्यांची मातृभाषा नाही त्यांनाही आपले विचार समजावे व त्यांचा प्रचार-प्रसार व्यापक रूपात व्हावा, या दृष्टीने संतांनी मराठी भाषेव्यतिरिक्त हिन्दी भाषेमध्येही साहित्य रचना केली. संत गुलाबराव महाराजही त्याला अपवाद नाहीत. संत गुलाबराव महाराज यांचे हिन्दी भाषेमध्ये मनोहारिणी, स्वमंत-व्यांशसिद्धांत तुषार आणि पदांची गाथा असे तीन ग्रंथ उपलब्ध आहेत. यांचा क्रमशः परिचय करून घेणे आवश्यक आहे.

मनोहारिणी :

श्रीगुलाबराव महाराज ज्ञानेश्वर माउलीचे परमभक्त होते. ते स्वतःला ज्ञानेश्वर-कन्या म्हणवून घेण्यात स्वतःचा गौरव समजत असत. ज्ञानेश्वर महाराजांच्याच प्रेरणेने सनातनधर्म भगवद्भक्तीच्या प्रसाराचे काम त्यांनी केले. ज्याप्रमाणे ज्ञानेश्वर महाराजांनी श्रीकृष्णाने सांगितलेल्या संस्कृत गीतेवर मराठी भाषेमध्ये सरस टीका लिहून 'ज्ञानेश्वरी' ग्रंथ सिद्ध केला त्याचप्रमाणे संत गुलाबराव महाराजांनीही गीतेमधील तत्त्वज्ञान सामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वाचे कार्य केले. त्यांनी गीतेमधील महत्त्वाचे श्लोक डोळ्यासमोर ठेवून अत्यंत सोप्या, सरळ हिन्दी भाषेमध्ये गीतेतील तत्त्वज्ञान सांगण्यासाठी प्रवचनाचे माध्यम स्वीकारले. व्यवहारातील अनेक उदाहरणे देऊन अत्यंत समर्पक नि रसाळ भाषेत त्यांनी गीता समजावून सांगितली. त्यांनी वेळोवेळी दिलेल्या गीतेवरील अशा हिन्दी प्रवचनांपैकी काही महत्त्वपूर्ण प्रवचनांचा सार-संग्रह या ग्रंथामध्ये केलेला आहे. त्याचे संपादन संत गुलाबराव महाराजांच्या मधुराद्वैत पीठाचे आचार्य श्री बाबाजी महाराज पंडित 'ज्ञानेशजासुत' यांच्या सारख्या अधिकारी व्यक्तीने केले आहे. या ग्रंथाचा मुख्य उद्देश अत्यंत सरळ व रमणीय भाषेत गीतार्थ सांगणे असल्यामुळे याचे नाव 'मनोहारिणी' ठेवले असल्याचा उल्लेख ग्रंथारंभीच करताना महाराज म्हणतात :

अलकावतिपति चरण को पुनि पुनि करी प्रणाम ।
रमण वचन भाषा करूँ 'मनोहारिणी' नाम ।।

या ग्रंथामध्ये आध्यात्मिक, आधिभौतिक, आधिदैविक दु:खे व त्यांचे प्रकार, लोक–परलोक, सत्य–सत्याभास, कर्मकांड, उपासनाकांड व ज्ञानकांड, पाप–पुण्य कल्पना, मोक्ष, समन्वयाध्यास, श्रुतिविरोध, वैराग्यनिरूपण, निर्गुण विद्या, सगुण विद्या, गीताशास्त्राचे महत्त्व, मोहाचे स्वरूप, धर्म–अधर्म, देह व आत्मा यांचे पृथकत्व, त्रिदोष, उत्तम, मध्यम व कनिष्ठ अधिकार नि त्यांची वैशिष्टये, प्रेम व द्वेष, स्वार्थ, परोपकार, जीव, ब्रह्म व ईश्वर, विवेक, जन्मकर्मवाद व गुणकर्मवाद, देहबुद्धी, पशु व मनुष्याची तुलना, धर्महीन कर्महीन मनुष्यापेक्षा पशुंचे श्रेष्ठत्व, पुनर्जन्म, देहाच्या तीन अवस्था–बालपण, तरुणपण नि वार्धक्य, नाशिवंत पदार्थ, अविनाशी आत्मा, तंत्रविद्या, संजीवन प्रयोग, आस्तिक व नास्तिक विचार, नियतिवाद, चार्वाक सिद्धांत, जड व चेतन पदार्थांची वैशिष्टये, मन व त्याचे स्वरूप, सुखाची व्याख्या, परमेश्वर प्राप्तीमधील विविध बाधा, प्रवृत्ती व निवृत्ती, स्पर्श, रूप, गंध, अटळ कर्मगती, परस्परांचे संबंध व त्याचा अर्थ, मनाचे धर्म, वैराग्य नि त्याचे प्रकार, अविनाशी आत्म्याचे महत्त्व, ब्रह्मानंदाचे श्रेष्ठत्व इत्यादी अनेक महत्त्वपूर्ण विषयांची अत्यंत रोचक नि समर्पक चर्चा 'मनोहारिणी' या हिन्दी ग्रंथामध्ये केलेली आहे.

निरूपणाचे आरंभी संस्कृत किंवा हिन्दी छंद देऊन ईश्वराचे अथवा ज्ञानेश्वरमाउलीचे वंदन करण्याची पद्धत गुलाबराव महाराज यांनी स्वीकारलेली दिसते. आपल्या निरूपणामध्ये रसाळपणा, औत्सुक्य व तर्कशुद्धता आणण्यासाठी महाराज सोप्या ब्रजमिश्रित हिन्दी भाषेचा जसा उपयोग करतात तसेच नैमित्तिक जीवनातील बहुप्रचलित उदाहरणांचे दाखले देऊन तात्त्विक विचार व्यावहारिक बैठकीतून ते अत्यंत कुशलतेने समजावूनही सांगतात. गुलाबराव महाराजांचे संस्कृत, मराठी व हिन्दी भाषांमधील श्रेष्ठ ग्रंथांचे वाचन व मनन अत्यंत व्यापक असावे असे दिसते. कारण गीतेतील विचार समजावून सांगतानाच ते कधी वेदांत, श्रुति, स्मृति, भागवत, उपनिषद आदी ग्रंथांचे आधार देताना दिसतात तर कधी कक्षपुटी, संप्रदाय चूडामणि, मत्स्येंद्रपद्धति किमयागार ग्रंथातील सुरस कथांचे संदर्भही ते देतात. संत ज्ञानेश्वर, तुकारामांच्या अभंगांची उदाहरणे आपले प्रवचन खुलविण्यास संत गुलाबराव जसे देतात तसे गोस्वामी तुलसीदास, सूरदास, सुंदरदास इत्यादी हिन्दी संतांच्या पदांची उदाहरणेही ते तितक्याच सहजतेने देतात.

स्वमंतव्यांशसिद्धांत तुषार

संत गुलाबराव महाराज यांचा हा दुसरा हिन्दी भाषेतील ग्रंथही पहिल्या ग्रंथाप्रमाणेच किंबहुना त्याही-पेक्षा अधिक लोकप्रिय झालेला दिसतो. या ग्रंथाच्या तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशनच या गोष्टीचे द्योतक आहे. या ग्रंथामागेही संत गुलाबराव महाराजांचा हेतू सर्व-सुलभ अशा भक्तिमार्गाचे जिज्ञासूंना दर्शन घडविणे असा दिसतो. महाराज स्वत:ला जसे ज्ञानेश्वरकन्या म्हणवून घेत तसेच ते स्वत:ला श्रीकृष्णाची पत्नीही मानत असत. श्रीकृष्णाची भक्ती केली असता मनुष्यास सद्‌गती प्राप्त होऊ शकते असा गुलाबराव महाराजांचा विश्वास आहे. 'स्वमंतव्यांशसिद्धांत तुषार' या ग्रंथाचे आगळेपण त्याच्या रचनेच्या विशिष्ट संवादात्मक शैली-मध्ये आहे. परमेश्वर प्राप्तीच्या अनेक साधनांमध्ये भक्ती हे प्रभावी नि सोपे साधन असल्याचा निर्वाळा महाराज देत असतात. भक्तीचे जे विविध प्रकार आहेत, त्यामध्ये मधुराभक्ती गुलाबराव महाराजांच्या मते सर्वश्रेष्ठ आहे. श्री गुलाबराव महाराज स्वतः मधुरा-द्वैताचार्य होते. स्वत:ला श्रीकृष्णाची पत्नी समजून प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्णाची भक्ती करीत असताना ते पूर्णपणे तन्मय होऊन जात असत. श्री गुलाबराव महा-राजांच्या भक्तीचे स्वरूप, त्यांची तन्मयता, कृष्णपत्नी-त्वाची भावना, निस्सीम कृष्णप्रेम ज्ञानेश्वराविषयीचा पितृभाव व अनेक चमत्कार इत्यादी गोष्टींमुळे जनते-मध्ये श्री गुलाबराव महाराज त्यांचे तत्त्वज्ञान याविषयीं जिज्ञासा उत्पन्न होणे स्वाभाविकच होते. संत गुलाबराव महाराज हे सिद्धपुरुष होते. लोकांच्या मनातील जिज्ञासा तोषविली पाहिजे, त्यांच्या प्रश्नांना व जिज्ञासेला समाधानकारक उत्तर देणे आवश्यक होते. म्हणून कदा-चित् स्वत:च्या कार्यासंबंधी व भक्तीच्या स्वरुपाविषयी प्रश्नोत्तराच्या पद्धतीने त्यांनी विवेचन केले आहे.

या ग्रंथाच्या आरंभीच संस्कृतमध्ये वंदन केले आहे. त्यात आदिनाथ, मत्स्येन्द्रनाथ, गोरक्षनाथ, गहिनी-नाथ, निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव, मुक्ताबाई यांचा सादर समावेश आहे. त्यानंतर माता पार्वती व शंभुर्गुरु ज्ञानेश्वर, पतिरूप कृष्ण आणि भगिनीरूप राधा यांचे स्मरण केलेले आहे. संस्कृतमधील वंदनानंतर

हिंदीमध्ये तीन गुरुस्तुतीपर पदे आहेत. प्रत्येक पदाच्या आरंभी वृत्त राग व ताल यांचा निर्देश केलेला आहे. शेवटी गुरूचे महत्व सांगणारा एक हिंदी दोहा दिला आहे, तो असा:—

वडे प्रेमतें एक घडी खडा सद्गुरु द्वार।
तिसका चारो मुक्ती करत निःसाधनहि स्वीकार ॥

यानंतर मंगलाचरण म्हणून हिंदीतील प्रसिद्ध संत चरणदास व सुंदरदास यांच्या पदांनी विवेचनाची पार्श्वभूमी तयार केली आहे. यामध्ये व्रजमंडळ, त्याचे महत्त्व, श्रीकृष्ण लीला, भक्तीची तल्लीनता, संयोग-वियोग स्थिती, परमानंद प्राप्ती इत्यादी गोष्टींचे वर्णन आहे. मंगलाचरणानंतर मूळ ग्रंथास आरंभ होतो. ग्रंथारंभी दोन हिंदी दोहे व एक चौपाई असे छंद दिले आहेत. त्यामध्ये गुलाबराव महाराजांच्या श्रीकृष्ण भक्तीचे स्वरूपही दिसून येते. खालील दोहा छंद उल्लेखनीय आहे:—

ज्ञानेश्वर करूणाघन कारण जगदोद्धार।
तिनकी कृपा नंदसुतकंठ डारेंगी हार ॥

प्रारंभिक तीन छंदानंतर संत गुलावराव महाराजांनी प्रश्नोत्तर शैलीमध्ये आपल्या विवेचनास आरंभ केलेला आहे. संपूर्ण ग्रंथामध्ये एकूण १३१ प्रश्न दिले असून प्रश्नांच्या स्वरूपाप्रमाणे त्यांची उत्तरेही दिली आहेत. त्यामुळे साहजिकच काही प्रश्नांची उत्तरे विस्तृत तर काहींची उत्तरे अत्यंत संक्षिप्त रूपामध्ये मिळतात. संत गुलावराव महाराज कोण आहेत ? त्यांच्या अवताराचे कार्य काय ? कुणाच्या आदेशाप्रमाणे ते भक्तिस्थापनेचे कार्य करीत आहेत ? इत्यादी प्रास्तविक प्रश्न व त्यांच्या उत्तरानंतर महाराज मूळ भक्ती निरुपणांकडे वळतात.

परमप्रेमरूपा भक्ती, तिच्या प्रेमाचा विषय श्रीकृष्ण, विवेचनास श्रुतीचा आधार, श्रीकृष्ण भक्तीचे श्रेष्ठत्व, राम, नरसिंहादिक अवताराचे प्रयोजन, उपासनेचे स्वरूप, भक्तीचे लक्षण, श्रीकृष्णाचा सगुण पूर्णावतार, ईश्वरत्वाची लक्षणे, जीव आणि ईश्वरामध्ये अंतर, जीव हा परमेश्वरचा अंश कसा आहे ? ज्ञान व भक्तीची फळे, पूर्ण जीव आणि ईश्वर यांचे अभिन्नत्व, अनादि अविद्या व तिचे स्वरूप, आवरण व विक्षेप, निर्गुणोपासना व सगुणोपासनेतील अंतर, सगुणोपासनेचें स्वरूप व महत्व, निर्गुण व सगुण एकाच ईश्वराची भिन्न-भिन्न रूपे, परब्रह्म स्वरूप, भक्तीची आवश्यकता, तुलाविद्या व तिची अल्पदेशाव्यापकता, मूलाविद्या व तिचे अनंतब्रह्मांडव्यापकत्व, प्रारब्ध अवतार व त्याचे लक्षण, भक्ती व मुक्ती, प्रवृती व माया, अवतारांचे प्रकार, भक्ती करण्याचा अधिकार कोणाचा असतो ? आत्मनिवेदनाचे स्वरूप, अखंडानंद म्हणजेच मोक्ष, इत्यादी अनेक विषयांवर प्रश्न उपस्थित करून गुलाबराव महाराजांनी त्यांची अत्यंत समर्पक शब्दांत उत्तरे दिली आहेत. ही उत्तरे देत असताना महाराजांनी नारद भक्तिसूत्र, भक्तिरसायन, कृष्णोपनिषद, भगवद्गीता, ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, भागवत, मुंडकोपनिषद, शंकराचार्यांचा विवेक चूडामणी, सामवेद, पातंजल योग, स्वामी विद्यारण्याचा विवरण प्रमेय संग्रह इत्यादी अनेक ग्रंथांचे आधार दिले असून आपली मते कशी शास्त्रसम्मत आहेत हे पटविले आहे. विवेचनात मधून-मधून स्वत: रचलेले सोपे हिन्दी दोहे, व प्रसिद्ध हिन्दी कवींची उदाहरणेंही ते प्रस्तुत करतात. अशा तऱ्हेने स्वमंतव्यांशसिद्धांत तुषार या प्रश्नोत्तररूप ग्रंथामध्ये गुलावराव महाराज यांची माधुर्यभक्तीची सांगोपांग व विस्तृत चर्चा करून भक्तीचे महत्त्व प्रतिपादिले आहे.

'मनोहारिणी' व 'स्वमंतव्यांश सिद्धांत तुषार' या दोन्ही ग्रंथांच्या विवेचनाचा विषय तत्त्वज्ञानाशी संबंधित आहे. त्यामुळे विषयाला अनुसरूनच श्री. गुलावराव महाराजांनी या दोन्ही ग्रंथांच्या विवेचनासाठी हिंदी गद्य भाषेचा प्रयोग केला आहे. ग्रंथातील हिंदी गद्यभाषा शुद्ध खडीबोली परिनिष्ठित हिंदी नाही. सामान्य जनतेला समजेल अशा सोप्या बोलचालीच्या हिंदी भाषेत त्यांनी आपले विवेचन केले आहे. त्यांच्या हिन्दी भाषेमध्ये संस्कृत, व्रजभाषा, मराठी, गुजराती, वैदर्भी, फारसी आदी भाषेतील शब्दही आढळतात. ग्रांथिक भाषा महाराजांना जनतेशी जवळीक साधण्याचे दृष्टीने फारशी उपयुक्त वाटत नसावी असे वाटते. वाक्यरचना व अनेकवचनी शब्द व्रजभाषेच्या प्रकृतीला धरून आहेत. सन् १८८१ ते १९१५ ह्या कालखंडातील सीमावर्ती प्रदेशातील हिन्दीचे व्यावहारिक रूप म्हणून गुलाबराव महाराजांच्या या दोन्ही ग्रंथातील हिन्दीचे उदाहरण देता येईल. त्यांच्या प्रश्नोत्तर शैलीतील हिन्दीभाषा तर इतकी सोपी

वाटते की वाचताक्षणीच कोणासही सहज ती कळू शकते. उदाहरण म्हणून खालील संवाद पाहण्यासारखा आहे.

प्रश्न–ईश्वरत्व के लक्षण क्या हैं ?

उत्तर–जिसके आश्रित षड्भग होवे है, सो ईश्वर है ।

प्रश्न–षड्भग कौनसे हैं ?

उत्तर–श्री, यश, औदार्य, ज्ञान, वैराग्य और ऐश्वर्य ।

प्रश्न–अब एक एक का पृथक लक्षण कहो ।

उत्तर–मनोहर शोभा का नाम श्री है । यश है वह जो थोडे कर्म में अत्यंत कीर्ती और श्रेय मिलना । इच्छानुसार देने का नाम औदार्य है । ज्ञान दो प्रकार का; व्यवस्थाकारी और बंधनिवर्तक । जगत की उत्पत्ति, स्थिति, लय की व्यवस्था को जानना व्यवस्थाकारी ज्ञान है और अज्ञान की निवृत्ति जिससे होती है तत बंधनिवर्तक ज्ञान है । किसी कर्म में वा फल में आसक्ति नहीं रखना वैराग्य है । अप्रतिबद्धाऽखंडानंद और कर्तुम् अकर्तुम् अन्यथाकर्तुम् शक्ति का नाम ऐश्वर्य है । यही षड्भग हैं । इनका अधिष्ठान परमात्मा है ।

हिन्दी पदांची गाथा

संत गुलाबराव महाराज यांनी मराठी भाषेमध्ये ज्याप्रमाणे गद्य व पद्य या दोन्ही प्रकारामध्ये लेखन केले आहे त्याच प्रमाणे हिन्हीमध्येही त्यांनी या दोन्ही प्रकारामध्ये लेखन केलेले आढळते. गुलाबराव महाराज हे केवळ प्रतिभासंपन्न कवी व लेखकच नव्हते तर ते एक श्रेष्ठ तत्त्वचिंतक, संगीत विशारद व उत्तम गायकही होते. आपल्या विचारांची अभिव्यक्ती करण्यासाठी त्यांनी मराठी पदांप्रमाणे हिन्दी भाषेतही पदे लिहिली आहेत. गुलाबराव महाराजांनी वेळोवेळी रचलेल्या पदांचा हा संग्रह आहे. प्रारंभी अन्य संतांच्या अभंग गाथ्यात असल्याप्रमाणे मराठी पदामध्ये मधून मधून हिंदी पदे मिसळलेली होती. परंतु गु. वा. पिंपळापुरे, यांनी मधुर प्रकाशन, नागपूरच्या वतीने प्रकाशित झालेल्या तिसऱ्या आवृत्तीमध्ये मराठी व हिंदी पदे स्वतंत्र केली असल्याने अभ्यासकाची मोठी सोय झाली आहे. हिन्दी पदाचा स्वतंत्र संग्रहही छापला असल्याचे डॉ. कृ. मा. घटाटे यांनी मला प्रत्यक्ष सांगितले आहे. परंतु मला हिन्दी पदसंग्रह स्वतंत्र रूपात छापलेला पहावयास मिळू शकला नाही. असो. हिन्दी पदसग्रह सोईसाठी वेगळा छापला असल्याचे कळले परंतु मराठी प्रमाणे हिन्दी जाणकाराकडून संपादन होणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणजे त्यातील सहज जाणवणारे दोषही राहणार नाहीत. हिन्दी पद संग्रहामध्ये एकूण ४०६ पदांची संख्या दिलेली आहे. ही संख्या देत असताना प्रकाशकाचे मनामध्ये 'पद' याचा पारंपरिक अर्थ नसावा असे दिसते. पद्यामध्ये जे लिहिले ते पद असा ढोबळ अर्थ गृहीत धरला असावा असे दिसते. कारण यामध्ये पदाच्या व्यतिरिक्त दोहे, चौपाई आदींचाही समावेश आहे.

संगीताची बैठक

या गाथेतील पदांचे आरंभी छंद अथवा वृत्त, राग व ताल यांचा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. दोहे, चौपाई यांचे बाबतीत असा उल्लेख नाही, ते स्वाभाविकच आहे. यावरून स्वतः गुलाबराव महाराज व त्यांचे भक्तगण ही पदे जनतेसमोर शास्त्रीय पद्धतीने गात असावेत असे स्पष्ट होते. त्यांच्या पदांमध्ये भूप, जोगिया, दरबारी कानडा, बागेश्री, कानडा, केदार, असावरी, घनासरी, बिहाग, यमन, यमनकल्याण, जीवनपूरी, भीमपलास, मांड, कामोद, काफी, गौड सारंग, मंजरी, सोरठ, पिलू, देस खमाज, हमीरकल्याण, तोडी, भैरवी इत्यादी अनेक रागांचा उल्लेख मिळतो. मात्रिक व वर्णिक अनेक छंद प्रकार उपलब्ध आहेत. तालांमध्ये मुख्यत्वे करून त्रिताल दिसून येतो. याशिवाय धुमाळी, राजविद्याधर, पेजावी ठेका, दादरा, केरवा, दीपचंदी, गजल इत्यादी तालांचेही उल्लेख आहेत. अशाप्रकारे सर्व पदांचे शास्त्रीय संगीताचे दृष्टीने विवरण उपलब्ध असून गाणाऱ्यासाठी सूचनाही मिळतात मधून मधून सुंदर दोहे, चौपाई, साकी मध्ये ही सुंदर हिन्दी काव्यरचना मिळते. संगीतत्वाचा स्पर्श झाल्याने गुलाबराव महाराजांची हिन्दी पदे श्रोतृवृंदांना आकर्षून घेण्यास सहज समर्थ आहेत असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

पदांतील विषय

हा सर्व मुक्तक पद्य रचनेमध्ये संत गुलाबराव महाराज यांनी अनेक विषयांचा समावेश केला आहे. महाराष्ट्रातील परंपरेप्रमाणे आरंभीच विघ्नहर्त्या गणेशाचे स्तवन केले असून त्यानंतर सगुण रूप वर्णन, नाममहिमा, संतप्रशस्ती, सद्गुरुमहिमा, उपासना व

तचे महत्त्व, करुणा, भक्ती, वेदांत, उपदेश, श्रीकृष्ण-लीला, द्रौपदीचा धावा, रासक्रीडा, दशमस्कंधसार, विरहिणी, प्रणयकलह, पौराणिक आख्यान, योग, रूपक, भूपाळी, संकीर्ण, शिवस्तुती, गीतास्तुती, तात-स्तुती, इत्यादी विषयांवर विविध काव्यरचना आढळून येते. जवळ जवळ असेच विषय त्यांच्या मराठी पदगाथे-मध्ये दिसून येतात.

श्री गणेश वंदन करताना संत गुलाबराव महाराज श्रीगणेशाच्या अगाधतेची थोरवी वर्णन करतात व आपले गुरु व पिता श्री ज्ञानेश्वर महाराजांचाही उल्लेख मोठ्या श्रद्धेने करताना दिसतात–

ज्ञानेश्वर गुरुनाथ हमारे ।। धृ. ।।
सोहि गणेश विघ्न के हर्ता ।
बिन पग सीस उघारे ।। १ ।।

सोहि सारदा मति के दायक ।
बैठे आणि हमारे ।। २ ।।

सोहि सद्गुरु जीव ब्रह्मकर ।
महावाक्य में रहे सिधारे ।। ३ ।।

सोहि संत समाजसरुप हैं ।
व्यापक जग जगमांहि बिहारे ।। ४ ।।

सोहि तुम श्रोते सज्जन हो ।
श्रवण करो हरिचरित सुधारे ।। ५ ।।

ज्ञानेश्वर प्रभु तात मात गुरु ।
मम हिरदे तिनके पग धारे ।। ६ ।।

मुख्य उद्देश्य : भक्ती:–

संपूर्ण हिन्दी पदावलींचा सूक्ष्म अभ्यास केल्या-नंतर लक्षात येते की त्यामध्ये संत गुलाबराव महा-राजांचा मुख्य उद्देश मधुराभक्तीचे स्वरूप व तिचे महत्त्व सांगणे असाच दिसतो. आपले विवेचन करताना महाराज कधीकधी व्यावहारिक व समर्पक उदाहरणे देतात तर कधी सरळ विवेचनच करतात. ज्याप्रमाणे 'मनोहारिणी' व 'स्वमंतव्यांशसिद्धांत तुषार' या ग्रंथा-तील विवेचनामध्ये गुलाबराव महाराजांनी अनेक ग्रंथाचे आधार स्पष्टपणे दिलेले आहेत त्याप्रमाणे त्यांच्या काव्यरचनेत तसे आधार जरी दिसत नसले तरी त्यांचे काव्यातील विचार देखील तत्त्वज्ञानाच्या आधारभूत व महत्त्वाच्या ग्रंथांच्या सखोल अभ्यासाचाच परिणाम असावेत असे स्पष्ट दिसून येते. गुलाबराव महाराज यांच्या हिन्दी काव्यापुरतेच सांगायचे झाले तर असे म्हणता येईल की, त्यांचा मूळ पिंड, भक्ती व त्यातही मधुराभक्तीच आहे. सामाजिक चिंतनाची स्वतंत्र बैठक त्यात दिसून येत नाही. भक्तीच्या अनुषंगाने जो सामा-जिक नीतीचा विचार येऊ शकतो तेवढा त्यात आलेला दिसतो.

सगुण रूपाचे महत्त्व :

वस्तुत: सगुण व निर्गुण एकाच परब्रह्माची दोन रूपे असून त्यात मूलत: तसे अंतर नाही. दोन्ही उपा-सनांची फळे जरी सारखी असली तरी सर्वसामान्य बुद्धीला निर्गुण रूपाचे आकलन होत नाही. सगुण रूप डोळ्यांना सहज दिसते. त्याचा मोहकपणा मन मोहून टाकतो. भक्ताला त्याच्याशी जवळीक साधणे सोपे जाते. त्याला त्याचा प्रत्यक्ष आधार वाटतो. गुलाबराव महाराज यांनी एका पदामध्ये निर्गुण रूपापेक्षा सगुण साकार रूपच भक्ताला का प्रिय असते हे सांगताना परमेश्वराच्या सगुण साकार रूपाकडे भक्ताची कशी ओढ असते हे पटवून दिले आहे

में तो चाहती हूँ साकार ।।धृ।।
निर्गुण रूप ध्यान न आवत ।
देत न चित मों प्यार ।।
कर धर वेणु गले बनमाला ।
निज जन हृदय विहार ।।
अलकावतिपतिकन्या प्रभु में ।
जानि करो स्वीकार ।।

परब्रह्माचे सगुण सावळे रूप राम व कृष्ण रूपा-मध्ये अवतरले असून त्यांच्या मनोहर लावण्यरूपाचे वर्णन अनेक संतांनी केले आहे. राम व कृष्ण विष्णुचेच अवतार असून कृष्ण हा पूर्णावतार मानला आहे. गुलाबराव महाराजांनी धनुर्धारी, आजानुबाहू, मुकुट-धारी रामाच्या रूपाचे जसे वर्णन केले आहे तसेच कमरेला पीतांबर, गळ्यात वनमाला, तांबूलधारी, भव-नाशक श्यामसुंदराच्या मनोहर रूपाकडे पहाताक्षणीच मोहादींचा विसर पडून त्याचेकडे चित्त एकाग्र होणे स्वाभाविकच आहे, मुरली मनोहर श्यामसुंदराच्या सगुण रूपाचे वर्णन करताना संत गुलाबराव महाराज म्हणतात–

श्याम को देखत मोह गिरे ।।ध्रु।।
श्रुतिसंभव भवनाशनकारन ।
मोतन छबि सुमरे ।।१।।

कटि कनकांबर गले बनमाला ।
तांबूल मूख धरे ।।२।।

ज्ञानेश्वर प्रभु तात कृपासे ।
नंदज पग पकरे ।।३।।

समन्वयात्मक दृष्टी :

संत गुलाबराव महाराजांना हे रूपवर्णन विशेष आवडत असावे असे दिसते. कारण त्यांच्या 'स्वमंत-व्यांशसिद्धांत तुषार' या ग्रंथामध्येही त्यांनी हे पद गणेशवंदनेप्रमाणेच समाविष्ट केलेले आहे. गुलाबराव महाराज समन्वयवादी विचारांचे होते. भक्ती क्षेत्रात व तेही पुन्हा सगुणभक्तीमध्ये शिव–विष्णुच्या नावाखाली प्रस्थापित पंथ परस्परांशी शत्रुभावाने वागत असलेले त्यांनी पाहिले होते. वस्तुत: विष्णु व शिव हे दोघेही परब्रह्माचेच अवतार असून त्यांचेमध्ये मूळात काहीच अंतर नाही. परंतु अजाणतेपणे सत्याची माहिती नसल्याने भक्तीपंथातील लोक व्यर्थच भेदभाव करून भक्तीच्या अखंडत्वाला तडा देत आहेत असे त्यांना वाटत असावे, म्हणून त्यांनी स्वतः राम, कृष्णाप्रमाणे शिवाचीही स्तुती केली आहे. इतकेच नव्हे तर तुलसीदासांनी ज्याप्रमाणे राम व शिव यांचे ऐक्य प्रतिपादिले त्याप्रमाणे गुलाबराव महाराज यांनीही कृष्ण व शिव यांचे ऐक्य सांगितले आहे. त्यासाठी त्यांनी 'हरिहर आख्यान' रचले असून ते हिन्दी व मराठी दोन्ही भाषेत मिश्रित रूपात आहे. एके दिवशी स्वत: भगवान शकर साधूचे रूपामध्ये यशोदेकडे भिक्षा मागण्याचे निमित्ताने येतात. यशोदा सोन्याच्या थाळीमध्ये हिरे–मोती घेऊन दान देण्यासाठी पुढे दरवाज्यापाशी येते. ते पाहून अतिथी म्हणतो, हे माई, माझ्या दृष्टीने हे सुवर्ण, हिरे–मोती सर्व दगडाप्रमाणे आहे. हे सर्व माझ्याकडेही भरपूर आहे. तू जर हे माझ्या झोळीत टाकशील तर उलट त्याचा झोळीला भारच होईल. म्हणून मला हे दान नको. मला तुझा कुमार कृष्णकन्हैया एकदा दाखव म्हणजे झाले. यशोदेला प्रथम साधुच्या हेतूबद्दल शंका येते व वात्सल्य जागृत होऊन ती आपल्या पुत्राला दर्शनार्थ आणण्याचे सरळ नाकारते. जेव्हा शिव तिला आपल्या खऱ्या रूपाची ओळख पटवितो तेव्हा ती शिवाला नमस्कार करते व बालकृष्णाला घेऊन येते. हरिहराच्या त्या अलौकिक भेटीचे गुलाबराव महाराजांनी जे वर्णन केले आहे, ते पहा–

गोद लेत हरि को तहँ लाये जहँ ठहरे मृतिहार ।
देखत नंन सो नैना लागीं दूनो चयन बिहार ।।
शिवशिव हरिहर मिल गये भई एक भी चैना ।
ज्ञानेश्वर प्रभु हरिहर को गति एक भई अरिदमैना ।।

भक्तीचे विविध प्रकार

संत गुलाबराव महाराज यांनी भक्तिविषयीचे विविध प्रकारचे विवेचन सामान्य मनुष्याच्या दृष्टीने सोपे करून सांगितले आहे. त्यांनी भक्ती व उपासना यांच्यामधील सूक्ष्म भेद समजावून सांगण्याचा प्रयत्न केला असून भक्तीच्या ज्या अनेक पद्धती मानल्या जातात त्यांची पुनर्रचना करून नव्याने मांडणी केलेली दिसते. डॉ. कृष्ण माधव घटाटे यांनी 'गुलाबराव महाराजांची विचारसंपदा' या ग्रंथामध्ये अत्यंत विस्ताराने महाराजांच्या भक्तिशास्त्राची वैशिष्टचे समजावून सांगितली आहेत. ते म्हणतात, "भक्ती वाङमयामध्ये दोन–तीन पद्धतींनी भक्तीचे प्रकार केलेले आढळतात. गीतेमध्ये आर्त, जिज्ञासू आर्थार्थी व ज्ञानी; एकेठिकाणी नवविधाभक्ती; काही ठिकाणी लालन, वात्सल्य, माधुर्य; तर कुठे गौणी व परा वगैरे पद्धतींनी भक्तीचे स्वरूप सांगितले जाते. या सर्व प्रकारांना एकत्रित करून त्यांची उत्तरोत्तर संगती लावून भक्तीची व्यवस्था समजावून घ्यावयाची असेल तर श्री गुलाबराव महाराजांनी गोविंदानंदसुधा, प्रीतिनर्तन, आणि भगवद्भक्ती सौरभ या ग्रंथातून केलेले विवेचन अभ्यासावे लागेल. महाराजांनी भक्तीचे गौणी, मध्यमा आणि परा असे मुख्य तीन प्रकार करून त्यांचे एकूण सोळा प्रकारात विभाजन केले आहे."

गुलाबराव महाराजांनी भक्तीचे जे सोळा प्रकार केले आहेत ते असे आहेत–(१) श्रवण (२) कीर्तन (३) स्मरण (४) पादसेवन (५) अर्चन (६) वंदन (७) दास्य (८) सख्य (९) ममता समर्पण (१०) अहंता समर्पण (११) लालन भक्ती (१२) वात्सल्य भक्ती (१३) गुप्त संयोग रूपी माधुर्यभक्ती (१४) स्पष्ट संयोग रूपी माधुर्य भक्ती (१५) गुप्त विप्रलंभरूपी माधुर्यभक्ती (१६) स्पष्ट विप्रलंभरूपी माधुर्यभक्ती.

हिन्दी काव्यामध्ये भक्तीच्या या सर्व प्रकारांचे वर्णन क्रमबद्ध रूपांमध्ये जरी मिळत नसले तरी जवळ जवळ सर्व भक्तिप्रकार विखुरलेल्या रूपात आढळून येतात. सर्व प्रकारांची उदाहरणे देणे या लेखाच्या मर्यादेत शक्य नसल्याने उदाहरणादाखल काही छंद देणे योग्य ठरेल असे वाटते.

कीर्तन : सुन सुन प्रभुजी तुम्हारे ऊपर मेरी मति
प्रभु लागी ।
तुम्हारे कारन किर्तन मां ही रयन दीन में जागी ।।

× × ×

पादसेवन : माई मेरी हरि पग सों टक लागी ।
विखय प्रिय सब छोर दिये हैं ।
श्याम सुंदरपर भयी अनुरागी ।।

× × ×

स्मरण : रामकथा सुमिरन करत रामरूप हरिदास ।
ये कहना क्या राम होय जो तहँ कर ही निवास ।।

माधुर्य भक्ती

गुलाबराव महाराज माधुर्यभक्तीचे उपासक व समर्थक होते. तेव्हा त्यांच्या काव्यामध्ये माधुर्यभक्तीचे वर्णन अधिक असणे स्वाभाविकच आहे. ज्या प्रमाणे श्रीकृष्णाच्या रासक्रीडेचा अधिकार मिळविण्यासाठी गोपींनी कात्यायनी व्रत केले होते त्याप्रमाणे स्वतः महाराजांनीही कात्यायनी व्रत केले होते. अनेकवेळा ते स्त्रीवेष धारण करून कृष्णपत्नीच्या रूपात वावरत असत. गुप्त संयोग, स्पष्ट संयोग, गुप्त विप्रलंभ, स्पष्ट विप्रलंभ ही माधुर्यभक्तीची रूपे महाराजांच्या हिंदी पदात प्रकर्षाने जाणवतात. गोपींचे–कृष्ण प्रेम, नयन-मनोहर मुरलीधराचे सगुणरूप, त्याच्या मुरलीचे आकर्षण, ती ऐकून गोपींची उडणारी त्रेधा, कृष्ण–गोपींचा प्रेम–संवाद, छेडछाड, कृष्णलीला, रासक्रीडा, कालियामर्दन, कृष्णाचे मथुरागमन, त्याच्या विरहाने वृंदावनातील गोपींची झालेली विरहव्यथा इत्यादी अनेक प्रसंग महाराजांनी हिन्दी पदामध्येही वर्णिले आहेत. श्रीकृष्णाचे मनमोहक रूप पाहून त्यावर अनुरक्त झालेल्या गोपींची मनोदशा पाहण्यासारखी आहे–

सुरत तेहारी बलम्यां नयना लागि रे ।। ध्रु. ।।
मास बरस जुग तुम्हरे कारन ।
दिन रजनी में जागि रे ।। १ ।।
सज सिंगार में घर मों बैठी ।
कोइ न दच्छन मागी रे ।। २ ।।
तुम हो प्यारे में हूँ प्यारी ।
दूनो सम अनुरागी रे ।। ३ ।।
सुंदर में विट्ठलसुत बाला ।
तुम सब रतनन केहि विभागी रे ।। ४ ।।

मुरली श्रीकृष्णाचे सम्मोहनास्त्र होते. वृंदावनामध्ये कृष्णाने मुरली वाजवावयास सुरवात केली की, तिचा आवाज कानी पडताच गोपींची तहान भूक हरपून जाई. हातात असलेले काम सोडून कुणाचीही पर्वा न करता गोपी सरळ श्रीकृष्णाकडे धाव घेत असत. मुरलीच्या आवाजाने गोपींची काय स्थिती होते ते पहा–

मैया ! सूद गई मोरी ।।ध्रु।।
क्या वह वेणु बजती सुंदर ।
सुनि हरिपद दौरी ।।१।।

जाती हूँ अब सकल छोरकर ।
रखती नहि चोरी ।।२।।

कन्हया साप हृदय मा काटे ।
दिस बस बहि बौरी ।।३।।

जिसने काटा ओही उतारे ।
ज्ञानेश्वर चहूं री ।।४।।

श्रीकृष्णाशी निस्सीम प्रेम गोपींनी केले होते. त्यासाठी त्यांनी घरादाराचाही त्याग करावयास कमी केले नाही. त्याच्या बरोबर केलेल्या विविध लीला, रासक्रीडा व त्यातून लाभलेला अखंड आनंद गोपींना कधीही विसरणे शक्य नव्हते. श्रीकृष्णाच्या सानिध्यात गोपीच काय पण संपूर्ण वृंदावनच प्रफुल्लित असे. श्रीकृष्ण मथुरेस गेल्यावर गोकुळ गोपींना प्रेतासमान निश्चल, निर्विकार, उदास भासू लागणे साहजिक आहे. गोकुळचा प्राणच जणु कुणी मथुरेस नेला असावा. अशा प्रसंगी संयोगावस्थेतील आठवणी दाटून येतात व गोपींची विरहव्यथा अधिकच तीव्र होते. कृष्णाचे खरे महत्त्व तो गोकुळ सोडून गेल्यावर जास्त जाणवू लागले. गोपींच्या विरहदशेचे हे चित्र पहा–

शाम बिन गोकुल प्रेत समान ।।ध्रु।।
जाते ये तव लौ नहि बूझे ।
ब्रजजन करि अभिमान ।।१।।

हालाहल जल जमुनाजी को ।
कीन्हों अमृत समान ।।२।।

ब्रंजवुवती अति व्याकुल मति भई।
छोरि मोह मद मान ॥३॥
अलकावतिपतिनंदिनी राखत।
कृष्ण चरण नख मान ॥४॥

सत्संग :

भगवद्गीता व नारदभक्तीसूत्रामध्ये सांगितलेल्या भक्ती पद्धतींचे वर्णन गुलाबराव महाराज यांच्या हिन्दी काव्यात तर मिळतेच, याशिवाय 'आध्यात्म रामायण' यामध्ये सांगितलेल्या नवविधा भक्तीतील सत्संग, गुरु-सेवा, विवेक-वैराग्य या भक्तीपद्धतींचाही समावेश गुलाबराव महाराज यांनी आपल्या हिन्दी काव्यामध्ये केलेला दिसून येतो. संतसमागम भक्ती क्षेत्रात महत्त्वाचा मानला जातो. संतांच्या सत्संगाने मानवाच्या मनातील विकार नष्ट होऊन त्या जागी प्रेमाचा उदय होतो. मग राग-द्वेष यांना थाराच उरत नाही. गुलाबराव महा-राजांनी सत्संग व पतितपावनी गंगा या दोहोंची तुलना केली आहे. गंगा फक्त बहिरंगाचे पाप नष्ट करते तर सत्संगामुळे अंतरंगातील विकार व पापही नष्ट होतात व त्यात अपेक्षित परिवर्तन घडून येते. म्हणून पतित-पावनी गंगेपेक्षाही सत्संगाचे महत्त्व पटवून सांगताना गुलाबराव महाराज म्हणतात-

हैं जगमाहि बडो सत्संगा ॥धृ॥
जैसे सज्जन पाप मिटावत।
तैसी न टारतगंगा ॥१॥
गंगा बाहर पाप मिटावत।
नहि शोधत अंतरंगा ॥२॥
पाप अरु पाप प्रवृत्ति को।
हरत साधुजन चंगा ॥३॥
यहि के खातर संतचरण पे।
नित लोटत है गंगा ॥४॥
ज्ञानेश्वरकन्या अनुभव ते।
बोलत प्रेम सुरंगा ॥५॥

गुरु महिमा :

संत गुलाबराव महाराजांनी गुरु महिमा वर्णिलेला आहे. गुरूची सेवा व तिचे महत्त्व त्यांनी अनेक पदां-मधून सांगितलेले आहे. ते परमेश्वरापेक्षाही गुरूला महत्त्वाचे स्थान देतात. परमेश्वराची भक्ती केल्याने गुरूची प्राप्ती होत नाही, परंतु गुरूची भक्ती केल्याने गुरू आणि परमेश्वर दोहोंची प्राप्ती होते. दुर्जनांना घडवून सज्जन बनविण्याचे सामर्थ्य गुरूत असते. म्हणून गुरूचे महत्त्व सर्वाधिक आहे असे सांगताना गुलाबराव महाराज म्हणतात-

गुरुबिन हरिगुन रंग न पावे ॥धृ॥
हरिध्यान ते गुरु नहि मिलते।
गुरु सुमिरन ते हरि घर आवे ॥१॥
दुष्ट को मारत भक्तन तारण।
हरि अपने दिल भेद लखावे ॥२॥
गुरु दुर्जन कूं सुजन करतु हैं।
हरि सों अधिक गुरुहि हिय भावे ॥३॥
विठ्ठलनंदन गुण विठ्ठल से।
सज्जन वदन अधिक तम गावे ॥५॥

तत्त्वज्ञान व उपदेश :

जीव, जगत माया व ब्रह्म या विषयीचे विवेचन गुलाबराव महाराजांनी वेदांताच्या व परंपरागत आधारावर केलेले दिसते. हिन्दी पदांमध्ये याविषयीची थोडी पदे मिळतात. विस्ताराने विवेचन आढळत नाही. सामाजिक नीतीचेही स्वतंत्रपणे विवेचन न करता भक्तीच्या संदर्भामध्येच गुलाबराव महाराज नीती-विषयीच्या चार गोष्टी सांगताना दिसतात. मोह, लोभ, क्रोध, मत्सर इत्यादी षड्रिपूंच्या आधीन न जाणे, पर-स्त्रीला मातेसमान लेखणे, कामवासनेत गुंतून न जाणे, मदिरापान न करणे, मानवी जन्माची दुर्लभता व त्याचा सदुपयोग करणे, संयम ठेवणे, वेळ अन्यत्र न दवडता हरिनामामध्ये घालविणे, प्रेमभावनेशिवाय कोणतेही कार्य व्यर्थ आहे, उदरभरण हेच माणसाच्या जीवनाचे कार्य नाही, परधन व परनारी प्राप्तीचा विचारही न करणे, धनदौलत नाशवान आहे, परमेश्वराची प्राप्ती-अखंडानंद हेच खरे सुख आहे, अशा अनेक गोष्टी गुलाबराव महाराज चरित्राच्या विकासासाठी सांगतात. मनुष्यास बालपणी ज्ञान नसते म्हणून तो खाण्या-पिण्यात व खेळण्यात वेळ दवडतो. तरुणपणी रमणीच्या नादी लागून वेळ वाया जातो. म्हातारपणी जेव्हा या सर्वांचे ज्ञान होते तेव्हा उशीर झालेला असतो. तेव्हा मनुष्याने वेळीच सावध होऊन आपला जन्म सत्कारणी लावावा. महाराज म्हणतात-

बालक थे तब ज्ञान न ये खुब दूध पिये सुद धायके।
ऊमरदार भये तब द्वार परे रमणी अरु राय के।

बूढन में अब बूडत हों दिन आय गये समुझाय के ।
मानस साच भरोस रहो अलकावति जीवन पाय के ॥

साहित्यिक मूल्यांकन :

साहित्यिक मूल्यांकनाचे दृष्टीने विचार केला असता असे दिसून येते की त्यांच्या मराठी पदांच्या तुलनेने हिन्दी पदांचा दर्जा थोडा कमी आहे. अर्थात् त्यांच्या हिन्दी काव्यामध्ये साहित्यिक गुणांचा संपूर्णपणे अभाव आहे असेही नाही. हिन्दी पदांमध्ये रस, अलंकार, गुण, छंद, भाषा–शैली इत्यादी गोष्टी सहजपणे दिसून येतात. हिन्दी काव्यामध्ये भक्तीरस प्रमुख असून श्रृंगाररस भक्तीरसाचे पोषण करीत आहे. याशिवाय वीर, शांत, करुण, आदि रसांचे आविष्करण सुद्धा प्रसंगानुरूप झालेले आढळते. गुलाबराव महाराज स्वतः काव्यशास्त्राचे मर्मज्ञ होते. काव्य–सूत्र संहिता नामक त्यांच्या ग्रंथामध्ये त्यांनी काव्यसामग्री, कविलक्षण, स्फूर्ती प्रयोजन इत्यादी काव्यशास्त्रसंबंधी विषयांचे विवेचन केले आहे. प्रसाद, ओज व माधुर्य गुणांपैकी माधुर्य व प्रसाद गुण महाराजांच्या हिन्दी काव्यात ठायींठायीं दिसून येतात. मोहन प्राणांपेक्षाही कसा प्रिय आहे हे गुलाबराव महाराजांनी प्रासादिक शैलीत किती सुंदर पद्धतीने समजावले आहे पहा–

मोहन प्राण सों प्यारा है ॥धृ॥
प्राण देह वृद्धि को बढावे ।
मोहन प्राण सों न्यारा है ॥१॥
प्राण बिचारा फिरे अचेतन ।
मोहन चेतन सारा है ॥२॥
प्राण कूं भूख प्यास बडी ।
मोहन तृप्त सदा रे है ॥३॥

आपले विचार व्यक्त करण्यासाठी गुलाबराव महाराजांनी अलंकारांचाही उपयोग केलेला आहे. हिन्दी पदांमध्ये जे अलंकार दिसून येतात त्यामध्ये उपमा, उत्प्रेक्षा, रूपक, अनुप्रास, यमक अलंकारांचा प्रयोग विशेष झालेला दिसतो. अलंकारांमुळे जसा अर्थ स्पष्ट होण्यास मदत होते तसे काव्याचे सौंदर्यही अधिक खुलते. नमुन्यादाखल काही अलंकारांची खालील उदाहरणे पहा–

१. छर संसार दिखत अच्छर में ।
पुरुषोत्तम की नार ॥ (यमक)

२. मुख मोहन मुरली धारी । (वृत्यानुप्रास)

३. हरिपग पंकज मधुकर होऊंगी । (रूपक)

४. हालहल जल जमुना जी को ।
कीन्हों अमृत समान ॥ (उपमा)

५. मोहतिमिर करन हान ।
प्रकट भयो ज्ञान भान ॥ (रूपक)

गुलाबराव महाराजांची मातृभाषा मराठी असल्याच्या अनेक खुणा त्यांच्या हिन्दी काव्यात दिसून येतात. मराठी शब्दांचे निःसंकोच प्रयोग अनेक ठिकाणी दिसतात. त्यांनी हिन्दी व मराठी भाषेत मिश्रित काव्य रचनाही केलेली आढळते. मध्ययुगामध्ये वेगवेगळचा भाषांच्या मिश्रणांची एक शैलीच होती. आचार्य विश्वनाथांनी अशाप्रकारच्या शैलीला करंभक शैली म्हटले आहे. गुलाबराव महाराजांच्या 'संत सखु' आख्यानातील खालील छंद पहाण्यासारखे आहेत–

नारी बनकर नाथ दयाघन फुकारते सखुबाई । (हिन्दी)

जन्माची मी मैत्रिण तुझि गे बोल गोड अजि आई ॥
(मराठी)

सखू देख मन अति हरखानी पूछत कुशल सुवाता ।
(हिन्दी)

येरि म्हणे कुशल परी तूं का परतली पंढरी जाता ॥
(मराठी)


गुलाबराव महाराजांच्या हिन्दी पदांमध्ये ब्रज, दक्खिनी, फारसी, मराठी, संस्कृत, वैदर्भी शब्दांचे अद्‌भुत मिश्रण आढळते. काही पदे अगदी दक्खिनी शैलीत आढळतात पण बरीचशी पदे ब्रजभाषा शैलीतच आहेत. महाराजांना अभिव्यक्तीसाठी जो शब्द योग्य वाटला त्याचा त्यांनी सहजगत्या उपयोग केलेला दिसतो. त्यांच्या पदांमध्ये विघ्न, मति, श्रवण, श्रोता, तात, मात, कनकांबर, कटी, तमारी संसृती, मंत्र, वारी, द्विज, दुर्जन, तनय, ज्ञानेश्वरजा, इत्यादी तत्सम शब्द जसे आढळतात तसेच हिरदै, पग, सीस, धनुख, मोतनछबी, बखान, म्हारा, सुमिरी, बलिहारी, छनमांही, कंबल, अशिस, निरखना, उजागर, काज, पिया, ननद, सास, ससुर गारी, इत्यादी तद्‌भव ब्रज शब्दही आढळतात. दक्खिनी भाषेतील धुंडत, बढचा, धंदा, कुचबे, कचरी, तलफत अशा शब्दांचा सहज प्रयोग जसा दिसतो तसाच म्हणुनी, घालिसी, प्रेमळ, माझी, चावट, प्रपंच

त्यांनी मराठी शब्दांचा प्रयोगही आढळतो. गुलाबराव महाराजांची मातृभाषा मराठी होती. हिंदी संतांच्या व्रजभाषेतील अनेक रचना त्यांनी वाचलेल्या दिसतात. विदर्भातील रहाणारे असल्याने नागपूरी हिन्दीचा प्रभाव असणेही स्वाभाविक. शिवाय महाराज मध्यप्रदेशातही प्रवचनाचे निमित्ताने जात असत असे कळते. तेव्हा त्यांची हिन्दी भाषा ही ऐकून ऐकून तयार झालेली भाषा दिसते. तरीसुद्धा अहिन्दी व्यक्तीने आपल्या विचारांच्या प्रसारासाठी इतक्या समर्थपणे हिन्दी भाषेचे माध्यम वापरले, याला विशेष महत्त्व आहे. सीमा प्रदेशातील सन् १८८१ ते १९१५ या कालखंडातील हिन्दी भाषेचे स्वरूप गुलाबराव महाराजांच्या हिन्दी काव्यात सापडते. त्यामुळे जेव्हा हिन्दी भाषेच्या विकासाचा अभ्यास होईल तेव्हा गुलाबराव महाराजांच्या हिन्दी भाषेचाही विचार करावा लागेल.

समारोप

गुलाबराव महाराजांच्या हिन्दी पद गाथेमध्ये हिन्दी पदांचा स्वतंत्र संग्रह केल्याचा निर्वाळा प्रकाशकांनी जरी दिला असला तरी मराठी पदगाथेमध्ये अद्यापही विशेषतः आख्यानामध्ये हिन्दी रचना आहेत. अन्यत्रही अजून असण्याचा संभव नाकारता येत नाही. आख्यानामध्ये हिन्दी–मराठीची सरमिसळ असल्याने केवळ हिन्दी भाग बाजूला काढणे शक्य झाले नसावे असे दिसते. मराठी संग्रहातील पदांमध्ये काही तुलसीदास, सुंदरदास वगैरे हिन्दी कवींचा समावेश झालेला आहे. ती पदे गुलाबराव महाराजांचीच असावीत असा सामान्य वाचकांचा भ्रम होणे सहज शक्य आहे. हिन्दी काव्याची ही प्रत ज्या मूळ प्रतीवरून तयार झाली असेल ती जाणकाराकडून तपासणे आवश्यक आहे, म्हणजे अशुद्धता रहाणार नाही. पदांची विषयवारीही बदलणे आवश्यक आहे. जर हिन्दी पदांच्या अन्य प्रती उपलब्ध असतील तर पाठचिकित्सा करून स्वतंत्र पदावली छापणेच इष्ट आहे. म्हणजे हा ग्रंथ हिन्दी साहित्यामध्येही आपले स्थान मिळवू शकेल. मराठी भाषिकांनी हिन्दी भाषा व साहित्य यांच्या विकासात जे योगदान केले त्यात गुलाबराव महाराज यांचाही मोठा वाटा आहे.

△ △ △



कविता

गांव सोडतांनाच्या

प्रभा पार्डीकर

१

गांव सोडतांना
मागे पहात चालू नये
कारण, पायाखालच्या
एखाद्या दगडाची ठेच
बसण्याची शक्यता असते
त्यापेक्षा, नजर समोरच्या
रस्त्यावर ठेवून चालावे.

२

गांव सोडतांना
मन धुवून पुसून स्वच्छ घ्यावे
चिखलाने भरलेल्या पायाने
दुसऱ्या गावात प्रवेश करू नये.

३


नाणी देण्याघेण्याची
द्यावीत इथेच सोडून
मोकळ्या हातानेच
दुसऱ्या गावांत प्रवेश करावा.

४

गांवाने तुम्हाला काय दिले
ह्यापेक्षा, तुम्ही गावाला
काय दिले ? ह्याचा
विचार करावा गाव सोडताना

५

गांव सोडतांना
इथल्या सगळ्या झाडांना
अभिवादन करावे
कारण चालतांना त्यांनी
दिलेली असते सावली थोडीफार
त्या सावलीला विसरू नये.



६

गांव सोडतांना
इथल्या वस्तु इथेच ठेवून जाव्यात
त्याचे ओझे इथेच फेकून द्यावे
कमीत कमी सामान असणेच
प्रवासांत बरे.

७

गांव सोडताना
वाटून घेऊ नये वाईट
कारण, तसे पुढचे गांव
तरी आपले कुठे असते ?
तेही सोडून जायचे असते
केव्हाना केव्हा.
प्रवास हेच खरे सत्य
गांव एक नुसताच विसाव्याचा टप्पा
म्हणूनच खंत करू नये
कुठलेही गांव सोडताना.


■ ■

अनुक्रमणिका

खंत

रजनी कविमंडन

झुळझुळता वारा
लकाकते ऊन्ह
हिरवी डौलदार झाडे
बागेबागेतून फुललेले
टवटवीत फुलांचे ताटवे
आणि मी–



म्लान चेहरा पदराआड लपवत
वाट चालतेच आहे –
सुसाट वेगाने धावणारी वाहने
घराघरात, रस्त्यारस्त्यावर
स्त्री– पुरुषाची लगबग
धावपळ–गडबड
उत्साहाचे नुसते उधाण
आणि मी–
भिटते मन सांभाळत
वाट चालतेच आहे.
ही पाऊलवाट–
अशीच संपणार ?
पण आता याचे उत्तर शोधायचेच नाही.

■ ■

अट्टाहास

रजनी कविमंडन

पायाखालची वाळू तर सरकते आहे
पण–
अट्टाहास आहेच अजून चालण्याचा
हातातील मशाली विझू विझू झाल्यात
पण–
अट्टाहास आहेच अजून चाचपडण्याचा
विणलेली जाळी सारीच सैल झालीयत्
पण–
अट्टाहास आहेच अजून त्यात गुरफटण्याचा
मनातले इमले तर सारेच ढासळलेत
पण–
अट्टाहास आहेच अजून त्यांना उभारण्याचा
उरातील वेदना आरपार ठसठसतेय
पण–
अट्टाहास आहेच अजून तिला शमविण्याचा !

■ ■

हालचाल

बबन सराडकर

सोसवत नाही
आता साधी पानगळ
चंद्र-चांदण्याने
आत उकळते जळ...
कुठे मावळली
जुनी जिद्द जगण्याची ?
हाय ! जड जाते
हालचाल पापण्यांची...

■ ■

कुणासाठी ?

प्रल्हाद सोनेवाने

मनाचा मोहर
वाहे झरझर
पेटलेली शेज
नवे आमंत्रण
जीवनाने दिली
पुन्हा नवी हाक
वेचूनी अेकेक
नवे हार तुरे
गंजली ही वीणा
तरी नवे गीत
घायाळ स्वप्नांचा
तरी हा हुंदका
दूर चितेतून
तरी हुरहूर
कुणासाठी उरी
आसवांचे तळे
रोज पश्चिमेची
तरी हे थांबणे

होऊनी पाझर
कुणासाठी
पुन्हा शृंगारून
कुणासाठी
स्वप्नांचीच राख
कुणासाठी
नभातील तारे
कुणासाठी
भंगले संगीत
कुणासाठी
मातीलाच घोका
कुणासाठी
दिसू लागे धूर
कुणासाठी
लागले डोहाळे
कुणासाठी
येती आमंत्रणे
कुणासाठी ?

■ ■



चेटूक

बाळकृष्ण बन्नोरे

वाटेचा सरळसोटपणा
आवडेनासा झाला
म्हणून मी चटकन वाट बदलली
नी एक वळण घेतले... गिरकेदार
(कूस बदलण्याच्या थेट ऐटीत)
चालू लागलो... थोडा दूर
तो पाहतो काय पुढ्यात
ती वाटच चक्क संपलेली
आणि मागच्या वळचणीचा उभेपणा
निखालस भुई-सपाट झालेला.

■ ■

दोन कविता

विजय कविमंडन

१

छळ याच भावनांचा
छातीत रुतुनि आहे
प्रतिमा मारेकऱ्याची
डोळयात ठसुनि आहे.

वाटे तरी पुन्हा ते
क्षणतेच फिरुनि यावे
लावून रंग ओठांना
शब्दांनी पुन्हा दिसावे.


भेट पुन्हा व्हावी तशी
डोळयात फसवे पाणी
गावी तुझ्या स्वरांनी
आभासयुक्त गाणी.

शोधीत गूढ प्रतिमा
डोळे तुझे दिसावे
तो मीच एक आहे
मानून मी जगावे.

माहीत पापण्यांना
हे स्वप्नवेड आहे
पण तारका-भुतांचा
आभास रम्य आहे !

२

ओळी-ओळी घेऊन प्रत्येक पानातून
मी तुमच्यासाठी बद्ध झालोय.
एक-एक अक्षर मिळवतांना
खिळचांच्या वेदना मी भोगतोय.
तरीही
आज तुमच्या बोटांच्या खुणांनी
मिटलेली अक्षरं छातीवर घेऊन
मी कालबाह्य ठरलोय.
कारण



केवळ कर्तव्याचा मजकूर असलेला
नि भावनांचे संदर्भ गहाळ झालेला
मी असा ग्रंथ उरलोय.
■ ■

हा पाऊस कायमचा नाहीये

धर्मराज निमसरकर

बघ ! चारही दिशांतून कसं गच्चगच्च भरून
आलया आभाळ
काळ्याकुट्ट ढगांनी, काळोखाचं मळभ साचतीया
आतल्या गाभाऱ्यात
ही वस्ती भणंग युद्धात उध्वस्त झालेल्या छावणीसमान
आसऱ्यासाठी एकही सावलीचं झाड शिल्लक
राहीलं नाहीये
वाराही भयाण वाहतो सांगाळा झालेल्या
झाडांच्या फांद्यांमधून, हे स्मशान
सावलीसारखं पाठीमागे.
आता येणारा पाऊस आपल्या ओळखीचा नाहीये.
डोळ्यात उफाळून वर न आलेला वणवा घेवून जगायचं
म्हटलं तर या पावसाची जातकुळी ओळखली पाहिजे.
हा धुव्वाधार कोसळणारा पाऊस वाटतोय !
तशा त्याच्या चाहूलखुणा रोंगावत येताहेत थेट
आपल्या त्वचेवर.
हे रस्ते आता चिखलाखाली गडप होतील
हा पाऊस यावा म्हणून हे रस्ते तरी किती निलाजऱ्या
सारखे आसुसलेले आहेत.
काय झालं असेल या रस्त्यांना ?
महापुरात वाहून जाण्यापेक्षा त्याचा उन्मत्तपणा पाहूया!
अशी दीर्घ हताश होवू नकोस !
तुम्ही येथल्या प्रदेशात निर्वासित म्हणून कंठघोष
करणारे जंगलं
जल्लोष करीत असले तरी, आपल्याला भिण्याचं
काही कारण नाही.
पाय मातीवर आणि मातीला पाय
प्रामाणिकपणे असले म्हणजे उन्मळून पडण्याची
शक्यता कमी.
आपल्या आतड्यावरच्या आदीमखुणा
खऱ्या करण्यासाठी
या पावसाशी तांबडं फुटेस्तो झुंजूया !
हा पाऊस कायमचा नाहीये...


■ ■

नवा प्रवाह

प्रतिमा इंगोले

रुळलेल्या वाटेवरून सर्वच चालतात
मी नवी वाट निर्माण करायला गेले
प्रथम आड आले दगड
मी त्यांना हळूच बाजूला केले
धोंडे अडथळा करते झाले
मी त्यांना वळसा घालून गेले
नंतर आड आली काटेरी झुडपे
मी त्यांना हसत कवटाळले
पुढे जाता सामोरी आली एक टेकडी
रक्ताळलेल्या जखमा अंगभर मिरवीत
मी टेकडीवर चढून गेले
अन बघता बघता
पळस फुलांचे झाडच की, हो ! झाले !

■ ■



अनुक्रमणिका

फुकटनगरातली गोष्ट

वामन पात्रीकर

[भिकाऱ्यांची वस्ती–फुकटनगर. सकाळ.]

झिंगरू : सुंद्रे–

सुंदरी : (वसकन्) काऽय ?

झिंगरू : आज मंगलवारीत जानार का शनचऱ्यात ?

सुंदरी : काऊन ?

झिंगरू : असंच इचारलं. बाजार न्हाई आनाचा ? (हमून स्वतःशीच) भिकारी काय आननार बाजार म्हना...असंच इचारलं...(काही वेळाने, काहीशा संकोचाने) भीक मागाले चलशीन का ?

सुंदरी : आज न्हाई.

झिंगरू : झोपडीतच वसशीन ?

सुंदरी : हो. काऊन ?

झिंगरू : कोढी बनन म्हनलं, कोनी गाडी खीचन का ?

सुंदरी : आता न्हाई. आता न्हाई व्होत खिचनं. तू लड्ड्या वी जाला खूब...कुसुम न्हाई का ?

झिंगरू : तिला आटवा लागला. पुडल्या म्हैन्यात बारतपन. ती काय खिचते ?

सुंदरी : चांदी हाय कुसुमची. पोरगं व्हो, पोरगी व्हो, भीक चांगली मिरन...विन–कोढ्याची न् लंगडा न्हाई त्याची गाडी ओढनार न्हाई. तू ठाटात वस्तो लाटसाब्रासारका न् मी जुपून. न्हाई... आंधरा काऊन न्हाई बनत ?

झिंगरू : आंधऱ्यात भोत कांपिटिसन हाय. जो भिकारी पाहा, तो सूरदास ! (कुणाला येताना पाहून) हा कोन व्है नवाडा ? हवालदार की पोस्तमन ?

पोस्टमन : (थकलेला स्वर) ऐ ऽ, क्या नाम है तुम्हारा ?

झिंगरू : झिंगऱ्या...पोस्तमन व्हा का ? हवाल्दार तं नै ?

पोस्टमन : पोस्टमन... फुकटनगर बस्ती यैच ना ? भिकारियोंकी ?

झिंगरू : यैच. काऊन ?

पोस्टमन : चिठ्ठी है.

झिंगरू : (चकित होऊन) चिट्टी ? फोकटनगर पत्ता हाय ?

सुंदरी : बैरंग हाय का ?

पोस्टमन : है टिकिट. हेच. हेण. बोदाडे कौन है ?

झिंगरू : वोदाडे ? हेचेन बोदाडे ?

पोस्टमन : हां. हेच. हेण. वोदाडे–(पत्ता वाचीत) हेचेग बोदाडे. भिकारी. मुकाम फुकटनगर. नागपूर... परेसान हो गया फोकटनगर ढूंढते ढूंढते. कौन है बोदाडे ? अं ?

झिंगरू : (मान हलवीत) यहां तो नै भै कोई. यहां झिंगरू, वकऱ्या, लटारू, तीतरमारे, कुतरमारे लगे तो है. बोदाडे न्हाई– (अचानक कल्पना येऊन) अवं सुंद्रे, हरदूंचं नाव वोदाडे हाय का ?

सुंदरी : का जाने की. इथं सगऱ्यांचं नाव भिकारी.

पोस्टमन : (रागाने) नामही नहीं. साले के इन्शल्स है– हेच. हेण. बोदाडे ! हुद्दा है– भिकारी ! लिखा है फुकटनगर में देना. (रागाने स्वतःशीच) सालोंका नोकर हूं मैं...भिकारीका नोकर ! हूं : (पुन्हा चिडून) कौन है वोदाडे ?

हरदू : (घाईने येत) बोदाडे ? मी हाय वोदाडे. चिठ्ठी आहे ?

पोस्टमन : हेच. हेण्. बोदाडे व्हा का ?

हरदू : ते न्हाय बा म्हाइत. पन् बोदाडे मी येकलाच हाय इथे... हो नं झिंगऱ्या ?

पोस्टमन : हरदू नाम है नं तुम्हारा ? फिर तुम्ही हो. लो चिठ्ठी...पढ सकोगे ? अंधे दिखते हो.

हरदू : (हसत) न्हाइ न्हाइ. डिवटीवर चाललो म्हून, पन दादा वाचून तुमीच दाकवा. हमको काला अक्सर, भैस बराबर,

पोस्टमन : (खांकरून, कष्टाने वाचत जातो.) श्री. हेच हेण. बोदाडे वुर्फ दादाले नमसते...येथं भिकाऱ्याइन्ले पकडत हायेत...

हरदू : (चमकून) पकडून राह्यलेत ?

पोस्टमन : (तिकडे दुर्लक्ष करीत) सुनो– माहा लंवर आजून लागला न्हाई. लागन. गर्ववती कैदी बायांची जजकी सर्कारी खर्चाने होते तवां कुमारी कुसमला यहां पाठौन देने. परश्न संपेल. बारतपन पुलीसच करून टाकतीन. कुमारी कुसुमला पाठवान तर पुलिसात भर्ती करवून दीन...बाकी कुसल हाये. तुमचा वंदू... (चिठ्ठी–वाचन संपवून) ठेवा चिठ्ठी.

[जायला वळतो तोच–]

हरदू : (लाचार स्वरात) बाबूजी–

पोस्टमन : (तुच्छतेनं) क्या ?

हरदू : एक चाराने पैसे द्या ना बाबूजी. चायको.

पोस्टमन : (चिडून) हुट्...चिठ्ठी पढूं ऊपरसे मैंही पैसे दूं. हुट्...

हरदू : देगा उसका भला वाबजी, नय् देगा उसका भी भला–

[पोस्टमन निघून जातो. अंधार.]

२

[फिल्म स्टुडियो. कुठल्याशा कॉमेडी फिल्मचे शूटींग सुरू आहे.]

लाइटमन : (वरून) साव लाइट ठीक आहे ?

डायरेक्टर : थोऽडा अँगल बदल...तिरपा. आणखी तिरपा...ओ. के. स्टॉप. (कुणा दुसऱ्या ऑप॰ रेटला) अठरा नंबर. डीमर तेज (तसे होते) ठीक. स्टॉप. फॅन वंद (फॅनचा झोत व आवाज वंद) कॉमेडियन, कम हियर. (तो येतो.) इथनं वोलायचं. (कॅमेरामनला) डिस्टंस लो–(कॅमेरा व कॉमेडियनमधील अंतर टेपने मोजण्यात येते) जसा डायलॉग संपेल, शॉट क्लोज होईल. समझे ? (मानांचे यथायोग्य डुलणे)

कॅमेरामन : (मधेच) ट्रॉली यहीं तक आयेगी.

डाय॰ : चलेगा—कॉमेडियन रेडी ? डॉयलॉग पाठ आहे.

कॉमेडियन : यस सर.

डाय॰ (टाळी वाजवून) सायलेंस एवरीवडी... (आवाजांचे शमण) वन मिनिट. कॉमेडियन, तुम्ही कोण आहात ?

कॉमेडियन : (संभ्रमित स्वरात) मी ? मी कॉमेडियन. कॉमेडी अॅक्टर.

डाय॰ : (रागाने) हूं : मग काय डोंबलाचे रेडी आहात तुम्ही ? रियल लाइफमधे नाही. स्टोरीत तुम्ही कोण आहात ?

कॉमेडियन : पिक्चरमधे ? शहनशाह. सम्राट.

डाय॰ : आर्डनरी सम्राट नाही. सम्राट झकलुटादित्य. नावातच तुमच्या तुमचं पूर्ण कॅरेक्टर. या सीनमधे केवळ तुमची एंट्री. लाँग शॉट. मिडल आणि क्लोज अप. अंडरस्टुड ?

कॉमेडियन : येस सर.

[कॅमेरा मागे जातो. सगळे सज्ज होतात.[

डाय॰ : क्लॅप.

क्लॅपरबॉय : (क्लॅप पकडून) जादुई आंगठी. सीन नंवर फोर. शॉट सेवंटीन–

[क्लॅपचे फटकारणे. कॅमेरा 'कर्र्रऽ' असा सूक्ष्म आवाज करीत सुरू होतो. यथाकाल समोर येऊ लागते. मार्च पास म्युझिकवर–]

प्रहरीची लालकारी शहाजादा मिर्जा, शहाबुद्दीन अहद, शहाआजम

बहादुर शहनशहा सम्राट झकलुटाहित्य पधार रहे हैंऽऽऽ

[वँडवर 'थाटात' कॉमेडियनचा झकलुटादित्य म्हणून प्रवेश. कॅमेराही यथोचित क्लोजअपसाठी पुढे आलेला पण मधेच–]

डाय॰ : कट् कट्. रिपीट एवरीथिंग अगेन.

[लोकांची शिस्त तुटते. कोलाहल. कॅमेऱ्याचे व कॉमेडियनचे मागे जाणे. अंधार.]

३

[फुकटनगर.]

हरदू : झिंगऱ्या–

झिंगरु : काय गा. वंदरूची चिठ्ठी आली पुत्रा ?

हरदू : न्हाई...(काही विचारांती) आता या धंद्यात काही राम नाही झिंगऱ्या.

झिंगरु : (चमकून) कोन्त्या धंद्यात ?

हरदू : आनखी कोन्त्या ? आपल्या धंद्यात. एकतं सर्कारनं पैसा पैसा छोटा करून नुस्कान केलं, लोक

नास्तिक झाले न् कांपिटिसन जमान्याभराची !
येकाच सडकेवर दोन दोन, तीन तीन आंधरे !

झिंगरु : प्वोट तं भरते ? इस्टेट थोडीच वनवाची आहे.

हरदू : इस्टेटीचं सोड पन् ही काही जिंदगी आहे ? सिनमा न्हाई, सिग्रेट न्हाई, सम्मान न्हाई. आता मान न्हाई बचला. आमच्या जमान्यात येकेक रईस घरी बोलवून भीक देत हुते. पोरावारांसंग पाया पडत हुते. भिकारी आता म्हंतेत. तेवा भिक्सुक, याचक म्हनाचे. तवासारके भिकारीवी न्हाइत म्हना आता. समदे रामदासाचे भजनं पाठहुते ऐकेकाला. आता लमचे सिन्माचे गाने... मले तं म्हराज म्हनाचे लोक–आणि पैशाचंच म्हन्शीन तं पैकं रंडीभी कमावते.

झिंगरु : खरं खरं. म्हागाई वाडली. लोक रेडीमेड रोटचा–चपात्या देत न्हाइत. आटा पन न्हाई. चक्कीचे पैसे तेवढेच वाचले ! गहू देतेत. ना पिसाई, ना थपाई, ना इस्तूचा खर्च बैमान साले. विलंदर अवलाद.

हरदू : दिवस मोठे खराब आलेत गड्या. कपडे तं कोनी देतच न्हाई आजकाल. ग्रहनाला पन. वर्तन, चिनिमातीवाल्या बाईसाठी कपडें काढून ठिवतात. म्हून तं वंदरुला म्हनलं, शेहरात जा. बम्बै ठीक. दुसरा बिजनेस पाहा. येच्यात राम उरला न्हाई. दुसरा पाहा.

झिंगरु : दुसरा कोन्ता ?

हरदू : त्येची विच्छा सिनम्यात काम करन्याची आहे. मी बी इचार करतो बंबैस जाव म्हून.

झिंगरु : कुसुम बरबर ?

हरदू : हो. तिच्या बारतपनाची यळपन आली. भर्ती करावं लागन.

झिंगरु : मातृ सेवा संगात ?

हरदू : (हंसून) साल्या मजाक करतो ? जेलात भर्ती झालं की समदं वेवस्थिशीर हुईन...बदंरुचा वुलावा पन हाये. भर्तीचा इंतजाम तेथं चोख हाय म्हने.

झिंगरु : रेलीनं जासीन ?

हरदू : तं काय हालिकाप्टरनं ? हवाय जहाजानं ? झिंगऱ्या तू बी झटुरी बात करतं गड्या कधी कधी. हवायजाहाजात विदाउट टिकट जाता यीन कुनाला ? हूं.

[अंधार.]

४

[वेगात चाललेल्या आगगाडीचा डबा. प्रवेशभर धावत्या गाडीचा पार्श्वभूमीत ध्वनी. हरदू आणि कुसुम मुंबईच्या फरशीच्या टिपऱ्या वाजवीत दोघेही भीक मागताहेत. म्हणून गाताहेत–]

हरदू : (भसड्या स्वरात) ना मागे हम सोना–चांदी–

कुसुम : (किनऱ्या टिपेत) ना मागे हम दूध–मलाई–

दोघेही : अम्माऽऽ रोटी दे...आम्माऽऽऽ रोटी दे.

[चाल जुन्या 'संसार' चित्रपटातील भिक्षा–गीताची. गाणे संपताच एक दोघांना गद्यात भीक मागणे त्यांनी पै–पैस टाकल्यावर परत टिपऱ्यांवर भीक–मागे गाणे सुरू–]

हरदू : तेरे द्वार खडा इक जोगी,
तेरे द्वार खडा इक जोगीऽ
ना मागू मैं सोना चांदी,
मांगू दरशन देवी,
तेरे द्वार खडा–

[गाणे अचानक थांबते, कारण, काळ्या, उगल्या आणि मळल्या कोटातला टिकिट चेकर गर्दीतून 'टिकिट टिकिट' करीत येताना दिसतो.]

कुसुम : (घावरलेल्या स्वरात) बापू, टिकट चेकर.

हरदू : (घास्ताऊन) म्येलो. टिकट मांगन...

[हतबुद्ध होऊन दोघेही वाट पाहातात. तिकिट चेकर येऊन तिकिट मागतोच–]

टी. सी. : (हरदूला) टिकट बताव.

हरदू (लाचार हसून) टिकट कायका जी ?

टी. सी. (रागाने) टिकट कायका ? सांगू का ?

कुसुम : (दीनपणे) सायेब, आमी गरीब मानसं. देनारे न्हाई, आमी घेनारे मान्सं. मांगनारे मानसं.

टी. सी. : (रागानेच) तू पन हाये का याच्यासंगं ? ठीक ठीक...(जोराने) कुठे जाताहात ?

हरदू : (घाबरून, हात जोडून) बाम्बे...बम्बै...मुंबै सायेब.

टी. सी. : मग टिकिट ?

हरदू : टिकिट न्हाई साब.

टी. सी. : मग ही गाडी तुमच्यासाठी मुंबईला नाही, सरळ जेलमधे जाणार–(एका दुसऱ्या, व्यापारी दिसणाऱ्या इसमाला) टिकिट ?

व्यापारी इसम: (गर्भित हंसून तिकिट नाही दर्शवितो) मिलता हूं मैं आपको.

टी सी. : (समजून) हूं हूं (पुढच्याला) टिकिट?

[दोघातिघांची तपासणी झाल्यावर तिथल्याच बाकावर बसतो. हिशेबटिशेब करीत. मग हरदूला दम भरीत.]

टी. स. : तर जेलात भर्ती हो.

हरदू : (मनातून खुशच, पण वरकरणी न दाखवता) जशी मर्जी तुमची मालक. ही माही मुलगी व्हे सायेब.

टी. सी. : कोनी पन असो. तिलावी व्हाव लागन वंद... पैसे तं नसतीन तुमच्याजवळ भरायला.

हरदू (हात जोडून) न्हाइ सायेब...(खूप लाचारीने) सायेब–

टी. सी. : (रागाने) काय आहे?

हरदू : (अचानक टिपऱ्या वाजवीत उंच आवाजात गाऊ लागतो–)

गरिबोंकी सुनो ऽ
वो तुम्हारी सुनेगा ऽ
तुम एक पैसा दे दो ऽ
वो दसलाख देगा ऽ ऽ गरिबोंकी सुनो ऽ

[यथाकाल गाण्यात कुसुमही सामील होते. गाडी सुरूच आहे. गाणे संपल्यावर टी. सी. लाच–]

हरदू : साब, एक पैसा दो गरीबको...

टी. सी. : (क्रोधाने) मलाच पैसे मागतो? मी तुला मागायला पाहिजे.

हरदू : (हाताने थोपवणे दर्शवीत) न्हाऊ द्या, न्हाऊ द्या सायेब. देगा उसका भला, नै देगा उसका भी भला.

टी. सी. : (नरमाईने) ठेसन आये तव तक गाओ कुछ.

[हरदू, कुसुम दोघेही या फर्माइशीने खुश. सरसाऊन बसतात आणि टिपऱ्यांवर ताल धरून–]

हरदू : तेरे दरपे आया हूँ, कुछ करके जाऊँगा ऽ
झोली भरके जाऊँगा, या ऽ मरके जाऊँगा ऽ
तेरे ऽ दर पे ऽ आया हूँ...

[गाण्याचे रवर, गाडीचा तालवद्ध आवाज व प्रकाश हळूहळू मंदावत जातो. अंधार.]

५

[तुरुंगातली कैदी, खोली. हरदूला घेऊन पोलिस येतो.]

पोलिस : पहिलीच येळ का जेलाची?

हरदू : पहिलीच. बोहोनीच हवालदार.

पोलिस : आराम करून घ्या मग थोडा वेळ आता. मग चक्की आहेच. दरवाजा सकाळ–संध्याकाळ खुलन. कामावर जायला न् कामाहून यायला. बास.

हरदू : (चिंतेने) काम? काम कोन्तं हवालदार?

पोलिस : गढ्ढे खोदणं, चक्की पिसनं, माती फेकनं, पत्थर फोडनं, ईटा–

हरदू : (घाबरून) बापरे बाप! हे तं लेन्याचं देनं पडलं. येवढ्याशा टिकटाची येवढी सजा?

पोलिस : विदाउट टिकट हायेच. भीक मागतो त्याची पन सजा हाये. तंदुरुस्त मानूस न्–

हरदू : नाई हवालदार तंदुरुस्त न्हाई...पन खान्यापिन्याचं काय?

पोलिस : खान्याचं फक्त. पिन्याचं न्हाई. (दाखवीत) ती थाली आहे कोपऱ्यात. संध्याकाळी दाल–रोटी मिळन. सकाळी एक वाजता दुपारी मिळन.

हरदू : (मनोमन संतुष्ट) हूं...आनि ही दुसरी थाली कोनाची?

पोलिस : तुज्या पार्टनरची. कामावर गेला आहे आता. यीन तासाभरानं. तुमी दोघं या खोलीत...बरं मी जातू.

हरदू : (संकोचत. शेवटी हिंमत करून) हवालदार–

पोलिस : (त्याच्याकडे रोखून पाहात) काय?

हरदू : येक विडी द्या नं गरिबाला.

पोलिस : (रागाच्या तिरिमिरिने) लमच्या, भिकेपायी जेलात घातला न् इथे पुन्ना भीक? फूट...मला देनं दूर वरती...बेक्कार साला.

[रागारागाने बाहेर गजाचा दरवाजा लाऊन घेतो. त्याला ताला ठोकतो. हरदूचा चेहरा उतरला आहे पण पलिकडे त्याचे काही नाही. अंधार.]

६

[तेच स्थळ. हरदू दबकून एका कोपऱ्यात. काडीने कान साफ करीत. संध्याकाळ झाली आहे. कामावर गेलेले कैदी परतताहेत. बाहेर कुलूप उघडले जाते. दार ढकलले जाते. हरदूचा पार्टनर कैदी येतो. त्याला पाहाताच आश्चर्याने–]

हरदू : लमच्या, वंदू तू?

बंदरू : (तो पण चकित) दादा तुमी ? कदी पकडलं तुमाले ?

हरदू : येता येताच. गाडीतच. गाडी बम्बईत पोचली न् पकडलं.

बंदरू : कुसुम कुठाय ?

हरदू : तिकडे लेडिसमधे...बंदऱ्या काम खूप असते का रे ?

बंदरू : हौ दादा. साले काम खूप घेतेत...काटा ढीला करतेत कमरेचा...आइकतो लौकरच दुसऱ्या कामावर पाठवनार हायेत. बांधाच्या. डॅमच्या.

हरदू : (चिंताग्रस्त सुरात) हे डॅम काय आनखी ?

बंदरू : (त्याला कमरचे बिडी देत) गुपचिप पी... (सुलगवून देतो. ती हातात कशी लपवायची तेही प्रत्यक्ष करून दाखवतो. नंतर) पन आता कुसुमची चिंता न्हाई. तिची डिलवरी–

[पण हरदू बिडी विझवून, ॲल्युमिनियमचा कटोरा घेऊन अकस्मात गजांच्या दाराकडे धावतो. काहींच्या बुटाचपलांचा आवाज ऐकूनच तो धावला आहे. गजातून कटोरा काढून–]

हरदू : (लाचार आक्रोश) बाबू ऽ...गरीबको रोटी दे बाबू ऽ भगवान तेरा...ओ बाबू ऽ

बंदरू : (चक्रावलेला, पण लगेच धाऊन वापाला ओढून आणत) अरे अरे अरे दादा. कटोरा ठेव. भीक न्हाई मागाची. हे गंज चाललेत आपल्यात जेवनाचे. थाली, कटोरा घेऊन माझ्यासंग चालशीन. ना मागता देतेत.

हरदू : पन कदी ?

बंदरू : सात वाजता. अजून टैम आहे.

हरदू : (उदास होऊन) पन काही म्हन बंदरू, भिकेच्या रोटीची मिठास, ना मागता दिलेल्या रोटीत न्हाई.

बंदरू : आता काय करनार, आहे ते गोड माना–

[दृश्य अंधारून येते.]

७

[फिल्म स्टुडियो. शूटिंग सुरू आहे. कॉमेडियन काकाच्या रोलमधे. सोबत कुणी एक भतीजा. पुढे प्रसंगानुसार कॅमेऱ्याचे ट्रॉलीवर मागेपुढे होणे.]

डाय० : (कामेडियनला) आपका लेहजा, बोलने का ढंग 'जॉनी वॉकर'सा ख्याल में आया नं ? (कॉमेडियन मान हलवतो होकारार्थी) एवरीबडी रेडी ? (शांतता प्रस्थापित होते) लाइटस् ऑन. (दिवे पेटतात.) क्लॅप.

[कॅमेरा व 'काका', 'भतिज्या'मधे क्लॅपरबॉय येतो.]

क्लॅपरबॉय : फिलम् 'काला तेन्दुआ'. सीन नाइंथ. शॉट फालोज्.

[फटाकदिशी क्लॅप दाबून दूर होतो. दृश्य व कॅमेरा सुरू.]

भतीजा फिर काका ?

काका : येही भतिजे, की बॉस कोई शेर नही. वो है शेर की खाल लपेटा हुआ गधा.

भतीजा : इसीलिये काका ऐसे आदमीको–

काका : 'काका' कहनाही पडेगा. 'समय पडा बांका, तो गधे को कहे काका.'

भतीजा : (घृणित भावसे) मैं ऐसे आदमी की पैर धरु ?

काका : पैर नहीं खुर कह. और पीछेके नहीं. आगेके खुर धरो. कहावत है, 'साहाब के अघाडी अघाडी और गधेके पिछाडी भूल के नहीं जाना. एक बात मारता है, दूसरा लात मारता है.' लेकिन तेरा प्राब्लेम इंटरनेशनल प्राब्लेम है. तेरा साहाब, गधा भी है. इदर भी मुश्किल, उधर भी समस्या.

भतीजा : कोई प्राब्लेम नहीं. मैं एक घाव दो टुकडे कर देता हूं. मेराभी तो कोई स्टेटस् है. ये साब ऐरे नत्थू खैरे को रिस्पेक्ट देता है और मुझे–

काका : हां भाई हां, उनके नजरमें गधे–घोडे सब बराबर.

भतीजा : और ऐसे आदमीके मैं पैर पकडू ?

काका : बोला ना, 'समय बलवान तो गधा पहेलवान.'

भतीजा : (चिढ़कर) काका, गधों के मुहवरोंके सिवा दूसरे–

डाय० : (बीचहीमें) कट् कट्. मुहावरे नही. कहावतोंके सिवा कहो. रिटेक.

भतीजा : (नाराजीसे) इतना अच्छा हुआ सब. फिरसे करना पडेगा ?

काका : करना पडेगा. 'समय पडा बांका, तो गधेको कहे काका' 'समय बलवान तो–'

[अंधार.]

८

[फिल्म स्टुडियो. चित्रणाची सुरुवात.]

क्लॅपरबॉय : संगम्मा पिक्चर्स. प्रॉडक्शन नंबर टू. 'मूषक महिमा.' सीन सेवन. शॉट फालोज.

[फटकार आणि त्याचे दूर होणे. रस्त्यावरील लोकांच्या घोळक्यात मदाऱ्याचा खेळ सुरू आहे. मदारी डुब् डुब् डुब् डुब् डमरू वाजवतो. बांसरीही वाजवतो. समोर ढगळ कपड्यात कॉमेडियन सवाल-जवाबासाठी उभा. डमरु व बासरी थांबवून—]

मदारी : ऐ ऽ तुम पैले क्या करता था?

कॉमेडियन : उंदिर पकडनेका पिंजडा बनाता था. उंदिर याने चुव्वा.

मदारी : (डुब् डुब् डुब्) धंदा क्यों बंद किया?

कॉमेडियन : उंदारोंने इस्माल इस्केल इंडस्ट्री शुरू की. छोटे छोटे उंदीर बनाने लगे. छोटे उंदीर पिंजडेसे भागने लगे.

मदारी : (डुर डुब्) आहोहोहो! फिर क्या किया?

कॉमेडियन : उंदरोंका टानिक बनाने लगा. उंदिर याने चुव्वे.

मदारी : उंदरोंका टानिक? (डुर डुब्.)

कॉमेडियन : उनको मोटा बनानेको. ताकी मोटलु उंदीर पिंजडेसे भागे नहीं...टानिकमें घाटा आया. फार्मूला जमा नही.

मदारी : (हंसून) हाहाः हाहाः (लोकांना उद्देशून) गधा. टानिकके बजाय, चुव्वे मारनेकी गोली क्यों नहीं बनायी?

कॉमेडियन : वोही किया बादमें...'दी ग्रेट महाराना सूरभद्र उंदिर मारने की गोली' का कारखाना खोला.

मदारी (डुर्र डुब्) फिर?

कॉमेडियन : नै चला. फार्मूला फेल्. उंद्रोंको सिरफ दस्त होते. हाजमा साफ. तबियत फाइन. 'दी ग्रेट महाराना' फेल्यूर रहा.

मदारी : वाह् वा, वाह् वा, वाह् वा! (डुर डुब, डुर डुब, डुर डुब) अब क्या विचार है?

डायरेक्टर : अब भिकारी बन गया हूं. भीख मांगने की प्रॅक्टिस सुरू की है...

[मदारीका 'डुर डुब, डुर डुब' शुरू है तभी—]

डायरेक्टर : स्टॉप. व्हेरी गुड्.

[सगळे रिलॅक्स होतात. मिसळतात. कोलाहल. डायरेक्टर पुढील सूचना देऊ लागतो तशी पुन्हा शांतता.]

डायरेक्टर : आता शूटिंग परवा. दवेंटी फर्स्ट को. कॉमेडियन, तुमचा वेष भिकाऱ्याचा. लक्तरं घालायचे.

कॉमेडियन : हो.

डाय० : सीन वाचून, पाठ करून या. सिच्युएशन अशी आहे–हिरॉइन घर झाडत आहे आणि तुम्ही भीक मागायला येता. साँग आहे. रेकॉर्ड ऐकून लिप मुव्हमेंटची प्रॅक्टिस करून घ्या. ऑर्केस्ट्रा पीसेस लक्षात ठेवा. नाचावं लागेल एकतारी घेऊन. ती प्रॅक्टिस करा. गाणं कोणतं ठाऊक आहे नं?

कॉमेडियन : हो...कोणतं आहे?

डाय० : 'ओ दुनियाकी रखवाली, भर देना मेरी झोली.' मॅनेजरकडून कॅसेट घेऊन जा. रेकॉर्डरही घेऊन जा माझं नाव सांगून.

कॉमेडियन : हो सर.

डाय० (बजावून सांगत) चंद्रालक्ष्मीसोबत सीन आहे. बी पर्टिक्युलर. फार डिफिकल्टीनं डेट मिळाली आहे. नाहीतर त्या येतील न् तुमचा पत्ता नाही. सबकी खटिया खडी. स्टुडियोचं भाडंच सहा हजार. सीन लागलेला. सगळंच मुसळ केरात होईल, आणि चंद्रालक्ष्मी आहेत फटकळ. पौराणिक भाव आहे सध्या.

कॉमेडियन : मी हजर राहीन साहेब वेळेवर.

डाय० : हजरच राहू नका. मेकप करून तयार रहा, अस्सल भिकाऱ्याचा मेकप्. वय पन्नाशीच्या जवळ. (मेकअपमनला) इस्माईल दाढीबिडी रखना इनको. बीमार, पगला भिकारी दिखना चाहिये.

इस्माइल : जी. सर.

[डायरेक्टरने 'ओ. के. देन–' म्हणताच सगळे पांगू लागतात. अंधार.]

९

[तेच स्थळ. एकवीस तारीख. वर वर्णिलेल्या दृश्याची तयारी. सगळे जय्यत. स्टेजवर कॉमेडियनला 'भिकारी' बनवणे सुरू आहे. 'ओ दुनियाकी रखवाली...' हे गाणंही मोठ्याने सरावासाठी सुरू आहे. पत्ता नाही चंद्रालक्ष्मी हिरॉइनचाच. गाणे बंद होते. सगळेच बेचैन. कारण शूटिंगची वेळ टळून बराच वेळ झालाय.]

लाइटमन : (अंडरवेयर, वनियनमधे यऊन) साहेब, लाइट ठीक केले.

डाय० : (रागाने) हूं.

लाइटमन : आता काय साहेब ? बाई तं आल्या नैत अजून. का करायचं ?

डाय० (चिडून) आराम कराचा...(स्वतःशीच धुसफुसत) सगळी तैयारी तरी आराम ! वा रे हिरॉइन चंद्रालक्ष्मी, म्हणे सगळे तैयार ठेवा. मी थांबणार नाही आणि स्वतःच गायव ! सीता-सावित्रीची कामं करते न् इसके साथ, उसके साथ...हूंः (कुणाच्या टाळीचा आवाज ऐकून वळून पाहात) काय झालं ? (कॉमेडियनला) तुम्ही टाळी वाजवली ?

कॉमेडियन : टाळी नव्हती. मच्छर मारला. मी नाही. वाघमारेनं मारला.

डाय० (त्या मूडमधेही किंचित् हसून) वाघमारेनं मच्छर मारला ? (रागाने) बस्, मच्छर आणि माशाच मारत बसा आता. सहा हजार रुपयाच्या स्टुडियोत. वाह रे हिरॉइन ! आपण नसतो तर आकाश-पाताळ एक केलं असतं.

कॉमेडियन : (भीत भीत) मी अटकलो आहे साहेब. सकाळपासून इथे हजर आहो. पोटात चहाशिवाय काही नाही. भिकाऱ्याचा मेकप्. बाहेरही जाऊ शकत नाही. माझा पार्ट घेऊन घ्याल तर—

डाय० : (उखडून) कसा घेऊ ? आं, कसा घेऊ ? तिचे तुमचे मिक्स सीन आहेत. नाच आहे, गाणं आहे.

कॉमेडियन : (भीतच) तर मी चहा पिऊन येऊ ?

डाय० : लौकर ये. नाही तर, तुम जाओगे और वो हाजिर.

कॉमेडियन : आत्ता येतो सर. चहा प्यालो न् आलो. रस्त्यावरच्याच ठेल्यावर...भिकाऱ्याचा मेकप् आहे. लौकरच सटकावं लागेल.

डाय० : जा जा—

[जातो, तसा अंधार. अंधारातच रस्त्यावरल्या ट्रॅफिकचा आवाज. घाईनं भिकाऱ्याच्या वेषातला कॉमेडियन चहाच्या ठेल्यावर येतो.]

कॉमेडियन : (ठेलेवाल्याला) हाप चाय. जल्दी.

चहावाला : (वेळ काढून संशयाने) पैसे हैं ?

कॉमेडियन : अं ? (प्रकार ध्यानी येऊन) है नं. मैं भिकारी नहीं हूं... (देत) लो पैसा.

[याच सुमारास बाजूच्या मेन रोडवर झर्रकन येऊन एक ट्रक थांबते. 'पकडो...पकडो उस भिकारी को—' असे आवाज. पाठोपाठ दोन पोलिस भिकाऱ्याच्या वेषातील कॉमेडियनला धरायला येतातही. तो गोंधळलेला.]

हवालदार : पकडो सालेको. डालो ट्रक मे...हट्टाकट्टा है। भीख मंगता है ?

[पोलिस आणि कॉमेडियनची झोंबाझोंबी. ती सुरू असताच—]

कॉमेडियन : अरे छोडो छोडो...क्या कर रहे हैं ?

पोलिस : (दमछाक झाल्याने धापा टाकीत) साला तगडा है—

हवालदार : और भीख मंगता है ? पकडो— (तोही तुटून पडतो.)

कॉमेडियन : (अटीतटीने) मैं भिकारी नहीं हूं...ऍक्टर हूं.

हवालदार : (हसून) साला पागल भिकारी दिखता है...डालो ट्रक में—

[दोघेही धरून त्याला नेतात. आत ट्रकमधे दचडतात. ट्रक सुरू होते आणि दूर निघून जाते. दूर जाणारा 'कॉमेडियन'चा आकांडतांडवी आवाज. अंधार.]

१०

[प्रकाश. डॅमसाइट. बांधकामानिकटचे वातावरण. ट्रकमधे भरून आणलेल्या भिकाऱ्यांच्या जत्थ्यासमोर कोणी इंजिनियर अधिकाऱ्याचे भाषण. या भिकाऱ्यांच्या जमघटात बंदरू, हरदू आणि हतबद्ध 'कॉमेडियन'ही आहे.]

इंजिनियर : मित्रांनो, इथं तुम्हाला कोणी भिकारी म्हणणार नाही. सरकारने तुम्हाला या बांधावर तुम्हाला काम, रोजगारी, पैसा, मानाचं खाणं-जिणं मिळावं म्हणून आणलं आहे...सरकार तुमच्या प्रतीची आस्था म्हणून तुम्हाला सतरंजी, पांघरूण, स्वैंपाकाची भांडी आणि दोन जेवणं फुकट देणार आहे. पुढली जेवणं मात्र काम करून तुमची तुम्ही कमवायची...मित्रांनो, अवहेलना, घृणा, तिरस्कार आदींचं जिणं सोडून कष्टाचं पण मानाचं जिणं शिका...जे खरोखरीच अपंग, असहाय्य आहेत त्यांना झेपेल असं काम देण्यात

येईल. धान्य, तेल, तिखट–मीठ आदीच्या खरेदीसाठी तुम्हाला एका आठवडयाचा ॲडव्हांस, आगाऊ रक्कम देण्यात यावी असाही हुकूम आला आहे. तेव्हा सरकारने दिलेल्या या संधीचा तुम्ही अवश्य फायदा घ्यावा, आपल्या पायावर उभे राहावे...(दर्शवीत) ते तिथे दगड पडून आहेत. तुम्हाला ते उचलून (विरुद्ध बाजूला निर्देश करीत) तिथे, कामाच्या साइटवर टाकायचे याहेत–(भिकाऱ्यांमधे भयाची लहर.) चला. कामाला लागा...या माझ्यामागे.

[अधिकारी उजवीकडे जातो. अनिच्छेनेच भिकारी वळतात. काही वेळाने एकेक दगड ओहारला जाऊ लागतो. तशातच अंधार.]

[रात्र. एका मोठ्या हॉलमधे काम करून थकलेले भिकारी सतरंज्यांवर निजण्याच्या बेतात. हरदू, बंदरू आदी 'अस्सल' कामचोर भिकाऱ्यांना कराव्या लागणाऱ्या कामाची चिंता. ते अस्वस्थ.]

हरदू : बंदऱ्या, किती वाजले रे बेटा... (अकस्मात पोटरीवर चापटी मारून) लमचे मच्छर येगरेच इथले. ह्याइंच चावनं येगरंच. किती वाजले ?

बंदरू : घा वाजले असतीन दादा.

हरदू : (कष्टाने उठून वसत) म्येला मानूस...येवडी मेहनत करन्यापरीस मरनं पुरवलं. नाही कमी पाचसहा दगडं न्येलेच मी इकडचे तिकडे.

बंदरू : (कण्हत उठून वसत) माझी वी कंवर टुटली. साला मेट घुरघुर पाहात होता. इडी प्यायची फुर्सद नाही. मानूस कामानंच मरनार असल तं कमवायचं कशापायी ? खानार कोन ?

हरदू : आपले दादा, परदादा मूरख थोडीच होते. फिजूल भिकाऱ्याइंचा धंदा नाही निवडला. पगले रोटी कमावतात, शाने लोक त्या खातात, म्हनायचे. कामानंच मानूस मरन तर...

[बाजूलाच कॉमेडियन भिकारी झोपला आहे. तोही उठून बसतो व हरदूला म्हणतो–]

कॉमेडियन : कोणी कामानं मरतविरत नाही. सवय झाली की सगळ्या गोष्टी जमतात. आज पहिला दिवस आहे. सवय झाली की हातपाय नाही दुखणार.

हरदू : (त्याच्याकडे विस्मयाने व काहिशा रागानेही पाहात–) तुमी कोन व्हा भाऊ ? भिकारी नाही दिसत. कामाची आदत दिसते.

कॉमेडियन : अशा कामाची नाही पण कामाची सवय आहे.

हरदू : भिकेचा अड्डा कोन्ता ?

कॉमेडियन : भीक नव्हतो मागत.

बंदरू : (चकित होऊन) मंग ?

कॉमेडियन : पकडल्या गेलो भिकारी म्हणून. असलीत मी कॉमेडियन आहे. फिल्म ॲक्टर.

बंदरू : (उडीच मारायचे सोडून) फिलम् ॲक्टर! कामडियन ? 'नटखटलाल', 'भूलभुलैया', 'अशी सासू नको रे बाप्पा 'मधे व्हते नं तुमी ? (कॉमेडियन 'हो–हो' म्हणून मस्तक हलवितो. बंदरूचा उत्साह कायम.) मी पन बंबईला एक्टर व्हायलाच गेल्तो बघा. बंदरू मेरा नाम. पकडलं कसं ?

कॉमेडियन : भिकाऱ्याच्या मेकपमधे होतो. चहा प्यायला गेलो सडकेवर तसं टाकलं ट्रकमधे न् आणलं इथे.

हरदू : तुमी काय नाही म्हटलं ? पुलिस साले भिकाऱ्यामागे दीड रुपया कमावतेत. ते कायला सोडनार ?

कॉमेडियन : मीही म्हटलं जन्मभर भिकाऱ्यांचेच रोल केले. जरा पाहावं तर भिकारी असतात कसे. बसलो गपचिप.

बंदरू : (लाचार स्वरात) मेरा भी जमा दो ना पिक्चरमें.

कॉमेडियन : पाहू.

[बाजूलाच झोपलेला झिंगरू आंग खाजवीत उठतो आणि तक्रारीच्या सुरात–]

झिंगरू : ही तकलीफ, ही दगदग न्हाई बा सहन होत. ची भन वापजाद्याइंचा भीकेचाच धंदा पुरवला.

हरदू : झिंगऱ्या, मला वाटते साल्याला परावं इथून.

बंदरू : (नेत्र विस्फारून) हे वर्तन, बिस्तरे घेऊन ?

हरदू : नाय नाय. थी म्हजे चोरी हुईन. आपन भीक मांगू, पण चोरी न्हाय करनार.

झिंगरू : म्हाइत हाय, म्हाइत हाय. तुला आजचा न्हाइ वरखत. फुकट–नगरपासूनची वरख... (कॉमेडियनकडे पाहून) आपलं नाव भावजी ?

कॉमेडियन : कॉमेडियन.

झिंगरू : अंगरेज भिकारी व्हा का ? फारिनचे ?

कॉमेडियन : इथलाच आहो. पण भिकारी नाही.

झिंगरु : (चकितपणे) मंग ?

कॉमेडियन : सिनेमात छोटेमोठे काम करतो. कारकून, मुनीम, नोकर, पोस्टमन, भिकारी असे...तुम्ही हा विचार काढून टाका डोक्यातून. पळून जाण्याचा. कामाच्या मैदानातून नाही, हे तुमच्या चांगल्या भविष्यापासून पळणं होईल.

[बाकी भिकारी एकमेकाकडे हंसून पाहातात. त्यांना शेवटचं काहीच कळलेलं नाही.]

झिंगरु : (तुच्छ हंसून) नाही परालो तं सगरेच्या सगरे मरतीन इथंच काम रगडून रगडून.

कॉमेडियन : कोऽणी मरणार नाही. आरामाची आदत, संवय तुटली की–

हरदू : (हंसून) कामाची आदत ? या वयात ?

कॉमेडियन : हो. वय वाढलं म्हणून वाईट संवयी ठाऊक असून पाळायच्या ? शिवाय तुमचं एक वय झालं, तुमच्या बंदरुचं काय ? बाकी मुलाबाळांचं काय ? सगळं जगच काम करतं. त्यांना कुणी ब्र म्हणत नाही.

झिंगरु : (जांभई देत) सो आओ बाबा, सो जाओ अब...आणि फिल्लमवाले साहेब काय तुमचं नाव?

कॉमेडियन : कॉमेडियन.

झिंगरु : काम...काम...(प्रयत्न सोडून) खैर, एक ध्यानात ठिवा. जित्या मान्सांची संवय मेल्याबिगर जात न्हाई...(जोराने अंग मोडून जांभई देत) आणि भीक मागनं काय कष्टाचं नसतं ? दिसभर तोंडाचा पट्टा फटाक् फटाक् चालाय लागतो...(लवंडत) मैं तो सोया अब हरद्या...

[बाकीही पडतात, पेंगुळतात. अंधार. अंधारातच कुणीकुणी उठल्याचे, खुसफुसत इतरांना उठवून सटकल्याचे आवाज...कोंबड्याचे आरवणे.]

पहाटचा प्रकाश. हळुहळू वाढतो तेव्हा एकटा कॉमेडियन गाढ झोपलेला.

[ढकललेले दार उघडून मेट, चौकीदार झाडूवाला आत येतात. हॉल रिकामा पाहून चकित ! त्यांची भागदौड, आरडा ओरडा.]

शालिग्राम : मेट (धावत साहेबांसोबत येऊन) पाहा साहेब, एक भिकाऱ्याचा पत्ता नाही.

साहेब : (अक्कल गुंग होऊन) माय गॉड ! आणि भांडे कुंडे ?

शालिग्राम : पळाले घेऊन.

साहेब : वाड विस्तारा ?

शालिग्राम : त्याच्यासकट गायब !

साहेब : ॲडव्हांस दिला होता.

शालिग्राम : त्याच्यासोबत चंपत. एक आहे–

साहेब : कोण आहे ?

कॉमेडियन : (उठून बसत) मी साहेब...कॉमेडियन...आता पटलं ना साहेब, मी भिकारी नाही म्हणून...कामाच्या मैदानातून नाही हे साहेब, हे ह्यांच्या भविष्यापासून, चांगल्या भविष्यापासून दूर पळाले आहेत...हा डायलॉग माझा नाही साहेब. एका फिल्ममधे रोल केला होता, तियला आहे...हे जिथे जिथे पळतील यांच्यामागे ह्यांचे स्वभाव पळत जातील. पिच्छा पुरवतील. स्टाइल्स डाय हार्ड, आदत मरती नहीं, स्वभावाला औषध नाही...हेच का खरं? फुकटनगर...फुकटनगर.

[हे बोलत कॉमेडियन उभा झालेला. त्याचे प्रश्नार्थक आविर्भाव. साहेब, मेट शालिग्राम, चौकीदार, झाडूवाला सगळेच संभ्रमात उभे. तशात पडदा.]

[प्रयोगपूर्व परवानगी आवश्यक. पत्ता: सौ. विजया पात्रीकर, १५, पारिजात फ्लॅट्स्, ११०, शिवाजीनगर, नागपूर–४४००१०.]

△ △ △

वास्तववाद आणि जनवाद

या. वा. वडस्कर

वास्तववाद व जनवाद ह्यांचे संबंध अतिशय निकटचे आहेत. वास्तववाद म्हणजे निव्वळ शैली वा रीति नव्हे. जनवादाप्रमाणेच ती एक प्रवृत्ती आहे. मानवी जीवन व मानवी समस्या ह्यांच्याकडे पाहण्याचा काहीएक निश्चित स्वरूपाचा तत्त्वज्ञानात्मक दृष्टिकोण या प्रवृत्तींमध्ये निहित असतो. मानवी जीवनाचे यथार्थवादी आकलन करून ते अधिकाधिक परिपूर्ण करण्याची धडपड या प्रवृत्तींच्या मागे असते.

जनवाद म्हणजे अधिकाधिक जनांच्या अधिकाधिक हिताचा विचार करणारे सूत्रबद्ध तत्त्वज्ञान. या विचाराच्या केंद्रस्थानी मनुष्य असतो. अंतीम सत्य, परमेश्वर इत्यादी गोष्टी या विचारामधून वाद असतात. त्यामुळे स्वभावतःच जनवादाचे स्वरूप भौतिकवादी व यथार्थवादी असते. ते अध्यात्म चिद्वाद वा आदर्शवादाच्या विरोधी असते. चिद्वादी तत्त्वविचाराची प्रत्येक शाखा माणसाला मायारूप मानते. त्याला दुय्यम स्थान देऊन परमेश्वराची उपासना करून मोक्षप्राप्तीसाठी धडपड करणे एवढे एकच जीवितध्येय त्याच्यासमोर ठेवते. परमेश्वर वा अंतिम सत्य इत्यादी विचार निव्वळ काल्पनिक व केवलचिंतनात्मक स्वरूपाचे असतात. कुठलाच प्रत्यक्ष पुरावा समोर न करता काल्पनिक स्वर्ग वा मोक्षाचा मार्ग अंतीम हिताचा म्हणून सांगून ते मोकळे होतात. त्यामुळेच शोषक वर्गांना शोषित वर्गांच्या विरुद्ध या तत्त्वज्ञानाचा फार मोठा उपयोग होतो. श्रमिक व शोषित वर्गांच्या हिताचा विचार करणाऱ्या जनवादी विचारसरणींना त्यामुळेच चिद्वादाचा धिःकार करीत मानवी समस्यांचे मूळ ऐहिक कारणमिमांसेत शोधावे लागते.

वाङ्मयीन वास्तववादाचा जन्म जनवादी मानसिकतेतूनच झाला आहे. वास्तववादाचा विशेष प्रभाव एकोणविसाव्या व विसाव्या शतकात अधिक दिसून येत असला तरी त्याची मुळे वाङ्मयनिर्मितीच्या आरंभ कालापासूनच अनेक ठिकाणी विखुरलेली दिसतात. एक निश्चित विचारसरणी म्हणून या प्रवृत्तीचा आरंभिक अविष्कार मात्र तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात झाला. मध्ययुगीन पाश्चात्य तत्त्वज्ञानात नामैकवादाच्या (nominalism) विरोधी अर्थाने, म्हणजे सामान्यांना (universals) वास्तविक अस्तित्व असते या अर्थाने हा शब्द वापरला जात असे. आधुनिक तत्त्वज्ञानात मात्र 'वास्तववादा'-च्या अर्थात बदल झाला. ज्ञानाचा विषय होणाऱ्या व स्थलकालात वास करणाऱ्या भौतिक वस्तूंचे अस्तित्व ज्ञातृनिरपेक्ष असते. त्यासाठी मनाच्या अवबोधनाची किंवा चित्‌ची अपेक्षा नसते, या तत्त्वाचा पुरस्कार वास्तववाद करतो. अर्थातच आधुनिक वास्तववादाची भूमिका चित्‌सत्तावादाच्या विरुद्ध आहे, हे स्पष्ट आहे.

चित्‌सत्तावादानुसार फक्त एकच गोष्ट सत्य (real) असते. ती म्हणजे अंतीम चैतन्यरूप परमेश्वर. त्या चैतन्याचा अंश म्हणजे मानवी संवेदना, या संवेदनांच्या द्वारे मानवाला सभोवतालचे विश्व प्रतीत होते. ही चैतन्यरूप संवेदना नसेल तर काहीच प्रतीत होणार नाही. म्हणून बाह्य भौतिक जग हे केवळ मायामय असून मानवाला संवेदना प्रदान करणारे अंतीम चैतन्य हेच फक्त एकमेव सत्य. ते जाणून घेण्याचा प्रयत्न सातत्याने करणे एवढे एकच ध्येय मनुष्य आपल्यासमोर ठेवू शकतो. या निष्कर्षाप्रत ही विचारसरणी येऊन पोहचते.

भौतिकवादाची भूमिका नेमकी ह्याच्या उलट असते. ज्ञाता व त्याची संवेदना या गोष्टींची अपेक्षा न ठेवतासुद्धा बाह्य वस्तुजगत अस्तित्वात असते. तथाकथित अंतीम सत्याचा शोध न घेतासुद्धा या वास्तवाचे ज्ञान माणसाला आपल्या विवेकबुद्धीने करून घेता येते.

वास्तववादाची भूमिकासुद्धा नेमकी हीच आहे. आपल्या सभोवतीच्या विश्वपसाऱ्याला व मानवसमाजाला मायारूप न मानता त्यांनाच तो वास्तविक व सत्य (real) मानतो. त्यांचे स्वरूप समजून घेण्यासाठी त्याला पारलौकिक प्रदेशाकडे वळण्याची गरज वाटत नाही. नव्हे, पारलौकिकतेचा प्रदेशच मायाजालाने भरलेला असतो, अशी त्याची पक्की खात्री असते. वरील विवेचनावरून वास्तववाद व भौतिकवाद या दोहोंचीही तात्त्विक बैठक एकच कशी आहे, हे आपल्या सहज लक्षात येते.

साहित्यातील वास्तववादाची मूळ भूमिकासुद्धा या भूमिकेपेक्षा फारशी वेगळी नाही. परंतु विषम समाजातील साहित्यनिर्मितीच्या एकूण प्रक्रियेवर वरिष्ठ वर्गांचा प्रभाव पडत असल्यामुळे तिला अनेक मर्यादा पडतात. परंतु एक विधान मात्र निश्चितपणाने करता येते. वास्तववादी साहित्य भूमिकेच्या केंद्रस्थानी मनुष्य व त्याची स्थिती ह्यांचा विचार असतो. प्रामुख्याने वीररसाचा आविष्कार करणारी महाकाव्ये, नियतीच्या क्रूर लीलांचे शोकात्म चित्रण करणारी प्राचीन ग्रीक अभिजात नाटके, शेक्सपीअरच्या रोमांचवादी शोकांतिका या सर्वच साहित्यातून मानवी स्थितीचाविचार केंद्रस्थानी असतो.पाश्चिनात्य प्राचीन साहित्य अतीमानवी शक्तींचे अस्तित्व नाकारत नसल्या तरी मानवांना त्या मायारूप मानत नाहीत. ग्रीक नाटके व महाकाव्ये तसेच शेक्सपीअरची नाटके, यातील नायक हिमालयाची उंची घेऊन वावरतात. विरोधी शक्तींसमोर ते पराभूत होत असले तरी त्यांच्यातील मानवी जिद्द व लढाऊपणा (human spirit) चिरडल्या जात नाही. त्यांचे तेज अपराभूत राहते. त्या तेजाच्या अस्सलपणाचा प्रत्यय आपल्याला वारंवार येत राहतो. त्यांच्यासंबंधीच्या गौरवाने आपण नतमस्तक होतो. त्यांनी दिलेल्या लढ्याचे चित्रण सत्य असते, प्रामाणिक असते. त्यामुळेच अभिजातता, रोमांचवाद, गूढवाद, नीतिबोध, अतिशयोक्ती, आदर्शीकरण इत्यादी अनेक अवगुंठनांमधूनही त्यांचा गाभा (core) वास्तववादी राहतो. आधुनिक साहित्यात अनेक प्रयोग करण्यात आले. अभिव्यक्तीवादापासून (expressionism) तो व्यस्तवतावादाचा (absurdism) पर्यंत अनेक प्रयोग आले आणि गेले. आणि तरीही आधुनिक जागतिक वाङ्मयाची मध्यवर्ती प्रवाहधारा मात्र वास्तववादी राहिली.

यावरून आपल्याला एक निष्कर्ष काढता येतो. वास्तववादाचे मध्यवर्ती सहाय्य घेतल्याशिवाय म्हणजेच वेगळ्या शब्दात, माणसाला केन्द्रस्थानी ठेवून साहित्य लिहिल्याशिवाय त्याला चिरमूल्य प्राप्त होत नाही. अतीमानवी शक्तींचा वडेजाव माजविणारे वा दैवी चमत्कारांच्या वर्णनांनी भरलेले साहित्य त्यामुळेच कालौघात नाहीसे होते. याउलट गोल्डस्मिथ किंवा थॉमस ग्रे ह्यांच्यासारख्या तत्कालीन संदर्भात सुद्धा सामान्य वकुब असलेल्या लेखकांचे साहित्य मात्र आजही टिकून आहे.

एका हेतुपूर्वक उभी केलेली साहित्य चळवळ म्हणून वास्तववादाला प्रथम महत्त्व आले ते मात्र युरोपमध्ये फ्रेंच राज्यक्रांतीनंतर. एकोणविसाव्या शतकाच्या उत्तरार्धात पाश्चिमात्य साहित्याचा जवळजवळ संपूर्ण तोंडवळाच वास्तववादी झाला. 'वास्तववाद' ही संज्ञा (le realisme) १८२६ मध्ये सर्वप्रथम उपयोगात आणली गेली. या वेळी प्रथमच अभिजात साहित्याचे अंधानुकरण व आत्यंतिक व्यक्तिनिष्ठ वर्णने या वाङ्मयीन अपप्रवृत्तीविरुद्ध बंड उभारण्यात आले. सभोवतालच्या वास्तवापासून पलायन करून काल्पनिक निसर्गचित्रे रंगविणे किंवा भूतकालाची गीते गात बसणे यापेक्षा आपल्या सभोवतालच्या परिस्थितीचा धीटपणे सामना करून तिचे यथातथ्य चित्रण करण्यावर वास्तववादी साहित्याच्या पुरस्कर्त्यांनी भर दिला. याच काळातील विज्ञानाची घोडदौड व कॉम्त (Comte)सारख्या तत्त्वज्ञांनी पुरस्कारलेले अनुभवसत्तावादी (positivist) तत्त्वज्ञान या गोष्टींचीही वास्तववादी साहित्याच्या विकासाला फार मदत झाली. फ्यूरबॉख (Feuerbach). ने मानववंशशास्त्रीय दृष्टिकोणातून धर्माची केलेली मीमांसा १८४१ मध्ये प्रसिद्ध झाली. फ्यूरबॉखने आपल्या लिखाणातून माणसाला दैव, नियती, पूर्वसंचित इत्यादींच्या सापळ्यांमधून मुक्त करून त्याचा व त्याच्या परिसराचा (environment) असलेला अतूट व कार्यशील संबंध दाखवून दिला. डार्विनचे उत्क्रांतीवादी सिद्धांतसुद्धा याच काळातले. तसेच कार्ल मार्क्सचा गत्यात्मक भौतिकवादाचा घणाघाती पुरस्कारसुद्धा साधारणपणे याच कालखंडातला.

या सर्व वैचारिक वातावरणाला हातभार लावणारी आणखी एक महत्त्वाची घटना याच सुमारास घडली. १८३९ मध्ये Daguerre ने छायाचित्रणाचा

शोध लावला. छायाचित्रणाच्या शोधामुळे कलावंतांना एका नवीन शैलीची संभाव्यता दिसू लागली. आपल्या विषयवस्तूचे वर्णन हुबेहूब, यथातथ्य व प्रातिनिधिक असावे यावर कटाक्षाने भर देण्यात येऊ लागला. माणूस आणि त्याचा सामाजिक व नैसर्गिक परिसर जसा असेल तसा रंगवा. माणसाचे चित्रण त्याच्या गुणदोषांसहित व्हावयास हवे. तसेच त्याच्या जीवनाचे चित्रण त्यातील हृद्य व मंगल गोष्टींबरोबरच कुरूप, ओंगळ व अमंगळ गोष्टींसहीत व्हावयास हवे. माणूस हा सद्गुणांचा अर्क नसतो. तसाच तो शुद्ध खलनायक नसतो, या गोष्टीचे अधिकाधिक भान वाढू लागले. परंतु या काहीशा बाह्य गोष्टींबरोबरच एका अत्यंत महत्त्वाच्या मुद्याकडे वास्तववादी लेखकांनी प्रथमच लक्ष दिले. त्यांनी मानवी जीवनातून नियतीला (destiny) हद्दपार करून त्याठिकाणी सामाजिक–आर्थिक नियतत्त्ववादाची (socio-economic determinism) प्रतिष्ठापना केली. प्रसिद्ध फ्रेंच कादंबरीकार एमिल झोलाचे या बाबतीतले योगदान फार महत्त्वाचे आहे.

नियतत्त्ववादावर अधिष्ठित असलेले लिखाण प्रामुख्याने प्राकृतिकवादी (naturalist) म्हणून ओळखले जात असले तरी प्राकृतिकवाद (naturalism) हे वास्तववादाचे अपत्य आहे व दोहोंच्या सीमारेषा एक-मेकात खूप मिसळलेल्या आहेत ही गोष्ट विसरता येत नाही. प्राकृतिकवादी तत्त्वज्ञानानुसार माणसाचे जीवना-तील स्थान व कर्तृत्व या गोष्टी त्याचा सामाजिक वा प्राकृतिक परिसर व आनुवंशिकता या गोष्टींमुळे नियत होतात. त्यांच्याशी पारलौकिक गोष्टींचा काहीच संबंध नसतो. अनेक टीकाकारांनी अज्ञानापोटी किंवा जाणीव-पूर्वक या सिद्धांतावर टीकेचे आसूड ओढले. प्राकृतिक-वादी नियतत्त्ववाद म्हणजे दुसरे तिसरे काहीच नसून जुन्या नियतीचेच नवीन रूप होय असा त्यांचा आक्षेप होता. प्राचीन नियती काय किंवा आधुनिक नियतत्त्व-वाद काय, या दोन्ही गोष्टी माणसाला केवळ कळसूत्री बाहुलीइतके महत्त्व देतात. दोन्ही सिद्धांतावर आधारित असलेले लिखाण अंतत: निराशावादी असते, असा त्यांचा आक्षेप होता.

टीकाकारांची ही टीका काही थोडया लेखकांना लागू पडत असली तरी स्वत: झोलाच्या अनेक काद-बऱ्या किंवा मोपासाँ, चेकोव्ह, डोस्टोएवस्की, टॉस्टॉय, ड्रायझर यांसारख्या महान वास्तववादी–प्राकृतिकवादी लेखकांना मुळीच लागू पडत नाही. कुठेही वास्तव-वादाची कास न सोडता या महान लेखकांनी अमर कलाकृती निर्माण केल्या. भारतीय साहित्यात सुद्धा शरच्चंद्र, प्रेमचंद व हरीभाऊ आपटेंच्या सामाजिक कादंबऱ्या यांमधून वास्तववादाचे अमोघ सामर्थ्य आपल्या दृष्टीस येते.


नियतत्त्ववाद म्हणजे नियतीवाद असे म्हणून हिणविणाऱ्या आपल्या टीकाकारांना स्वत: झोलाने सडेतोड उत्तर दिले. या दोन गोष्टींमधला फरक त्याने प्रभावीपणे विशद करून दाखवला. नियतीमध्ये परि-स्थिती काही जरी असली तरी मनुष्याच्या वा निसर्गाच्या स्थितीत घडणार असलेल्या गोष्टीत काहीच फरक पडत नाही. पूर येणे ही नियती असेल तर पाऊस न पडताही पूर येईल. नियतत्त्ववादात मात्र माणसाच्या सभोवतीचा परिसर बदलला की माणूस सुद्धा बदलतो. नवे संस्कार होतील असे वातावरण, यथायोग्य आहार व शिक्षण इत्यादी सोयी उपलब्ध करून दिल्यास माण-सांचे स्वभाव, रंगरूप व त्यांचे कर्तृत्व या गोष्टी सुद्धा बदलता येतात.

यावरून एक गोष्ट स्पष्ट होते. चिद्वाद किंवा नियतीवाद ह्यांचा परिवर्तनावर व मानवी कर्तृत्वावर विश्वास नसतो. वास्तववाद किंवा प्राकृतिकवाद ह्यांचा मात्र परिवर्तनावर विश्वास असतो. वर्तमान वास्तव, ते कुरूप व ओंगळ असले, तरी, चित्रित करीत अस-ताना ते बदलविण्याची, ते अधिक सुंदर, अधिक सुखी व न्यायी करण्याची प्रेरणा त्या चित्रणातच अनुस्यूत असते. पाश्चिमात्य डिकन्स किंवा भारतीय प्रेमचंद, ह्यांच्या कादंबऱ्या वाचताना आपण नकळत वर्तमान वास्तवाचा तिरस्कार करू लागतो. नवीन जीवन घड-विण्याची स्वप्ने पाहू लागतो.

ह्याचा अर्थ असा मात्र नव्हे की वास्तववादाचे विकृतीकरण करताच येत नाही. मराठी साहित्यात अशा प्रकारचे प्रयोग भरपूर झालेत. ना. सी. फडकेंच्या कादंबऱ्या वास्तववादाची झूल पांघरून स्वप्नरंजन व पलायनवाद शिकवतात. भाऊ पाध्येंची 'वासूनाका' व मंगेश पदकींची 'माहीमची खाडी' या कादंबऱ्या सुद्धा वास्तववादाचा आव आणून वाचकांसमोर कामुकतेचे ताट ठेवतात. त्यामुळे अशा कादंबऱ्यांचा वरवरचा


तोंडवळा जरी वास्तववादी वाटत असला तरी त्यात झुलीच्या सहाय्याने स्वप्नरंजनी पलायनवादाची कातडी उठावदार करून दाखविण्यात येते.

याउलट, आधुनिक जनवादी साहित्य प्रवाहांची प्रतिज्ञा वेगळीच असते. दलित साहित्य, ग्रामीण साहित्य किंवा जनसाहित्यात वर्तमान वास्तवाचे चित्रण भीड-मुर्वत न ठेवता परंतु कलात्मक रीतीने करण्यात येते. पण त्यासोबत या वर्णनांमागील प्रेरणा परिवर्तनाची असते. वास्तवाचे चटोर चित्रण करून वाचकांची सवंग करमणूक करणे, हे ध्येय त्यामागे नसते. सभोवतीच्या



विषम व अन्याय समाजस्थितीतील अत्याचार पाहून उद्दिपित झालेली संवेदनशीलता अशा लेखनामागे असते. त्यामुळेच कुठेही प्रचारकीपणा न येऊ देता व कलेशी निष्ठा न सोडता हे लेखन समाजाचे वास्तविक चित्र रेखाटून आपला प्रभाव पाडते.

आतापर्यंतच्या विवेचनावरून काही निश्चित स्वरूपाचे निष्कर्ष आपल्याला काढता येतात. उच्च-कोटीच्या साहित्यात वर्ण्य विषयवस्तूचा सत्याभास निर्माण करण्यापेक्षा तिचे आंतरिक वास्तव चित्रित करणे अधिक महत्त्वाचे असते. आॅर्थर मिलर यांच्या Death of a Salesman या नाटकाची बाह्यप्रकृती अभिव्यक्ती-वादी (Expressionist) वाटली तरी त्यात अमेरिकन समाजजीवनात आज निकराला आलेल्या मानवी अस्मितेचा महत्त्वाचा प्रश्न आत्यंतिक वास्तवतावादी पद्धतीने चित्रित केला आहे. यातून आणखी एक महत्त्वाचा मुद्दा निघतो. अभिव्यक्तीवादाचा उपयोग जसा लेखनाचे तंत्र म्हणून करता येतो तसा वास्तववादाचा नाही. वास्तववाद हा तंत्राचा वा शैलीचा प्रकार नसून ती एक महत्त्वाची जीवननिष्ठा आहे.



दुसरा महत्त्वाचा निकर्ष हा की आंतरिक भौतिक-वादी निष्ठा नसतील व संवेदनशीलतेची बैठक मानव-निष्ठ नसेल तर बाह्य वास्तववादाला काहीच महत्त्व राहणार नाही. फडकेंच्या कादंबऱ्या किंवा 'वामू-नाका', 'चक्र', 'माहीमची खाडी' यांसारख्या कादं-बऱ्या वास्तववादाचे बाह्य तंत्र वापरूनही वास्तववादाच्या मुख्य ध्येयनिष्ठेलाछेद देतात. वाचकांना मानवसन्मुख बनविण्याऐवजी कामुकतेच्या नशेकडे ओढण्याचा प्रयत्न करतात.

अस्सल वास्तववादी कलाकृतीत सर्वसामान्य माणसाचे यथातथ्य वर्णन करून, माणसाचे लहानपण दाखवण्यात येते असाही एक आक्षेप अशा प्रकारच्या कलाकृतींवर घेण्यात येतो. परंतु या आक्षेपात सुद्धा काहीच तथ्य नसते. सर्वसामान्य माणसांचे चित्रण करून वास्तववादी लेखक सर्वसामान्य माणसांवरील आपला विश्वास व्यक्त करीत असतात. उद्धव शेळकेंची कौतिक, आनंद यादवांचा नारबा, तल्हारांचा रिक्षावाला शंकर, बोराडेंचा गंगाराम किंवा श्री. ना. पेंडसेंच्या मध्यम-वर्गीय चाळीचे कारकून नायक ही सर्वच सर्वसामान्य माणसे होत, ही गोष्ट खरी. परंतु आजच्या संस्कृतीची प्रचंड इमारत त्यांच्याच सामान्य कर्तृत्वातून उदयाला आली आहे, ही निष्ठा या सर्व चित्रणांमधून अनुस्यूत असते. या कलाकृतींमधून अतीमानुष शक्तींबरोबरच असामान्य मानुष शक्तींचीही हकालपट्टी करण्यात येते. सर्वसामान्य माणसाच्या जीवनेच्छेचा, त्याच्या चिका-टीचा, त्याच्या आशाआकांक्षांचा यथायोग्य गौरव करण्यात येतो. वास्तववादाचे खरे बलस्थान हेच. या बलस्थानाचे भान न ठेवता बाह्य वास्तववादाच्या कितीही उपाधी परिधान केल्या तरी त्या कलाकृती अप्रामाणिक व म्हणून निर्जीव ठरतील. काळाच्या प्रवा-हात त्यांचे नाव निशाण सुद्धा शिल्लक राहणार नाही.

△ △

चक्रधरांचे शेवटचे " प्रकरण "

सुरेश म० डोळके

१. प्रास्ताविक

'युगवाणी' मासिकाच्या १९८१ च्या दिवाळी-अंकात 'चक्रधरांचा वध झाला काय?' या शीर्षकाचा माझा लेख प्रसिद्ध झाला असून, "संशोधनात्मक व वैचारिक अशा निरनिराळ्या दृष्टींनी विचार केला तर चक्रधरस्वामींचा वध झाला नाही, असेच सिद्ध होते" असा त्यात मी निष्कर्ष काढला आहे. या लेखाला उत्तर म्हणून गुरुवर्य डॉ० वि० भि० कोलते यांनी 'श्रीचक्रधर-स्वामींचा वध' या नावाचा लेख 'युगवाणी'च्या नोव्हेंबर-डिसेंबर १९८१ च्या अंकात प्रसिद्ध केला आहे, व त्यात "चक्रधरांचा मृत्यू झाला होता, तोही त्यांच्या वधाने झाला होता, इतकेच नाही तर शिरच्छेदाने झाला होता, असेच महानुभाव चरित्रकार, कवी, भाष्यकार इत्यादी प्राचीन महानुभाव आचार्यांचे स्पष्ट मत होते, यात शंका नाही" असे म्हटले आहे. "मृत्यू स्वीकारल्यावर ते पुन्हा जिवंत झाले, धड व शिर एकत्र येऊन त्यांनी नवीन अवतार धारण केला व मग पैठणला सारंगपंडिताला भेट देऊन ते उज्जैनला जाण्यासाठी विंध्य पर्वत ओलांडू लागले" असेही त्यांनी या लेखात म्हटले आहे.

मला हे मत मान्य नाही. त्यामुळे, डॉ० कोलते यांच्या लेखाला प्रत्युत्तर देण्यासाठी मी प्रस्तुत लेख लिहीत आहे; पण, केवळ प्रत्युत्तर देणे एवढाच या लेखाचा उद्देश नाही, तर माझ्या मताच्या प्रतिपादनार्थ नवीन पुरावे सादर करणे, व स्वतंत्र विवेचन करणे हेही त्याचे उद्दिष्ट आहे.

मी माझ्या लेखात (१) वास्तव, (२)तत्त्वज्ञान, (३) चक्रधरांची प्रवृत्ती, व (४) वैचारिकता या दृष्टींनी या प्रश्नाचा विचार केला होता. डॉ० कोलते यांनी मात्र, वास्तव व वैचारिक दृष्टी डावलून 'तत्कालीन श्रद्धांच्या दृष्टीतून' या प्रश्नाकडे पाहिले आहे. आणि असे करताना 'डॉ० डोळके यांना अवच्छेद मान्य,' "...की प्रा० सावळापूरकर यांच्याप्रमाणेच तेही (डॉ० डोळके) आपल्या समाजेतिहासात्मक दृष्टीतून, चक्रधर मुळी गुजरायेत जन्मलेच नसावेत (किंवा, त्यांनी हरिपाळाचे मृत शरीर उठवून अवतार धारण केला नसावा) असे अनुमान काढणार आहेत?"—अशी, वधप्रकरणाशी संबंधित नसलेली अवान्तर विधानेही केली आहेत. या अवान्तर विधानांच्या बाबतीत मला एवढेच सांगायचे आहे की, माझा मूळ विवेचनविषय 'चक्रधरांचा वध झाला काय?' एवढाच होता, व आहे.* डॉ० कोलते यांच्या अवान्तर विधानांना व प्रश्नांना मी उत्तर द्यावे असा जर त्यांचा आग्रहच असेल तर मी स्वतंत्र लेख लिहून त्यांचा आग्रह पुरा करीन !

डॉ०कोलते यांनी आपल्या लेखात माझ्यावर एक हेत्वारोप केला आहे. "...अशा अनेक पंथीय व पंथीयेतरांनी चक्रधरांचा वध झाला असे मत मांडलेले असताही त्यांचा नामनिर्देशही न करता डॉ० डोळके यांनी त्यांच्या टीकेचे लक्ष्य केवळ मलाच केले आहे. यामागे त्यांचा कोणताही हेतू असला तरी त्याचे उत्तर मलाच देणे आवश्यक आहे." असे डॉ० कोलते म्हणतात. मी मात्र, 'चक्रधरांचा वध करण्यात आला, व तोही हेमाडपंताकडून करण्यात आला' असे जे डॉ० कोलते वारंवार म्हणतात त्यामागे त्यांचा काही हेतू आहे की काय हे शोधणार नाही, व त्यांच्यावर काही हेत्वारोपही करणार नाही. कारण, माझ्या बाबतीत तो अधिकार डॉ० कोलते यांना आहे, त्यांच्या बाबतीत मला तो नाही, असे मी मानतो. शिवाय, चक्रधरस्वामींनी सांगितल्याप्रमाणे, 'परस्परें मथन कीजे : मग नूतन होए' हीच हाही लेख लिहिताना माझी भूमिका आहे.

* चक्रधरांचा 'मृत्यू' हाही माझ्या त्या लेखाचा विषय नव्हता, हे वेगळे सांगायला नकोच !

इतर अभ्यासकांनी चक्रधरांचा वध झाला असे मत मांडलेले असतानाही त्यांचा उल्लेख मी केला नाही याचे कारण असे की, डॉ० कोलते यांनीच ते पहिल्यांदा मांडले आहे. जुलै १९३६ च्या 'महाराष्ट्र शारदे'च्या अंकात 'हेमाडपंताचा हृदयद्रावक खून' या नावाचा लेख लिहून त्यांनी हे मत मांडले व त्यानंतर वारंवार त्या मताचा पाठपुरावा केला. १९५२ साली प्रसिद्ध केलेल्या स्वलिखित 'श्रीचक्रधर चरित्र' या ग्रंथात त्यांनी याचे सविस्तर प्रतिपादनही केले आहे. इतर अभ्यासकांनी या मताचा उल्लेख वा पाठपुरावा केलेला असला तरी पहिल्यांदा आणि विस्तारानेही, हे मत मांडणारे डॉ० कोलतेच ठरतात. म्हणून, त्यांचा उल्लेख माझ्या लेखात येणे अपरिहार्य होते. त्यांनी हे मत पहिल्यांदा व विस्ताराने मांडलेले असल्यामुळे त्यांच्या मताचा समाचार घेण्यात इतरही अभ्यासकांच्या एतत्सदृश मतांचा विचार आपोआपच येऊन जातो, हे वेगळ सांगायला नकोच !

—आणि, "त्यांचा 'नामनिर्देश'ही न केल्याचा" आरोप माझ्यावर करता करता, आपण स्वत:ही या आरोपात सापडू की काय, याचे भान मात्र डॉक्टरसाहेबांना राहिलेले दिसत नाही. कारण, अशा एका लेखकाचे नाव तर त्यांनी स्वत:ही सोडून दिलेले आहे! प्रा० विश्वंभरनाथ उपाध्याय यांनी आपल्या 'हिंदी साहित्य की दार्शनिक पृष्ठभूमि' या ग्रंथात (१९५५) "...१३ वी शताब्दी के प्रमुख संत 'चक्रधर'ने... 'महानुभाव' पंथ का प्रवर्तन किया, ब्राह्मण पुरोहितोंने षड्यंत्र कर उनकी हत्या करा डाली" असे म्हटले आहे (पृ. ४६). पण, डॉ० कोलते यांनी, इतर लेखकांसोबत त्यांचा उल्लेख केलेला दिसत नाही!—कदाचित् अनवधानाने हे घडले असेल!! असो.

डॉ० कोलते यांचे "श्रीचक्रधर : शेवटचे प्रकरण" या नावाचे एक पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले आहे. त्यात त्यांनी 'युगवाणी'तील आपला लेख 'शेवटचे प्रकरण' या मथळ्याखाली संपूर्णपणे अंतर्भूत केलेला आहे. अर्थात, त्यांच्या मूळ लेखाला उत्तर देणे म्हणजे या पुस्तकालाही, या लेखापुरते; उत्तर देणेच होय.

२. चमत्कारातिशयोक्तीच्या भुसभुशीत व गैरलागू लीळा

मृत्यूनंतर मनुष्य जिवंत होऊ शकतो हे सिद्ध करण्यासाठी डॉ० कोलते यांनी आपल्या लेखाच्या सुरुवातीलाच लीळाचरित्रातील दोन लीळा माझ्या तोंडावर फेकल्या आहेत. धर्मश्रद्धांच्या दृष्टीतून आपले प्रमेय सिद्ध करणे ही त्यांची भूमिका असल्यामुळे त्यांनी असे करणे स्वाभाविकही आहे. आणि आपल्या प्रमेयसिद्धीसाठी खुद्द चक्रधरांइतका महत्त्वाचा साक्षीदार दुसरा कोणता मिळणार? —अर्थात, चक्रधरांची ही साक्ष माझ्याच प्रमेयाला पुष्टी आणते, हा भाग वेगळा!

डॉ० कोलते यांनी उद्धृत केलेल्या या दोनही लीळा, चक्रधरांच्या वधोत्तर पुनरुज्जीवनाच्या बाबतीत कशा भुसभुशीत व गैरलागू आहेत, आणि चक्रधरांचे वधोत्तर पुनरुज्जीवन सिद्ध करण्यास त्या कशा असमर्थ आहेत हे, त्या लीळा वाचताच अभ्यासकांच्या ध्यानात येईल.

(१) यांपैकी पहिली लीळा "**नागार्जुनीं अवस्थान:॥ दाइंवा वीवर सीध कथन:॥**" ही आहे. लीळाचरित्रात (नेने–प्रतीत) ती पुढीलप्रमाणे आहे—

> 'गोसावीयांसि वीवराचां तोंडीं लोंवतां श्रीचरणीं आसन : सर्वज्ञें ह्मणीतलें : भोजेया : हें नागार्जुनाचें वीवर गा : एथ नागार्जुन पडिला असे : तेयाचें सीर वेगळें पडिलें असे : घड वेगळें पडिलें असे : कण्हणी एकु जाइल : तयाचे सीर लाविल : तरि लागैल: उठील : तयासि विवर सीधि होइल : तुह्मीं जाल : तरि तुह्मांही होइल : जी जी : तरि कण्हणी ठाइं दर्शन देति : सर्वज्ञें ह्मणीतलें : तें नेणिजे : जा : तरि असो परता : तैसाचि पसरला': (उत्त०,४५२)

—या लीळेवरून सरळ सरळ असे दिसते की, नागार्जुनाच्या विवरात नागार्जुनाचे शिर व धड अलग अलग पडलेले होते, आणि जर कुणी ते शिर व धड एकत्र लावील तर नागार्जुन 'उठील'. अर्थात, नागार्जुन उठण्याकरिता (जिवंत होण्याकरिता) त्याचे शिर व धड कुणीतरी एकत्र लावण्याची आवश्यकता होती. '**कण्हणी एकु जाइल : तयाचें सीर लाविल : तरि लागैल : उठील :**'—म्हणजे, त्याचे शिर व धड कुणीतरी एकत्र लावील **तरच** नागार्जुन जिवंत होईल, एरवी नाही, असे चक्रधरांनी स्पष्ट सांगितले आहे. असे सांग-

ण्यात, शिरच्छेदित शरीर जर कुणीतरी दुसऱ्याने युक्त केले तरच, म्हणजे त्या युक्त शरीरातच पुन्हा प्राण संचरू शकेल, अयुक्त शरीरात नव्हे, असाच चक्रधरांचा स्पष्ट अभिप्राय आहे. अयुक्त शरीरात जर प्राण संचरला असता तर शिर व धड अलग अलग पडलेल्या अवस्थेत नागार्जुन इतके दिवस तिथे कशाला पडून राहिला असता ? आणि 'तयाचें सीर लाविल तरि–' असे तरी चक्रधरांनी कशाला म्हटले असते ??–याचा अर्थ असा की, पुन:प्राणसंचाराकरिता पूर्वशरीराचे 'युक्तत्व' ही अत्यावश्यक अट आहे, चक्रधरांनीच ती सांगितली आहे.

चक्रधरांच्या बाबतीत ही अत्यावश्यक अट पूर्ण झाली होती का ? त्यांचे शिर व धड एकत्र आणून कुणी लावले होते ? 'चक्रधरचरित्रा'तील परिशिष्टोद्धृत लीळेत (तेही तळटीपेतील संदर्भावरून ! कारण, पुस्तकात छापलेल्या मूळ मजकुरात ही वाक्ये नाहीतच) 'श्रीकमळ एरीकडे पडिले : श्रीमूर्ति एरीकडे पडिली' एवढेच म्हटलेले आहे (च० च०, पृ. ३२१, तळटीप). म्हणजे चक्रधरांच्या बाबतीत त्यांचे शिर व धड कुणीतरी दुसऱ्याने एकत्र आणून मेळविण्याची क्रिया घडलीच नाही. मग ते जिवंत कसे झाले ?–त्यांचे शरीर 'युक्त' तर कुणीच केले नव्हते. आणि म्हणून "नागार्जुनी अवस्थान" या लीळेच्या संदर्भात, चक्रधरस्वामी वधोत्तर जिवंत होऊ शकत नाहीत, असाच निष्कर्ष निघतो.

(२) (अ) डॉ० कोलते यांनी उद्धृत केलेली दुसरी लीळाही त्यांच्या मन्तव्याच्या विरुद्ध जाते. आदिमहादेव नावाच्या महात्म्याने त्याच्याजवळ असलेली आदिमहादेवी विद्या आपल्याला द्यावी, अशी त्याच्या पत्नीची फार इच्छा होती. त्याने 'हे वीद्या सांघो नैए : हे वीद्या जेयापासौनि होए तेयासीचि ओखटें करावें ऐसी बुधि उपजे : म्हणौनि हे वीद्या सांघों नैए :' असे म्हणून तिचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला. पण तरी तिने "आग्रहो घेतला : तेव्हळि तेणें तोसि वीद्या सांघीतली तीसि स्तीति जाली : स्तीतीस्तव आवेसु भरला : आणि तेयाचेंचि खर्ग घेउनि पाठीं लागली : एतुकेनि तेयातें वीदारिलें : वीदारूं सरलें : आवेसु गेला मग रडों लागलीं : 'प्रीया: प्रीया :' करीत रडों लागलीं : तवं आश्रणीं वाचा जाली : 'मीयां तुतें वारिलें कीं:' 'आतां तुम्हांवीन मज गमे ना : तुम्हांवीन माझें देह जाइल :' तेहीं म्हणीतलें : 'आतां अवघे अवेव जेथिचे तेथ मेळवि : मग मी स्वीकरीन :' मग तीया अवघे अवेव मेळवीले : मग तेणें तें मागौतें स्वीकरिलें : देहेवीण असों सकति: ते वीदेहीए पुरुखः" ॥ (लीळाचरित्र, पूर्वार्ध ३५३, कोलते–प्रत.)

–याही लीळेत पूर्वीच्या लीळेतल्यासारखीच परिस्थिती आहे. आदिमहादेवाचे शरीर विदीर्ण अवस्थेत असताना तो त्या शरीरात पुन्हा प्राणसंचार करू शकत नव्हता. आणि म्हणूनच त्याने **'आतां अवघे अवेव जेथिचे तेथ मेळवि : मग मी स्वीकरीन'** असे सांगितले; व त्याच्या पत्नीने **सर्व अवयव जेथल्या तेथे** लावल्या**वरच**–म्हणजे शरीर युक्त केल्यावरच–त्याने त्या शरीरात प्राणप्रवेश केला.

(आ) या लीळेचा विचार करताना आणखी एक गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे. ती ही की, ही 'लीळा' चक्रधरांनी कशाकरिता सांगितली ? "एकी वीद्या राजसा : एकी वीद्या तामसा : ऐसीया एकी विद्या आति जेथौनि होति तेथौनिचि प्रतिकुळां करावें ऐसी बुधि उपजे:" (विचारमाळिका, ५९) हे पटवून देण्याकरिता चक्रधरांनी बाईसाला आदिमहादेव नावाच्या महात्म्याची ही कथा सांगितली आहे. तिचे उद्दिष्ट निषेधपर आहे. सिद्धींचा वापर करू नये, त्या स्वतःवरच उलटतात, असे सांगणे हा यात चक्रधरांचा उद्देश आहे. 'हे विद्या सांघो नैए : हे वीद्या जेयापासौनि होए तेयासीचि ओखटें करावें ऐसी बुद्धि उपजे : म्हणौनि हे वीद्या सांघों नैए ': असेही चक्रधरांनी म्हटले आहे. महाराष्ट्रातल्या काही संतांनी अनेक सिद्धींचा उल्लेख केला आहे, आणि त्याबरोबरच, या सिद्धींचा वापर मात्र करू नये, असाही सूर काढला आहे. एकनाथांचा कृष्ण उद्धवास उपदेश करताना म्हणतो–

> **ज्यासी विषयभोग लागे गोड ।**
> **तोचि सिद्धींची वाहे चाड ।**
> **ज्यासी माझे प्राप्तीचे कोड ।**
> **तो वांछीना बंड ऋद्धिसिद्धींचे ॥**
> –(ए० भा०, १५–१८७, पांगारकर–प्रत)

चक्रधरांचीही, महादेवीविद्यासिद्धीचे वर्णन करताना, अशीच निषेधात्मक भूमिका होती. तेव्हा, चक्रधर स्वत: असे वागले असतील व याप्रकारे वधोत्तर जिवंत झाले असतील, हे खरे कसे मानावे ?

(३) विदीर्ण अवयव आपोआप एकत्र येऊ शकत नाहीत, हे सुद्धा या दोनही लीळांवरून स्पष्ट होते. ते जर आपोआप एकत्र येऊ शकले असते तर 'कव्हणी एकु...तयाचें सीर लाविल : तरि लागैल : उठील' असे चक्रधरांनी नागदेवाचार्यांना, व 'आतां अवघे अवेव जेथिचे तेथ मेळवि : मग मी स्वीकरीन' असे आदि-महादेवाने आपल्या पत्नीला कशाला सांगितले असते?— अर्थात, 'श्रीकमळ एकीकडुनि चालीलें : श्रीमूर्ति एकीकडुनि चालीली' ही घटना या दोनही लीळांच्या कक्षेत बसू शकत नाही.

सर्व अवयवांनी शरीर युक्त असण्याची आवश्यकता चक्रधरांनी एका सूत्राद्वारेही व्यक्त केली आहे. आउसेने एकदा चक्रधरांना विचारले, "जी जी: विद्या येथौनि कवणें द्वारें संचरे?' सर्वज्ञें म्हणितिलें : 'बाइ : इंद्रियें द्वारक एथौनि संचार" [वि० मा० ५४, (निरुक्त शेष, पृ. १८९)]. म्हणजे कोणतीही विद्या इंद्रियांद्वाराच शरीरात संचरू शकते. म्हणून, शरीर युक्त असणे आवश्यक आहे.

आणि, वरील दोन लीळांतच केवळ नव्हे, तर महानुभाव तत्त्वज्ञानातही, ईश्वर अवतार घेताना 'युक्त' शरीरातच प्रवेश करतो, असे सांगितले आहे. डॉ० कोलते हे चक्रधरांच्या वधोत्तर पुनरुज्जीवित शरीराला चक्रधरांचा 'नवीन' अवतार मानतात, ते महानुभाव तत्त्वज्ञानानुसार चूक आहे. कारण, ईश्वर अवतार धारण करताना अयुक्त शरीरात प्रवेशच करीत नाही. आणि चक्रधरांचे शिरच्छेदित शरीर 'युक्त' तर कुणीच केले नव्हते.

वरील निरनिराळ्या दृष्टींनी विचार केला तर असा निष्कर्ष निघतो की, डॉ० कोलते यांनी उद्धृत केलेल्या दोनही लीळा चक्रधरांच्या वधोत्तर पुनरुज्जीवनाच्या बाबतीत गैरलागू तर आहेतच; पण त्यांवरून हेही सिद्ध होते की, चक्रधरस्वामी वधोत्तर जिवंत होऊ शकत नाहीत.

चौरंगी विद्या

'चौरंगी विद्ये'चाही उल्लेख डॉ० कोलते यांनी केला आहे. पण, चौरंगी विद्येने फार तर तुटलेले शरीरावयव येऊ शकतात, मृत शरीरात पुन:प्राणसंचार होऊ शकत नाही. "हात पाव तुटल्या तोकडिया : तेय चौरंगीची विद्या जालिया मागुतिया येती" असे 'लक्षणस्थळा'त म्हटले आहे (उद्ध० ११). डॉ० कोलते-संपादित लीळाचरित्रातील 'मार्गी चौरंगी वीद्या नीरोपणें' यातल्या (पूर्वार्ध २६०) चौकटी कंसातल्या लीळेतही, चौरंगी विद्येने "हातपाय नीगाले" एवढाच उल्लेख आहे.

तेव्हा, 'चौरंगी विद्या'ही चक्रधरांच्या मृत शरीराला प्राणजीवन देऊ शकत नव्हती, हे उघड आहे.

३. पोथ्याधिक्याचा पोकळ दावा !

"डॉ० कोलते यांनी 'चक्रधरचरित्र' लिहिताना लीळाचरित्राच्या २४ हस्तलिखितांचा उपयोग केलेला आहे. पण, त्यांपैकी फक्त ३ पोथ्यांतच वधासंबंधीचा उल्लेख आहे; व तोही सर्व प्रतींत सारखा नाही" असे मी माझ्या लेखात म्हटले आहे. यातील पूर्वार्धाला उत्तर देताना डॉ० कोलते यांनी "क, ग, द, ढ या चार प्रतींची माहिती देताना त्या पूर्वार्धाच्या असल्याची नोंद करण्याचे माझ्याकडून राहून गेले, हे मी मान्य करतो" असे म्हणून ही आपली चूक जशी मान्य केली आहे, तसेच २४ हस्तलिखितांतील उत्तरार्धाच्या ११ पोथ्यांपैकी ६ पोथ्यांत वधासंबंधीचा वृत्तान्त आहे, असे म्हणून मीही माझी चूक मान्य करतो. मात्र, डॉ० कोलते यांनी यासंबंधी लिहिताना आणखी एक चूक केली आहे. "पूर्वार्धाच्या पोथ्यांच्या यादीतील **म** प्रतीत पूर्वार्धाप्रमाणेच उत्तरार्धही आहे" असे ते म्हणतात. पण, चक्रधरचरित्रातील पोथ्यांच्या तपशीलात पूर्वार्ध-पोथ्यांच्या यादीत "**म**" प्रत आढळतच नाही !

चक्रधरचरित्र लिहिताना उत्तरार्धाच्या ११ पोथ्या आपण पाहिल्या होत्या असे जे डॉ० कोलते म्हणतात त्यांपैकी **ब** प्रतीच्या बाबतीत मात्र थोडे स्पष्टीकरण केले पाहिजे. "**भ, म** प्रतींत निराळ्या शब्दात हाच (वधासंबंधीचा) वृत्तान्त सविस्तर आलेला आहे" हे जसे डॉ० कोलते यांनी स्पष्ट म्हटलेले आहे (च० च०, पृ० ३२१, तळटीप), तसे '**ब**' प्रतीच्या बाबतीत म्हटलेले नाही; किंवा या वृत्तान्ताच्या बाबतीत **द, न** या प्रतींतील लीळा 'परिशिष्टा'त देऊन तळटीपेत **ध** प्रतीत नसलेला मजकूर जसा त्यांनी नमूद केला आहे, तसेही "**ब**" प्रतीच्या बाबतीत केलेले नाही. वधाचा मजकूर असलेल्या पोथ्यांचा आवर्जून उल्लेख करताना व त्यातील कमीअधिक मजकूर साक्षेपाने नमूद करताना किंवा त्यासंबंधी निवेदन करताना त्यांनी **ब** प्रतीचा उल्लेख कुठेही केलेला नाही.

"या (भ) प्रतीतील मजकूर व ब प्रतीतील मजकूर जवळ जवळ सारखा आहे" असे मात्र त्यांनी म्हटले आहे (च० च०, प्रस्ता०, पृ० ७). त्यामुळे, याही पोथीत वधाचा वृत्तान्त आहे असे मान्य करायला माझी हरकत नाही.

पण, या ज्या ६ पोथ्यांत वधाचा वृत्तान्त आहे असे डॉ० कोलते म्हणतात त्यांपैकी ब, भ व म पोथ्या तळेगावकर–पाठाच्या आहेत.आणि तळेगावकरपाठ तर डॉ. कोलते अप्रमाण मानतात. इतकेच नव्हे तर, "'तो महानुभाव पंथात महत्त्वाचा मानण्यात येतो' हेही म्हणणे बरोबर नाही" असेही ते म्हणतात. मग ते त्या पोथ्यांचा आधार, चक्रधरांच्या वधाच्या लीळेच्या बाबतीत कसा देतात?–आणि तळेगावकर–पाठाच्या पोथ्यांत चक्रधरांच्या वधाची लीळा आहे असे प्रतिपादन करण्याचा अट्टाहास तरी कां करतात? डॉ० कोलते ज्याला प्रमाण मानतात त्या पिढीपाठाच्या या पोथ्या नव्हेत. या ३ पोथ्या वगळल्या तर ११ पैकी ८ पोथ्या शिल्लक उरतात; आणि त्यांपैकी ३ पोथ्यांत (द, ध, न) वधाचा वृत्तान्त आढळतो. ८ पैकी ३ म्हणजे 'निम्याहून अधिक' नव्हे!

या तीन पोथ्यांतील वधाच्या वृत्तान्तातही एकवाक्यता नाही, हे आणखी वेगळेच! 'खर्ग घातले : श्रीकमळ एरीकडे पडिले : श्रीमूर्ति एरीकडे पडिली" हीं वाक्ये तर डॉ० कोलते यांनी 'परिशिष्टा'त (च० च० पृ०, ३२१) उद्धृत केलेल्या मूळ लीळेत नाहीतच!!

वरीलपैकी "म" पोथीच्या बाबतीत मला एक शंका येते, तीही येथे व्यक्त केली पाहिजे. मला म० तपस्वीन्द्रशास्त्री तळेगावकर यांनी तळेगावकर–पाठाची लीळाचरित्र–उत्तरार्धाची पोथी दिली होती, व तिच्या आधारे विवेचन करून, या पोथीत चक्रधरांच्या वधाचा वृत्तान्त नाही, असे मी माझ्या लेखात म्हटले आहे. तपस्वीन्द्रशास्त्री तळेगावकर यांनी मला जी पोथी दिली होती तीच डॉ० कोलते यांनी उल्लेखिलेली म प्रत असावी की काय, अशी शंका मला येते. कारण, 'म' प्रतीचे डॉ० कोलते यांनी जे वर्णन केले आहे (च० च०, प्रस्ता०. पृ० ८ पहा) ते या पोथीशी तंतोतंत जुळते. मी पाहिलेल्या पोथीत–

"शके शतरा : ।।१७।। तेवीस : २३ : ।।
दुर्मती नाम संवत्सरे : भाद्रपद मासे वद्य
पक्षे शप्टी रवीदीने प्रथम प्रहरे यके :
आरोलीग्रामे प्रगाणे रामक्षेत्रे : तत्रस्थळे
लीख्यते : यथाप्रति लीख्यते मम दोष न
लीप्यते : ।। तडागोपसंज्ञाकस्य हरीराजसुत
कान्हेराज मूनेश्वरा ।। तत्सुतं लिखीतं
शास्त्रं कृष्णनामंच वीद्यते : ।। छ ।।"

हाच समाप्तिलेख आहे. म्हणजे या पोथीचा लेखनकाल (शक, संवत्सर, मास, पक्ष, तिथी, वार प्रहर यांसह), लेखनस्थळ, लेखकनाम इत्यादि तपशील,– आणि हे व्यक्त करणारी लेखनपद्धती व भाषाही,– डॉ० कोलते यांनी निर्देशिलेल्या "म" प्रतीशी तंतोतंत जुळते. हीही पोथी डॉ० कोलते यांना प० म० श्रीतळेगावकर महानुभाव यांच्याकडूनच प्राप्त झाली होती (च० च०, प्रस्ता०, पृ० ८). त्यामुळे, मी माझ्या लेखात उल्लेखिलेली तळेगावकर–पाठाच्या लीळाचरित्र–उत्तरार्धाची पोथी हीच, म्हणजे डॉ० कोल्ते यांनी उल्लेखिलेली "म" प्रत असावी की काय, अशी शंका मला येते. मी पाहिलेल्या पोथीत चक्रधरांच्या वधाची लीळा नाही.

वरील पोथीव्यतिरिक्त, तळेगावकर–पाठाच्या लीळाचरित्र–उत्तरार्धाच्या आणखी दोन पोथ्या मी पाहिल्या : एक 'शके १७४८, व्यय नाम संवत्सरे' लिहिण्यात आलेली, आणि दुसरी "वचने ।। ९५२।। दृष्टांत ।। ९९ ।। आदी ।। ९०८ ।। प्रारंभदीन सूकरवारी दसमी सूद्ध दसमी कार्तीक मास प्रारंभ उवरखेडयात ।। समाप्त भानेगाली ।। सन १२४३ ।।" असा समाप्तिलेख असलेली. या दोनही पोथ्यांत "...दर्भेश्वरीहुनी गोसावी उत्तरापंथे बीजे केले : सकळ भक्त* श्रीप्रभुते निरवूनी" असा शेवटी ('ऋद्धिपूरागमनी : भट्टाते आनुवर्जीत पाठवणी : उत्तरापंथे प्रयाण' या लीळेत) उल्लेख आहे. या दोनही पोथ्यांत वधाची लीळा नाही. त्यामुळे, "तळेगावकर पाठाच्या प्राचीन पोथ्यांत वधाचा वृत्तान्त आढळतो यात शंका नाही" हे डॉ० कोलते यांचे विधान 'निःशंकपणे' स्वीकारता येत नाही.

['पाठभेद–भक्तजने']

लीळाचरित्राच्या अनेकानेक पोथ्यात चक्रधरांच्या वधाची लीळा आहे असे डॉ० कोलते म्हणतात, व त्याकरिता त्यांनी पाहिलेल्या अशा काही पोथ्याही नमूद केल्या आहेत. मी या बाबतीत पुन्हा एवढेच म्हणतो की, लीळाचरित्र उत्तरार्धाच्या ज्या पोथ्या उपलब्ध आहेत त्यांपैकी फारच थोड्या प्रतींत वधाचा वृत्तान्त आहे; व तोही सर्व प्रतींत सारखा नाही. डॉ० कोलते यांना उल्लेखच हवा असेल तर पुढे काही पोथ्यांचा निर्देश करतो:—

(१) अमरावतीचे सुप्रसिद्ध महानुभाव संशोधक श्री. माधवराज पंजाबी यांच्या संग्रहात लीळाचरित्राच्या एकूण १० हस्तलिखित पोथ्या आहेत. त्यांपैकी ६ उत्तरार्धाच्या आहेत. पण त्यांपैकी एकाही पोथीत चक्रधरांच्या वधाची लीळा नाही. या ६ पैकी एक पोथी फार प्राचीन असून, तिच्या शेवटी "शिवबासामागा दुसरे शोधन पीढीपाठ उत्तरार्धाचे" असा उल्लेख आहे.

(२) डॉ० म० रा० जोशी यांच्या संग्रहात "शके १४९६ हा कालोल्लेख असलेली लीळाचरित्र—उत्तरार्धाची पोथी मी पाहिली. हिच्यातील मजकुरावरून ही पोथी, डॉ० कोलते यांनी लीळाचरित्र—संपादनाकरिता घेतलेल्या ह्री, बी या प्रतींशी साम्य दर्शविते. या पोथीतही चक्रधरवधाची लीळा नाही.

(३) 'शिवबासामागा दुसरे शोधन पीढीपाठ उत्तरार्धाचे' अशी नाममुद्रा असलेल्या मुरारीमल्लबासांच्या लीळाचरित्र—शोधनीच्या तीन पोथ्या मी पाहिल्या. या तीनही पोथ्यांत उत्तरार्धाची लीळासंख्या ६९५ असून, उत्तरार्धसमाप्तीनंतर 'आता उत्तराद्धिचा काळनेमु' असे म्हणून पुढे चक्रधरांच्या उत्तरार्ध—काळातील घटनांचा तपशील दिलेला आहे. डॉ० कोलते यांनी जो पिढीपाठ आपल्या 'चक्रधरचरित्रा'साठी प्रामुख्याने प्रमाण मानलेला आहे, त्या पिढीपाठाच्या या पोथ्या आहेत. पण, त्यांपैकी एकीतही चक्रधरवधाची लीळा नाही. शिवबासांचा पिढीपाठ व मुरारीमल्लबासांची शोधनी यांना महानुभाव पंथात फार प्रामाण्य आणि महत्त्व आहे गुजरशिवबास हे पिढीपाठाचे पहिले, आणि मुरारीमल्लबास हे लीळाचरित्राचे चवथे व पिढीपाठाचे दुसरे शोधनीकार ठरतात. या पाठाला 'पिढीपाठ' हे नाव शिवबासांनीच दिले, व त्या पिढीपाठाचे दुसरे संशोधन—संपादन मुरारीमल्लांनी केले. मुरारीमल्लांच्या शोधनीत वधाची लीला नाही. मुरारीमल्ल विद्वांस यांच्या 'वृद्धाचारा'वरून त्यांचा काल—काळ शके १५२७ हा दिसतो. ['महानुभाव' (मासिक), वर्ष ३४, अंक ७–९, पृ० ४४]. यावरून, चक्रधरांच्या वधाची लीळा सुमारे शके १५०० पर्यंत निर्माण झाली नव्हती, व. ती लीळाचरित्राच्या पिढीपाठात नव्हती; असे म्हणता येते. मुरारीमल्लबासांच्या शोधनीला डॉ० कोलते यांनी कितीही नाके मुरडली, व त्यांच्यासारख्या चिकित्सक 'शोधनी'कारावर, चक्रधरांचा शिरच्छेद झाल्यावर ते पुन्हा जिवंत झाले असे मानणाऱ्या डॉ० कोलते यांनी श्रद्धाळूपणाचा कितीही आरोप केला तरी, लीळाचरित्राच्या पिढीपाठाच्या बाबतीत त्यांच्या शोधनी—प्रतीला, हिराइसाच्या शोधनीप्रमाणेच, आगळे महत्त्व आहे यात शंका नाही.

(४) (अ) लीळाचरित्र—उत्तरार्धाच्या ४८१ लीळा असलेल्या ज्या पोथीचा उल्लेख मी माझ्या लेखात केला आहे त्या पोथीत चक्रधरवधाची लीळा नाही.

(आ) तसेच, 'शके १५२६ क्रोधी संवत्सर' असा कालोल्लेख असलेली ४८२ लीळांची उत्तरार्धाची पोथी मी पाहिली. तिच्यातही वधाची लीळा नाही.

(इ) लीळाचरित्र—उत्तरार्धाच्या पिढीपाठाची आणखी एक पोथी माझ्या पाहण्यात आली. तिच्यात एकूण ४९१ लीळा आहेत. पोथीवर कालनिर्देश नाही. तरी, पोथी ३०० वर्षांपूर्वीची असावी. याही पोथीत वधाची लीळा नाही.

(५) (अ) आश्रमातील पोथ्यांचेच उदाहरण द्यावयाचे तर, अमरावती येथील महन्त ऋषिराजबाबा यांच्या आश्रमात लीळाचरित्र—उत्तरार्धाची एक पोथी मी पाहिली. "इती श्रीउत्तरार्ध चरीत्रे : पीढीपाठ संपुर्ण" असा त्यात समाप्तिलेख, व त्यानंतर "दुर्मती नाम संवतसरीं : शकें १५ ।। ५ ।। अवधारीं : आस्वीन मास शुक्ल पक्षु तीथि शष्टी आदीत्यवारीं : चरीत्रें संपुर्ण जाली : ।। १ ।। " असा त्यात कालोल्लेख आहे या पोथीत चक्रधरवधाची लीळा नाही.

(आ) रणाईचे आश्रमातही (प्रणवाश्रम) उत्तरार्धाची पोथी (पोथी क्र० २) असून तिच्यातही वधाची लीळा नाही.

५. याव्यतिरिक्त, चक्रधरवधाची लीळा नसलेल्या लीळाचरित्र—उत्तरार्धाच्या दोन पोथ्या सध्या मजजवळ आहेत:

– अशी किती म्हणून संख्या सांगावी ?–यावरून हे लक्षात येते की, वधाची लीळा नसलेल्याच पोथ्या बहुसंख्य आहेत. किंबहुना, लीळाचरित्राच्या (अर्थात उत्तरार्धाच्या) पोथ्यांत चक्रधरांच्या वधाची लीळा अपवादानेच आढळते, असेच म्हटले पाहिजे.

आणि याला आधार खुद्द डॉ० कोलते यांचाही दाखविता येतो. त्यांना लीळाचरित्र–संपादनाकरिता उत्तरार्धाच्या ज्या ६ पोथ्या मिळाल्या, त्यांपैकी एकीतही चक्रधरवधाची व त्यांच्या पुनरुज्जीवनाची कथा नाही. ती आपल्या प्रतीत [चौकटीच्या कंसात का होईना] घालण्यासाठी त्यांना वेगळ्याच, म्हणजे संपादनासाठी न घेतलेल्या, व ३० वर्षांपूर्वी लिहिलेल्या चक्रधरचरित्रा-करिता उपयोगात आणलेल्या द, ध, न, या पोथ्यांकडे धाव घ्यावी लागली–यावरूनही, चक्रधरवधाची लीळा असलेल्या पोथ्या किती 'तुरळक' प्रमाणात आढळतात याची अभ्यासकांना कल्पना येईल.

४. पोथीलेखकांची समाहितता

चक्रधरांच्या वधाची लीळा लीळाचरित्राच्या पोथ्यांतून गाळण्यात काही पोथीलेखकांनी अंतःकरणाची समाहितता दाखविली नाही असे डॉ० कोलते म्हणतात ('चक्रधरचरित्र,' प्रस्ता०, पृ० १६). मी तर असे म्हणतो की, ही लीळा न देण्यात या पोथीलेखकांनी अंतःकरणाची समाहितता तर दाखविली आहेच, शिवाय लीळाचरित्र शुद्धही ठेवले आहे. प्रक्षेपापासून लीळा–चरित्र मुक्त ठेवण्याचे फार मोठे कार्य त्यांनी केले आहे. वध झाला आणि पुन्हा शिर व धड एकत्र झाले अशी केवळ काल्पनिक, केवळ पुराणग्रंथातच शोभणारी लीळा लीळाचरित्रात न देऊन या पोथीलेखकांनी खरोखरच वास्तवाचा स्वीकार केला आहे, आणि चक्रधरस्वामींना काल्पनिकतेच्या व श्रद्धेच्या देव्हाऱ्यात न बसविता वास्तवाच्या भूमिकेतून त्यांचे अलौकिकत्व, त्यांचे श्रेष्ठ-पण मूल्यमापित करण्याची संधी दिली आहे. चक्रधर मोठे होते ते काय त्यांनी चमत्कार केले म्हणून ? चमत्कार तर सिद्धीप्राप्त योगीही करू शकतो. चक्रधरांचे शिर व धड एकत्र झाले हा त्यांनी केलेला तथाकथित असा सर्वात मोठा चमत्कार !–पण यामुळे का ते श्रेष्ठ ठरतात ? ते श्रेष्ठ ठरतात ते त्यांच्या व्यक्तिमत्त्वामुळे! त्यांच्या ठिकाणी असलेल्या दैवी गुणांच्या सामर्थ्यामुळे व आविष्कारामुळे ! जीवोद्धरणाचे व्यसन असल्यामुळे परमेश्वरावतार धारण करणाऱ्या चक्रधरांनी जीवोद्धर-णाचे कार्य केले, आपल्या ठिकाणी असलेल्या दैवी गुणांच्या सामर्थ्याने अनेकांचे दुःख हलके केले, अनेक जीवांचे भले केले–यात त्यांचे श्रेष्ठत्व आहे, व हेच परमेश्वरावताराचे उद्दिष्टही असते. वध झाला व शिर धड पुन्हा एकत्र आले या घटनेत –जी घडली नाही ती घडलीच असे मानून–या घटनेत चक्रधरांचे अलौकिकत्व सामावले आहे असे मानणे हा वास्तवाचा तर अपहार आहेच, पण चक्रधरस्वामींसारख्या श्रेष्ठ समाजपुरुषाच्या लौकिक अलौकिकत्वालाही ती बाधक आहे ! शिवाय, बुद्धिवादाला तिलांजली आहे ती वेगळीच ! !

म्हणूनच, चक्रधरांच्या वधाची व पुनर्जीवनाची लीळा लीळाचरित्रात अंतर्भूत करण्यात नव्हे, तर ती लीळा न देण्यातच पोथीलेखकांनी अंतःकरणाची समा-हितता दाखविली आहे, असे म्हणावे लागते.

५. 'मूर्तिप्रकाशा'तील अनुल्लेख; –आणि उल्लेखही !

"चक्रधरांवर करण्यात आलेल्या विषप्रयोगाचा वृत्तान्त ज्या 'मूर्तिप्रकाशा'त आढळतो, त्या मूर्ति-प्रकाशातदेखील चक्रधरांच्या वधाचा उल्लेख नाही; उलट, 'ऐसें बोलौनि जगंनाथें ; बीजें केलें उत्तरापंथें' (२७५९) असा अगदी स्पष्ट निर्देश मूर्तिप्रकाशकाराने केला आहे" असे मी माझ्या लेखात म्हटले आहे. त्यावर–

भणौनि वृधासंगमीचें महींमान
प्रसंसू नए अती गहन ।
भक्ता इश्वरा उभयां हनन
जेय जालें ॥ (मू० प्र० ३०३)

ही ओवी उद्धृत करून, 'मूर्तिप्रकाशा'त चक्र-धरांच्या वधाचा स्पष्ट उल्लेख आहे, असे डॉ० कोलते यांनी म्हटले आहे.

पण, डॉ० कोलते यांचे म्हणणे कसे संभ्रमित व चुकीचे आहे, हे पुढील विवेचनावरून ध्यानात येईल:

उपरोक्त ओवीचा अर्थ लावताना त्यापूर्वीच्या काही ओव्यांचा संदर्भ ध्यानात घ्यावा लागतो. 'वृद्धा-संगमीची व्यावृत्ती' हा या प्रकरणाचा विषय आहे, आणि बाईसाची आत्महत्या हा उपरोक्त ओवीपूर्वीच्या काही ओव्यांचा संदर्भ आहे. ते ध्यानात येण्याकरिता आधी त्या ओव्याच वाचकांपुढे ठेवतो–

पंरी पापियाचें ओखटें मन:
कर्रू आले ईश्वरहनन
लटकें बोलौनि अन्यथाज्ञान:
बाइसां दुख संपादिलें ।। २९८ ।।

सांघौनि नव्हती दुर्वार्त्ता:
घतलें सप्रेमळा भगता
तयां नीर्वाळलेया सर्वथा :
नीत्यनरक ।। २९९ ।।

यावरि भक्तीचिया प्रेमकळिका:
देहत्यागु केला नागांबिका
मग चींता वर्त्तली परमपूरूखा:
परमात्मयासी ।।३००।।

स्नेहें झळंबौनि बोलिला सर्वज्ञराओ:
बाइसीं कां गा केला वेगीं लवलाहो
ऐसा ईश्वरीं भक्ताचा पढीयाओ:
आत्मयांरामासी ।।३०१।।

मादणयांवां प्रसंगीं केवल्यनाथा:
बाइसावीण सुख नाहीं सर्वथा
वीसरू स्वीकरीला हे श्रुति समस्तां:
श्रीमुखें निरूपिली ।।३०२।।

भणौनि वृधासंगमीचें महींमान:
प्रसंसू नए अती गहन
भक्ता इश्वरा उभयां हनन:
जेथ जालें ।।३०३।।

—'गुंफेचा नागोवा' झाल्यावर काही पाइकांनी चक्रधरांच्या गुंफेतील सामान लुटले, व ते परतायला लागले. त्यावेळी बाइसा तेथे नव्हती; नदीपलीकडील गावात ती बाजाराला गेली होती. परत येताना नदी ओलांडण्यासाठी ती नावेत बसली. तेव्हा तिने नावाड्यांना विचारले, 'तुम्हीं कें गेले होतेति?' त्यांनी उत्तर दिले, 'श्रीचांगदेव राउळ गोसावियांचा ठाइं ऐसेनि ऐसे करावेया:' (उत्त. ४४७). आपल्या म्हणण्याला पुरावा म्हणून स्वामींच्या गुंफेतून लुटून आणलेले सामानही त्यांनी बाइसाला दाखविले. नावाड्यांचे उत्तर ऐकून, व त्या परिचित वस्तू पाहून बाइसाची खात्री झाली की, स्वामींचा अवतार समाप्त झाला! बाईसा स्वामींची अनन्य 'भक्त' होती, आणि खरा भक्त परमेश्वरसान्निध्यावाचून जगू शकत नाही. त्या वियोगदु:खाच्या भरात बाइसांनी नदीत उडी घेतली आणि देहत्याग केला! (उत्त० ४४७).

हा प्रसंग ध्यानात घेऊन वाचकांनी 'मूर्तिप्रकाशा'तील वरील ओव्या वाचाव्यात. खोटीच दुर्वार्ता सांगून पाप्यांनी बाइसांच्या अंत:करणाला दुखविले, त्यांनी 'सप्रेमळा भगता'चा घात केला; आणि त्यामुळे 'भक्तीचिया प्रेमकळिका' असलेल्या नागांबिकेने देहत्याग केला. चक्रधरांना हे कळताच भक्ताच्या प्रेमाने उचंबळून ते म्हणाले, 'बाइसांनी जाण्याची उगीच घाई केली.'

मग एकदा 'मादनें उपक्रमीं' चक्रधर म्हणाले, 'बाइसा मागां मादणें ऐसें हें परिभाषही नेणे' (उत्त० ४८४, नेने—प्रत)

—यावरून हे लक्षात येईल की, प्रत्यक्ष हनन बाइसांचेही झाले नाही व चक्रधरांचेही झाले नाही. बाइसाने आत्महत्त्या केली. डॉ० कोलते समजतात त्य अर्थाने तिचे 'हनन' झाले, म्हणजे तिला मारण्यात आले, असे नाही.

मग मूर्तिप्रकाशकारांनी असा उल्लेख कां केला? —बाइसाच्या बाबतीत असे म्हणता येते की, दुष्ट दुर्वार्ता ऐकून बाइसाने आपला मृत्यू स्वत: ओढवून घेतल्यामुळे तिचे एक प्रकारे हननच झाले. दुष्ट दुर्वार्तेने त्या 'सप्रेमळा भगता'ला 'घतले' म्हणजे तिच्या अंत:करणाचा घात केला, व त्या दु:खहत अवस्थेत तिने 'देहत्यागु केला'. त्यामुळे, तिचा मृत्यू म्हणजे दुष्ट दुर्वार्तेने केलेले तिचे 'हनन' असे दूरान्वयाने मानता तरी येते.

पण, चक्रधरांच्या बाबतीत 'हनन' म्हणजे वध हा अर्थ येथे लागूच पडत नाही. 'भक्ता इश्वरा उभयां हनन' असे जे मूर्तिप्रकाशकारांनी म्हटले आहे, त्यांपैकी चक्रधरांच्या बाबतीत अर्थ असा आहे की, बाइसांच्या मृत्युवार्तेने चक्रधरांच्या अंत:करणावर दु:खाचा आघात झाला. त्यांचे अंत:करण दु:खहत झाले. बाईसा ही चक्रधरांची अनन्यभक्त असल्यामुळे त्यांच्या अंत:करणावर तिच्या मृत्युवार्तेने दु:खाचा आघात होणे, ते दु:खहत होणे स्वाभाविकही होते.

महानुभाव तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनेही या घटनेचा विचार करता येतो. 'सवी देणें हेंही एक तात करणेंचि

कीं गा' (लीं० च० उत्त० २४२, कोलते-प्रत) असे म्हणणाऱ्या चक्रधरस्वामींनी आपल्या तत्त्वज्ञानात अहिंसेला फार महत्त्व दिले आहे. 'हिंसा अधर्मु' (युग० १८), 'हिंसा न करावी' (आ० मा० १५), 'हिंसा पाप' (आ० मा० १०६), 'हिंसा वर्ते तिये स्थानीं महात्मेया असों नये' (आचार २४०)-इत्यादि त्यांच्या वचनांवरून हे लक्षात येते. प्रत्यक्ष घात न करताही हिंसा करता येते,-ती इतरांच्या अंतःकरणावर दुःखाचा आघात करून! अंतःकरण दुखवल्याने जी हिंसा होते तत्प्रीत्यर्थ हिंसकाला कोणती नरकफळे भोगावी लागतात याचेही वर्णन महानुभावांच्या भाष्य-ग्रंथांत आढळते. 'दुसऱ्याचे अंतःकरण दुखवल्यानेही हिंसा होते' असे डॉ० कोलते यांनीही म्हटले आहे. (महा०तत्त्व०, पृ०३४१). बाइसांच्या मृत्युवार्तेने चक्रधरांचे अंतःकरण अतिशय दुखावले, म्हणजे एक प्रकारे त्यांची हिंसाच झाली. आणि, या हिंसेला अनुलक्षूनच 'ईश्वरा हनन' हे शब्द मूर्तिप्रकाशात कवीने योजलेले आहेत. याचा अर्थ, त्यांचा प्रत्यक्ष वध झाला असा मुळीच होत नाही.

आणि असा अर्थ या ओवीत होईलच कसा? कारण, 'भक्ता इश्वरा उभयां हनन : जेथ जालें' या चरणातील 'जेथ' शब्दही फार महत्त्वाचा आहे. चक्रधरांचा तथाकथित वध 'वृद्धासंगम' येथे झालाच नाही (तो कुठेच झाला नाही; पण, काही पोथ्यांतील प्रक्षिप्त लीळांच्या आधारे, तो झाला असे मानले तरी, तो बेलापूर येथे झाला. वृद्धासंगम येथे झाला नाही). डॉ० कोलते यांनी या बाबतीत थोडी सारवासारव केली आहे. पण कितीही सारवासारव केली तरी, या ओवीतील "जेथ" हा शब्द कुणालाच नाकारता येणार नाही. म्हणून, 'जेथ' या शब्दाच्या अनुरोधाने 'ईश्वरा हनन'-याचा अर्थ लावला पाहिजे. व तो 'चक्रधरांच्या अंतःकरणावर झालेला दुःखाचा आघात' असाच केला पाहिजे; चक्रधरांचा वध असा मुळीच करता येत नाही.

चक्रधरांचा वध वृद्धासंगम येथे झाला असता तर तेथेच त्यांचे आयुष्य संपले असते. पण, तसे झाले नाही. कारण, त्यानंतरही स्वामी अनेक दिवस जिवंत होते व त्यांचे काही चरित्रही घडले. त्यानंतरच्याच एका प्रसंगी त्यांनी 'बाइसा मागां मादणें ऐसें हें परिभाषही नेणे' हे उद्गार काढले आहेत. यावरूनही, 'हनन' या वरील ओवीतील शब्दाचा अर्थ 'वध' असा होत नाही.

अर्थात, 'मूर्तिप्रकाशा'त चक्रधरांच्या वधाचा उल्लेख आढळत नाही हे माझे म्हणणे कायमच राहते.

'पेणोवेणा बीजें केलें'

चक्रधरांचा वध झाला असे 'मूर्तिप्रकाशा'वरून दिसत तर नाहीच; उलट, चक्रधरांनी उत्तरापंथे बीजे केले आणि तेही 'पेणोवेणा' म्हणजे मुक्काम करीत करीत बीजे (प्रयाण) केले, असे मूर्तिप्रकाशकार स्पष्ट शब्दांत सांगतात. 'स्वयें ईश्वरें कृपावंतें : बीजें करूं आदरीलें उत्तरापंथें' (ओ० ३३५). त्यांनी नागदेव. प्रभृति शिष्यांना असतीपरीचा आचारधर्म निरूपिला; आणि 'ऐसें बोलौनि जगन्नाथें : बीजें केलें उत्तरापथें उद्धरावया आर्त जनातें : संबंध देउनिया' (२७५९).

'उत्तरापंथे बीजें' चक्रधरांनी कोण्या रीतीने केले: हेही मूर्तिप्रकाशकारांनी सांगितले आहे. त्यांचा नागार्जुन म्हणतो-

अवधारीं जीवोद्धरणा :
तुं मानु देसी म्हाइयां ब्राह्मणां
तरी तयातें न पुसत पेणोवेणा :
कां बीजे केलें ॥२८६३॥

म्हणजे, चक्रधरांनी उत्तरापंथे बीजे केले ते 'पेणोवेणा' म्हणजे मुक्काम करीत करीत. 'बीजे करणे' म्हणजे 'मृत्यू स्वीकारणे' हा एक अर्थ डॉ० कोलते यांनी सुचविला आहे, तो येथे लागू पडत नाही. कारण, तो अर्थ स्वीकारला तर काय असे म्हणावयाचे की चक्रधरांनी पेणोवेणा मृत्यू स्वीकारीत प्रयाण केले? किंवा पेणोवेणा मृत्यू स्वीकारला??- 'अर्थु तो प्रकरणवशें' हे मी सांगायला पाहिजे असे नाही, चक्रधरांनीच ते सांगून ठेवले आहे.

६. ज्ञानप्रबोध

'मूर्तिप्रकाशा'प्रमाणेच, 'ज्ञानप्रबोधा'तही चक्रधरांच्या वधाचा उल्लेख नाही. उलट, चक्रधरांनी हे राष्ट्र त्यजून उत्तरेकडे बीजे केले असे 'ज्ञानप्रबोध'कार स्पष्ट सांगतात. चक्रधर-वियोग-दुःखाचे निरूपण करताना ज्ञानप्रबोधकार म्हणतात-

आणि तेणें प्रभुराजें :
येथौनि केलें बीजें
नीमित्य करुनि हों काजें :
मजचि कारणें ॥१०४२॥

भज अमंगळाचें जन्म :
पुढां होइल ऐसें अधम
तदि दर्शन नेदावें हें वर्म
राष्टर त्यजावेया ॥१०४३॥

जयाचेनि आदिभावें :
हें राष्टर त्यजीलें देवें
तें मी मुख्य आघवे :
यकजाति ॥१०४६॥

या ओव्यांत, चक्रधरांनी येथून 'बीजें केलें'... त्यांच्या आदिभावाने–म्हणजे त्यांच्या मूळ इच्छेनेच त्यांनी हे 'राष्ट्र त्यजीलें' असे कवीने स्पष्ट सांगितले आहे. यावरून, चक्रधरांना हे राष्ट्र सोडून दुसरीकडे जाण्याची प्रवृत्ती ('आदिभाव') झाली होती, व त्याप्रमाणे त्यांनी येथून प्रयाण केले, असे उघड उघड दिसते. 'बीजें केलें' म्हणजे काय झाले, व कुठे बीजें केले अशी कुणाला शंका येईल तर त्यालाही विश्वनाथ-बास वाळापूरकरांनी उत्तर देऊन ठेवले आहे–

ऐसीं दानें अनंतें :
देउनि उदारें श्रीमंतें
मग अनेत्र स्थानांतरांतें :
चीतींता जाला ॥ १०२८ ॥

म्हणजे, 'अशा प्रकारे थोर व श्रीमान असलेल्या ईश्वराने (चक्रधरांनी) अनंत प्रकारची दाने देऊन अन्यत्र स्थानांतर करण्याचा विचार केला'. "अन्य स्थान=उत्तर दिशा" असा टीपकाराने अर्थ दिला आहे, आणि या प्रकरणाला "परमेश्वरें राज्यांतर केलें : त्या राज्यांतराच्या वोव्या" असे नाव दिले आहे.

यावरून अगदी स्पष्ट होते की, ज्ञानप्रबोधकारांच्या मते, चक्रधरांनी अनंत प्रकारची (किंवा अनंत लोकांना) दाने दिल्यावर त्यांना 'बीजें' (=स्थानांतर) करण्याची प्रवृत्ती (= आदिभाव) झाली, व त्याप्रमाणे त्यांनी हे राष्ट्र त्यजून अन्य स्थानी (= उत्तर दिशेला) प्रयाण केले. चक्रधरांना उत्तरापंथे प्रयाण करण्याची प्रवृत्ती आधीपासूनच झाली होती व त्याप्रमाणे त्यांनी उत्तरापंथे 'राज्यान्तर' केले हे तर यावरून दिसतेच; पण त्यावरोबरच हेही दिसते की, उत्तरापंथे प्रयाण करण्याच्या बाबतीत 'प्रवृत्ति' याचा अर्थ अंत:स्फूर्त इच्छा, व 'बीजें करणें' याचा अर्थ गमन करणे,–'स्थानांतर' करणे असा होतो; 'मृत्यू स्वीकारणे' असा होत नाही. 'अर्थु तो प्रकरणवशे' हे इथेही लागू पडते.

७. सह्याद्रि वर्णन

'ज्ञानप्रबोधा' पूर्वी लिहिण्यात आलेल्या (म्हणजे चक्रधरांच्या काळाशी अधिक लगत असलेल्या) 'सह्याद्रि-वर्णना'त तरी चक्रधरांच्या वधाचा किंवा मृत्यूचा उल्लेख आढळतो का?–रवळोबासांनीही चक्रधरांच्या विरहाने भक्तांची अंत:करणे कशी 'गेली' याचे वर्णन केले आहे. त्या वर्णनात ते म्हणतात–

एकीं तुवां बीजें केलें ऐसा :
शब्द आइकतखेवो सहसा
सर्व संपतीची न पांत वास :
सांडिला देशवासू ॥ ४४१ ॥

बरवें नित्य श्रीवीळासें :
कवणें मार्गें बीजें केलें असे
कव्हणातेंही मी ऐसें
पुसेंचि ना ॥ ४४४ ॥

काइ सवें हडप बारी :
वोनेबाटिकार कन्हेरी
सुकासनीं कीं चरणचारी :
चालतु असे ॥ ४४५ ॥

तेणें वस्त्रें प्रावर्णें केलीं :
कीं श्रीमूर्त्ति उघडी असैल जाली
उपानहौ किं वोनपाउलीं :
बीजें करीतु ॥ ४४६ ॥

तो श्रीचरणचारी वाटे :
तया खूंपती हरळगोटे
ऐसें आठवीतां न फुटे
हृदए माझें ॥ ४४७ ॥

येथे मी वरील प्रत्येक ओवीचा अर्थ देत नाही. पण, जाड ठशांतील शब्दांवरून वाचकांच्या सहज लक्षात येईल की, चक्रधरस्वामींनी हा 'देशवास सोडून' कोणत्यातरी रस्त्याने 'बीजे केले'. बीजे करताना ते पालखीत बसून गेले की पायी चालत गेले, तसेच बीजे करीत असताना त्यांच्या पायात 'उपानहौ' होते की ते अनवाणी चालत गेले,–अशा आशंका कवीने व्यक्त केल्या आहेत; आणि ते अनवाणी गेले असतील

तर चालत असताना त्यांच्या पायात वाटेतील खडेगोटे रुतत असतील याची आठवण होऊन 'न फुटे हृदए माझें' असा आपला शोकपूर्ण आत्मनिर्वेदही व्यक्त केला आहे.

यावरून लक्षात येते की, चक्रधरस्वामींनी उत्तरापंथे पायी चालत चालत प्रयाण केले. 'बीजे केले' याचा गमन केले, स्थानांतर केले, [आणि 'चरणचारी' म्हणजे पायी चालत चालत] असा अर्थ मीच करतो असे नाही. टीपकारानेही "बीजें केलें = गमन केलें" [आणि 'चरणचारी = चरणेंचि विचरण करिती'] असाच अर्थ केला आहे, ('स० व०,'संपा० डॉ० कोलते, पृ० १७१).

तेव्हा, चक्रधरांच्या उत्तरापंथे बीजे करण्याच्या बाबतीत, 'बीजे करणे' म्हणजे स्थानांतर करणे, गमन करणे (पायी चालत जाणे) हा अर्थ होतो हे पुन्हा सांगण्याची आवश्यकता आहे का ? चक्रधरांचा महाराष्ट्रातील' देशवास ' त्यांच्या उत्तरापंथे प्रयाण (गमन) करण्याने संपला हे तर यातून फारच स्पष्ट रीतीने व्यक्त होते. त्याविषयी संशयाला जागाच राहत नाही.

८. 'बीजे करणे' म्हणजे जाणे, गमन करणे

'उत्तरापंथे बीजे करणे' यातील 'बीजे करणे' याचा अर्थ जाणे, गमन करणे हा होतो, हे निरनिराळ्या काव्यग्रंथांतील उल्लेखांवरून वर स्पष्ट केलेच आहे. डॉ० कोलते यांनी सांगितलेला 'बीजे करणे' म्हणजे 'मृत्यू स्वीकारणे' हा अर्थ तेथे मुळीच लागू पडत नाही. लीळाचरित्र, गोविंदप्रभुचरित्र, स्मृतिस्थळ– इत्यादि चरित्रग्रंथांत 'बीजे करणे' हा शब्दप्रयोग जाणे, गमन करणे या अर्थीच प्रामुख्याने वापरलेला आहे. महानुभावांच्या भाष्यग्रंथांतही बीजे करणे म्हणजे जाणे, गमन करणे याच अर्थी हा शब्दप्रयोग मुख्यत: योजलेला आढळतो. विशेषत: 'उत्तरापंथे बीजे करणे' म्हणजे 'उत्तरापंथे जाणे' हाच अर्थ महानुभाव भाष्यकारांना अभिप्रेत आहे, 'मृत्यू स्वीकारणे' हा नव्हे ! पुढील काही उदाहरणे पहा–(१) 'बाइ आता एथोन वानरेशा आचार्यत्व देवुनि उत्तरापंथे बीजें किजैल :' (प्रकरणवश, पृ० ४९, संपा०—मा० का० पंजाबी,(२) नायका आतां एथौनि उत्तरापंथें बीजें कीजैल :'(निरुक्त शेष, पृ० ४१), (३) 'एथौनि उत्तरे बीजें कीजैल': (नि० शे०, पृ० १६), (४) 'सर्वज्ञा उत्तरापंथें बीजें करावयाची प्रवृत्ति जाली': (नि० शे०, पृ० ५१), (५) महदाइसी पुसिलें: 'जी: आमतें सांडोनि सर्वज्ञ विजें करूं पांताति तरि आम्हीं काइ करूणि असावें?': (नि० शे० पृ० ५), (६) 'गोसावि तर बीजे करूनि जाति असति : तर काई करू जी'? (प्र० व०, पृ० १०४), इत्यादि.

'विचारमाळिका–महाभाष्या'त बीजे करणे म्हणजे गमन करणे असे स्पष्टीकरण मूळी महाभाष्यकारांनीच केले आहे. 'आतां नवेयां संबंधु' या चक्रधरांच्या वचनावर (वि. मा. १३९) भाष्य करताना ते म्हणतात–"आता म्हणजे गोसावी बीजें केलीया आता:...उत्तरापंथीच्याना दर्शन...आन उत्तरापंथीचीयाना दर्शन द्यावयाचे होतें : म्हणौन गोसावी बीजे केले...आता म्हणजे येयोनी बीजे केलेंया उपरी: एयोनी म्हणजे महाराष्ट्रामधुनी: बीजे केंलीया म्हणजे गोसावी गमन केलीया: उपरी म्हणजे नंतर..."

–('विचारमालिका महाभाष्य', पृ. २१९,
संपा. मा. का. पंजाबी)

वरील उदाहरणांवरून ध्यानात येईल की, 'उत्तरापंथे बीजे करणे' यातील 'बीजे करणे' याचा अर्थ जाणे (<व्रज्–to go, walk), गमन करणे, स्थानांतर करणे हाच होतो. डॉ० कोलते यांनी म्हटल्याप्रमाणे 'मृत्यू स्वीकारणे' हा होत नाही !

९. 'प्रवृत्ति म्हणजे उल्लेख'

'प्रवृत्ति' या शब्दाच्या अर्थाच्या बाबतीतही डॉ० कोलते यांनी संदर्भभ्रंशाचा असाच दोष केला आहे. प्रवृत्यंतर म्हणजे मृत्यू असा अर्थ त्यांनी केलेला आहे. पण, त्यांचा हाही अर्थ बरोबर नाही. कारण, प्रवृत्ती या शब्दाचा मूळ अर्थ अन्त:स्फूर्त इच्छा असा आहे. 'प्रवृत्ती' हे सामान्यनाम आहे. कोणतीही आन्तरिक इच्छा झाली तर 'प्रवृत्ती' झाली असे म्हणता येते. अर्थात, मृत्यूचीही प्रवृत्ति होऊ शकते.

महानुभाव भाष्यग्रंथांत 'प्रवृत्ती' याचा सुंदर अर्थ दिलेला आहे. त्यात म्हटले आहे–(१) "प्रवृत्ति म्हणजे उल्लेखु...तर उल्लेखु म्हणजे जैसा जीवासि स्वभावरूप प्रथम उल्लेखु उपजे तैसा ईश्वरीचा जागावा:" (संसरणप्रमेय) (२) "परमेश्वर प्रवृत्ती तर प्रवृत्ती म्हणावे कशाला...प्रवृत्ती म्हणजे उल्लेख : म्हणजे

उल्लेखाला प्रवृत्ती म्हणावे :" (ल०स्थ०, महाभाष्य, पृ० १६९), (३) "प्रवृत्ति म्हणिजे उलेखू " (लक्षणस्थळ, संहार, १५), (४) " प्रवृत्तिः उलेखू " (ल० स्थ०, संसरण, ३).

वरील सर्व उदाहरणांत 'प्रवृत्ति म्हणजे उल्लेख' असे भाष्यकारांनी म्हटले आहे. यावरून, प्रवृत्ति म्हणजे अन्तर्मनातून उफाळून आलेली इच्छा, हा अर्थ व्यक्त होतो.

ही प्रवृत्ति स्वतंत्रपणे निर्माण झालेली असते, व स्वतंत्रपणेच भंगतेही ! म्हणजे तिला कोणत्याही बाह्य आलंबनाची किंवा चेष्टकत्वाची गरज नसते. (१) 'प्रवृत्ति म्हणिजे स्वातंत्रीएं उपजे : भंगे...दुसरें : उपजे तेचि होए : म्हणौनि प्रवृत्तिः' (लक्षणस्थळ, संहार १), (२) 'प्रवृत्त ते स्वातंत्रियेचि उपजे आन स्वातंत्रियेचि भंगे: वांचौनि कव्हणीं उपजवीतें नाही : तथा भंगती तैसेंहि नाहीं : मग राहे ते इच्छा' (संसरणप्रमेय, ३), (३) 'स्वातंत्रीएं उपजे भंगे ते प्रवृत्तिः राहे ते इच्छा' (ल० स्थ०, संस०, २७).

वरील उदाहरणांवरून, प्रवृत्ती म्हणजे अन्तस्फूर्त इच्छा, हा अर्थ निष्पन्न होतो.*

१०. प्रवृत्ती 'बीजे करण्या'ची, मृत्युस्वीकाराची नव्हे !

आता, चक्रधरस्वामींना कोणती प्रवृत्ती झाली होती याचा विचार करू. "चक्रधरस्वामींना 'बीजें' करण्याची प्रवृत्ती आधीपासूनच झाली होती... या प्रवृत्तीनुसार त्यांनी विचार केला होता...आणि स्वतःच्या प्रवृत्तीनुसार व विचारानुसार सर्व निरवानिरव व्यवस्थित व पूर्ण करून नंतरच उत्तरापंथे प्रयाण केले" असे मी माझ्या लेखात म्हटले आहे, व यासंबंधी साधार विवेचनही केले आहे. त्याची पुनरुक्ति येथे करीत नाही.

* या अर्थाचे एक सुंदर उदाहरण पुढे देतो—

" ...नीरंतर प्रवृत्तीची वाट पाहे । क्रिया कैसी असे । ना तेथचियाचि प्रवृत्तीं सृष्टि रचिली : तेथचियाचि प्रवृत्तीं संहार केला : ते थचियाचि प्रवृत्तीं अवतारीं पुर जाली । म्हणौनि केवळें ईश्वरस्वरूपीं नीरंतर माया असे ।"
(निर्वचनप्रमेय)

पण, या माझ्या म्हणण्याकरिता काही नवीन पुरावे मात्र सादर करतो

(१) आवाइसें : उमाइसें : माहादाइसें : भटोवास : ऐसीं समवेत : गोसावियांचिया दर्शनासि नीगाली : तीयें सीहंनगरासि आली : तेथ भीलमठीं गोसावियांचे दर्शन जालें : मग सन्येधान आनुसरण खडकुलीयेसि जालें : सन्येधान चरीतार्थु होआवे होते : तवं गोसावियांसि आन्य देशा बीजें करावेयाची प्रवृत्ति जाली : तेव्हेळि भटोवासीं वीनवीलें : " जी जी : मातें कोणासि नीरोवीलें जी ": सर्वज्ञें म्हणितलें : " तुमतें श्रीप्रभुसि नीरोवीलें गा": मग गोसावी श्रीमुख सवंछरीं भद्रपद सुध आष्टमीं सोमवारीं : तददीनीं गोसावीं उत्तरापंथें बीजें केलें ।।४।।
['स्मृतीं'ची पोथी (हस्तलिखित)]

(२) "सर्वज्ञा उत्तरापंथें बीजें करावयाची प्रवृत्ति जाली: मग भटातें सर्वज्ञें म्हणितिलें: 'वानरया: आतां हें उत्तरापंथें जाईल: तुम्हासि असनिधान देईल": [निरुक्तशेष, (संपा.—य. खु. देशपांडे): पृ० ५९].

(३) एक वेळ महादाइसातें सर्वज्ञें म्हणितिलें: 'बाइ- आतां एथौनि वानरेशां आचार्यत्व देऊनि उत्तरा पंथें बीजें कीजैल' : (नि० शे०, पृ० ३७).

(४) सर्वज्ञें भणितिलें : 'एथौनि उत्तरें बीजें कीजैल': (नि० शे०, पृ० १६).

(५) एक वेळ आउसातें सर्वज्ञें म्हणितिलें : 'नायका आतां एथौनि उत्तरापंथें बीजें कीजैल' : (नि० शे०, पृ० ४१).

(६) 'देवाची प्रवृत्तीच होती : उत्तरापंथी बीजे करण्याची' [लक्षणस्थळ महाभाष्य (संपा०—मा० का० पंजाबी), पृ० ५८७]

(७) 'स्वामीला उत्तरापंथी जावयाची प्रवृत्ती...' (ल० स्थ० म० भा०, पृ० ५८९).

(८) 'वानरेया...आता हे उत्तरापंथा जाईल' (प्रकर्णवस, पृ० १८६)

(९) भटीं पुसिलें : ' जी : सर्वज्ञ असनिधान देताति : तरि असनिधानीं महात्मेनी काइ काइ वर्जावें ?" (नि० शे०, पृ० ६७).

(१०) येकवेळ साधीं पुसिलें : ' जिजी : आतां, सर्वज्ञ आम्हां असंबंध देवों पातातिं...' (नि० शे० पृ० २०६).

वरील उल्लेखांवरून हे स्पष्ट दिसते की, चक्रधरस्वामींना प्रवृत्ती झाली होती ती उत्तरापंथे बीजे करण्याची,-तेथील लोकांचा उद्धार करण्याकरिता! "आतां हे म्लेछामध्यें असैल : **उत्तरापंथें गमन** : तयाचेया वाजा : सुपवतीयां वरि नीद्रा कीजैल " असे स्वत: चक्रधरांनीच म्हटले आहे (लीच., उत्त० ५०४). ही प्रवृत्ती चक्रधरांना आधीपासूनच झाली होती. या प्रवृत्तीची कल्पनाही नागदेवाचार्य, महदाइसा, साधा-इत्यादि त्यांच्या शिष्यांना आधीपासूनच आली होती. या प्रवृत्तीनुसार विचार करून चक्रधरांनी आधीपासूनच निरवानिरव केली, नागदेवाचार्यांना असन्निधानधर्म निरूपिला, त्यांना ' आचार्यत्व 'ही दिले, आपल्या भक्तांना त्यांनी गोविंदप्रभूंकडे जाण्यास सांगितले, आणि ' बीजे करण्याची प्रवृत्ती भंगावी ' असा नागदेवाचार्यांचा आग्रह असूनसुद्धा, तो न मानता, चक्रधरांनी ' उत्तरापंथें गमन ' केले.

चक्रधरांनी वधाची प्रवृत्ती स्वीकारली असे वरील उदाहरणांतच नव्हे तर संपूर्ण महानुभाव वाङ्मयात तरी आढळते का?-आणि शिरच्छेदाची प्रवृत्ती कुणी स्वीकारू शकतो का??-आणि शिरच्छेदानंतर पुन्हा पुनरुज्जीवनाचीही ???-या घटना असंभाव्य आहेत. आंधळ्या श्रद्धेनुसार, त्या खऱ्या आहेत असे कुणाला मानायचे असेल तर त्यांनी तसे खुशाल मानावे! पण, चक्रधरांची प्रवृत्ती वधस्वीकाराची व वधानंतर पुनरुज्जीवनाची होती असे संशोधनात्मक दृष्टीने मात्र म्हणता येत नाही. कारण, महानुभाव वाङ्मयात त्याला यत्किंचितही आधार नाही. उलट, चक्रधरांची प्रवृत्ती उत्तरापंथे जाण्याची होती, आणि ती आधीपासूनच होती असे मात्र महानुभावीय चरित्रग्रंथ, काव्यग्रंथ व तत्त्वज्ञानग्रंथ एकमुखाने सांगतात. तेच खरे मानले पाहिजे.

दुसऱ्याही दृष्टीने विचार केला तर असे दिसते की, चक्रधरस्वामींना उत्तरापंथे जाण्याची प्रवृत्ती झाली होती. ती भंगण्याचे त्यांना कारणच काय होते? त्यांना स्वतंत्रपणे उपजलेली ती अन्त:स्फूर्त इच्छा होती, आणि ती मोडण्याचे सामर्थ्य दुसऱ्या कुणातही नव्हते. 'उपजे तेचि होए : म्हणौनि प्रवृत्ति' हे लक्षणस्थळकारांचे वचनही ध्यानात घ्यावे. तरी ती भंगून त्यांनी शिरच्छेदाची प्रवृत्ती स्वीकारली? आणि तीही भंगून पुन्हा पुरस्वीकाराची?? तथाकथित शिरच्छेदाच्या पूर्वीच तर चक्रधरांनी ' एथिचेनि अभिमानियें अभिमान सांडिला गा ' (उत्त० ४४६, नेने-प्रत) असे म्हटले होते. मग शिरच्छेदानंतर त्यांचा अभिमान कुणी-कोणत्या पुराभिमानिनी देवतेने धरला?-आणि ते जिवंत तरी कसे झाले?-वैचारिक दृष्टी, आणि मी माझ्या लेखात व्यक्त केलेली "एक ' वेगळी ' दृष्टी " बाजूला ठेवली तरी (कारण, या दृष्टी विचारात घ्यायला वधोत्तर-पुनरुज्जीवनवादी संशोधक तयारच नाहीत), महानुभावीय चरित्र-काव्य-भाष्य-ग्रंथांवरून असे दिसते की, चक्रधरांना उत्तरापंथे बीजे करण्याची प्रवृत्ती पूर्वीपासूनच झाली होती आणि नागदेवाचार्यांच्यासुद्धा आग्रहाला न जुमानता, आपल्या प्रवृत्तीनुसार, त्यांनी 'उत्तरापंथे बीजे केले.'

११. **'स्मृतिस्थळा'ची साक्ष**

" स्मृतिस्थळा 'त चक्रधरांच्या वधाची गंधवार्ताही मिळत नाही ' असे मी माझ्या लेखात म्हटले होते. डॉ० कोलते यांना, खूप आटापिटा करूनही, चक्रधरांचा वध झाला असे 'स्मृतिस्थळा 'वरून दाखविता आले नाही.

चक्रधरांचा मृत्यू झाला होता असे स्मृतिस्थळातील 'प्रवृत्यंतर' या शब्दावरून सिद्ध करण्याचा डॉ० कोलते यांनी प्रयत्न केला आहे. पण, तोही कसा चुकीचा आहे,-चक्रधरांच्या बाबतीत 'प्रवृत्यंतर' याचा अर्थ 'मृत्युस्वीकार' असा होत नसून उत्तरापंथे गमन करण्याच्या प्रवृत्तीचा स्वीकार हा कसा होतो-हेही मी वर दाखविलेच आहे. आणि इतकेही करून, स्मृतिस्थळातील 'प्रवृत्यंतर' या शब्दाच्या अर्थाबद्दल कुणाच्या मनात शंका राहीलच तर त्याने, मी वर [१० (१)] उद्धृत केलेला 'स्मृती'तील उतारा पहावा. "**गोसावियांसि आन्य देशा बीजें करावयाची प्रवृति** जाली...मग गोसावी श्रीमुख सवंछरीं...गोसावीं उत्तरापंथें बीजें केलें " असे त्यात स्पष्ट म्हटलेले आहे. यावरून, स्मृतिस्थळात उल्लेखिलेली चक्रधरांची प्रवृत्ती कोणती होती, व तेथील 'प्रवृत्यंतर' शब्दाचा अर्थ काय होतो, याविषयी संशयाला जागा राहत नाही. त्यामुळे, केवळ वधस्वीकाराच्याच बाबतीत नव्हे तर

मृत्युस्वीकाराच्या बाबतीतसुद्धा, स्मृतिस्थळाची साक्ष ही डॉ० कोलते यांच्या बाजूला जाऊ शकत नाही.

उलट, उत्तरापंथे गमन करण्याची प्रवृत्ती स्वीकारून चक्रधरस्वामी उत्तरापंथे गेले, उत्तरापंथे जात असताना उज्जयिनीला त्यांचे काही दिवस 'अवस्थान' होते, 'गोसावी उजनिये असति' असे वंदोजनांनी देमाइसेला सांगितले (स्मृति १३२), काही दिवसांनंतर आणखी कुणीतरी 'उजनियेहूनि आले : तेथ गोसावी राज्य करीताति यैसें तेहीं सांघितलें' (स्मृ० २३२)– असेच स्मृतिस्थळ सांगते. यावरून, चक्रधरांचा वध वा मृत्यू झाला नव्हता असेच सिद्ध होते. 'ईश्वरसदृश पुरुषागमनि म्हाइंभटांकरवि पूर्वप्रश्न करवणें' या स्मृतीतील (१९२) "गोसावियांसारीखे पुरुषु एक आले...म्हाइंभटमुख्य अवघींचि हरीखैली : आपलवले : यैसें प्रत्यया आलें : जें गोसावी होति :' या वृत्तान्तावरूनही, चक्रधर जिवंत होते, 'म्हाइंभटमुख्य अवघ्यां'-चाही चक्रधरांच्या जिवंत असण्यावर विश्वास होता, असेच दिसते.

लीळाचरित्रातही, चक्रधरस्वामी 'उत्तरापंथे बीजें' करीत असताना गंगातीरच्या चाटचांना भेटले (उत्त० ५०५, नेने–प्रत), 'तवं गंगातीरिचे चाटे उजनिएसि कापड घेउनि जाति : तीहीं गोसावीयातें म्लेसामध्यें राज्य करितां देखिलें' (लीं० ५०६) असे म्हटले आहे. 'देखिले' शब्दाच्या अर्थाबद्दल कुणाला शंका असल्यास त्याने 'असे तें दीसे' हे चक्रधरांचे उद्गार पहावे (लीचउ. २६२, नेप्र०).

चक्रधरस्वामी उत्तरापंथे जात असताना काही लोकांना दिसले /भेटले यावरून त्यांचा वध वा मृत्यू झाला नव्हता हे उघड आहे. त्यांचा वध वा मृत्यू झाला असता तर तिथेच त्यांचे जीवन संपले असते. कारण, वध वा मृत्यूनंतर मनुष्य, अगदी ईश्वरावतार असला तरी तोही,–जिवंत होऊ शकत नाही. जगाच्या इतिहासात शिरच्छेदोत्तर (किंवा वधानंतर वा मृत्यूनंतर) कुणी जिवंत झाल्याचे एकही उदाहरण नाही;–डॉ० कोलते यांनी दिलेल्या येशू ख्रिस्ताचे सुद्धा !* "माझे असे स्पष्ट मत आहे की, खऱ्या योग्यांनी ज्यास अतिमानुष व निसर्गातिक्रमण म्हणता येईल अशा सामर्थ्याची ग्वाही दिलेली नाही" असे कैवल्यधाम योगाश्रमाचे संस्थापक स्वामी कुवलयानंद यांनीही म्हटले आहे.+ आता चमत्कारावरच विश्वास ठेवायचा असला तर चिलया देखील, उखळात कांडल्यावरसुद्धा, बाहेरून दुडुदुडु धावत आला अशी अंधश्रद्धा बाळगावी लागेल, हा भाग वेगळा !

सारांश, 'स्मृतिस्थळाची साक्ष' ही डॉ० कोलते यांच्या मताच्या विरुद्ध तर जातेच; आणि उलट, चक्रधरांचा वधच काय, पण त्यांचा मृत्यूही झाला नव्हता या मताचा पाठपुरावाही करते.

'पुन:संबंध दीजैल' या बाबतीतही स्मृतिस्थळाची साक्ष डॉ० कोलते यांच्या विरुद्ध कशी जाते हे मी पुढे दाखविणारच आहे.

१२. 'नवीन' अवतार ?

चक्रधरांनी शेवटी पालखीत बसून जाताना नागदेवाचार्यांना म्हटले, "वानरेया वानरेया : राहा गा : मग आश्चर्य एक देखाल : आणि : पुन:संबंध दीजैल : भटीं ह्मणीतलें : ना जी : हें मज पाहावेना : आणि भट नीगाले :" (उत्त० ५०४, नेप्र०)

यातील 'पुन:संबंध दीजैल' याचा अर्थ करताना तर डॉ० कोलते यांनी 'महानुभाव तत्त्वज्ञान'ही गुंडाळून ठेवले आहे. ते म्हणतात– 'महानुभाव तत्त्वज्ञानाप्रमाणे ज्ञानियाला पुन:संबंध त्याच्या दुसऱ्या देहात किंवा परमेश्वराच्या नवीन अवतारात होतो... भटोबास निघून गेल्यानंतर तेथे चक्रधरांनी नवीन अवतार धारण केल्याची घटना घडली असावी. अर्थात त्यापूर्वी त्यांचा पूर्वीचा अवतार संपला असावा... चक्रधरांचा पुनरवतार झाला असावा असेच यावरून दिसून येत नाही काय ?'

*'After Jesus had been taken down from the cross, a series of incidents took place that show that he received treatment and left the sepulchre alive...'

–A. Faber-Kaiser : 'Jesus Died in Kashmir,' p. 36.

–(या पुस्तकातील 'Jesus was alive when he left the Sepulchre' हे संपूर्ण प्रकरणच जिज्ञासूंनी पाहावे).

+मुंबई नभोवाणीवर दि० २६–८–१९४० रोजी केलेल्या भाषणातून.

डॉ० कोलते यांच्या या प्रतिपादनाचा विचार करताना अनेक दृष्टींनी अनेक मुद्दे उपस्थित होतात. त्यांपैकी महानुभाव तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने उद्भवणाऱ्या काही मुद्यांचा पुढे सूत्ररूपाने उल्लेख करतो:–

(१) डॉ० कोलते यांनी चक्रधरांचा हा **नवीन** अवतार मानलेला आहे. पण, तो 'अवतार' कसा ठरेल? कारण, ईश्वर तीनच प्रकारे अवतार स्वीकारतो असे चक्रधरांनी सांगितले आहे ['परमेश्वरु त्रिविधा परि मायापुरातें स्वीकरीति,' (वि० १०४), 'गर्भ स्वीकरीति : कां पतितातें उठवीति : कां जीवातें दवडीति,'] (वि० १०५). चक्रधरांनी जर वधोत्तर अवतारस्वीकार केला असेल तर हा नवीन अवतार 'त्रिविधा 'परीपैकी कोणत्या प्रकारात बसतो? चक्रधरांनी सांगितलेल्या अवतारस्वीकाराच्या कोणत्याच प्रकारात तो बसू शकत नसल्यामुळे हा ईश्वराचा **नवीन** अवतार ठरू शकत नाही.

(२) प्रत्यक्ष अवतरणाच्या क्रियेनेही ईश्वर कुणाचे तरी भले करीत असतो. त्याने गर्भात अवतार घेतला तर मातापितरांना पुण्य लाभते, 'पतित' अवतारात ज्याचे पतित (= प्रेत) उठविले असेल त्या जीवाला गोमटे होते आणि दवडण्याच्या अवतारात ज्या जीवाला दवडले असेल त्याचे कल्याण होऊ शकते. म्हणूनच, गर्भ, पतित व दवडणे या तीनच प्रकारांनी परमेश्वर अवतार घेतो. परमेश्वर रचून अवतार कधीच घेत नाही. कारण, त्या क्रियेने कुणाचेच भले करता येत नाही. चक्रधरांनी वधोत्तर अवतार धारण केला असेल तर त्या अवतार क्रियेने स्वीकाराच्या कोण्या जीवाचे भले केले?

(३) ईश्वर अवतार धारण करतो तो, महानुभाव तत्त्वज्ञानाप्रमाणे, पूर्णपणे युक्त असलेल्या शरीरात. गर्भ व दवडणे या प्रकारांत अयुक्ततेचा प्रश्नच उद्भवत नाही. कारण, त्याचा प्रारंभ मातेच्या गर्भातच होतो. पतितावतारातही, ज्या 'पतितात' अवतार घ्यावयाचा ते पतित पूर्णपणे युक्त पाहिजे. सारांश, ईश्वर अयुक्त शरीरात कधीच अवतार घेत नाही. आणि येथे तर चक्रधरांचे शरीर छिन्नभिन्न म्हणजे 'अयुक्त' होते. छिन्नभिन्न झाल्यानंतर, विदीर्ण शरीर आपोआप युक्त होऊ शकत नाही; व चक्रधरांच्या शरीराला शिरच्छेदानंतर 'युक्त' तर कुणीच केले नाही. अशा अयुक्त शरीरात ईश्वर प्रवेश कसा करील? – व तो ईश्वराचा **नवीन** अवतार तरी कसा ठरेल.??

(४) महानुभाव तत्त्वज्ञानाप्रमाणे, ईश्वर 'मायापुरा'त अवतार स्वीकारतो. शिरच्छेदानंतर मायेने त्या अयुक्त शरीरात 'शुद्धता' कशी आणली? कोणते 'युक्त' शरीर मायेने 'घुमसून शुद्ध' केले? मायेला त्या विच्छिन्न शरीराचा 'अभिमान' कसा वाटू शकेल? चक्रधरस्वामींनीच तर "एयिचेनि अभिमानियें अभिमान सांडिला गा" असे म्हटले आहे. (उत्त० ४४६, नेप्र०)

(५) या 'नवीन' अवताराचे कार्य तरी कोणते? 'उत्तरापंथे बीजे करणे' किंवा नागदेवाचा यांना 'पुन:संबंध' देणे एवढेच? ईश्वर अवतार धारण करतो तो जीवाच्या उद्धाराकरिता! "अनंता जीवाचिया सातरिया पसरलिया असेति : तयांतें उध्ररिता काइ आणिकु देवो असे?" असे चक्रधरस्वामी म्हणतात (उत्त० ५०४, नेप्र०) आणि हे कार्य खुद्द चक्रधरस्वामीच, याच देहात, करणार होते. "आतां हे म्लेछामध्यें असैल : उत्तरापंथें गमन : तयचेया बाजा : सुपवतीयांवरि नीद्रा कीजैल" (उत्त० ५०४) असेही त्यांनी म्हटले आहे. म्हणजे हे कार्य चक्रधरस्वामी **याच** अवतारात करणार होते; व ते करण्याकरिता त्यांची प्रवृत्ती 'उत्तरापंथें गमन' करण्याची होती; वध स्वीकारण्याची नव्हती. नवीन अवतारात आम्ही हे कार्य करू असे चक्रधरस्वामींनी कुठेही सुचविलेले नाही; उलट, याच अवतारात आम्ही हे कार्य करणार आहोत असे त्यांनी म्हटले आहे. 'आतां हे म्लेछामध्यें असैल' यातील 'हे' या शब्दाकडेही वाचकांनी लक्ष्य द्यावे.

(६) शिवाय असे की, 'नवीन' अवतार आपल्या जुन्या अवतारातील भक्तांना त्यांच्या क्षेमकुशलाची वार्ता कशाला पाठवील? चक्रधरांनी तर 'हें पुसत होतें ऐसें सांघावें' असा भावपूर्ण निरोप आपल्या भक्तजनांकरिता चाटयांबरोबर पाठविला होता. (उत्त० ५०५).

अर्थात, चक्रधरांनी शिरच्छेदोत्तर **नवीन** अवतार स्वीकारला हे म्हणणे महानुभाव तत्त्वज्ञानाला धरून नाही. चक्रधरांनी सांगितलेल्या 'पंच 'कृष्णांनाही त्यामुळे बाध येतो, हे वेगळेच!

१३. 'पुनःसंबंध दीजैल'

'पुनःसंवंध दीजैल' यासंबंधी लिहिताना डॉ० कोलते म्हणतात—' भटोबास तेथे राहिले असते तर तेथेच त्यांना चक्रधरांच्या या नवीन अवताराने पुनःसंबंध दिला असता.' पण, डॉ० कोलते यांचे हे म्हणणे महानुभाव तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने चुकीचे आहे. कारण—

(१) "विकारविकल्पशून्य: स्वभावमात्रें: निरालंबी: देवतास्मरणें: जो जन्म क्षेपी: तेयासि परमेश्वरु पुनरपि अपुला संवंध देति:" (असतिपरी) असे चक्रधरस्वामींनी म्हटले आहे. याचा अर्थ असा की, विकारविकल्पशून्य होऊन व स्वभावाला 'मात्रा' (= नियंत्रण) देऊन, निरासक्त होऊन जो 'जन्म क्षेपतो' त्याला पुढील देहात परमेश्वर 'पुनःसंवंध' देतात. त्याकरिता परमेश्वर पुनःसंवंधियाला जन्माला घालतात तेही 'सुखिया श्रीमंताच्या घरी!' ('पुनःसंबंधिया पुरुषुः सुखिया श्रीमंताचां घरीं जन्मे—' (आ० मा० ८७). म्हणजे, पुनःसंबंध देताना जन्म क्षेपणाराचा पुढील देह महत्त्वाचा आहे. (कारण, त्यालाच पुनःसंवंध द्यायचा असतो). येथे नागदेवाचार्यांचा देह तर तोच होता. आणि त्यांना चक्रधरांचा 'संबंध' ही याचि देही याचि डोळा होता. तेव्हा, त्यांना चक्रधरांनी 'पुनःसंवंध' दिला असता हे कसे शक्य आहे?

(२) हा 'पुनःसंवंध'ही परमेश्वर ज्ञानियाला केव्हा देतात?—तर बारा वर्षांनंतरच! 'ज्ञानियाला पुनर्जन्मात पुनःसंवंध होतो तो १२ व्या वर्षानंतरच' (महा० तत्त्व०, पृ० ४४९). 'ज्ञानियाप्रमाणेच भक्तालाही नवीन देहात बाराव्या वर्षानंतरच परमेश्वराचा पुनःसंवंध होतो' (महा० तत्त्व०, पृ० ५२०). हा काळ, ज्ञानियाच्या किंवा भक्ताच्या योग्यतेनुसार, आणखीही लांबू शकतो. पण, कोणत्याही परिस्थितीत, १२ वर्षांच्या आधी मात्र परमेश्वर त्याला पुनःसंवंध देत नाहीत. डॉ० कोलते यांनी 'पुनःसंवंध दीजैल' याचा नागदेवाचार्यांच्या बाबतीत जो अर्थ केला आहे त्यात १२ वर्षांचा काळ कुठे आहे?

(३) पुनःसंवंधियाच्या नवीन देहाप्रमाणे, ईश्वराचाही वेगळा अवतार मानला तरी, त्या अवतारातसुद्धा, पुनःसंवंध द्यावयाला बारा वर्षांचा अवधी मध्ये जायलाच पाहिजे. आणि चक्रधरांचा (तथाकथित) वध व त्यांचे पुनरुज्जीवन यांत तर १२ वर्षांचाच काय, १२ मिनिटांचाही वेळ गेला नसेल!!

(४) चक्रधरांनी नागदेवचार्यांना असन्निधानधर्म कशाकरिता निरूपिला?—त्यांना नवीन अवतारात पुनःसंवंध देण्यासाठी नव्हे, तर 'असन्निधानी सन्निधाना'त कसे वर्तावे यासाठी! "सर्वज्ञा उत्तरापंथें बीजें करावयाची प्रवृत्ति जाली: मग भटातें सर्वज्ञें म्हणितिलें: 'वानरया: आतां हें उत्तरापंथें जाईल: तुम्हासि असनिधान देईल': " (निरुक्तशेष, पृ० ५९). हा उतारा काय सांगतो? चक्रधरांनी नागदेवाचार्यांना उद्देशून काढलेल्या "बापूडें वानरें आतां एणेंवीण एकलें असैल... हा श्रीप्रभूसि नीरोविला" (उत्त० ४९८) इत्यादि उद्गारांवरून काय व्यक्त होते?

(५) 'स्मृतिस्थळा'तील पुढील उतारा तर 'पुनःसंबंध'—प्रकरणातील चक्रधरांच्या व नागदेवाच्या संबंधावर स्पष्ट प्रकाश टाकतो. नागदेवाचार्य स्वतःच प्रत्यक्ष सांगतात—"गोसावी असतां रूपैया गोसावियांतें पुसिलें 'हांजी गोसावी बीजें करिताति तरि माघौति कितां दिसां भेटि दीजैल जी? :' तवं गोसावीं म्हणितलें : 'बाइ **आतां येणें भेटि नाहीं** : आतां तुम्हां **नवेयासि** भेटि': रूपैया म्हणितलें : 'तें कैसें जी? :' गोसावीं म्हणितलें : 'येथौनि म्हणितलें तें कराल : मग सुखीयां श्रीमंतांचां घरीं पुरुषु होऊनि जन्म वीजाल : मग **बारां वरीखां** तुम्हां **नवेन भेटि दीजैल**' : यैसें गोसावीं निर्वचीलें असे..." (स्मृ० १३२).

—यात चक्रधरांनी आपल्या भक्तांना किती स्पष्टपणे सांगितले आहे की, 'आतां येणें भेटि नाहीं :' '**नवेयासि भेटि**' याचेही स्पष्टीकरण चक्रधरांनी '**बारा वर्षांनी**' तुम्हाला नव्याने भेट देईन' असे केले आहे. नागदेवाचार्यांना चक्रधरांनी लगेच 'पुनःसंबंध' दिला असता असे यावरून यत्किंचित तरी व्यक्त होते का? '**भेटि नाही**' हे चक्रधरस्वामींना पूर्वीपासूनच ठाऊक होते. म्हणून तर त्यांनी नागदेवाचार्यांना असन्निधानधर्म निरूपिला होता, त्यांना 'आचार्यत्व' दिले होते, आणि 'शास्त्रवचनरूप परमेश्वरू' आपल्या शिष्यांच्या स्वाधीन केला होता.

(६) चक्रधरस्वामींनी नागदेवाचार्यांना पुनःसंबंध तर दिला नसताच; उलट, चक्रधरस्वामींचा संबंध (=सान्निध्य) पुन्हा येण्याची संधी आली असताना, व

शिष्यांनी त्यांना तशी विनंती केली असतानाही त्यांनी ती नाकारली ! शिष्यांच्या आग्रहाला त्यांनी उत्तर दिले, "तुम्ही जाओं म्हणा : मा : मज काइ न वचवे ? ...परि गोसावी मातें वर्जिलें : सर्वज्ञें ह्मणीतलें : 'वानरेया : नवेयासि भेटि' : ते तरि ब्रह्म वाचा :" (उत्त० ५०६)–या 'ब्रह्मवाचें'च्या विरुद्ध स्वत: चक्रधरच कसे वागतील ?

(७) नागदेवाचार्यांना 'पुन:संबंध' देण्याची आवश्यकता तरी काय होती ? कारण, चक्रधरांनी याच अवतारात त्यांना 'आपणया सामान' केले होते, आणि 'पोटी'ही धरिले होते (लीच० उत्त० ४८९, नेप्र०). 'भक्तासि आपणपें समोर देति'(उद्ध० ६०). चक्रधरांनी नागदेवाचार्यांना तर 'आपणपें' दिले होते. मग त्यांना 'पुन:संबंध' देण्याची आवश्यकता तरी कोणती होती ?

–वरील विवेचनावरून ध्यानात येईल की, 'पुन:संबंधा'च्या बाबतीत डॉ० कोलते यांनी चक्रधर व नागदेवाचार्य यांच्याविषयी जे लिहिले आहे, व त्याकरिता चक्रधरांच्या वधाचे जे अनुमान काढले आहे, ते दिशाभुलीचे व चुकीचे आहे.

१४. समाजेतिहासात्मक दृष्टी

"श्रीचक्रधरस्वामी हे समाजातील एक प्रमुख आणि प्रभावी व्यक्तिमत्व होते...एवढ्या मोठ्या समाजपुरुषाचा जर वध झाला असता तर तत्कालीन समाजात त्याचे काहीच पडसाद उमटले नसते का ? आणि हे पडसाद तत्कालीन वाङ्मयात, तसेच महाराष्ट्राच्या समाजेतिहासात ध्वनित झाले नसते का ? पण, तसे ते झालेले दिसत नाहीत, एवढे मात्र खरे" असे मी माझ्या लेखात म्हटले आहे. यावर डॉ० कोलते लिहितात– "त्यावेळचे प्रमुख धार्मिक संप्रदाय दोन. एक महानुभाव संप्रदाय व दुसरा वारकरी संप्रदाय...पण त्यांच्या वाङ्मयात आपल्या संप्रदायाव्यतिरिक्त दुसऱ्या संप्रदायातील संतामहंतांचा, त्यांच्या जीवनाचा व साहित्याचा उल्लेख तरी आढळतो काय ?"

मला या बाबतीत एवढेच म्हणायचे आहे की, हा प्रश्न विचारण्याच्या आधी डॉ० कोलते यांनी 'मराठी संत आणि महानुभाव पंथ' हा स्वत:चाच लेख पहायला हवा होता; अजूनही पहावा ('डॉ० शं० दा० पेंडसे गौरव–ग्रंथ', १९६३). एकनाथ, त्र्यंबकराज, तुकाराम इत्यादि वारकरी संतांनी महानुभाव पंथासंबंधी काय काय उद्गार काढले आहेत हे त्यांनी या लेखात दिले आहे.

महानुभाव वाङ्मयातही, वारकरी संतांबद्दल उल्लेख आढळत नाहीत असे नाही. 'ज्ञानदेवां झोटींग प्रसन्न'ही लीळा 'अज्ञातचरित्रां'त आहे (कोलते–संपादित लीळाचरित्र, पृ० ७७५)लीळाचरित्राच्या काही प्रतींतही ती शिरली असे दिसते–'वेलापूरचरित्रा'तल्या काही लीळा लीळाचरित्रात शिरल्या त्याप्रमाणे ! 'स्मृतिस्थळा'त 'नामदेव शिंप्या'चा उल्लेख आहे (स्मृ० २४४). 'वीठलबीरु कथन' या लीळाचरित्रातील लीळेंतही (उत्त० ४२३, नेप्र०)संत नामदेव यांना संदर्भ आहे असे डॉ० तुळपुळे यांनी म्हटले आहे (ली० च०, उत्त०, भा२, पृ० १५७). या लीळेवरून संत ज्ञानदेवांचाही संदर्भ सूचित होतो असे काही संशोधकांचे म्हणणे आहे. मेघचंद्रकृत 'यक्षदेव वृद्धान्वय', यक्षदेव-आम्नायाची आरती, व 'भीष्माचार्यांचा भरड'(भा० इ० सं० मंडळ त्रैमासिक, वर्ष १२, अंक २) हे तर या बाबतीत प्रसिद्धच आहेत !

तेव्हा, डॉ० कोलते यांचा युक्तिवाद निराधार व चुकीचा आहे, असे म्हणण्याशिवाय गत्यंतर नाही !

माझे तर म्हणणे आहे की, चक्रधरांसारखा एवढा मोठा समाजपुरुष मारेकऱ्यांच्या शस्त्राला बळी पडला असता व त्याचे शिरच्छेदोत्तर पुनरुज्जीवन झाले असते तर त्याचे ध्वनी–प्रतिध्वनी प्राचीन वाङ्मयात व महाराष्ट्राच्या समाजेतिहासात कुठेतरी उमटलेले दिसले असते. तसे ते दिसत नाहीत, एवढे मात्र खरे !

१५. न्यायंबासाचे 'हेतुस्थळ'

न्यायंबासाच्या 'हेतुस्थळा'चे उदाहरण डॉ० कोलते यांनी दिले आहे. पण, ते चक्रधरांच्या 'वधा'ला कसे काय लागू पडते, हे कळत नाही. कारण, डॉ० कोलते यांनी उद्धृत केल्याप्रमाणे, त्यात "गोसावीं विषस्तंभनी श्रीमूर्तीचां ठाइं विकळात्व त्वरेनि उणीवत्व स्वीकरीलें : तरि समाधी तेधवांचि कां नांगीकरावी ?" एवढेच म्हटले आहे. याचा अर्थ, 'वीखशक्तिस्वीकारू' या लीळेच्या वेळीच (ली० च० पू० २०, पृ० ३५, नेने–प्रत) चक्रधरांनी 'समाधी' कां स्वीकारली नाही, एवढाच होतो. त्यानंतर केव्हातरी त्यांनी मृत्यू स्वीकारला असाही अर्थ पर्यायाने करता

येईल. पण, त्याचा शिरच्छेदाशी (व पुनरुज्जीवनाशी) काय संबंध ?– कोणताही मनुष्य, – मनुष्यवेषधारी ईश्वरसुद्धा, – कधीतरी मृत्यू 'स्वीकारी'तच असतो.

१६. 'बेलापूरचरित्रा'विषयीची दिशाभूल 'अन्वयी'

'बेलापूरचरित्रा' विषयी डॉ० कोलते यांनी जी 'अन्वयी' लावली आहे तीही तपासून पाहिली पाहिजे. "शके १३०० या सुमारास हरिवासांनी 'बेलोपुर चरित्रें' निवडून अन्वयी लावली, असे म्हणावयास हरकत नाही" असे डॉ० कोलते म्हणतात. पण, आपले म्हणणे सिद्ध करण्याकरिता त्यांनी पारिमांडल्य आम्नायाच्या अन्वयस्थळातील जे अवतरण दिले आहे ते एक तर मोडतोड करून स्वमन्तव्यानुकूल अशा स्वरूपात दिले आहे, आणि त्या अवतरणाचा जो अर्थ केला आहे तो मुळाच्या दृष्टीने चुकीचा आहे. पारिमांडल्य आम्नायाच्या अन्वयस्थळातील मूळ वाक्ये पुढीलप्रमाणे आहेत– "आणो बासांची वानाइसें : त्याचें हरी बास : तेहीं वेलोपुरीचीं चरीत्रें नीवडुनि सिधांत पाठाचें नीरुपण :।। सीधांत साखळी :।: मांडणी : मुलसंचरण : अन्वयीं लावीलें : ते पारिमांडल्यआम्नायीं प्रवर्तलें :" [ह०ना० नेने : 'महानुभावी सारस्वत' (भा. इ. संशोधक मंडळ, स्वीयग्रंथमाला क्र. ४४/पृ० ४) 'संशोधनलेखसंग्रह', भाग पहिला, पृ० १४५].

या वाक्यांचा अर्थ 'हरीवासांनी वेलोपुरीची चरित्रे निवडून अन्वयी लाविले' असा होतो,– की 'हरीवासांनी वेलोपुरीची चरित्रे निवडून सिद्धांतपाठाचे निरूपण, सिद्धांतसाखळी, मांडणी, मूलसंचरण हे अन्वयी लावले' असा होतो, याचा विचार वाचकांनीच करावा. यातील पहिला अर्थ डॉ० कोलते यांनी केला आहे. पण, तसा तो होत नसून दुसरा अर्थ होतो असे मला वाटते. कारण, हरीवासांनी वेलोपुरीची चरित्रे निवडून त्यांची अन्वयी लावली असे या अवतरणात म्हटलेले नाही, तर वेलोपुरीची चरित्रे निवडून सिद्धांतपाठाचे निरूपण, सिद्धांतसाखळी, मांडणी, मूलसंचरण यांची अन्वयी लावली असे यात सांगितलेले आहे.

'सिद्धांतपाठ' व 'सिद्धांतसाखळी' या प्रकरणांचा उल्लेख महानुभाव वाङ्मयातही आढळतो–

(१) "सिद्धांतसाखळी : ते तवं आचार्यकृत : तया : सिद्धांतपाठ तोहीं आचारकृत" ('बत्तीस लक्षणाची टीप', संपा. ह. ना. नेने, पृ० ७७)

(२) "सिद्धांतपाठीं : तया : सांखळीसि परमेश्वर ऐसें नांव नाहीं" (पृ० ९७)

(३) "सिद्धांत साखळीसि : परकैवल्यातें निःशब्द ब्रह्म ऐसें भणीजे : ऐसें बोलिलें असें" (पृ०९८)

(४) "सिद्धांतपाठीचा भाव न कळतां : देवतास्वरूपस्थानमांडणी कल्पूनि बोलिली असे" (पृ० ९९)

(५) "या सिद्धांतपाठाची सिद्धांतसांखळी बोलिली असे", (पृ० ९९)

(६) "ऐसीचि निर्देशवचनें सिद्धांतसांखळीसि असत" (पृ० १२९)

हे, व असे इतरही उल्लेख 'बत्तीस लक्षणाच्या टीपे'त आहेत.

'मूलसंचरण' या नावाच्या ग्रंथाचाही उल्लेख मुरारीमल्लांच्या 'वृद्धाचारा'त आढळतो. ['महानुभाव' (मासिक) ऑक्टो.–डिसेंबर १९८१, पृ० ४०].

यावरूनही, हरीवासांनी वेलोपुरीची चरित्रे निवडून सिद्धांतपाठनिरूपण, सिद्धांतसाखळी, मांडणी, मूलसंचरण ही प्रकरणे अन्वयी लावली असे दिसते; 'बेलापूरचरित्रा'ची अन्वयी लावली असे दिसत नाही.

शिवाय असे की, 'बेलापूरचरित्र' हा लीळाचरित्राचाच भाग आहे असे डॉ० कोलते म्हणतात. त्यांनी लीळाचरित्राच्या संपादनासाठी घेतलेल्या शके १४७६ मधील उत्तरार्ध–चरित्राच्या पोथीच्या शेवटी "वेलोपुर चरीत्रें : उत्तरार्ध चरीत्रें सम्राप्त :" असा उल्लेख आहे (पृ. ७३२). 'गो' प्रतीच्याही शेवटी "इती बेलोपूर संपूर्णमीती ।। यवं लीळा उत्तरार्ध चरीत्रे संपूर्ण भवति" अशी नोंद आहे (प्रस्ता०, पृ० ८१). पण, यांपैकी एकाही प्रतीत चक्रधरांच्या वधाची लीळा नाही. याचा अर्थ असा की, बेलापूरचरित्रातही ही लीळा नंतरच्या काळात अंतर्भूत करण्यात आली आहे. अर्थात, ती प्रक्षिप्त आहे. म्हणजे एक तर बेलापूरचरित्र हे आधीच उत्तरकाळातले, त्यातही मूळ बेलापूरचरित्रात ही लीळा नाही, तीही उत्तरकाळात प्रक्षिप्त करण्यात आलेली! –तेव्हा उत्तरकालीन बेलापूरचरित्रातली, –तीही सर्व प्रतींत नसलेली म्हणजे प्रक्षिप्त असलेली, –चक्रधरवधाची लीळा मूळ लीळाचरित्रातली म्हणून प्रमाण मानता येत नाही, हे उघड आहे.

बेलापूरचरित्राच्या मूळ लीळा किती व कोणत्या हाही एक वेगळा प्रश्न आहे. बेलापूरचरित्राच्या ७० लीळा असलेल्या पोथ्या आढतात, आणि २४४, २४५ लीळा असलेल्याही पोथ्या आढळतात. मुरारीमल्ल विद्वांस यांच्या 'अन्वयस्थळाच्या परी'त "तैसेचि वेलोपूरीची लीळा शोधुनी प्रमानाचे : २९ मांडलिया असति।" असे म्हटले आहे ('महानुभाव,' ऑक्टो.–डिसें. १९८१, पृ० ६१). तेव्हा प्रश्न असा उपस्थित होतो की, बेलापूरचरित्राच्या मूळ लीळा किती? २९, ७०, २४४ की २४५? –२४४, २४५ लीळांच्या बेलापूरचरित्रात चक्रधरवधाची लीळा आढळते. तिच्यातूनच, तिच्या नंतरच्या काळात लिहिण्यात आलेल्या लीळाचरित्राच्या काही तुरळक प्रतीत, ही लीळा शिरली असावी.

१७. 'शेवटचे प्रकरण'?

[अ] (१) चक्रधरांच्या वधप्रसंगाला उद्देशून डॉ० कोलते यांनी "शेवटचे प्रकरण" हा शब्दप्रयोग वारंवार वापरला आहे. त्यांनी आपल्या 'चक्रधरचरित्रा'त 'शेवटचे प्रकरण' या नावाचे एक स्वतंत्र प्रकरण लिहिले आहे, आणि अलीकडे प्रसिद्ध आलेल्या आपल्या एका पुस्तकालाही त्यांनी "श्रीचक्रधर : शेवटचे प्रकरण" असे नाव दिले आहे. यावरून, हा शब्दप्रयोग त्यांच्या फार आवडीचा आहे असे दिसते. त्यामुळेच की काय, मी माझ्या लेखात 'शेवटचे प्रकरण' हा शब्दप्रयोग एकदाही योजलेला नसतानासुद्धा डॉ० कोलते म्हणतात–'शेवटचे प्रकरण' हे शब्द म० मुरलीधर जयत्कर्ण यांनी कोणत्या अर्थाने व का वापरले आहेत हे त्यांना डॉ० डोळके यांनी विचारावे." 'शेवटच्या प्रकरणा'च्या बाबतीत डॉ० कोलते यांनी माझा व म० मुरलीधर जयत्कर्ण यांचा संबंध कां जोडला हे कळत नाही. पण, त्यांनी तो जोडलाच आहे तर आता मी डॉ० कोलते यांनाच विचारतो की, 'शेवटचे प्रकरण' हा शब्दप्रयोग अस्तित्वात कधी आला? आणि या शब्दप्रयोगाचा अर्थ काय??–

'बत्तीस लक्षणाच्या टीपेनुसार श्रुति' स्मृति व वृद्धाचार हीं तीन; आणि हरीबास व सोंगोवास, तसेच कृष्णमुनी, यांच्या अवयस्थळांनुसार श्रुति, स्मृति, वृद्धाचार व मार्गरूढी हीं चार–अशी जी महानुभावांची तीन किंवा चार 'प्रमाणे' आहेत त्यांच्यात 'शेवटचे प्रकरण' हा शब्दप्रयोग कुठेच आलेला नाही. श्रुति–स्मृति–वृद्धाचार–मार्गरूढी या चार प्रमाणांव्यतिरिक्त इतर प्रमाणे 'प्रमाण' मानू नयेत असे मत हरीबास व सोंगोवास यांनी, आणि कृष्णमुनीनेही, आपआपल्या अन्वयस्थळात व्यक्त केले आहे. पारमांडल्य आम्नायाच्या एका अन्वयस्थळातही "श्रुति : स्मृति : वृद्धाचार : मार्गरूढी...या चौमध्यें सामावें तें प्रमाण : अशेष मार्गासि। "या वेगळें तें ग्राह्य नाहीं :।" असे स्पष्ट म्हटले आहे.* या चारही 'प्रमा नणां'त चक्रधरांच्या वधाचा वा 'शेवटचें प्रकरण' या शब्दप्रयोगाचा उल्लेख नाही.

हरिवास व सोंगोवास यांच्या अन्वयस्थळातील 'ॐकारवास : धारासिव : अचळमुरारीवास : सिद्धान्ते हारीवास गुर्जरसिवव्रासापर्यंत मार्गरूढ'या उल्लेखावरून† किंवा कृष्णमुनीच्या अन्वयस्थळातील 'आचळ मुरारी : धारासीवकर : सीधांत सुंदर : हारीराज (२७) सीवाख्या गुर्जर : मुख्ये मार्ग फार : चोधाची सुंदर: मार्गरूढी:' (२८) या व्याख्येवरून,‡ मार्गरूढीची मर्यादा गुजरशिववासापर्यंत येऊन पोचते.

वरील चार प्रमाणांप्रमाणेच चक्रधरांचे 'शास्त्र' किंवा त्यांच्या शास्त्राचा 'अर्थ अर्थादिक' या बाबतीत महानुभावपंथात 'लक्षणस्थळ', 'आचारस्थळ' व 'विचारस्थळ' हे ग्रंथ प्रमाण मानण्यात येतात. या तिन्ही स्थळांची बांधणी गुर्जरशिवव्यासांनी, सिद्धांते हरीबास यांच्या सहकार्याने, 'पाथरी' या गावी केली. हे कार्य करताना गुर्जरशिवव्यास आणि सिद्धांते हरीबास यांनी, पूर्वीच्या निरनिराळ्या बावीस आचार्यांनी सूत्रपाठातील सूत्रांचे जे अर्थ लावले होते, व निरनिराळ्या रीतींनी जे तात्त्विक विवेचन केले होते ते ध्यानात घेऊन, आणि त्यात स्वतःच्या अर्थाची व विवेनाची भर घालून, तिन्ही स्थळांचा संबंध लावला.

* ह० ना० नेने : 'श्रीपारमांडल्य आम्नायाचें एक अन्वयस्थळ', भा० इ० सं० मंडळ–त्रैमासिक, वर्ष ५१, अंक १–४ (इ० स० १९७२), पृ० १.

† वि० भि० कोलते : हरिबास व सोंगोबास यांचे अन्वयस्थळ', म० सा० पत्रिका, अंक १०६, पृ० २६:

‡ ह० ना० नेने : 'कृष्णमुनीचें अन्वयस्थळ', भा० इ० सं० मंडळ, त्रैमासिक, वर्ष २०, अंक २, पृ० ६३.

" पाथारीए ग्रामीं : उभयेता दोन्ही : सीउबास आणी : हरीराज : उभये संवादें : सोधुनी नीवंध : लावीला संबंध : तीही स्थळा : " असे कृष्णमुनीच्या अन्वय-स्थळात (२५३, २५४), आणि "ऐसा चौवीसा पक्षी : तिन्ही स्थळाचा बंध: सिद्धान्ते हारीब्रासां आन गुजर सीवब्रासा मिळौनि पाथरीसी केला : " असे हरिबास व सोंगोबास यांच्या अन्वयस्थळात म्हटले आहे. चक्रधरांच्या वचनांचा महानुभावीय अर्थ जाणून घेण्याच्या दृष्टीने हे स्थळग्रंथ अत्यंत महत्त्वाचे आहेत;—आणि त्याबरोबरच, चक्रधरांच्या तत्त्वज्ञानाच्या बाबतीत प्रमाणभूतही ! इतकेच नव्हे तर, 'यावेगळे शास्त्र : अर्थ अर्थादिक : नव्हे प्रमाणीक : अवीहीत :' (२९३) असा दंडकही कृष्णमुनीने घालून दिलेला आहे.

तत्त्वज्ञानाच्या बाबतीत महानुभाव पंथात शेखरीभूत प्रामाण्य असलेल्या या ग्रंथांत तरी 'शेवटचे प्रकरण' हा शब्दप्रयोग आलेला आहे का? म्हणजे गुजर शिवबासांच्या काळापर्यंत तरी 'शेवटचे प्रकरण' घडल्याचा पुरावा मिळतो का? सूत्रपाठातील 'देवो तो अछेद्यो : अभेद्यो' (विचार, २२७) या वचनाचे स्पष्टीकरण करताना विचारस्थळ "हातु तोडीलेयां छेदु जाला : वीख सर्पूं : तरि : भेदु : सीसें दोन्हीं जालीं अव्यक्ताअभीप्राएं : तरि : जीव : देवता : असति : नां मुर्ती तरि दीसत असे : तेही स्वाकारीलेयावांचौनि नांहीं : सृष्टांतरीं मुर्ती न नसे : परि नासीतांहीं :" एवढेच म्हणते. विचारस्थळातील या उताऱ्यात 'शेवटचे प्रकरण' हा शब्दप्रयोग नाही. चक्रधरांच्या वधाची सूचनाही नाही. लक्षणस्थळ व आचारस्थळ यांच्यातही हा शब्दप्रयोग कुठेच नाही. म्हणजे, महानुभावांचे तत्त्वज्ञानात्मक प्रमाणग्रंथ जे आहेत त्यांतही, निदान 'स्थळ'ग्रंथांच्या काळापर्यंत तरी, 'शेवटचे प्रकरण' हा शब्दप्रयोग कुठेही आलेला नाही.

श्रुति—स्मृति—वृद्धाचार—मार्गरूढी या 'प्रमाणां'-तील मार्गरूढीची मर्यादा गुजरशिवबासापर्यंत येऊन पोचते हे वर सांगितलेच आहे. आणि योगायोग असा की, तत्त्वज्ञानाच्या बाबतीत महानुभावपंथात 'प्रमाण' असलेले स्थळग्रंथही गुजरशिवबासांनीच, सिद्धांते हरीबास यांच्या साह्याने, निर्माण केले. म्हणजे महानुभाव पंथातील चरित्रात्मक काय किंवा तत्त्वचर्चात्मक काय, 'प्रमाण 'ग्रंथांच्या बाबतीत गुजरशिवबास हे दीपस्तंभासारख मार्गदर्शक ठरतात.

गुजरशिवबासांचा काळ कोणता?—गुजरशिवबासांच्या काळासंबंधी निश्चित उल्लेख आढळत नाही. तरी, गुरुपरंपरेच्या आधारे, स्थूलमानाने, त्यांचा (व 'तिन्ही स्थळां'चा) कालनिर्णय करता येतो. मुरारीमल्लबासांच्या 'अन्वयस्थळाच्या परी'त जे उल्लेख आहेत त्यांवरून पुढीलप्रमाणे शिष्यपरंपरा निष्पन्न होते :- भटोबास (नागदेवाचार्य > कवीश्वरबास > परसरामबास > हरिबास (पेठे हरिव्यास) > अचळमुरारिव्यास > सिउब्रास (गुर्जरशिवव्यास). 'कपाटे नागराज कुळातील दिवाकर शाखेच्या अल्पवृद्धाचारा 'तही हीच शिष्यपरंपरा दिलेली आहे ('महानुभाव' ऑक्टो.—डिसें. १९८१, पृ० (दुसरे) ५१.) पिढीच्या गणनेनुसार (प्रत्येक पिढीचा काळ २० वर्षांचा धरला तर), वरील परंपरेनुसार, गुजरशिवब्रासांचा काळ नागदेवाचार्यानंतर ८० वर्षांनी येतो. नागदेवाचार्यांचा निधनशक संशोधकांनी शके १२३४ हा ठरविला आहे. त्यानंतर ८० वर्षांपासून गुजरशिवबासांचा काळ सुरू होतो. म्हणजे शके १३१४ ते १३३४ हा गुजरशिवब्रासांचा काळ ठरतो. आणि हाच काळ मार्गरूढीचाही ठरतो. या काळात केव्हातरी गुजरशिवब्रासांनी 'तिन्ही स्थळां'ची (सिद्धांते हरिवास यांच्या सहकार्याने) रचना केली. आणि तिन्ही स्थळांत तर 'शेवटच्या प्रकरणा'चा उल्लेख नाही. अर्थात, तोपर्यंत म्हणजे शालिवाहनाच्या चौदाव्या शतकाच्या मध्यापर्यंत चक्रधरांच्या वधाची लीळा, किंवा 'शेवटचे प्रकरण' हा शब्दप्रयोग अस्तित्वात आला नव्हता.

(२) हा 'राजभद्र' कोणता ?

मग, 'शेवटचे प्रकरण' हा शब्दप्रयोग निर्माण कधी झाला?—डॉ० कोलते यांनी आपल्या लेखात एका ठिकाणी म्हटले आहे, "ना मूर्ती तरि दिसत असे: तेही स्वीकारीलेयावांचौनि नाहीं' या पक्षाचे स्पष्टीकरण करताना विचारबंद (राजभद्र) कर्ते लिहितात : 'ना मूर्ती म्हणजे व्यक्ती : तरि दिसत असे : एवं छेदभेद : तो कैसा ? ना ब्रह्मज्ञानाचिया फोडी : तथा **सेवटील प्रकरण**". याचा अर्थ, डॉ० कोलते यांनी 'राजभद्र' या विचारमहाभाष्यातून हे अवतरण दिले आहे असा होतो.

पण, मी 'राजभद्र' या बंदाच्या दोन प्रती पाहिल्या. एका पोथीच्या समाप्तिलेखात कालोल्लेखा-

नंतर "...प्रहर चौयैयामध्य राजभद्र बंद समाप्ति" असा,व दुसऱ्या पोथीच्या समाप्तिलेखात कालोल्लेखानंतर "...आखाड शुद्ध सप्तमीसी : शुक्रवार ते दिवसीं प्रथम प्रहरीं राजभद्रासी : मूळ लाविले पैं" ॥२॥ असा स्पष्ट उल्लेख आहे. पण, या दोनही प्रतींत, 'ना मूर्ती ...नाही' या पक्षाच्या स्पष्टीकरणात, डॉ० कोलते यांनी उद्धृत केलेले उपरोक्त अवतरण मला कुठेच आढळले नाही. त्यांत 'सेवटील प्रकरण' हा शब्दप्रयोग तर नाहीच, पण 'ब्रह्मसानाचिया फोडी' हाही उल्लेख नाही. उलट, "अमरवोळीचा गोरक्ष[1]: तयाचीया देहातुनि पाणियाचीया परी शस्त्र नीगोनि जाए : मां : इश्वरी आछेद्येआभेद्ये ते[2] काइ म्हणावे असे : एवं इश्वरीचीए मूर्तीसि छेदभेद प्रभवति[3] ना:" असा मात्र उल्लेख त्यात आहे. मग, डॉ० कोलते यांनी उल्लेखिलेला 'राजभद्र' कोणता ? आणि "ब्रह्मसानाचिया फोडी : तथा सेवटील प्रकरण" हा उल्लेख 'राजाभद्रा'त आहे असे ते म्हणतात, हे कसे ?

(३) उपाध्ये–आम्नायाचा विचारबंद

आपल्या लेखात एका ठिकाणी हेच अवतरण डॉ० कोलते यांनी 'विचारबंदा'तून उद्धृत केले आहे. हा विचारबंद कोणता ?–उपाध्येशाखेच्या विचारबंदात हा उल्लेख नाही. "ना मुर्ती तरि दीसत असेः तेही स्वीकरल्यावांचौन नाही:', या पक्षाचे सविस्तर स्पष्टीकरण उपाध्ये–आम्नायाच्याही विचारबंदात केलेले आहे. पण, "ना...ब्रह्मसानाचिया फोडी : तथा सेवटील प्रकरण" हा उल्लेख याही विचारबंदात मला आढळला नाही.*

(४) वाइंदेशकरांच्या 'विचारबंदा'तील उल्लेख

वाइंदेशकरांच्या 'विचारबंदांत मात्र हा उल्लेख आहे. "ना मुर्ती म्हणिजे व्यक्ती : तरि दीसत असे : म्हणिजे छेदभेद तो कैसा : ना ब्रह्मसानाची फोडी : तथा सेवटील प्रकर्ण : ऐसे दीसत असे :" असे त्यात स्पष्ट म्हटलेले आहे. त्याचा आता विचार करू :

सुरुवातीलाच प्रश्न उपस्थित होतो तो असा की, वाइंदेशकरांच्या विचारबंदाचा काळ कोणता ?

'पाठभेद–१ गोरक्षी. २ आछेद्येआभेद्येत्वे. ३ प्रवर्तति.'

* हे विचारमहाभाष्य श्री. मा. का. पंजाबी यांच्या कृपेने मला पाहावयाला मिळाले.

मी पाहिलेल्या "एवं वीचारबंद वीराटसंवज्ञीकाचा जानावा" असा अन्त्योल्लेख असलेल्या पोथीच्या समाप्तीत पुढील ३ श्लोक आहेत :–

ईशाधीष्टीत योगीय परीकरे श्रीनागदेवे वरें ।
वोलोनी मग आक्षरे शुभतरे प्रेमांमृते सुंदरे ॥
पाठार्थी वरवे[1] पयी नीगदली श्रीपंडीतें भास्करे ।
केसींद्रादी[2] लक्षनोक्त बरवी चोवीस पक्षांतरे ॥१॥
याचा आन्वय लावीला हारीहारे शीद्धांत वीजाक्षरें
लेहीले मुनी सीवराजकुमरे आदृष्ट हेतु वरे ॥
न्यायाख्या[3] मुनी योगिय परीकरे परीक्षा नीकी पाहीली
देउनी मग आज्ञेया सुभतरा टीका नीकी मांडीली ॥२॥
त्या मुख्या उपयोगकारकपरा सीद्धांत[4]हीतार्थता
मार्गी[5] ख्यात महाजगी पसरली जो स्वामीयानीर्मीता ॥
तो श्रीवर्धन संत शांतणपथी जाला तदा वोलता
जैसा आंबरी मेघ जो वर्पता भुगोळ संतृप्तता ॥३॥

'वीराटदेशोपनामालंकृत...' लेखकाने लिहिलेली विचारबंदाची आणखी एक पोथी मी पाहिली–॥ "शाके ॥१६८५॥ बाणवसोरसेंदुगणीते सुभानसंवत्सरे : मासे आस्वीन वद्यपक्षे दसमि दीनेचि : भृगवासरे : तद्दीने स्छळ पुर्न लेखण तदा: वीचारनाम्नास्तथा..."

असा समातिप्लेख असलेल्या या पोथीत वरील ३ श्लोकांबरोबरच आणखी ३ श्लोक (असे एकूण ६) श्लोक लिहिलेले आहेत. ते असे :–

त्याचे मंत्रजपुत्र चाल्हणमुनी शास्त्रार्थ संबुधुनी ।
केला ज्ञानप्रकास पुर्ण सकळा जो वंद्ये वीस्वाजनी ॥
त्याचे सन्निध युक्त पैं करुनिया श्रीविश्वनाथू मुनी ।
ज्ञानाची परिपूर्णता करुनिया पव्हेचि केली जनी ॥४॥

त्याची सन्नीध ते पवीत्र करूनी ज्ञानेंत्रीये भुसनी ।
तो श्रीवर्धन प्रीय नाम वदता अच्चार्य सीरोमनी ॥
त्याचा पुत्रज पाळकु ईती भला द्वापारनामांकीता ।
मार्गी ख्याती माहाजगी पसरली संपूर्ण सत्पात्रता ॥५॥

त्याचा हा उपयोग मानसी सदा ध्यानी दुजा चींतनी ।
ते अज्ञा सीरी माणुनी मग तदा वंधार्थ संबुधुनी ॥
वीराटाभिद सागता अर तदा दैत्यारी पैं लेखनी ।
ऐसा सार वीच्यार शास्त्र नीकरा श्रुतार्थ पैं मांडुनी ॥६॥

पाठभेद–१ बरवी. २ केसींद्रादिक. ३. न्यायाख्ये. ४. सीधांत. ५. मार्गी ख्याती जगी महा पसरली.

वरीलपैकी ३, ४, ५ व ६ या श्लोकांवरून असे दिसते की, श्रीवर्धन संतराज यांचे 'मंत्रज-पुत्र' (मंत्र-शिष्य) चाल्हणमुनी नावाचे होते. चाल्हणमुनींचे शिष्य श्रीविश्वनाथ मुनी (वर्धनस्थ विश्वनाथ वास), विश्वनाथांचे शिष्य आचार्य-शिरोमणी श्रीवर्धन, व त्यांचे शिष्य श्रीकृष्ण ('द्वारारनामांकिता') हे होते. त्यांचे शिष्य मुरारी ('दैत्यारी') यांनी 'वंधार्थ संबुधुनी लेखनी मांडिला.'

म्हणजे संतराज > चाल्हण > विश्वनाथ > श्रीवर्धन > श्रीकृष्ण (किंवा कृष्णराज) > मुरारी अशी शिष्यपरंपरा येते. यांपैकी "विश्वनाथव्यास (वर्धनस्थ) बीडकर यांनी 'ध्यानामृतस्तोत्र' हे शके १५६३ मध्ये हिवरळी या नगरात पूर्ण केले" असे डॉ. य० खु० देशपांडे यांनी म्हटले आहे (म० म० वा०, आ० २ री, पृ० ५९). प्रत्येक पिढीचा काळ २० वर्षांचा मानला तर, वरील शिष्यपरंपरेनुसार, विश्वनाथबासानंतर ६० वर्षांनी, म्हणजे शके १६२३ च्या सुमारास विराट मुरारींनी (किंवा मुरारीमल्ल वाईदेशकर यांनी) हा विचारवंद लिहिला, असे निष्पन्न होते.

(५) 'शेवटचे प्रकरण' हा शब्दप्रयोग शके १६०० नंतरचा !

अर्थात, 'शेवटले प्रकरण' हा शब्दप्रयोग शके १६०० मधील दुसऱ्या दशकानंतरचा, म्हणजे चक्रधरांच्या उत्तरापंथे प्रयाणानंतर सुमारे ४००-४२५ वर्षांनी निर्माण झालेला आहे. तत्पूर्वी हा शब्दप्रयोग महानुभावीय ग्रंथात आढळत नाही. "शालिवाहनाच्या चौदाव्या शतकाच्या उत्तरार्धात किंवा त्यानंतर चक्रधरांच्या वधाची वार्ता निर्माण झाली आणि ती लीळा-स्वरूपात लीळाचरित्राच्या काही पोथ्यात शिरली..." असे मी माझ्या लेखात म्हटले आहे. आता तर मला असे म्हणावेसे वाटते की, चक्रधरांच्या वधाची लीळा ही चौदाव्या शतकाच्या उत्तरार्धात नव्हे, तर पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धात निर्माण झाली, आणि ती, त्यानंतर लिहिण्यात आलेल्या लीळाचरित्र-उत्तरार्धाच्या काही प्रतींत शिरली. अर्थात, मूळ लीळाचरित्राच्या दृष्टीने ती प्रक्षिप्त आहे, हे वेगळे सांगायला नकोच ! डॉ० कोलते यांच्या समाधानाकरिता असे म्हणता येईल की, वंदग्रंथ लिहिणाऱ्या तत्त्वविवेचक महानुभावांनी, अशाच एखाद्या चरित्र - पोथीच्या आधारे "शेवटील प्रकर्ण" हा उल्लेख,- डॉ० कोलते यांना अभिप्रेत असलेला या शब्दप्रयोगाचा अर्थ खरोखरीच होत असेल तर- त्या अर्थाने केला असावा !

[आ] (१) 'शेवटचे प्रकरण' या शब्दप्रयोगाचा अर्थ

दुसरा पण मूळ प्रश्न असा की, 'शेवटचे प्रकरण' या शब्दप्रयोगाचा अर्थ काय ? चक्रधरांचा शिरच्छेद (आणि त्यांचे पुनरुज्जीवन) हा त्याचा अर्थ कसा होतो ? चक्रधरांच्या आयुष्यातले 'शेवटले' म्हणजे अखेरचे प्रकरण एवढाच त्याचा अर्थ होतो. डॉ० कोलते यांनी उद्धृत केलेल्या विचारवंदाच्या अवतरणात "ना मूर्ती म्हणजे व्यक्तीं : तरी दिसत असे : एवं छेदभेद : तो कैसा : ना ब्रह्मसानाचिया फोडी : तथा सेवटीले प्रकरण : ऐसे दिसत असे :" असे म्हटलेले आहे. यात, 'सेवटीले प्रकरण' याचा अर्थ, चक्रधरांचा शिरच्छेद असा कुठे होतो ? ब्रह्मसानूने केलेला विषप्रयोग याचा या वचनात उल्लेख आहे. 'तथा सेवटीले प्रकरण' याचा अर्थ, चक्रधरांवर, त्यांचा नाश करण्याकरिता म्हणजे त्यांचा शस्त्राने छेद करण्याकरिता, आलेले सशस्त्र सैनिक असाही होऊ शकतो. चक्रधरांना मारण्याचे त्यांच्या आयुष्यातील शेवटले म्हणजे अखेरचे प्रकरण एवढाच त्याचा अर्थ आहे, चक्रधरांचा प्रत्यक्ष शिरच्छेद हा त्याचा अर्थ नाही. कारण, त्यांच्या जीवनातील या 'शेवटल्या प्रकरणा'तही त्यांचा शिरच्छेद झाला नाही, ते जिवंतच होते, आणि नंतर काही काळाने त्यांनी (पुनरुज्जीवित होऊन नव्हे, तर याच देहात) उत्तरापंथे प्रयाण केले (म्हणजे पायी चालत चालत ते उत्तरापंथे गेले).

मला तर असे वाटते की, 'सेवटीले प्रकरण' या विचारवंदकारांच्या शब्दप्रयोगाचा अर्थ 'शस्त्रधर आगमनीं भटोबासां आवेशु' या लीळेतील (उत्त० ४४६, नेप्र०) प्रसंगालाच उद्देशून असावा. कारण, चक्रधरांचा ज्यात नाश होऊ शकला असता असा त्यांच्या आयुष्यातला हा 'शेवटचा' प्रसंग आहे. त्यानंतर काही दिवसांनी चक्रधर उत्तरापंथे निघून गेले. अर्थात, त्यापूर्वीचा, त्यांचा नाश करण्याचा शेवटचा प्रयत्न - म्हणजे त्यांच्यावर चालून आलेले शस्त्रधर - हाच आहे. -आणि त्यालाच अनुलक्षून विचारवंदकारांनी 'सेवटीले प्रकरण' हा शब्दप्रयोग योजला आहे. 'वीखशक्ति-

स्वीकारू' या लीळेतील प्रसंगापासून (पूर्वार्ध, भाग २, खंड १, पृ० ३५ नेप्र०) चक्रधरांना मारण्याचे प्रयत्न सुरू होतात, आणि 'शस्त्रधर आगमनी–' या लीळेतील प्रसंगात हे प्रकरण संपते. म्हणूनच, 'ब्रह्मसानाचिया फोडी : तथा सेवटीले प्रकरण' असे विचारबंदकारांनी म्हटले आहे. त्यांनी उल्लेखिलेले 'शेंवटले प्रकरण' हे आहे! डॉ० कोलते व काही अभ्यासक ज्याचा डांगोरा पिटतात ते नव्हे!!

अर्थात, 'शेवटले प्रकरण' या शब्दप्रयोगाचा अर्थ चक्रधरांचा वध व त्यांचे पुनरुज्जीवन हा मुळीच होत नाही.

(२) डॉ० कोलते–संपादित 'आचारबंदा'तील उल्लेख

(१) आपल्या अर्थाच्या पुष्टचर्थ डॉ० कोलते हे विश्वनाथवास बीडकर यांच्या 'आचारबंदा'तील काही उल्लेख पुढे करू शकतील. त्यांनी संपादिलेल्या आचारबंदाच्या प्रतीत "मग उदास तरी जैसे नासिकीचें : तथा डोबेग्रामिचें : मग सेवटीलही जाणावें :" असा उल्लेख आहे (पृ० १०३). "नाम : लीळा। मूर्ति : चेष्टा :" (आचार, २८) या सूत्रावरील "जिए काळीं जैसा अवस्वरू : वस्त्रें अळंकार : उदास प्रसन्न तें आठवीजे" (आ० स्थ० २८) या पक्षातील 'उदास' या शब्दाचे स्पष्टीकरण करताना बंदकारांनी हे वाक्य लिहिले आहे. पण तेथेही "सेवटील **प्रकरण**" हा शब्दप्रयोग नाही. 'सेवटील' एवढाच उल्लेख आहे, आणि तोही चक्रधरांच्या **उदास**वृत्तीसंबंधीचा आहे. त्यांचा शिरच्छेद वा मृत्यू त्यातून यत्किंचितही सूचित होत नाही. शिवाय, 'माझ्या वधाची आठवण करावी' असे चक्रधरस्वामी म्हणणेच शक्य नाही. "मुर्ति म्हणिजे रूप : वए : गुण : वर्णु : जो जैसा अवएवु : खूति खावणी..." या आचारस्थळातील उल्लेखाशी (आ० स्थ० २८) ते विपरीतही आहे.

(२) डॉ० कोलते–संपादित 'आचारबंदा'च्या प्रतीत आणखी एक उल्लेख आढळतो. त्याचाही येथे विचार केला पाहिजे. "अपक्व कखाइया जाए : तैसा कुयोगिया न वचे :" (आचार, १६०) या सूत्रावरील "तो दोपेंसीं निरया जाये" या पक्षाच्या स्पष्टीकरणात बंदकारांनी "ना उद्धी (वृद्धा) संगमीं जेणें आज्ञापिले मुनिये : तयाचेनि लेखें आधीं भटोवासांचां ठाइं घात घडलाचि : मग ईश्वरें लीळावशें वांचविलें तें वेगळें : अथवा तया प्रकरणापूर्वींचि कैं नेणों ज्ञानियाचा घात घडला असैल : म्हणौनि भक्त बाइसें तयाचाहीं घडला : त्यापाठीं पुढीलें प्रकरणें विश्वहननातव नित्यनरकाची ही जाली : म्हणौनि 'दोपेंसीं निरया जाये' म्हणितलें :" (पृ० ३४९–३५०). पण येथेही '**शेवटील प्रकरणें**' असा शब्दप्रयोग नाही; 'पुढीलें प्रकरणें' असा आहे. 'पुढील' प्रकरण म्हणजे 'शेंवटले' प्रकरण नव्हे. चक्रधरांचा घात करण्याचे जे प्रयत्न झाले, त्यांपैकी एखाद्या प्रकरणाला उद्देशून 'पुढील' प्रकरण असे येथे म्हटले असणे शक्य आहे. चक्रधरांचा 'शिरच्छेद' किंवा त्यांचा मृत्यू हा अर्थ 'पुढील' प्रकरण या शब्दांतून व्यक्त होत नाही.

[इ] "**शेवटचे प्रकरण**" नव्हे, तर "**नवीनच प्रकरण**"

सारांश, 'राजभद्र' काय किंवा आचारबंद काय, –यांपैकी कोणत्याही महाभाष्यात "**शेवटचे प्रकरण**" हा शब्दप्रयोग आलेला नाही. उपाध्ये–आम्नायाच्या विचारबंदातही तो नाही. आणि वाइंदेशकरांच्या विचारबंदात तो जो आलेला आहे तो एक तर बऱ्याच उत्तरकाळात–म्हणजे चक्रधरांच्या उत्तरापंथे प्रयाणानंतर ४००–४२५ वर्षांनी! आणि दुसरे पण मुख्य म्हणजे त्याचाही अर्थ चक्रधरांचा वध असा होत नाही. चक्रधरांना मारण्याचे जे प्रयत्न झाले, पण ज्यांपैकी एकाही प्रयत्नात चक्रधरांचा मृत्यू झाला नाही असा, त्यांच्या जीवनातील अखेरचा प्रसंग, –एवढाच त्याचा अर्थ आहे. चक्रधरांचा प्रत्यक्ष वध वा शिरच्छेद असा अर्थ त्यातून यत्किंचितही सूचित होत नाही.

अर्थात, 'शेवटचे प्रकरण' 'शेवटचे प्रकरण' म्हणून डॉ० कोलते ज्याचा झेंडा नाचवितात तेच घटनादृष्टचा, आणि ते समजतात त्या अर्थदृष्टचाही, निरर्थक आहे. या शब्दप्रयोगाचा 'चक्रधरांचा वध, आणि त्यानंतर त्यांचे पुनरुज्जीवन' हा अर्थ होऊच शकत नाही. चक्रधरांना मारण्याचे जे विविध प्रकारचे प्रयत्न झाले, पण तरीही चक्रधर ज्यांतून जिवंत राहिले, असे त्यांच्या जीवनातले अखेरचे प्रकरण, एवढाच त्याचा अर्थ आहे. त्यांच्या तथाकथित शिरच्छेदाशी (व पुनरुज्जीवनाशी) या शब्दप्रयोगाचा संबंध जोडणे म्हणजे वडाची साल पिंपळाला लावणे होय! इतकेच नव्हे तर, एक नवीनच 'प्रकरण' निर्माण करणे होय!!


१८. समारोप

सारांश, बुद्धिवाद आणि वस्तुनिष्ठा या दृष्टींनी विचार केला तर चक्रधरांचे वधोत्तर पुनरुज्जीवन ही असंभवनीय घटना आहे. ती घडूच शकत नाही. महानुभाव तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनेही, चक्रधरांच्या प्रवृत्तीचा विचार केल्यास, चक्रधरांचा वध घडला असणे शक्य नाही. आता राहिली संशोधनात्मक दृष्टी. या दृष्टीनेही पाहिले तर श्रुति, स्मृति, वृद्धाचार व मार्गरूढी ही महानुभावांची 'प्रमाणे'; लीळाचरित्र (उत्तरकालीन तुरळक पोथ्या सोडून), स्मृतिस्थळ इत्यादि चरित्रग्रंथ; मूर्तिप्रकाश, सह्याद्रिवर्णन, ज्ञानप्रबोध इत्यादि काव्यग्रंथ; स्थळ, बंद इत्यादि भाष्य व महाभाष्य ग्रंथ; प्रकरण-वश, निरुक्तशेष इत्यादि चक्रधरसूत्रकथनप्रसंगनिरूपण करणारे ग्रंथ–यांत कुठेही चक्रधरांच्या वधाचा (व वधोत्तर पुनरूज्जीवनाचा) उल्लेख आढळत नाही.

त्यामुळे,–बुद्धिवाद, वस्तुनिष्ठा, महानुभाव तत्त्वज्ञान व संशोधनात्मकता यांपैकी कोणत्याही दृष्टीने विचार केला तरी चक्रधरांचा वध झाला नाही, असेच सिद्ध होते.

'शेवटचे प्रकरण' घडलेच नाही, ते उत्तरकाळात निर्माण झालेले एक नवीनच 'प्रकरण' आहे.

△ △ △



पुस्तके

कांचन संध्या

सुलभा हेर्लेकर

तृप्त मनाच्या जलाशयावर बसून आळवलेल्या कवितांचा 'कांचनसंध्या' हा संग्रह! कविवर्य बा. भ. बोरकर यांच्या परिपक्व मनातून व वयातून उतरलेल्या या १३६ कविता. हा मौज प्रकाशनने प्रकाशित करून पद्मा सहस्रबुद्धेच्या कुंचल्यातून सुशोभित चौकटीत दिमाखाने सामावल्या आहेत. कवितांच्या खाली दिलेल्या नोंदीवरून या कवितांचा काळ हा अलिकडील १२–१३ वर्षांचा आहे. बोरकर सातत्याने रसिकांसमोर आपली कविता घेऊन उभे आहेत. सौंदर्य, संगीत व निसर्ग यांचे वेड असलेला हा कवी संध्याछायेच्या किनाऱ्यावर उभा राहून सांगतोय. "पिसास कुठूनी पंख तयांची घरटी झाली कुठेकुठे, आता अपुली कांचनसंध्या मेघडंवरी सोनपुटे." प्रत्येक येणाऱ्या क्षणांचे स्वागत करण्याची कवीची मनःशैली, सखीला सांगतेय की दिवस जरेचे आले तरी त्याला आपण जरीचा काठ लावू.

तन्मयतेने, सुखसमृद्धीने अडचणी सोसून पलीकडच्या आशेच्या किरणाने ह्यांना सतत प्रकाश मिळत गेला. ज्ञानेश्वरीच्या शब्दकळेचे, पदलालित्याचे ऋण बोरकरांची शैली सातत्याने वागवीत आली आहे. अलौकिकातून लौकिक सौंदर्य शोधत जाणे हा तर तिचा धर्मच! कविता हे वाङ्मयातील आशयाचे सर्वात गोठवलेले स्वरूप! तिच्या आस्वादासाठी मनाची एकाग्रता व सूक्ष्मतेचे भान आवश्यक असते. अनुभव घेणाऱ्या व्यक्तीची एकाग्रता वाढत जाते तसतशी त्याच्या व्यक्तित्वातून समष्टीकडे किंवा सामाजिक अंगातून व्यक्तित्वाच्या विलोभनीयतेकडे वाटचाल सुरू होते. भावनेच्या खोलीबरोबर प्रतिभेची उंचीही मग वाढू लागते. याचे उदाहरण म्हणजे बोरकरांची कविता. या प्रज्ञाप्रवाहात ते तुडूंब बुडालेले होते.

'गंगेत मी काल सचैल न्हालो
माझ्या मनाच्याच तळा मुळाशी
श्रीवाज्रसा गंधसगर्भ आलो
माझ्याच प्रज्ञाप्रभव प्रकाशी.'

अशी रोमरोमी पुलकित होत जाणारी अनुभूती रूप–रस–गंध–नाद यांच्या सर्वांगानी व्याप्त होते. आणि सुंदरतेची, सौंदर्याची एक तरल सुरावटच त्या कवितेला प्राप्त होते.

बोरकरांच्या कवितेला असा एक तृप्त सुखाचा काठ आहे. तसा गोव्यातल्या निसर्गाचा लडिवाळपणाही आहे. "भोवतीचे विश्व सारे इंद्रधनुरंगात न्हाले। वाळल्या गवतास सुद्धा रेशमाचे फूल आले." असा याच्या तृणपात्यातही रेशमी फुलांचा स्पर्श ह्यांना लाभलाय. त्याच मुलायम स्पर्शदृष्टीने ते जगाकडे बघतात किंबहुना स्वतःकडे व सखीकडेही!

कविवर्य तांबेप्रमाणेच बोरकरांची कविता ही समाधानी जीवाची आहे. सौंदर्यावर सतत प्रेम करणारी! पण सौंदर्याच्या तळाशी दुःख व भयाण विसंगत जीवन लपलेला आहे. त्याचा अर्थ असा लावण्याचा मात्र त्यांनी प्रयत्न केला नाही. या अस्तित्वाच्या मुलानुभावाशी त्याच्या दुःखाशी भिडण्याची, त्याचे रहस्य शोधण्याची त्यांची जिज्ञासा दिसत नाही. सौंदर्याच्या छायेतच ती गुंतून पडते. शब्दांच्या नादमयी स्वरातच ती गुरफटते. काही ठिकाणी ती अति सनातन शब्दांच्या रचनेमुळे कृत्रिमही बनते, पण तरीही या सर्वांमधून मुळातच त्यांचे व्यक्तिमत्व हे समृद्ध तंत्रावरची पकड आणि जीवनावरील एक निष्ठा, प्रेम यातून घडलेला असल्यामुळे ही कृत्रिमता नजरेआड होते. बहुतेक सौंदर्यवादी कवीची ही मर्यादा आहे. मर्ढेकरानंतरचा एक काळ असाही येऊन गेला की कवी आपल्या अमूर्त अनुभवाकडे वळताना वैफल्याच्या व शून्यतेच्या भोवऱ्यात सापडला. आजची कविता ही

पुःन्हा समाज सन्मुखतेकडे वळत चाललीय. या सर्व प्रवासात बोरकरांची कविता कुठल्याच नाविन्य- वा प्रयोगशीलता याकडे न वळता सौंदर्य, निसर्गप्रेम यातूनच अव्याहत रसिकांसमोर उभी आहे.

'ना मिळे काहीच हाता, कां म्हणू ही व्यर्थता
जे भिडे अज्ञात थोडे त्यात येथे सांगता.'

जे मिळाले त्यात समाधान मानता मानताच बोरकरांचं कवी म्हणून यत्किंचितही नाव वाचकां- समोरून ढळता कामा नये याची पूर्ण जाणीव बोरकरांच्या कवितेने बाळगली आहे.

बोरकरांच्या कवितेवर संगीताचा परिणाम सतत जाणवतो. लोकसंगीताचा साजही त्यात आहे. निसर्ग प्रतिमा त्यांच्या कवितात दाटून येतात. माड, सागरी- वारे, इंद्ररंगावली, रेघविरहुली, कणसातील बळकणा, इत्यादी अनेक शब्दातून त्या प्रतिमांकित होतात. 'वेल्हाळ पाखरे गंधर्व किन्नरे वाटते वनचरे अमरांची' म्हणत म्हणत आणि आपल्या प्रिय सखीला २० वर्षा- नंतरही 'कुंतलच्या स्त्रोतपातीं वाटले कृष्णेत न्हालो। तो तुझ्या तारा कटाक्षे मी पुनः घायाळ झालो.' म्हणत घायाळ होत गेले. तिला विश्वासात घेऊन आणि आळवून कितीदा तरी बोरकरी कविता उमलतच राहते. 'गीत मासे गायलो मी,' किंवा 'ती तुझी स्मितरेघ' या कविता साक्षीला पुरेशा आहेत.

बोरकरांच्या कवितेची वाटचाल ही गोव्याच्याच हिरव्याकंच गर्द वनराईसारखी आहे. तिथल्या सागरा- ची शांतता त्यांच्या कवितेला लाभलेली आहे. पण म्हणूनच वाटत राहतं की शांत नी तृप्त अवस्था लाभ- ल्यामुळे बोरकरांच्या कविता प्रयोगशील वाटल्या नाही. अग्रेसर कवींमध्ये बोरकरांचे नाव घेऊनही त्याची वाट फक्त सरावलेली राहिली. याचे कारण प्रयोजन नसता- नाही घडवलेली कविता व त्यामुळे येणारी अंतर्विसंगत अलंकरणप्रचुरता यामुळे कवितेला मूळ गाभा काही वेळा निसटला जातोय हे साध्यासरळ वाटेच्या व्यक्ति- मत्वाच्या बोरकरी कवितेला कधी लक्षात आलेच नाही. तरीही या संग्रहातल्या कविता या त्यांच्या परि- पक्व वयातील कविता आहेत म्हणून हा संग्रह वाचताना बोरकरांची वाटचाल ही 'याच निळ्या डोहाकाठी माझी राहील राहुटी, तुझी हाक येता सख्या निघेन मी उठाउठी' अशी आहे. सहज साध्या भावनांचा उत्कट आविष्कार 'मी तुजसाठी शैशवीचा व्रण, चाहूल, उन्हातले सरी' इत्यादी अनेक कवितातून जाणवतो. आणि सध्याच्या धकाधकीच्या आणि विफलतेच्या परि- स्थितीत सापडलेल्या वाचकाला बोरकरांची कविता आनंद देते. प्रतिमांकित अलंकरणातून आणि संस्कृत- प्रचूर भाषेतून काही ठिकाणी ही कविता जडशीळ होते. स्मरणकरुणाधन, अतुलतक्कातून, अचलनिरंजन इ. अनेक शाब्दिक कसरतीतून ती पेलवतही नाही. पण मधेच 'बकुळतळी गंधखुणा ओले सुखावून उन्हा। रोमांचित धरणीतल पवनात्मक पोरपणा।' अशी अल्लडपणे धावतही जाते.

सतत उनपावसाचे रंग घेऊन आलेली बोरकरी कविता जुन्या थाटाची पण मोहक निसर्गातून फुलत जाते. आणि अशी फुलता फुलताच मृत्यूकडे ओढ घेणारे त्यांचे मन 'अंतर्बाह्य आता आनंदकल्लोळ। श्वासी परिमळ कस्तुरीचा। सुखोत्सवी अशा जीव अनावर पिंजऱ्याचे दार उघडावे॥' अशी आर्त विनवणीही करून सर्व सुखाचे क्षण उपभोगल्यावर शांत मनाने 'शिंपल्या- सारखी स्वये मिटे भूक' यापरते सुख काय आहे?। अ ते स्वतःच स्वतःला प्रश्न करतात. आता मृत्युने केव्हाही दार उघडले तरी ह्यात बंदिस्त व्हायला तयार आहेत. वेल्हाळ पाखरासारखा जीव होतो, त्या कणांना अमृत बनवतो म्हणून तांब्यांप्रमाणेच ह्यांनाही मृत्यु म्हणजे नवीन पहाट वाटते. माहेराचे बोलवणे वाटते.

तृप्त शांतपणा, संयमी शृंगार, शब्दांच्या सहज कसरती, यातून बोरकरी कविता स्थिर झाली आहे. बाल्य, तारुण्य, प्रौढत्व व वृद्धत्व या सर्वच ऋतूतून जाताना बोरकरांच्या कवितेला कुठेच कडवटपणाची धार आली नाही. सुखी समाधानी अशी बोरकरी कविता वाचकाला निर्भेळ आनंद मिळवून देते हे 'कांचनसंध्या'तील कविता वाचतात लक्षात येते. हेच तर कवीचे व त्याच्या कवीतेचे तृप्त यश!

['कांचनसंध्या'/बा. भ. बोरकर,/मौज प्रकाशन/प्रकाशक श्री. पु. भागवत मुंबई]

△ △ △

चांगदेवपासष्टी

उषा मा० देशमुख

ज्ञानेश्वर साहित्याची आज केवळ धार्मिक दृष्टीने पारायणे होत नसून एका डोळस चिकित्सेने मराठी साहित्याचे अभ्यासक संशोधक त्याचा पाठपुरावा करीत आहेत आणि त्याचे फलित म्हणजे ज्ञानेश्वरीच्या सर्व अध्यायांचे झालेले संपादन, अमृतानुभवाचे झालेले संपादन, अभंग गाथेचे झालेले संपादन आणि प्रस्तुत प्रयत्न म्हणजे चांगदेव पासष्टीचे झालेले संपादन! डॉ. वा. पु. गिंडे यांनी वाङमयीन पातळीवरून ज्ञानेशांच्या 'चांगदेव पासष्टी'चा एक चिकित्सक अभ्यास प्रस्तुत ग्रंथात मांडला आहे. विस्तृत प्रस्तावना, मूळ संहिता, मराठी सोप्या भाषेतून अन्वय आणि अर्थ, परिशिष्टातून ओव्यांची अक्षरानुक्रमणिका विवेचक टीपा, संदर्भ, काही विशिष्ट संज्ञांचे स्पष्टीकरण आणि शब्दकोश देऊन या ग्रंथाला संशोधनाची परिपूर्णता डॉ. गिंडे यांनी आणून दिली आहे. केवळ पुस्तकाचे स्वरूप वरवर न्याहाळले तरी देखील एक गोष्ट आपल्या लक्षात येईल की 'चांगदेव पासष्टी'सारखे एक तत्त्वज्ञानपर स्फुट प्रकरणपर काव्य छोटेखानी असूनही डॉ. गिंडे यांनी आपल्या चिकित्सक आणि संशोधक वृत्तीने संहिता संपादन केली असल्यामुळे ते मराठीच्या अभ्यासकांना आणि पदवीपूर्व आणि पदव्युत्तर परीक्षार्थींना उपयुक्त ठरले आहे यात शंका नाही. या ग्रंथाचे दुसरे वैशिष्टच म्हणजे ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, आणि अभंगगाथेशी चांगदेवपासष्टीचे जे जे नाते जाणवले तेथे ते तुलनात्मक पद्धतीने मांडून ज्ञानेश्वरांचे वाङमयीन व्यक्तिमत्त्व एकसंध कसे होते हेही दाखवून दिले आहे. किसनमहाराज साखरे यांच्यासारख्या हरिभक्तपरायण विद्वानांनी ग्रंथाचा पुरस्कार केला आहे. 'मनोगता' मध्ये डॉ. गिंडे यांनी ज्ञानेश्वरमहाराज आणि त्यांची साहित्यनिर्मिती यामधील एकसंधता कशी आहे हे दाखवून दिले आहे. त्याचप्रमाणे ज्ञानेश्वर आणि त्यांचे साहित्य म्हणजे मराठी संस्कृतीचा आणि साहित्याचा मानदंड कसा आहे, त्यांच्या जीवनदृष्टीचे प्रतिबिंब त्यांच्या साहित्यनिर्मितीत कसे उतरले आहे आणि ज्ञानदेव साहित्याचे आवाहन सार्वत्रिक आणि सार्वकालिक स्वरूपाचे कसे झाले आहे याचाही साकल्याने ऊहापोह केलेला आहे. ज्ञानेश्वर आणि तुकाराम हे दोन मराठी कवी अभ्यासकांना आव्हान देणारे कवी कसे ठरतात याचाही परामर्श डॉ. गिंडे यांनी घेतला आहे. "ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेवपासष्टी या तिन्ही ग्रंथातून आणि त्यांच्या अभंगगाथेतून उमटलेल्या त्यांच्या अनुभवसंपन्न, बहुपरिमाणात्मक व्यक्तिमत्त्वांच्या खुणांचा शोध घेत घेत त्यातून त्यांच्या तत्त्वज्ञानाच्या आणि त्यांच्या शैलीचा विचार म्हणजे वाङ्मयीन रूपाचा विचार अशी भूमिका" संपादकांनी योजिली आहे व मुख्य म्हणजे ती त्यांनी सर्वार्थाने पार पाडली आहे. प्रस्तुत ग्रंथाला मनोगताप्रमाणेच एक विस्तृत प्रस्तावनाही डॉ. गिंडे यांनी लिहिली असून तीन ज्ञानेश्वर चरित्रवाद, ज्ञानदेवांचे व्यक्तिमत्त्व, ज्ञानेश्वरी, ज्ञानेश्वरीची टीकापद्धती, आत्मसाक्षात्कारी पुरुषाची वाणी, संतवाङमयाच्या अभ्यासाची भूमिका, एक वैचारिक विसंगती, श्री ज्ञानदेवांचे एकसंध व्यक्तिमत्त्व, मायावाद की चिद्विलासवाद, चांगदेवपासष्टीचा काव्यदृष्टचा विचार! असे विविध परिच्छेद पाडून ज्ञानेश्वर साहित्याचे अवलोकन व मार्मिक चिकित्सा आणि वाङ्मयीन समीक्षा केलेली वाचकाला आढळून येईल! चांगदेवपासष्टी हा तत्त्वज्ञानपर असा ज्ञानेश्वरांचा ग्रंथ असूनही त्यात तत्त्वचिंतन आणि काव्यात्मकता कशी आलेली आहे याचाही परामर्श डॉ. गिंडे यांनी यथासांग घेतला आहे.

अमृतानुभवातील चिद्विलासाचा अनुभवलेला साक्षात्कार एका अभेद दृष्टीने 'चांगदेव-पासष्टी'त उतरतो या दृष्टीने चांगदेव पासष्टी म्हणजे एक आत्मरूप संवाद आहे. ते एक पत्र असूनही आध्यात्मिक आणि ज्ञानात्मक पातळीवरून आविष्कृत झाले आहे. एका अर्थाने ते स्फुट, एकमुखी, स्वगतपर पत्रभाषण आहे. एका भावमधुर हृदय संवादाची प्रत चांगदेव पासष्टीला आल्यामुळे ते तत्त्वचिंतन स्वतंत्र, स्वयंपूर्ण आणि संपूर्ण झाले आहे. अमृतानुभवातील तत्त्वाशयाचे सारसर्वस्व चांगदेवपासष्टीत उतरले आहे. तत्त्वज्ञान (Philosophical thoughts) आणि आध्यात्मिक अनुभव (Spiritual experience) चांगदेवपासष्टीमधून व्यक्त होतो. चैतन्यरूप आणि जीवासह उभा असलेला विश्वपसारा यामधील अन्योन्यसंबंध आणि स्फूर्तिरूपे ज्ञानेश्वरांनी 'अमृतानुभवा'त जी न्याहाळली

त्यांचीच सांगता 'चांगदेवपासष्टी'त झाली आहे. आत्मसाक्षात्काराचा अनुभव, पूर्णैक्याचा अनुभव, निर्गुण निराकार परब्रह्माचा अनुभव ज्ञानेश्वरांच्या प्रतीतीला जो आला त्याची भावपूर्ण आविष्कृती म्हणजे 'अमृतानुभव' आणि 'चांगदेवपासष्टी' हे दोन ग्रंथ होत. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, अभंगगाथा यांचा विस्तार ऐसपैस आहे परंतु पासष्टीत मात्र केवळ अल्प ओव्यांच्या अभिव्यक्तीतून ज्ञानेश्वरांनी एक 'दर्शन' उभे केले आहे. पारंपारिक उपनिषदजन्य वैदिक तत्त्वज्ञान स्वीकारूनही ज्ञानदेवांनी त्यांची पुन:स्थापना सर्वस्वी नव्या पद्धतीने केली आहे. यादृष्टीने ते 'द्रष्टे' आणि 'दर्शनकार' ठरतात. एका ज्ञानात्मक भूमिकेवरून आत्मसाक्षात्काराचा अनुभव ज्ञानेश्वर स्वान्तसुखार्थ आणि चांगदेवाच्या निमित्ताने गोचर करतात. गीतेमध्ये अर्जुन भ्रांतचित्त होता म्हणून श्रीकृष्णाला प्रबोधन करावे लागले. अमृतानुभवात आणि पासष्टीत आत्म्यानेच आत्म्याशी साधलेला संवाद आहे. चांगदेवाची कथा तशी निमित्तमात्र आहे ढाक्याची मलमल जशी छोटया डबीमध्ये ठेवता येत होती असे म्हणतात, त्याप्रमाणे ज्ञानेश्वरांनी केवळ पासष्ट ओव्यांमध्ये स्फूर्तिवाद, अजातवाद, विवर्तवादासह विश्वचैतन्याचा संदर्भशोध घेतला आहे. यादृष्टीने पासष्टीचा आत्मा तत्त्वचिंतनपर आणि आविष्कार भावपर झाला आहे.

चांगदेवपासष्टीचे सरळ दोन भाग कल्पिता येतात. पूर्वार्धात ज्ञानदेवांनी परमात्मा जगत्संबंध, द्रष्टादृश्यसंबंध, विश्वस्फूर्ती, त्रिपुटी, संवित्तिउपपत्ती, सत्‌चित् आनंदाची प्रतीती या विषयांच्या साह्याने एक सिद्धांत उभा केला असून उत्तरार्धात त्याचे विवरण, स्पष्टीकरण, चिकित्सा केली आहे आणि शेवटी उपसंहारात एकांतात मग्न असलेले ज्ञानेश्वर लोकांतात येतात आणि 'तिचेपरी जो इया। दर्पण करील ओविया। तो आत्मा एवढिया मिळेल सुखा' असे म्हणून चांगदेवपासष्टीची सांगता करतात.

परमात्म-दर्शन आणि जगत्‌दर्शन अविद्येने लिप्त असलेल्या माणसाला एकदम दिसत नाही. जगाचा आभास जाणवल्यास परमात्मरूप दिसत नाही आणि परमात्मस्वरूप जाणवल्यास जगाचा ग्रास झाल्यासारखे वाटते. वास्तविक परमात्मा लपतही नाही किंवा प्रगटही होत नाही तर तो प्रकाशमय, स्वयंभू निर्लेप, निराकार असूनही अणूरेणूत भरलेला आहे. सुवर्ण आणि अलंकार, उदक आणि कल्लोळ, पृथ्वी आणि मरुद्‌गण यांचे जे नाते आहे तसे परमात्मा आणि विश्व पसारा यांचे नाते आहे. पुन: विश्वस्फूर्तीमुळे परमात्मा झाकोळत नाही. अविद्येमुळे दृष्य, दृष्टत्व हा व्यवहार घडतो. वास्तविक परमात्मा स्वसंवेद्य आणि सहजरूप आहे. विश्वपसाऱ्यात पदार्थांची नानात्वे जाणवतात ती प्रकाशविणारी संवित्ती एकमेवाद्वितीय आहे. नामरूपात्मक भेदातून नानत्व जाणवते. वास्तविक वस्तुरूप भेद तेथे संभवत नाही. घटपटाच्या सिद्धान्ताने ज्ञानेश्वर विश्वसंवित्ती संबंध उभा करतात. ही संवित्ती दृङ्मात्र आहे. देहासह संपूर्ण विश्वाला अंतर्बाह्य व्यापून राहणारी ही संवित्ती म्हणजे चिन्मय परब्रह्म होय. देह ही उपाधी आहे, अविद्या आहे. ती येते आणि जाते. आत्मतत्त्व अज, अमर, केवळ आहे. 'सर्वम् खल्विदम् ब्रह्म' असे त्याचे स्वरूप आहे. द्रष्टा–दृष्य–दर्शन ही त्रिपुटी ज्ञाता–ज्ञेय–ज्ञान या त्रिपुटीप्रमाणे तीनपणाशिवाय असते. दृश्याची जी उभारणी तेच जगताचे दृष्टत्व होय. अशी एकभावोपपत्ती ज्ञानेश्वर मांडतात आणि लगेच दृश्यच जेव्हा नसते तेव्हा दृष्टी आणि द्रष्टा काय ग्रहण करणार असे सांगून अभावोपपत्ती ज्ञानेश्वरांनी मांडली आहे. दर्पणाच्या साह्याने बिंबाला प्रतिबिंब दिसते. परंतु मुख्य सत्य प्रतिबिंब मिथ्या होय. प्रतिबिंबाला बिंब म्हणणे म्हणजे दृष्टीला फसविणे होय. परमात्मस्वरूप हे ज्ञानरूप आहे. तो ज्ञानाचा विषय होऊ शकत नाही. म्हणून मौनाच्या भाषेतच बोलावे लागते. आत्मस्वरूप असे सत् चित् आनंदघन असून भोक्ता–भोग्य आणि भोग यांच्या अतीत अशी त्याची उपस्थिती आहे. अशा परमात्म्याचा 'तया पुत्र तू वटेश्वराचा' असे ज्ञानेश्वर म्हणतात व अभेदाच्या पातळीवरून आत्मानात्म विचाराला सुरवात करून द्वैताला फाटा देत त्रिपुटीचा निरास करीत स्फूर्तिवादाचा आणि अजातवादाचा पुरस्कार करीत चिद्विलासाचा अद्वयानंदबोध ज्ञानेश्वरांनी अमृतानुभवाप्रमाणे चांगदेवपासष्टीतही मांडला आहे. अमृतानुभवात 'शब्दखंडन' करताना शब्दांना 'स्मारके' असे ज्ञानदेव संबोधितात. तर चांगदेवपासष्टीत 'अखम डोळा' हे प्रतीक उपयोजितात.

वाद्य जाते विण ध्वनि। काष्ट जाते विण वन्ही
तैसे विशेष ग्रासुनि। स्वयेचि असे॥ चांगदेवपासष्टी २९

अशी त्याची (परमात्म्याची) 'विशिष्टता' पुन: स्पष्ट करीत जातात. आत्मसाक्षात्कार आणि केवलानंदाची

मुक्तावस्था हाच चांगदेव–पासष्टीचा मूलगर्भ विचार होय. तो मांडतांना स्वसंवेद्य, स्वत:सिद्ध, अनुभवसिद्ध, प्रकाशरूप असे जे ईश्वराच्या साक्षात्काराचे स्वरूप ज्ञानेश्वरांना जाणवले ते त्यांनी 'चांगदेवपासष्टी'मध्ये अतिशय बंदिस्तपणे अभिव्यक्त केले. 'अनेकत्व', 'नानत्व' ही भ्रांती असून 'एकत्व' ही स्फूर्ती होय. हा ज्ञानेश्वरांचा सिद्धान्त आहे आणि त्याचे निरूपण ज्ञानदेव आणि चांगदेव हे दोन डोळस आरसे समोरा-समोर येताच त्यांच्या अन्त:करणाचे प्रतिबिंब 'एक-रूप', 'अद्वैती' कसे असेल याची भावप्रतीती 'चांग-देवपासष्टी'तून व्यक्त करतात. कारण हा हृदय संवाद म्हणजे ज्ञानेश्वरांची तत्त्वचिंतनपर अशी 'एकोक्ती' आणि 'स्वगत'च आहे. सिद्धभेट 'विसकुसे' होईल म्हणून सखयाला भेटण्यासाठी उल्हासणारे ज्ञानदेवांचे मन कचरते आहे.

सोनेया वरकल सोने जैसा । का मुखा मुख हो आरिसा
मज तुज संवाद तैसा । चक्रपाणी ।। चांगदेवपासष्टी ४०

अशी 'मौनाची अक्षरे' चांगदेवपासष्टीत चिरंजीव झाली आहेत.

डॉ. वा. पु. गिंडे यांच्या 'चांगदेवपासष्टी'चे आस्वादन करीत करीत सुचलेले विचार प्रस्तुत सादर केले आहेत. वाचकांनी 'न्यून ते पुरते अधिक ते सरते' करून घेणे. डॉ. गिंडे यांचा हा प्रयत्न स्वागतार्ह असून समग्र ज्ञानेश्वर वाङ्मयाचे संशोधित दृष्टिकोणातून समीक्षण जर त्यांनी केले तर वाचकांची ही गरज पूर्ण होईल असा मला विश्वास वाटतो.

[**चांगदेव पासष्टी : एक अभ्यास**, लेखक डॉ. वा. पु. गिंडे, प्रकाशक : किसनमहाराज साखरे साधकाश्रम देवाची आळंदी मूल्य ६ रुपये.]

△

देवचाफे

तारा शास्त्री

नवकाव्याबद्दल मला कुतुहल आहे. त्यातून यशोदा माझ्या परिचयाची, निकटवर्ती ! तिचं काव्य मला वाचायलाच हवं होतं. ते वाचलं. शेवटावर येऊन ठेपले. तिची, 'प्रवासाहून परतल्यानंतर' ही कविता वाचून संपविली तेव्हा मी माझ्याच मनाशी मूक होऊन बसले. रिकामं, हलकं, ओझं डोक्यावरून उतरल्यावर वाटतं, तसं वाटलं. एकाच गोष्टीचं नवल करीत होते. उतारवयात, आता रिक्तमनाचे काही क्षण मला अनु-भवता आले, तर ते बऱ्याचं लक्षण होतं. पण ह्या तरुण कवयित्रीलाही अशी अनुभूती यावी ?–का ? सुहृदांशी प्रेमाची कोवळिक ज्या या मुलीला फुलवता आली, त्या सर्व नाजूक बंधांना, कोषात बंद करून, आता अखेरच्या प्रवासाची सिद्धता झाली आहे, असा निर्वाळा, तिचं मन तिला कसं देऊ शकलं ?

उत्तर फक्त एकच आहे. ह्या मुलीची प्रकृतीच अशी आहे. रणरणत्या उन्हातही फुलायचं आणि फुलता फुलता संपून जायचं अशी ओढ तिच्या मनाला आहे. असतेपणापेक्षाही नसतेपणाशी तिची जवळिक आहे. कारण ह्या नसतेपणात एक अंधाराचं आर्जव आहे, एक शांत स्निग्ध एकांत आहे, एक बोलकं मौन आहे, आणि ह्या मौनातून साधलेला सुखसंवाद आहे.

सुखसंवादाची तिची ओढ सुद्धा विलक्षण आहे. त्यात दुसऱ्या बाजूला एक 'तो' आहे, तिने समजावून घेतलेला, तिला आवडलेला आणि नाकारत स्वीकार-लेला ! तिला माहीत आहे,–तिचं हे त्याला नाकारत स्वीकारणं, त्याला जड जातं आहे. तो 'जडभार' हलका करण्याकरता, ती पोक्त झाली आहे. त्याला समजावते आहे. 'त्या' दोन देवचाफ्यांचा दृष्टांत तिच्या जवळ आहे.

"कैशा परस्परांच्या फांद्या (दोन देवचाफे फुलले आहेत त्या) झुकून आल्या
स्पर्शून सावल्याही गेल्या कधी न गेल्या
प्रलयातला विसावा झाले कधी कुणाला
भांबावल्या दिशांना अडलेत प्रश्न सोपे–(सोपे तिच्या दृष्टीने) दूरस्थ उन्हाचा दाखला देऊन ती सांगते आहे. ऊन दूरस्थ असलं म्हणून काय झालं ?–
त्याच्या झळंदारीने आणि लयकारीनेच नाही का–
"या बधिर हिमातून झरली पारदगाणी
घट्ट सूत्र नभाचा ओथंबत जलदाणी ?"

तिच्या शब्दात सान्त्वना तरी केवढी आहे,–
इतका झाकोळून जाऊं नकोस रे
तुझा प्रवास झळझळीत उन्हातला आहे.
जे आपण एकमेकांना दिलं, ते सारं तुला
प्रवासात भेटेल.

माझ्या डोळ्यांनी पाहिलंस तर
कोणताही प्रवास हा अखेर अतूट सहवास असतो,
आपल्याला खुणा पटल्या तर !

त्याच्या.

"अचला तुझ्या उरी गे का उठेनात स्पंद ?" ह्या प्रश्नाला उत्तर देताना ती म्हणते आहे,–

निकटतम सुखाची संपता स्वप्न माया ।
वळ कुठूनी मिळावे रे वियोगी जगाया ।

खरं तर, तिला अभिप्रेत असलेल्या प्रेमाची रीतच न्यारी आहे. लौकिक आयुष्याची हूल उठून उधळून जाताना ती पहाते आणि–

'मग कवण्या क्षणि केलागी ही ठेव जिवाची दिधली ?' अशी आशंका मनात दाटून येते. तिला हवं असतं, ते ह्या पलिकडचं, आभाळाएवढं, सर्वसाक्षी, अक्षय ! हेच पहा ना–

बाहुपाशाहून दृढ होतं
आपल्यातलं समंजस निळं अंतर
पहाटे पूर्वीच्या असूर्यपश्य जवळिकेत
अलौकिक देणं घेणं मिटवून टाकून
आयुष्यभराकरता विलग होताना
एकमेकाना जी अक्षर वचनं दिली,
त्या वचनांसाठी आजच्या अंतिम क्षणी
आधारासाठी तुला हाक न घालता
तुझी अस्पष्ट मूर्ती डोळ्यांत साठवत
मला मुक्याने कोसळणं भाग आहे

हा अंतिम क्षण कवयित्रीला सांभाळायचा आहे. एका निराळ्या अर्थाने शेवटचा दिवस गोड करायचा आहे. मुक्याने कोसळायचं आहे–आता अस्पष्ट झालेली मूर्ती डोळ्यांत सांठवत,–

'शहिदाने पाठवलेला शेवटचा स्पर्श त्याच्या प्रियतमेने सांभाळावा तसा'–! किंवा

'मध्यरात्री हद्‌पार होताना विश्वात अशा तुझ्या डोळ्यांवर टेकलेले ओठ आणि परतीच्या पाऊलखुणा, तू चुंबून घ्याव्यात, तशा ! –

सरत्याक्षणी ही कविता बघा,–

सरत्याक्षणी, झुंजत्या नाडीला एवढंच कळतं.
की अजूनही आहे सोबत
तुझ्या पाठमोऱ्या पावलांचे पुसटते सहस्वर
तुझ्या कणखर मौनातलं, ऋजुस्निग्ध उत्तर !

कवयित्रीला माहीत आहे,–किंबहुना तिने ठरवलं आहे की ह्या लौकिक आयुष्यातला तिचा प्रवास एकाकीच असणार. ह्या प्रवासातल्या संकट आणि भयग्रस्त वाटा, तिला पार करून गेल्याच पाहिजेत. तसं करताना, कळत न कळत हुंदका बाहेर पडलाच, तर धावून येणारा,–तो,–त्या अज्ञातापल्याडचा हवा. आणि जर हवा, तर आयुष्य हे तपश्चर्येसारखं जगायला हवं.

"इथे मातला निष्ठुर उत्सव ।
विरक्त घुंगुर माझे पायी
तुझ्या हातची खनक खंजिरी ।
विना विसावा नाचत राही

म्हणजे पायाचं त्राणं सुद्धा सोसत नसलं तरी घुंगुरहाटापायी बांधून सिद्ध व्हायचं, आणि कोमेजत्या क्षणांनाही फुलवत ठेवायचं.

"असा शब्द जिव्हार भेदून जावा ।
थिजावे झरे वाहते आतले,
जला त्याच शोषूनि ओठी फुलावे ।
प्रयासी स्मिताने टपोरे फळे

किंवा,–तरी पाहतो स्वप्नात । सूळ हेच पालवले,
फांदीफांदीला फुलली । शुभ्र हार्दीकाची फुले.

किंवा,–भरारात्र जडावाची झगमगत रहावी,

तशी मिरवते आहे
उरात सांभाळत उल्कापात

मात्र उरात उल्कापात सांभाळत असतानाही, दूरची स्वप्नं दृष्टिआड झालेली नाहीत. मन ग्वाही देत आहे.

"सत्य केवळ शृंखला अन् मुक्ती भासे स्वप्न रे
दूरच्या त्या स्वप्नार्थ तू सारेच रे निभवून घे."
कदाचित् ते दूरचं स्वप्न येवढ्याकरता असेल,
"वाटे काही निर्मळसे अनाहूत दारी यावे
उरी कोंदलेले तेथे, अर्पूनिया मुक्त व्हावे ।"

किंवा,–"कृतार्थ दिवसाच्या शिणलेल्या मुद्रेवर
संध्याकाळच्या उन्हाचं अव्याज हसू फाकलं"
वाटलं त्या क्षणी आपणही अगदी असंच हंसावं
शांत, अपाश, नि:संग ।

एखादे वेळी उफाळलेली ज्वाळा गगनाला शोधायला निघेल सुद्धा, निघायलाच हवी. पण त्यानंतर ?

"मन स्मशानाहूनही शांत अविकंपित सुस्थीर होणार आहे." आणि खरंच आहे ते.

" जे हृदयाला व्यापून उरलं, त्याला शांत स्मित मौनापलिकडे दुसरं सुख ते कोणतं ?"

त्या व्यापून उरणाराशी रममाण झाल्यानंतर, 'सुंदर मी होणार' ही एकच जाणीव शिल्लक उरते. रुमझुमते नुपूर, तांबुस मळिते फुले, इत्यादींची गरजच उरत नाही.

" फुलं ? कधी माळली होती ? ही दरवळतेय ती मीच। गाणी–? कधी गायली होती ? ही झंकारतेय तीही मीच." असा अनुभव येतो.

पण असा हा अनुभव सुखासुखी येत नसतो. दुःखं संपत नाहीत. प्राक्तनाचे भोग टळत नाहीत आणि पायातलं बळ संपलं की विफलता मनाला ग्रासून टाकते. कधी बंडखोरीचा आवाज उमटला, चढला नाही असं नाही.

"वये, कपाळावरचा प्राक्तनाचा मलूल टिळा
खसकन् पुसला का नाहीस ?"

असं म्हणताना संतापाची लाल धग जळजळत गेली. पण ह्या मुलीच्या कर्मयोगाला पायातल्या तोकड्या बळाची मर्यादा आहे. ती म्हणते,–

पायातलं बळ संपलं की,
सर्वसमावेशक माती आपल्याला पचवून टाकणारी
धूळराख, चार मुठी इकडे, तिकडे इतकंच।

दुःख तर असं की,–

जळले सुख निष्पाप, कुणाच्या अंगारांनी
या दुःखाला भला बुरा उद्‌गारच नाही,

आणि परिणामतः येणारं वैफल्य–

जाहलेत आता सर्व शांत आकांत
मी पुरूनि टाकिली स्मिते शुभ्र नवजात


ह्यानंतरच्या शेवटच्या ओळीत विषादाचा केवढा अर्थपूर्ण विखार भरला आहे पहा,–

ती (स्मिते शुभ्र नवजात) पोटी घेऊनी धरती वंध्या झाली. पण आयुष्य तपश्चर्येसारखं आहे म्हटल्यावर, कोसळताना सुद्धा पीळ उकलू द्यायचा नाही, हा कवयित्रीच्या मनाचा निर्धार आहे.

त्यामुळे शरवर्षा करणाऱ्याला,–

"थकले असतील तुझे हात, शिणवटा घालविण्यासाठी काय करू मी ?"

हाच प्रश्न तिच्या मुखावर उमटणार. तक्रार



आहे ती बाहेर पडणाऱ्या हुंदक्याविरुद्ध,–

"नतद्रष्ट ठरला हा फक्त माझा कंठ
साधा हुंदका बंदिस्त करू शकला नाही तो.

व्यक्तिगत दुःखाबरोबरच सामाजिक दुःखाची बोचही

कवयित्रीला सलते आहेच. 'शुभ्र स्मित पोटी घेऊन धरती वंध्या झाल्याची कवयित्रीला वाटणारी खंत, मोहेन्-जो-दारो, ह्या कवितेत वाचायला मिळते.

"विजेची पहिली पहार पडली।
तेव्हा दचकून उठले मोहेनजोदारो
कसल्याशा कहाण्या ओंजळीत सावरत
ज्यांनी उमटवली अलौकिकाची मुद्रा।
माझ्या स्वप्नांच्या उदास डोळ्यांवर
एक कहाणी अवघडून म्हणाली।
अजून आहेत माझ्या पोटी जिते गर्भ
बेचैन करते आहे त्यांची हालचाल,

संस्कृतीचा भव्य-दिव्य वारसा पोटी घेऊन आलेली ही धरती! मग आता हे असं विपरीत का घडते आहे? कवयित्री विचारते आहे,-

"मोहेन्-जो-दारो पुन्हा बेहोषीत गेलं आहे
अरे; पण ते जिते बेचैन गर्भ कुठे आहेत?"

हे बेचैन गर्भ जन्माला यायला पाहिजेत. संहाराच्या शस्त्रक्रियेने निर्मितीचं काम होणार नाही, असं तिला मनोमन वाटतं आहे. म्हणून स्वतःची तलवार ती म्यान करते आहे. कर्मवंताच्या कार्याच्या स्वाभाविकं प्रक्रियेला गोमटी फळे येतील असा तिचा विश्वास आहे. म्हणून वाचीवीरांना मागे सारून ह्या योग्यांसमोर तिने स्तवनाच्या रांगोळ्या काढल्या आहेत.

बाहेरच्या जगाचं भान जागं असताना, कवयित्रीने ह्या पद्धतीने काही हाकारलं आहे, काही नाकारलं आहे. सामाजिक जाणिवांचा निकष साहित्याला लावणाऱ्यांनी, तिच्या काव्याबद्दल आपले भलेबुरे उद्गार पेश करावेत.

मला ह्या कवितांतून प्रकट झालेला आत्माविष्कार आवडला आहे. वितीच्या जिण्यापलिकडील, अज्ञात अशा दूर देशीच्या सुगंधाची कवयित्रिला वाटणारी ओढ मला नवल करायला लावते. ती ओढ, तो अनुभव 'यशोदे'च्या संवेदनाक्षम आणि प्रगल्भ मनाने, फार सहजपणे तोलून धरला आहे. तोलून धरला आहे इतकंच नव्हे तर कविसुलभ कल्पनाशक्तीने ह्या सगळ्या अनुभवाला, एक अलौकिकतेची झळाळी दिली आहे. ह्या काव्यात भाषासौष्ठव आहेच. पण त्याशिवाय जे थोडसं आभाळ हाती आल्यासारखं वाटतं आहे, त्याची हलक्या हातानं जपणूक करणारं, त्याला गोंजारणारं आणि आर्जवणारं शब्दलाघव, सबंध कवितेतून झुळझुळत गेलं आहे. लौकिकातल्या आघातांनी क्षणभर हतप्रभ झाल्यासारखं वाटल्यावरही, काव्यातला एकंदर सूर "माझ्या राजकन्ये" ह्या कवितेतल्या शापित राजकन्येसारखा "अश्रू आणि वळ" लपविणाऱ्या, अशरण इमानाला जागणाऱ्या मानिनीचा आहे तो मला आवडला आहे.

(देवचाफे : कवितासंग्रह प्रकाशक-आनंद अंतरकर विश्वमोहिनी प्रकाशन, ६२-१२ कर्वे रोड पुणे. ४. कवयित्री-यशोदा मूल्य १२ रु.)

△ △ △

युगवाणी एप्रिल १९८० ते मार्च १९८३

लेखकांची सूची

संशोधन लेख

लेख

बखले सुरेश । नैतिक चिकित्सेचे स्वरूप । ऑगस्ट–नोव्हेंबर १९८० । १७८.

कुळकर्णी भीमराव । संगीत रंगभूमीची सुरवात : काही शंका, काही उलगडा । डिसेंबर–जानेवारी १९८१ । १९१.

सावंगीकर तारा । मेघादूतानुवाद : कुसुमाग्रज आणि बोरकर । डिसेंबर–जानेवारी १९८१ । १९६.

काळे अक्षयकुमार । कर्ण संगीतिका : एक नवे आकलन । डिसेंबर–जानेवारी १९८१ । २०७.

पांढरीपांडे सु. श्री. । परात्मभाव : मार्क्स, सार्त्र आणि अद्वैत । डिसेंबर–जानेवारी १९८१। २३७.

ज्ञाते कृष्णचंद्र। निसर्ग आणि कवी : आरती प्रभू । फेब्रुवारी–मे १९८१ । २६१.

ठेंगडी ना. बा. । दलित साहित्याची लक्ष्मणरेषा । फेब्रुवारी–मे १९८१ । २७२.

सानप किशोर । प्रायोगिक कादंबरी : उद्‌गम आणि विकास । फेब्रुवारी–मे १९८१ । २९४.

बोरावार प्र. ग. । विज्ञानतंत्र व परात्मता । फेब्रु.–मे १९८१ । २९९.

गडकरी उषा । अनुभव : अर्थ आणि अभिव्यक्ती : एक अस्तित्ववादी दृष्टिकोन । फेब्रुवारी–मे १९८१ । ३०६.

कुळकर्णी द. भि. । दुसऱ्यांदा देवदास । जून–आक्टोबर १९८१ । ३४३.

कुळकर्णी भीमराव । ९० वर्षांपूर्वीचा गाजलेला संमतीवयाचा वाद । जून–आक्टोबर १९८१ । ३४६.

कुळकर्णी भीमराव । ९० वर्षांपूर्वीचा गाजलेला संमतीवयाचा वाद । जून–आक्टोबर १९८१ । ३४६.

वडस्कर या. वा. । साहित्यातील नायक, प्रतिनायक, व्यस्तनायक व जनवादी नवनायक । जून–आक्टोबर १९८१ । ३६१.

वराडपांडे म. ल. । भागवत संप्रदायाची कलोपासना । जून–आक्टोबर १९८१ । ३८६.

वऱ्हाडपांडे वसंत कृष्ण । ‘ रंजितरंजक नाटकमाला ” । जून–आक्टोबर १९८१ । ४२८.

परांजपे जयंत । प्रश्नोपनिषद : ग्रेसची कविता । नोव्हे.–डिसें. १९८१ । ४७९.

रानडे गो. मा. । एक सनातनी सुधारक : विष्णुशास्त्री पंडित । नोव्हें.–डिसें. १९८१ । ४९०.

नेवासकर शिवकुमार । महाभारत की विदर्भ–क्रांतीगाथा ? । नोव्हें.–डिसें. १९८१ । ४९५.

पुंडे दत्तात्रय दिनकर । एकांकिका व श्रुतिका यांतील भेदरेषा । जानेवारी–एप्रिल १९८२ । २२.

आपटे प्रज्ञा । काव्य आणि क्रांतीविषयक अनिलांचे विचार । मे–जुलै १९८२ । ७.

सावदेकर आशा । कवि अनिलांचा आशावाद । मे–जुलै १९८२ । ९

देशमुख उषा मा. । शब्द असा हा : रसरेषांची अगणित नगरे । मे–जुलै १९८२ । १४.

चितमपल्ली मारूती । हाथी पागडी । ऑगस्ट–नोव्हें. १९८२ । ५५.

जामकर मधु । ‘ रूसवा ’ एक आकलन । ऑगस्ट–नोव्हेंबर १९८२ । ८९.

कुळकर्णी भीमराव । स्त्रीयांची विनोदबुद्धी । ऑगस्ट–नोव्हेंबर १९८२ ।९९.

काळे अक्षयकुमार । गालिब आणि अध्यात्म । ऑगस्ट–नोव्हेंबर १९८२ । १२६.

मोरे सदानंद । श्रीधर शनवारे यांची कविता । ऑगस्ट नोव्हें. १९८२ । १३३.

बडस्कर या. वा. । वास्तववाद आणि जनवाद । फेब्रुवारी–मार्च १९८३ । ११०

विशेष लेख

जोग वि. स. । कथाकार भावे । जून–जुलै १९८० । ५९.

वेलणकर अ. द. । अण्णासाहेब किर्लोस्करांचा केशराचा मळा । ऑगस्ट–नोव्हे. १९८० । १५३.

पाटील मालती । वीर वामनरावांच्या नाटकातील स्त्रीसृष्टी । डिसेंबर–जानेवारी १९८१ । २३१.

शास्त्री तारा । कै. पु. शि. रेगे : एक स्मरण । डिसेंबर–जानेवारी १९८१ । २११.

देशमुख सदानंद जगन्नाथ । पी. जी. वुडहाऊस : ललित साहित्यातील एक चमत्कार । जानेवारी–एप्रिल १९८२। १२.

अनुक्रमणिका

प्रवास-लेखन

कथा

विज्ञान वाङ्मय

एकांकिका

लघुतम नाटके

समीक्षा

कविता

मुलाखत

नोंदी

पत्रे

परीक्षणे

मुखपृष्ठ

रेखाटणे

विशेष-अंक

सात्र विशेषांक । एप्रिल–मे १९८०.
आत्मचरित्र विशेषांक । जून–जुलै १९८०.
एकांकिका विशेषांक । ऑगस्ट–नोव्हेंबर १९८०.

दिवाळी-अंक

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे १९८१ ह्या वर्षातील उत्कृष्ठ दिवाळी अंकासाठी स्पर्धा जाहीर करण्यात आली होती. त्यात युगवाणीच्या १९८१ च्या दिवाळी अंकाला विविध ज्ञान विस्तार कर्ते कै. रा. र. मोरमकर पारितोषिक प्राप्त झाले. (रु. १०१/–)

△ △ △

कऱ्हाडे सदा । साहित्य संशोधन । ऑगस्ट–नोव्हेंबर १९८२ । १५५ हा लेख 'संशोधन' ह्या शिर्षकाखाली वाचावा ही विनंती.

उत्साह आणि जिव्हाळा यांनी न्हाऊन निघालेला विदर्भ साहित्य संघाचा हीरक महोत्सव !

लोकांच्या भाषेत, लोकांच्या भावना आणि समस्या मांडण्याची लोकवादी परंपरा प्रवर्तित करणाऱ्या विदर्भ साहित्य संघाचा हीरक महोत्सव दिनांक १४-१-८३ ते २१-१-८३ पर्यंत अत्यंत उत्साहाने संपन्न झाला. जनतेचे वर्तमानपत्रांचे आणि मराठी बोलणाऱ्या संपूर्ण महाराष्ट्रातील साहित्यिकांचे भरघोस सहाय्य लाभल्यामुळे कार्यक्रमांना एक वेगळे लोभस आणि सर्व मराठी माणसे एकत्र आल्याचे सुखद स्वरूप प्राप्त झाले.


ह्या हीरक महोत्सवी वर्षात पुढील कार्यकारिणी अधिकारावर होती. (१) मधुकर आष्टीकर, अध्यक्ष (२) तु. वि. गेडाम, उपाध्यक्ष (३) अ. ल. लिमये, सरचिटणीस (४) योगश बऱ्हाणपुरे, चिटणीस (५) मनोहर म्हैसाळकर, आमंत्रक ध. रं. मं. (६) शरद कोलारकर, संपादक, युगवाणी, (७) प्रकाश देशपांडे, कार्यकारी संपादक, युगवाणी, (८) श्रीपाद मुंजे, कोषाध्यक्ष (९) मदन गडकरी, आमंत्रक, नाटयसमिती (१०) चंद्रकांत कुळकर्णी, आमंत्रक; शिवाजी संदर्भ ग्रंथालय (११) शं. त्रि. वालेकर, अमरावती, चिटणीस (१२) पंढरी मांडवगणे, चिटणीस, अकोला (१३) मा. तु. दलाल, सदस्य; भंडारा (१४) गो. स. देहाडराय, सदस्य (१५) माणिक बैतुले, सदस्य (१६) बजरंग सरोदे, सदस्य, आकोट, (१७) पु. ह. उपाख्य मदन धनकर, सदस्य, चंद्रपूर, (१८) म. ग. मानकर, सदस्य, यवतमाळ (१९) प्राचार्य कृ. मा. मुन्शी, वर्धा.

आपल्या कारकीर्दीत विदर्भ साहित्य संघाचा हीरक महोत्सव आल्याने तो नेत्रदीपक व्हावा आणि यशस्वी व्हावा असे कार्यकारिणीतल्या प्रत्येक सदस्यालाच वाटत होते आणि त्यादृष्टीने सर्वांचेच प्रयत्न होते.

अशा स्थितीत १४ जानेवारीचा उद्घाटनाचा दिवस उजाडला. प्रकाशाने उजळून निघालेली विदर्भ साहित्य संघाची महाकाय वास्तू, कै. माडखोलकर, नाना जोग, कवि अनिल आणि धनवटे ह्यांची स्मृती जागती करणारी चार महाद्वारे, ग्रंथाली, कॉन्टिनेन्टल, मॅजेस्टिक वगैरे पश्चिम महाराष्ट्रातील आणि काही स्थानिक प्रकाशकांनी उभारलेली प्रांगणातील पुस्तकांची भव्य प्रदर्शने रसिकांची मने आकर्षून घेत होती. सनईचे सतत निनादणारे मंगल सूर वातावरणातील पावित्र्य अधिकच वाढवीत होते. विदर्भ-विषय: सारस्वती जन्मभू: । हे बिरूद मिरविणाऱ्या विदर्भ साहित्य संघाने उद्घाटनाच्या सोहोळयात सर्व भूतपूर्व संघाध्यक्षांना आणि विदर्भ संमेलनाध्यक्षांना, त्यांचा सत्कार करायचा म्हणून आनंदाने व आदराने आमंत्रित केले होते. ही वयोवृद्ध मंडळी आणि काही तरुण संमेलनाध्यक्षही सर्व अडचणीवर मात करून निमंत्रणाला सुयोग्य साद देऊन उपस्थित झाले.

उद्घाटनाचा दिवस म्हणजे मकर संक्रमणाचा दिवस ! सायंकाळचे सहा वाजलेले. वि. सा. संघाचे धनवटे रंगमंदिर आबालवृद्ध स्त्रीपुरुष निमंत्रितांनी ओतप्रोत भरलेले. व्यासपीठ पुष्पमालांनी शृंगारलेले, रंगांनी विभूषित झालेले; भारतीय बैठकीवर सर्वभूतपूर्व वयोवृद्ध संघाध्यक्ष

उद्घाटन सोहोळा



डावीकडून–डॉ. आष्टीकर, श्री. ना. रा. शेंडे, श्री. पां. श्री. गोरे, श्री. ढवळे, श्री. बाबूराव धनवटे, श्री. विद्याधर गोखले आणि डॉ. द. भि. कुळकर्णी.


विराजमान झालेले. आपआपल्या सोयीनुसार कोणी खुर्ची मागितलेली तर कोणी उंच लोड–बसायला. समारंभाचे उद्घाटक होते लोकसत्तेचे संपादक, सुप्रसिद्ध नाटककार श्री. विद्याधर गोखले. अध्यक्ष होते डॉ. ग. त्र्यं. देशपांडे आणि प्रमुख अतिथी म्हणून आवर्जून आले होते सुप्रसिद्ध विनोदी लेखक श्री. रमेश मंत्री.

दीप प्रज्वलनाने उद्घाटन झाले आणि टाळयांच्या कडकडाटात सरस्वतीचे पूजन व वि. सा. संघाच्या संस्थापकांचे, कै. अण्णासाहेब खापर्डे यांचे कृतज्ञ पुण्यस्मरण.


ह्या समारंभात सर्व माजी संघाध्यक्ष आणि संमेलनाध्यक्ष यांचा शाल आणि श्रीफळ देऊन अध्यक्षांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. रंगमंदिर उभारतांना उदार देणगी देणारे धनवटे कुटुंबीय, यांचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित असलेले श्रीमंत बाबूरावजी धनवटे ह्यांचाही आवर्जून सत्कार करण्यात आला. सौ. कुमुदताई पाठक यांचे ह्या कार्यक्रमातील सहकार्य उल्लेखनीय.

हीरक महोत्सवाच्या निमित्ताने युगवाणीचा एक विशेषांक काढण्यात आला. त्यात चंद्रपूरचे वयोवृद्ध साहित्यिक व विदर्भ साहित्य संघाचे जुने हितचिंतक कार्यकर्ते सा. भू. तु. ना. काटकर ह्यांनी, अत्यंत परिश्रमाने लिहिलेला विदर्भ साहित्य संघाचा महाकाय इतिहास संक्षिप्त करून दिलेला आहे. आणि हेच ह्या अंकाचे वैशिष्टच. ह्या अंकाचे संपादन श्री. प्रकाश देशपांडे यांनी केले.


विदर्भ साहित्य संमेलनाध्यक्षांच्या आजवरच्या सर्व भाषणांचा संग्रह देखील ह्यानिमित्ताने ग्रंथरूपाने काढण्यात आला. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने तदर्थ अनुदान त्याकरिता दिले. वि. सा. संघ याकरिता ऋणी आहे.




हीरक महोत्सव प्रसंगी विदर्भ साहित्य संघाध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर साहित्य संघाचा इतिहास सादर करताना व्यासपीठावर पूर्वाध्यक्ष आणि संमेलनाध्यक्ष.



हीरक महोत्सवात विदर्भ साहित्य संघाध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर रसिकांचे स्वागत करताना




हीरक महोत्सवाचे प्रमुख अतिथी श्री. रमेश मंत्री यांचे स्वागत करतांना वि. सा. संघाध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर.



हीरक महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी उद्घाटक म्हणून भाषण करताना श्री. विद्याधर गोखले.

ह्या हीरक महोत्सवी पर्वात डॉ. यू. म. पठाण, समीक्षक श्री. धों. वि. देशपांडे (अश्मसार), मा. तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी, व्यंगचित्रकार श्री. मनोहर सप्रे यांची व्याख्याने आयोजित करण्यात

झाली होती. गणेश व्याख्यानमालेत डॉ. यू. म. पठाण "समर्थ रामदास–व्यक्ती वाङ्मय" ह्या विषयावर दिनांक १६–१–१९८३ आणि दिनांक १७–१–१९८३ ह्या दोन दिवशी बोललेत तर कै. ना. के. बेहरे व्याख्यानमालेत मंगळवार दिनांक १८–१–१९८३ रोजी प्रा. श्री. धों. वि. देशपांडे (अश्मसार) यांचे "व्यक्ती, समाज आणि समाजवाद" ह्या विषयावर सुश्राव्य व्याख्यान झाले. बुधवार




डॉ. यू. म. पठाण कै. ना. के. बेहरे व्याख्यानमाला गुंफताना.

दिनांक १९–१–१९८३ रोजी मा. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी कै. ए. श्री. पटवर्धन व्याख्यानमालेला प्रारंभ केला. त्यांच्या व्याख्यानाचे विषय होते "भारतीय नीतिमीमांसा" आणि "भारतीय राजनीतिमीमांसा." बुधवार दिनांक १९ आणि गुरुवार दिनांक २० ह्या दोन्ही दिवशी शास्त्रीबुवांनी फार मोठी बौद्धिक मेजवानीच दिली. सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार श्री. मनोहर सप्रे यांनी "विनोद एक साहित्य प्रकार" ह्या विषयावर अतिशय विनोदी पद्धतीने बोलून श्रोत्यांना जागच्या जागी खिळवून ठेवले. व्याख्यानमालांच्या ह्या सात दिवसांच्या कार्यक्रमात नागपूर रसिकांना साहित्यक आणि बौद्धिक मेजवानीच मिळाली आणि नागपूरकरांनीही त्याचा आनंद मनमुराद लुटला.

कै. कवि अनिल, विदर्भ साहित्य संघाचे भूषण आणि भूतपूर्व आधारस्तंभ. त्यांच्या पावन-स्मृतीला अभिवादन करण्याकरिता त्यांच्याच काव्यावर आधारलेला "अनिल–स्मृती" हा कार्यक्रम खास म्हणून मंगळवार दिनांक १८–१–८३ रोजी रात्री ९ वाजता सादर करण्यात आला. प्रा. शिरीष देशपांडे, सौ. आशावती देशपांडे, सौ. सुलभा हेर्लेकर, श्री. गोपाळ कौशिक, सौ. विद्यावती केतकर, सौ. कुसुम चाफळे आणि त्यांचे इतर साथीदार यांनी ह्या आगळ्या कार्यक्रमाची खूपच वेगळी आखणी केली होती. त्यामुळे हा कार्यक्रम अंतःकरणाला स्पर्श करून गेला. दि. १५–१–८३ ला मुंबईच्या

सौ. शुभदा पराडकर ह्यांच्या शास्त्रोक्त गायनाचा बहारदार कार्यक्रम रंगला. अनोखे आणि कठीण राग व विशेषत: स्त्रियांकडून क्वचितच ऐकायला मिळणारा 'टप्पा' आणि भजनी ऐकवून त्यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.




हीरक महोत्सवात. सौ. पराडकर शास्त्रोक्त संगीत सादर करताना.


विदर्भातील काही नव्या-जुन्या आणि प्रथितयश व उदयोन्मुख अशा कवींच्या काव्यांचे आणि कथाकारांच्या कथांचे हीरकमहोत्सवाच्या निमित्ताने खास आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे सोमवार दिनांक १७-१-८३ आणि बुधवार दिनांक १९-१-८३ ह्या दोन रात्री ह्या दोन कार्यक्रमांनी अक्षरश: भावचिंब ओल्या झाल्या.

सोमवार दिनांक १७-१-८३ च्या कविसंमेलनाचे आयोजन केले होते सौ. सुलभा हेर्लेकर यांनी. अध्यक्षस्थानी होते प्राचार्य राम शेवाळकर. ठीक रात्री ९ वाजता कवि संमेलनाला प्रारंभ झाला. ह्या कविसंमेलनात श्री. पुरुषोत्तम पाटील (धुळे), नारायण कुळकर्णी कवठेकर (खुर्द जि. अकोला), शंकर बडे (यवतमाळ), देविदास सोटे (वर्धा), श्रीकांत राय (अकोला), सुधाकर गायधनी (नागपूर), वामन निंबाळकर (नागपूर), सौ. ज्योती लांजेवार (नागपूर), सौ. रंजना विगम (नागपूर), बाळकृष्ण बन्नोरे (नागपूर), सौ. प्रतिमा इंगोले (दर्यापूर), राजा धर्माधिकारी (नागपूर), गजानन सावरकर (अकोला), सुखदेव ढाणके (आर्वी), मनोहर चव्हाण (दर्यापूर), सौ. सुशिला पगारिया (जळगाव) आणि स्वत: सौ. सुलभा हेर्लेकर ह्यांनी भाग घेतला. प्रा. राम शेवाळकर यांनी विनोदाचा शिडकावा करीत करीत बैठकीला रंग भरला आणि श्रोत्यांनीही काव्याचा मनमुराद आनंद लुटला.

कथाकथनाचा कार्यक्रम बुधवार दिनांक १९-१-१९८३ रोजी रात्री ९ वाजता झाला. आयोजन केले होते सौ. वर्षा रेगे यांनी. त्याचे अध्यक्षस्थान स्वीकारले होते श्री. बाजीराव पाटील



हीरक महोत्सव प्रसंगी कविसंमेलन.



हीरक महोत्सव प्रसंगी रसिकांची तुडुंब गर्दी.


यांनी. ह्या कथाकथनाच्या कार्यक्रमात प्रा. नवनीत देशमुख (वर्धा), श्रीमती संजीवनी देशमुख (यवतमाळ), श्री. वसंत निगवेकर (नागपूर), सौ. प्रतिमा इंगोले (दर्यापूर), श्री. गोविंद गोडबोले

(नागपूर), श्री. प्रभाकर घोटे (नागपूर), श्री. सुरेश गांजरे (यवतमाळ) आणि सौ. वर्षा रेगे (नागपूर) यांनी भाग घेतला. एका मागून एक उत्तम कथांची मेजवानी मिळाल्याने श्रोतृवृंद खुष होता.

सहकारी नाटच संस्था, नागपूर यांचे विदर्भ साहित्य संघाला सतत सहकार्य लाभत आलेले आहे. हीरक महोत्सवी पर्वात ह्या संस्थेने संगीत सौभद्र हे नाटक रविवार दिनांक १६ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजता सादर केले. ह्या नाटकाची शताब्दी साजरी होत असतांना हे नाटक सादर करून संस्थेने तेही औचित्य साधले. हे संगीत नाटक येथील भिडे कन्या शाळेतील विद्यार्थिनींनी अत्यंत समर्थपणे सादर केले. षोडशवर्षीय बालिकांनी गाण्यात भरलेला रंग काही और होता. थेट बाल गंधर्व आणि शिलेदार कुटुंब यांच्या गाण्याची आठवण यावी इतके ह्या मुलींचे गाणे रंगले होते. ह्या नाटकासाठी डॉ. मधुकर कुंडले आणि त्यांचे इतर सहकारी यांनी जे परिश्रम घेतले ते मोलाचे आहेत. याच दिवशी रात्री ९ वाजता सौ. मीरा चंद्रशेखरन् आणि चमूचा नृत्याचा कार्यक्रम झाला.

श्री. विद्याधर गोखल्यांचे तर साहित्यसंघावर अपार प्रेम. त्यांनी रंगशारदा प्रतिष्ठान मुंबई द्वारा, गुलशन हा गीत आणि गझल ह्यांचा मेळ घालणारा सुरेख संगीतभरा कार्यक्रम आणि संपूर्ण महाराष्ट्रात गाजलेला 'मदनाची मंजिरी' हा संगीत नाटचप्रयोग गुरुवार आणि शुक्रवार दिनांक २० आणि २१ रोजी सादर करून महोत्सवाची शोभा वाढविली.

परीक्षा समितीने शनिवार दिनांक १५-१-८३ रोजी दुपारी ३ वाजता भूतपूर्व परीक्षा-संचालकांचा सन्मान केला. गुरुवार दिनांक २०-१-१९८३ रोजी विविध प्रकारच्या स्पर्धा आयोजित केल्या. परीक्षा समितीने वक्तृत्व व कथाकथन ह्यांच्या विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा घेतल्या. ह्याही उपक्रमाला विदर्भातून उचित प्रतिसाद मिळाला.



डॉ. द. भि. कुळकर्णी यांना हीरक महोत्सवात साहित्यवाचस्पती पदवी देतांना समारोहाचे अध्यक्ष डॉ. ग. त्र्यं. देशपांडे.

शेवटच्या दिवशी म्हणजे शुक्रवार दिनांक २१-१-१९८३ रोजी मा. श्री. त्र्यं. गो. देशमुख ह्यांचे अध्यक्षतेखाली भारत सरकारचे नभोवाणी राज्यमंत्री मा. एन. के. पी. साळवे ह्यांच्या हस्ते विनोबा भवनाच्या वास्तूची कोनशिला ठेवल्या गेली. ह्या औचित्यपूर्ण योजनेची प्रशंसा करून तिच्या यशस्वितेसाठी सर्वांच्या सहकार्याची मान्यवरांनी अपेक्षा केली.

समारोहाच्या या सप्ताहभर मॅजेस्टिक प्रकाशन, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, ग्रंथाली व नागपूर पब्लीशर्स असोसिएशन ह्या संस्थांतर्फे ग्रंथ प्रदर्शन भरले होते. ह्या प्रदर्शनास दररोज अलोट गर्दी रहात होती. नागपूर व बाहेरगावाहून आलेल्या साहित्यिकांनी व मान्यवरांनी ह्या प्रदर्शनास भेट देऊन या उपक्रमाचे कौतुक केले. वि. सा. संघाचे शिवाजी संदर्भ ग्रंथालयाचे आमंत्रक श्री. चंद्रकांत कुळकर्णी यांनी हे प्रदर्शन यशस्वी होण्यास विशेष प्रयत्न केले. शासकीय वाचनालय व वि. सा. संघातर्फे शिवाजी संदर्भ ग्रंथालयात वैदर्भीय लेखकांच्या ग्रंथाचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. तसेच श्री. चंद्रकांत चन्ने व दीपक जोशी यांनी अत्यंत परिश्रम घेऊन विदर्भ कला प्रदर्शन भरविले होते. ह्यात विदर्भातील अनेक मान्यवर कलाकारांच्या कलाकृती प्रदर्शित केल्या होत्या.

अशा प्रकारे विदर्भातील नवे जुने साहित्यिक, रसिक आणि विविध क्षेत्रातील तंत्रज्ञ आणि कलावंत ह्यांनी उत्स्फूर्त सहकार्य देऊन हा आठ दिवस चाललेला सोहोळा सहज सफल केला. ह्या सर्व यशाचे श्रेय साहित्य संघाचे अध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर, सरचिटणीस श्री. बाळासाहेब लिमये आणि धनवटे रंग मंदिराचे आमंत्रक श्री. मनोहर म्हैसाळकर आणि साहित्य संघाचे इतर सर्व पदाधिकारी यांनाच द्यावे लागते. साहित्यावरील निस्सीम प्रेमामुळे सर्व जण मतभेद विसरून एकाच व्यासपीठावर येऊ शकतात हे ह्या कार्यक्रमांनी पुन्हा सिद्ध केले. ह्या सहकार्याच्या भावनेवर साहित्य संघाची प्रगती अशीच होत राहील यात शंका नाही.

△ △ △

कार्यवृत्त

अ. ल. लिमये
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ

(डिसेंबर १९८२ ते मार्च १९८३)

१७ नोव्हेंबर १९८२ पूज्य विनोबा भावे ह्यांच्या दुःखद निधनाबद्दल शोकसभा घेऊन श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

२७ नोव्हेंबर १९८२ कै. ग. त्र्यं. माडखोलकर ह्यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या फोटोस पुष्पहार घालून स्मृतिदिन साजरा करण्यात आला.

८ डिसेंबर १९८२ कै. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांच्या फोटोस प्रा. भास्कर नंदनवार यांचे हस्ते पुष्पहार घालण्यात आला.

१४ डिसेंबर १९८२ महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध साहित्यिक व कवि कै. ग. दि. माडगुळकर
२३ जानेवारी १९८३ व कै. राम गणेश गडकरी,
२६ जानेवारी १९८३ कै. लोकनायक बापूजी अणे ह्यांचे स्मृतिदिन साजरे करण्यात आले.

२६ जानेवारी १९८३ प्रजासत्ताक दिनानिमित्त सकाळी ९-०० वाजता डॉ. मधुकर आष्टीकर अध्यक्ष, विदर्भ साहित्य संघ यांचे हस्ते ध्वजारोहण समारंभ पार पाडला.

३० जानेवारी १९८३ राष्ट्रपिता महात्मा गांधी ह्यांचे स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या फोटोस पुष्पहार घालून व सकाळी ११-०० वाजता दोन मिनिटाचे मौन पाळून स्मृतिदिन साजरा करण्यात आला.

१० फेब्रुवारी व
२६ फेब्रुवारी १९८३ कै. नरहर कुरुंदकर व स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर ह्यांचे स्मृतिदिनानिमित्त त्यांचे फोटोस पुष्पहार घालून स्मृतिदिन साजरा करण्यात आले.

१५ व १६ मार्च १९८३ श्री. प्र. वा. मोकाशी व त्यांच्या कुटुंबियांनी बँकेत ठेवलेल्या विश्वस्त निधीतून दरवर्षीप्रमाणे दिनांक १५ व १६ मार्च १९८३ ह्या दोन दिवशी सायंकाळी ६-३० वाजता सुप्रसिद्ध कीर्तनकार श्री. राजाभाऊ दिग्रसकर कारंजा (लाड) ह्यांचे "ईश्वर भक्तिमार्ग" ह्या विषयावर नारदीय कीर्तने झालीत.

शाखा वृत्त

(डिसेंबर १९८२ ते मार्च १९८३)

वि. सा. संघ शाखा : लाखनी :

(१) दिनांक २८-११-१९८२ रोजी रविवारला दुपारी ४ वाजता वि. सा. संघ शाखा लाखनी तर्फे पू. विनोबा भावे यांना शाखाध्यक्ष श्री. ह. प्र. बोरकर यांचे अध्यक्षतेखाली शोकसभा होऊन श्रद्धांजली वाहण्यात आली.

(२) वि. सा. संघ शाखा लाखनी तर्फे दिनांक २६ जानेवारी १९८३ रोजी "राष्ट्रीय गीत गायन" स्पर्धेचा कार्यक्रम आमदार अॅड. भाऊसाहेब दलाल ह्यांचे उपस्थितीत व प्रा. राम ठेंगडी

ह्याचे अध्यक्षतेखाली पार पडला. वरील स्पर्धेत एकूण ३१ स्पर्धकांनी भाग घेतला होता व त्यांना बक्षिस व प्रशस्ती पत्रे देण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाखेचे कार्यवाह श्री. द. सा. बोरकर यांनी तर अध्यक्ष श्री. ह. प्र. बोरकर ह्यांनी आभार प्रदर्शन केले.

(३) दिनांक २६–२–१९८३ ला स्वातंत्र्यवीर बॅ. वि. दा. सावरकर यांच्या जन्म-शताब्दी निमित्त परिसंवाद आयोजित करण्यात आला. परिसंवादात प्रा. राम ठेंगडी व प्रा. गो. तु. पोहरकर ह्यांचे अनुक्रमे "क्रांतीवीर सावरकर आणि सावरकरांचे राजकीय चिंतन" या विषयावर माहितीपूर्ण व विद्वत्ताप्रचुर भाषणे झालीत. अध्यक्षस्थानी वि. मा. शि. संघाचे अध्यक्ष श्री. व. कृ. हुकरे हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. द. सा. बोरकर व अतिथींचे स्वागत उपाध्यक्ष प्रा. दि. प. लाखनीकर ह्यांनी केले.

वि. सा. संघ शाखा मूल :

शाखेच्या वतीने दिनांक २८ ऑक्टोबर ८२ ला गुरुकुंज मोझरीचे श्री. राम महाराज इंगोले यांचे "रामायणातील शिकवणुकीचे आजच्या काळात महत्त्व" या विषयावर प्रवचन झाले.

दिनांक १३ नोव्हेंबर १९८२ रोजी पं. नेहरू जयंतीनिमित्त क्षेत्रीय प्रचार कार्यालय चंद्रपूर व वि. सा. संघ शाखा मूलचे वतीने परिसंवाद आयोजित करण्यात आला. अध्यक्षस्थानी शाखाध्यक्ष प्राचार्य वि. ना. घोटे होते. परिसंवादात श्री. यशवंत भुते यांनी पं. नेहरूंचे जीवनावर, सौ. शोभाताई फडणविस यांनी सहकार व शेती, प्रा. नाना पाटील यांनी अणुशक्ती विज्ञान तर प्रा. रमेश देहलकर यांनी 'सांसदीय लोकशाही व धर्मनिरपेक्षता' या विषयावर विचार व्यक्त केले. क्षेत्रीय प्रचार अधिकारी श्री. रामचंद्र पुजारी यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे संचालन शाखेचे सचिव श्री. शशिकांत धर्माधिकारी यांनी केले.

आंतरराष्ट्रीय ख्याती प्राप्त मुंबईचे चित्रकार श्री. ए. जे. अलमेलकर यांचे दिनांक १३ डिसेंबर १९८२ ला दुखःद निधन झाले. त्याबद्दल वि. सा. संघाच्या मूल शाखेने दुखवटा व्यक्त केला. मागील वर्षी दिनांक ७ नोव्हेंबर १९८२ ला शाखेने त्यांचा सत्कार केला होता.

हिंगणघाट शाखा :

दिनांक २१ जानेवारी १९८३ ला वि. सा. संघ हिंगणघाट शाखेची सर्व साधारण सभा घेण्यात आली व त्यात सर्वानुमते खालीलप्रमाणे स्थायी समितीची निर्मिती करण्यात आली.

मार्गदर्शक	–	प्रा. पं. वि. हुलके
अध्यक्ष	–	प्रा. भा. वि. रागीट
उपाध्यक्ष	–	श्री. म. न. घाटुर्ले
सरचिटणीस	–	श्री. बी. जी. खेरकार
चिटणीस	–	श्री. से. रा. खेडकर
कोषाध्यक्ष	–	श्री. क. या. मुळे

कार्यकारी सदस्य –(१) प्रा. श्री. मनोहर तरार (२) श्री. बी. सी. बागदे (३) श्री. र. म. टपाले (४) कु. साधना सरकार (५) कु. जया हरकुडे.

परीक्षा समिती –(१) प्रा. शेष तळपेकर (२) डॉ. प्रा. कु. उषा साजापूरकर (३) कु. शीला पारभे (४) प्रा. पी. एम. चौधरी (५) श्री. भो. म. वाळके.

सांस्कृतिक समिती–(१) डॉ. म. गं. कावळे (२) प्रा. मनोहर तरार (३) प्रा. गिरधी कुबडे (४) श्री. भ. वा. घाटे (५) कु. माधवी कुणावार.

शाखेचा उद्घाटन समारंभ महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध नाटककार व साहित्यिक सन्माननीय डॉ. मधुकर आष्टीकर अध्यक्ष वि. सा. संघ नागपूर यांच्या शुभ हस्ते सन्माननीय श्री. अ. ल. लिमये सरचिटणीस वि. सा. संघ नागपूर यांचे प्रमुख उपस्थितीत व सन्माननीय डॉ. पी. जी. खोब्रागडे सर्जन हिंगणघाट यांचे अध्यक्षतेखाली शनिवार दिनांक ५ फेब्रुवारी १९८३ रोजी दुपारी ३-३० वाजता रा. सु. बिडकर महाविद्यालयाच्या प्रांगणावर संपन्न झाला.

अकोला शाखा

दिनांक ४, ५ व ६ डिसेंबर १९८२ रोजी संतश्रेष्ठ गुलाबराव महाराज यांचे स्मृती प्रित्यर्थ व्याख्यानमाला आयोजित केली होती.

ब्रह्मपुरी शाखा :

वि. सा. संघ ब्रह्मपुरी शाखेच्या वतीने दिनांक ८ व ९ जानेवारी १९८३ रोजी प्राचार्य राम शेवाळकर यांची व्याख्यानमाला आयोजित केली होती. श्री शेवाळकरांनी "श्रीकृष्ण व द्रौपदी" या विषयावर दोन व "ताटी उघडा ज्ञानेश्वरा" या विषयावर एक अशी तीन व्याख्याने दिली. भगिनी मंडळ सभागृहात हा कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रमाचे संयोजन व समारोप श्री. मनोहर शिनखेडे यांनी केले.

दिनांक १३ जानेवारी १९८३ रोजी स्वामी श्री. पितांबरानंद, संचालक रामकृष्ण आश्रम मद्रास यांचे "स्वामी रामकृष्णांचा संदेश" या विषयावर भगिनी मंडळ सभागृहात प्रवचन आयोजित करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. टेंभरे हे होते. प्रा. श्री. हाजरा यांनी स्वामीजींचा परिचय करून दिला. सरचिटणीस श्री. राजाभाऊ भट यांनी आभार मानले. कार्यक्रमाला नागरिकांची चांगली गर्दी होती.

दि. २६ जानेवारी ८३ रोजी ब्रह्मपुरी शाखेच्या वतीने "नागपूरचे नवोदित कवि श्री. राजा धर्माधिकारी यांच्या वऱ्हाडी गीत गायनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. प्रारंभी सरचिटणीस श्री. राजाभाऊ भट यांनी त्यांचा परिचय करून दिला. सुरुवातीला नगरातील काही निमंत्रित कवींनी आपल्या कविता सादर केल्या. या कार्यक्रमात श्री. सतीश शिनखेडे, नंदकिशोर भाई, कु. अंजू रामपायले, सौ. सोनपिपरे, श्री. फडके, संजय देव, प्रवीर चौरीकर, कृष्णा नाईक इत्यादी कवींनी भाग घेतला. त्यानंतर सुमारे दोन तास श्री. धर्माधिकारी यांनी आपल्या वऱ्हाडी कविता सादर केल्या.

दि. ५ ते ९ फेब्रुवारी १९८३ पर्यंत स्व. मनिलाल जीवानी स्मृति एकांकिका स्पर्धा आयोजित केल्या होत्या. ह्यात १५ संस्थांनी आपले प्रयोग सादर केलेत. स्पर्धा "अ" आणि "ब" अशा दोन गटात झाल्यात. व्यवसायी गटात १० तर "ब" म्हणजे शालेय गटात ५ संस्थानी आपल्या एकांकिका सादर केल्या. दि. ५ रोजी आमदार श्री. बाबासाहेब खानोलकर यांचे हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. तर बक्षिस वितरण दि. ९ रोजी शेवटची एकांकिका झाल्यानंतर ग्रंथालय संचालक, श्री. वहांदे साहेब, मुंबई ह्यांचे हस्ते झाले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. राम तेलंग, चंद्रपूर, प्रा. विजय हंबरडे, नवरगांव, श्री. संजय सुरडकर, नागपूर ह्यांनी काम केले. ह्या स्पर्धेचे हे तिसरे वर्ष होते. ब्रह्मपुरी सारख्या ठिकाणी सतत ३ वर्षे ही स्पर्धा उत्साहाने व आनंदाने पार पडत आहे ह्यातच वि. सा. संघ ब्रह्मपुरी शाखेचे संपूर्ण कर्तृत्व सामावले आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकर जन्म शताब्दी वर्षानिमित्त नागपूरचे कथाकार श्री. मधुकरराव नानोटी ह्यांचे समयोचित भाषण दि. १० नोव्हें. रोजी सायंकाळी ६ वाजता झाले. श्री. अरुण मुन्शी

ह्यांनी प्रास्ताविक व वक्त्यांचा परिचय करून दिला. सरचिटणीस श्री. भट यांनी आभार मानले. कुं. साधना घाटे ह्यांनी म्हटलेल्या वंदेमातरम् गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

सुप्रसिद्ध सिनेकलावंत श्री. मोहन कोठीवान आणि दिग्दर्शक श्री. मदन गडकरी ह्यांची श्री. ब्रम्हपुरीकर नाटच रसिकांशी चर्चा घडवून आणण्याचा एक आगळा कार्यक्रम ब्रह्मपुरी शाखेने दि. १० डिसेंबर १९८२ रोजी लोकमान्य टिळक वाचनालयात पार पाडला. प्रा. श्री. राजन जयस्वाल ह्यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. टेंभरे ह्यांनी स्वागत केले. श्री. मोहन कोठीवान ह्यांनी आपल्या भाषणात नाटच आणि सिनेमा जगतात त्यांना आलेले विविध अनुभव कथन केले.

श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालय, नागपूर कार्यवृत्त डिसेंबर १९८२ ते मार्च १९८३

१. १९ डिसेंबर १९८२ रोजी "आस्वाद" या मालेतील दुसऱ्या कार्यक्रमात डॉ. मदन कुळकर्णी यांनी "आक्रांत" कादंबरीवर आपले विचार व्यक्त केले.

२. दिनांक १–१–१९८३ रोजी "नवे ग्रंथ नवे समीक्षक" मालेतील कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात श्री. विनोद इंदुरकर "नाटचनिर्मिती" आणि प्रा. सौ. श्रद्धा महाशब्दे यांनी 'गदिमांच्या सहवासात' या ग्रंथावर, समीक्षण केले.

३. दिनांक २०–२–१९८३ रोजी "नवे ग्रंथ नवे समीक्षक" कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात सौ. कल्याणी पिंपळापुरे व सौ. धनश्री क्षीरसागर यांनी समीक्षण केले.

४. २० मार्च १९८३ रोजी मर्ढेकर स्मृतिदिन साजरा करण्यात आला. याच प्रसंगी डॉ. सौ. आशा सावदेकर यांनी "मला उमजलेले कवि मर्ढेकर" या विषयावर व्याख्यान दिले.

△ △ △



हीरक महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी श्री. रमेश मंत्री पाहुणे म्हणून भाषण करताना.

युगवाणी [Yugwani] Regd No. NGP/207

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

विक्रीस तयार असलेली प्रकाशने

पुस्तके		किंमत
१	कै. हरिभाऊ नेने यांचा संशोधन लेखसंग्रह, भाग २	६-००
२	दि वेदस्थान ऑफ दि एन्शन्ट होम ऑफ दि इन्डो आर्यन्स : ले. कै. डॉ. तु. ज. केदार	६-००
३	प्रयोगक्षम मराठी नाटके : डॉ. मु. श्री. कानडे	३०-००
४	मराठी वर्णोच्चार विकास : डॉ. द. ह. अग्निहोत्री	३२-००
५	लोकसाहित्य संपदा : ना. रा. शेंडे	१२-००
६	केशवसूत वाङ्मय सूची : सौ. उज्वला अयाचित	२-००

कै. गडकरी वाङ्मयावरील प्रबंध

१	सतारीचे नव्हे एकतारीचे बोल : व. पि. तेंडूलकर	१-००
२	गडकऱ्यांची नाट्यशैली : प्रा. रु. पां. पांजणकर	१-२०
३	गडकऱ्यांची खरी भूमिका : प्रा. भ. श्री. पंडित	१-००
४	गडकऱ्यांची नाट्यप्रकृती व नाट्यसृष्टी : वसंत वरखेडकर	१-२०
५	आणखी गडकरी डॉ. मधुकर आष्टीकर	१०-००

अमराठी भाषिकांना मराठी व्याकरणाचा अभ्यास करण्याकरिता सहज सोपे पुस्तक

१	हिंदी मराठी भाषा प्रवेशिका द्वितीयावृत्ती : श्रीमती मालतीबाई श्रीखंडे	४-००
२	तीन भाषणे गणेश व्याख्यानमाला १९७७ (प्र. आ.) डॉ. र. श. केळकर	४-००
३	'प्रातिश्न' लघुकथा संग्रह १९८०	२०-००
४	समग्र वजावा	२०-००

रसिकांनी ह्या ग्रंथांकरिता सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झांशी राणी चौक, नागपूर १२ यांना त्वरित लिहावे.

प्रकाशक : अ. ल. लिमये, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झांशी राणी चौक, नागपूर-१२
मुद्रक : मधुसूदन पांडुरंग वनहट्टी, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर-१२